# राजकीय पक्षाच्या विचारसरणी संदर्भात शिवसेनेच्या 'सामना' या मुखपत्राचा अभ्यास.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

आधुनिक शास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये विद्याशाखेंतर्गत

पत्रकारिता आणि जनसंज्ञापन या विषयांतर्गत पीएच.डी.
(विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध.


**संशोधक**
श्री. सुकृत खांडेकर

**मार्गदर्शक**
डॉ. दीपक ज. टिळक

पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**मे २०२२**

–:प्रतिज्ञापत्र:–

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, ‘राजकीय पक्षाच्या विचारसरणी संदर्भात शिवसेनेच्या ’सामना’ या मुखपत्राचा अभ्यास’ हा शोधप्रबंध मी डॉ. दीपक टिळक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधनात साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठात पीएच. डी. (पत्रकारिता आणि जनसंज्ञापन) पदवीसाठी प्रस्तुत शोधप्रबंध सादर करण्यात येत आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

**ठिकाण** : मुंबई (श्री. सुकृत खांडेकर)

**दिनांक** : **संशोधक**

## *-: प्रमाणपत्र :-*

मी असे प्रमाणित करतो की, ‘राजकीय पक्षाच्या विचारसरणी संदर्भात शिवसेनेच्या ’सामना’ या मुखपत्राचा अभ्यास’ या शीर्षकाचा प्रस्तुत शोधप्रबंध हा श्री. सुकृत खांडेकर यांचे स्वतःचे लिखाण असून, ते माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे. या लेखनासाठी वापरण्यात आलेल्या शोध साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे पीएच. डी. (पत्रकारिता आणि जनसंज्ञापन) पदवीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठिकाण** :

(डॉ. दीपक ज. टिळक)

**दिनांक** :

**मार्गदर्शक**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती व माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. दीपक टिळक यांचे मी मनपूर्वक आभार मानतो. डॉ. टिळक यांच्या संयम, शिफारसी व वेळोवेळी मिळत आलेल्या सूचानांमुळेच मला हे संशोधन कार्य वेळेत पूर्ण करता आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा संशोधन अभ्यास पूर्ण करणे ही मला मिळालेली एक उत्तम संधी प्राप्त झाली आहे.

विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. गीताली टिळक व मास मीडिया विभागाच्या अधिष्ठाता यांचे ही मला उत्तम मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. विद्यापीठाच्या पीएच.डी. आणि मास मीडिया विभागातील सर्वांनी मला दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

तसेच डॉ. भारतकुमार राऊत, माजी संपादक, महाराष्ट्र टाइम्स, मुंबई., डॉ. हेमंत मोरे, सहसंपादक दै. केसरी, सांगली., नरेंद्र वाबळे, अध्यक्ष मुंबई मराठी पत्रकार संघ व संपादक दै. शिवनेर, मुंबई., हर्षल प्रधान, जनसंपर्क अधिकारी, शिवसेना, मुंबई., संतोष तळाशीलकर, धर्मेश शिंदे, रोहित गुरव, राकेश जाधव, सुनील सकपाळ, महेश पांचाळ इत्यादींनी सदर संशोधनपूरक माहिती संकलनात मोलाची मदत केली त्यासाठी त्यांचे मनापासून आभार. सदर संशोधन पूर्ण करण्यासाठी विविध नामवंतांनी दिलेल्या मुलाखतींबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

ॲड. सायबा कांबळे (अध्यापक, लॉ कॉलेज. मुंबई), नेहा रहाटे (भांडुप), राज केतकर, महेंद्र वैती (मुलुंड), शिवसेना, मुंबई.,मनिष राणे (जनरल मॅनेजर, दै. प्रहार, मुंबई) व ज्ञानेश्वर सावंत (एच. आर. हेड.) यांच्या सदर संशोधन कार्यात मिळालेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधन प्रकल्प सादर करण्यासठी डॉ. धनिष्ठा खंदारे, ग्रंथपाल, (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे) आणि ग्रंथालयातील सर्व कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी

आहे. विजय बारभाई, जनसंपर्क अधिकारी (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई मराठी पत्रकार संघ, शिवसेना भवन, मुंबई यांची फार मौलाची मदत झाली.

माझी पत्नी, मुले व नातवंडे यांनी दिलेल्या प्रोत्साहन आणि प्रेमामुळेच दैनंदिन कार्यात व्यस्त असूनही मी हे संशोधन वेळेत पूर्ण करू शकलो. तसेच घरातील सर्व सदस्य, मित्र परिवार आणि नातेवाईक यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

**श्री. सुकृत खांडेकर**

# ❊अनुक्रमणिका❊


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण १** | **प्रस्तावना** | |
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | संशोधनाची गरज | ३ |
| १.३ | विषयाची निवड | ३ |
| १.४ | विषयाचे महत्व | ४ |
| १.५ | संशोधनाची उद्दीष्टे | ५ |
| १.६ | संशोधनाची गृहीतके | ५ |
| १.७ | संशोधनाची व्याप्ती | ६ |
| १.८ | वृत्तपत्रांचा इतिहास: एक आढावा | ६ |
| १.९ | शिवसेनेच्या स्थापनेत मार्मिकची भूमिका | २५ |
| १.१० | शिवसेना : एक राजकीय पक्ष | ३३ |
| १.११ | सामना : एक ज्वलंत मुखपत्र | ७७ |
| १.१२ | बाळासाहेबांची निवडक व्यंगचित्रे | ९१ |
| १.१३ | संशोधनाचा आराखडा | ९६ |
| १.१४ | सारांश | ९७ |
| १.१५ | संदर्भ | ९७ |
| **प्रकरण २** | **पूर्व साहित्याचा अभ्यास** | |
| २.१ | प्रस्तावना | १०० |
| २.२ | शोधप्रबंध व संशोधनासंबंधी लेख | १०० |
| २.३ | इतर राज्यातील निवडक राजकीय पक्षांची मुखपत्रे | १०९ |
| २.४ | सारांश | ११० |
| २.५ | संदर्भ | ११० |
| **प्रकरण ३** | **संशोधन पद्धती** | |
| ३.१ | प्रस्तावना | ११७ |
| ३.२ | संशोधन | ११७ |
| ३.३ | माहिती संकलनाची तंत्रे | १२० |
| ३.४ | प्रश्नावली : माहिती संकलनाचे महत्त्वाचे साधन | १२२ |
| ३.५ | संशोधन पद्धती | १२३ |
| ३.६ | संशोधनाची शास्त्रोत्तक बैठक | १२५ |
| ३.७ | संशोधन गट समूह | १२९ |
| ३.८ | संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा | १३० |
| ३.९ | सारांश | १३० |

| | | |
|---|---|---|
| ३.१० | संदर्भ | १३१ |
| **प्रकरण ४** | **माहिती विश्लेषण आणि सादरीकरण** | |
| ४.१ | प्रस्तावना | १३३ |
| ४.२ | मुलाखती | १३३ |
| ४.३ | प्रश्नावलींचे विश्लेषण आणि स्पष्टीकरण | २२२ |
| ४.४ | सामनातील निवडक अग्रलेखांचे विश्लेषण | २४७ |
| ४.५ | सारांश | २६२ |
| **प्रकरण ५** | **निष्कर्ष आणि शिफारसी** | |
| ५.१ | प्रस्तावना | २६४ |
| ५.२ | मुलाखतीतून निघालेले निष्कर्ष | २६४ |
| ५.३ | प्रश्नावलीतील निष्कर्ष | २७० |
| ५.४ | निष्कर्ष व शिफारसी | २७६ |
| ५.५ | गृहीतक आणि उद्दिष्ट यांची पूर्तता | २७९ |
| ५.६ | पुढील संशोधनाची दिशा | २८० |
| ५.७ | सारांश | २८० |
| | **संदर्भ सूची** | २८२–२८९ |
| | **परिशिष्ट्ये** | २९०–२९५ |

# तक्ता सूची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १.१ | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९० निकाल | ६१ |
| १.२ | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९५ निकाल | ६४ |
| १.३ | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९९ निकाल | ६६ |
| १.४ | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २००४ निकाल | ६९ |
| १.५ | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २००९ निकाल | ७१ |
| १.६ | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ निकाल | ७३ |
| ४.१ | लिंग | २२२ |
| ४.२ | शिक्षण | २२३ |
| ४.३ | शालेय शिक्षणाचे ठिकाण | २२४ |
| ४.४ | महाविद्यालयीन शिक्षणाचे ठिकाण | २२५ |
| ४.५ | रोज वाचली जाणारी वृत्तपत्र संख्या | २२५ |
| ४.६ | वृत्तपत्र कोठे वाचता | २२७ |
| ४.७ | वृत्तपत्र किती वेळ वाचता | २२८ |
| ४.८ | वृत्तपत्र कशासाठी वाचता | २२९ |
| ४.९ | वाचनाला/पाहायला प्राधान्य कशाला | २३० |
| ४.१० | 'सामना' वाचनाचा उद्देश | २३२ |
| ४.११ | वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान | २३३ |
| ४.१२ | शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे पोहोचविण्यात 'सामनाचे'यश | २३४ |
| ४.१३ | जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग | २३५ |
| ४.१४ | बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा–यांपर्यंत पोहोचली | २३६ |
| ४.१५ | 'सामना'तील बातम्या शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत | २३८ |
| ४.१६ | शिवसेना संदर्भातील बातम्यांचे प्रमाण | २३९ |
| ४.१७ | शिवसैनिकांना 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग | २४० |
| ४.१८ | शिवसैनिकांना दिशादर्शक | २४१ |
| ४.१९ | पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामनाचे यश | २४२ |
| ४.२० | मराठी माणसाची अस्मिता ही सामनाची ओळख आहे का ? | २४४ |
| ४.२१ | 'हिंदुत्वाचा पुरस्कार' ही 'सामनाची' ओळख आहे का ? | २४५ |
| ४.२२ | मराठी प्रादेशिक अस्मिता आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवणे | २४६ |

# आलेख सूची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| ४.१ | लिंग | २२२ |
| ४.२ | शिक्षण | २२३ |
| ४.३ | शालेय शिक्षणाचे ठिकाण | २२४ |
| ४.४ | महाविद्यालयीन शिक्षणाचे ठिकाण | २२५ |
| ४.५ | रोज वाचली जाणारी वृत्तपत्र संख्या | २२६ |
| ४.६ | वृत्तपत्र कोठे वाचता | २२७ |
| ४.७ | वृत्तपत्र किती वेळ वाचता | २२८ |
| ४.८ | वृत्तपत्र कशासाठी वाचता | २२९ |
| ४.९ | वाचनाला/पाहायला प्राधान्य कशाला | २३१ |
| ४.१० | 'सामना' वाचनाचा उद्देश | २३२ |
| ४.११ | वृत्तपत्रात अन्य पक्षाच्या बातम्यांना पुरेसे स्थान | २३३ |
| ४.१२ | शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे पोचविण्यात 'सामनाचे'यश | २३४ |
| ४.१३ | जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग | २३५ |
| ४.१४ | बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा–यांपर्यंत पोहोचली | २३७ |
| ४.१५ | 'सामना'तील बातम्या शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत | २३८ |
| ४.१६ | शिवसेना संदर्भातील बातम्यांचे प्रमाण | २३९ |
| ४.१७ | शिवसैनिकांना 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग | २४० |
| ४.१८ | शिवसैनिकांना दिशादर्शक | २४२ |
| ४.१९ | पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामनाचे यश | २४३ |
| ४.२० | मराठी माणसाची अस्मिता ही सामनाची ओळख आहे का? | २४४ |
| ४.२१ | 'हिंदुत्वाचा पुरस्कार' ही 'सामनाची' ओळख आहे का? | २४५ |
| ४.२२ | मराठी प्रादेशिक अस्मिता आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवणे | २४६ |

**प्रकरण १.   प्रस्तावना**

| क्र. | शीर्षक |
|---|---|
| १. १ | प्रस्तावना |
| १.२ | संशोधनाची गरज |
| १. ३ | विषयाची निवड |
| १. ४ | विषयाचे महत्व |
| १. ५ | संशोधनाची उद्दिष्टे |
| १. ६ | संशोधनाची गृहीतके |
| १. ७ | संशोधनाची व्याप्ती |
| १. ८ | वृत्तपत्रांचा इतिहास एक आढावा |
| १. ९ | शिवसेनेच्या स्थापनेत मार्मिकची भूमिका |
| १. १० | शिवसेना एक राजकीय पक्ष |
| १. ११ | सामना : एक ज्वलंत मुखपत्र |
| १. १२ | बाळासाहेबांची निवडक व्यंगचित्रे |
| १. १३ | संशोधनाचा आराखडा |
| १. १४ | सारांश |
| १. १५ | संदर्भ |

## १.१ प्रस्तावना

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दि. १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली आणि शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा दि. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी झाला. त्या सभेत शिवसेनाप्रमुख म्हणाले – महाराष्ट्राला आज खरी गरज आहे, ती महाराष्ट्रवादाची, आज मराठी माणूस जागा झाला आहे. यापुढे तो अन्याय सहन करणार नाही. राज्य सरकारला त्याची दखल घ्यावीच लागेल. जे आमच्यावर आरोप करतात, त्यांना मला सांगायचे आहे की, जर मराठी माणूस प्रांतीयवादी, जातीयवादी नि संकुचित वृत्तीचा असता तर मुंबई ही विश्वबंधुत्वाची झालीच नसती.

काही जण असा आरोप करतात की, शिवसेना हे नाव देऊन आपण शिवाजी महाराजांना प्रांतीयतेचे कुंपण घालत आहोत. पण महाराजांच्या बाजूला जे कुंपण आहे, ते प्रांतीयतेचे नसून, आमच्या श्रध्देचे आहे. ही संघटना जातीय नाही. कारण मराठी माणसाशी संकटात जो मैत्री करतो तोच मराठी. (पुरंदरे, वै. २०१२)

भाषावार प्रांतरचनेच्या सूत्रानुसार मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे यासाठी मराठी माणसाला मोठा संघर्ष करावा लागला. रस्त्यावर आंदोलन करावे लागेल व मुंबईच्या रस्त्यावर संयुक्त महाराष्ट्राला लढयात शेकडो जणांनी रक्त सांडले. लाठीमार, गोळीबार, अश्रुधूर यांची पर्वा न करता सर्वांनी लढा दिला. अगदी बॉम्बेचे मुंबई करण्यासाठीही अनेक वर्षे शिवसेना व अन्य पक्षांतील मुंबईच्या नेत्यांना झगडावे लागले. मद्रासचे चेन्नई करण्यासाठी किंवा त्रिवेंद्रमचे तिरुअनंतपुरम कारण्यासाठी तेथील जनतेला केंद्राशी लढावे लागले नाही किंवा लोकसभेत आक्रोश करावा लागला नाही; परंतु महाराष्ट्र व मुंबईला केंद्र सरकारने नेहमीच सावत्र वागणूक दिल्याने मराठी जनतेला नेहमीच लढे देऊनच आपल्या न्याय्य मागण्या मिळवाव्या लागल्या आहेत.

## १. २ संशोधनाची गरज

प्रादेशिक पक्षाचे मुखपत्र म्हणून आजवर कोणत्याही वृत्तपत्रावर, त्या वृत्तपत्राने केलेल्या कामावर संशोधन झालेले नाही.

राज्याच्या राजकारणात सामनाने विशिष्ट स्थान मिळवले आहे व मराठी वाचकांवर या वृत्तपत्राने जम बसवला आहे. हे यश अन्य कोणत्याही राजकीय पक्षाला मिळाले नाही. शिवसेनेच्या यशामागे सामनाचे योगदान या विषयाशी संबंधित आजपर्यंत संशोधन करण्यात आलेले नाही.

## १. ३ विषयाची निवड

शिवसेना या प्रादेशिक राजकीय पक्षाला पंचावन्न वर्षे पूर्ण झाली. हा पक्ष राज्यात; तसेच मुंबई, ठाणे आणि कल्याण–डोंबिवली या प्रमुख महापालिकांमध्ये सत्तेवर आहे. या पक्षाचे 'सामना' हे मुखपत्र आहे. शिवसेना आपली भूमिका सामनामधून मांडत असते आणि सामना हे सेनेचे आक्रमक वृत्तपत्र अशी त्याची राज्यातच नव्हे, तर देशात ओळख आहे. एका राजकीय पक्षाला त्याच्या मुखपत्राची त्याच्या वाटचालीत किती मदत झाली किंवा होते, याबाबत संशोधन करण्यात आले आहे.

राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना हे चार प्रमुख पक्ष आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस किंवा भाजप यांचे राज्यात मुखपत्र म्हणून दैनिक वृत्तपत्र आहे असे ठामपणे सांगता येणार नाही. कारण या तिन्ही पक्षांशी संबंधित असलेल्या नेत्यांची वृत्तपत्रे आहेत; पण ती त्यांच्या पक्षांची मुखपत्र आहेत, असे म्हणता येणार नाही. शिवसेना असा एकमेव पक्ष आहे की त्याचे अधिकृत मुखपत्र आहे. म्हणूनच शिवसेना व सामना यांचा अभ्यास करताना अनेक नवे पैलू शोधून काढता येतील, असे संशोधकाला वाटते.

## १.४ विषयाचे महत्व

मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी मुंबईत १९६६ मध्ये शिवसेनेची स्थापना झाली. पण त्याचे संस्थापक शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे मुळात पत्रकार – व्यंगचित्रकार होते, हे सर्वांत महत्त्वाचे आहे.

बाळासाहेब ठाकरे हे फ्री प्रेस जर्नल या वृत्तपत्रात व्यंगचित्रकार म्हणून काम करीत असताना मुंबईतील मराठी माणूस परप्रांतीयांच्या वाढत्या गर्दीत दबला जात आहे, हे त्यांनी ओळखले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यावर व मुंबई ही महाराष्ट्राला राजधानी मिळण्यावर सर्व पक्षांचे राजकीय नेते सुस्तावले होते असे त्यांच्या निदर्शनास आले. संयुक्त महाराष्ट्रात मराठी माणसाचे अधिकार व हक्क डावलले जात होते, याकडे कुणाचे लक्ष नव्हते. मराठी माणसाची होणारी घुसमट आणि खंत ठाकरे यांनी त्यांच्या व्यंगचित्रातून मांडायला सुरुवात केली. मार्मिकचा जन्म १९६० आणि शिवसेनेचा १९६६ मार्मिकनंतर शिवसेना स्थापन झाली. जशी शिवसेना फोफावत गेली. तसे या पक्षाला स्वतःच्या वृत्तपत्राची गरज भासू लागली. दैनिक नव्हे सैनिक अशी गर्जना करीत सामना या वृत्तपत्राचा जन्म झाला. सामनाला यंदा तेहतीस वर्षे पूर्ण झाली. शिवसेनेच्या वाटचालीतील सामनाचे योगदान किती आहे, याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे म्हणूनच शिवसेनेच्या जडणघडणीत सामना वृत्तपत्राचे महत्त्व असा संशोधनाचा विषय योजला आहे. पक्षाचे मुखपत्र म्हणून सामनामधून पक्षाची धोरणे, विचार, भूमिका, कार्यक्रम, संघटनात्मक नेमणूक, आदेश, सूचना वाचायला मिळतात. हे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यात सामनाला किती यश मिळाले आहे, पक्षाचे मुखपत्र म्हणून सामना कितपत प्रभावी आहे, पक्ष आपले विचार सामनामधून लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कितपत यशस्वी झाला आहे, याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे असे संशोधकास वाटते.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

शिवसेनेची स्थापना बाळासाहेब ठाकरे यांनी केली व सामना या वृत्तपत्राला त्यांनी जन्म दिला. शिवसेनेवर त्यांची मजबूत पकड होती. अन्य वृत्तपत्रांपेक्षा सामना हे वेगळे वृत्तपत्र आहे. अन्य वृत्तपत्रांत बातम्या असतात किंवा कोणाची तरी बाजू मांडण्यासाठी वा विरोध करण्यासाठी वृत्तपत्रे चालवली जातात. काही उद्योग तर आपल्या व्यवसाय म्हणून वृत्तपत्र चालवतात, पण सामनामध्ये जे प्रसिद्ध होते हे देशपातळीवर दुस-या दिवशी सर्व भाषांतून वाचायला मिळते, कारण त्यात शिवसेनेची भूमिका असते. सदर संशोधनाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे:

१. शिवसेना या पक्षाची भूमिका सामनामध्ये प्रतिबिंबित होते का? ते पाहणे.

२. सामना या वृत्तपत्र माध्यमातून शिवसेनेची भूमिका सर्वसामान्यांपर्यंत पोहोचते का याचा अभ्यास करणे.

३. सामनाचे शिवसेनेच्या वाटचालीतील योगदानाचा अभ्यास करणे.

४. सामनातील बातम्या किंवा अग्रलेख यामागे पक्षाची भूमिका असते. पक्षाच्या भूमिकेला पूरक म्हणून सामनाचा किती उपयोग होतो? हे तपासणे.

## १.६ संशोधनाची गृहीतके:

सदर संशोधनात संशोधकाने खालीलप्रमाणे गृहीतके मांडली आहे:

१. महाराष्ट्र राज्यामध्ये राजकीय पक्षाचे सामना हे एकमेव वृत्तपत्र आहे.

२. शिवसेनेच्या वाटचालीत सामनाचे महत्वपूर्ण योगदान आहे.

३. सामनातील बातम्या व अग्रलेख यामध्ये पक्षाची भूमिका ठामपणे मांडली जाते.

## १.७ संशोधनाची व्याप्ती

संशोधन वेळेत पूर्ण करणे गरजेचे असते म्हणून संशोधकाने सदर संशोधनात काही व्याप्ती ठरविल्या आहेत. सदर संशोधनातील व्याप्ती पुढीलप्रमाणे:

- सामना व शिवसेना या विषयावरील संशोधनाचे कार्यक्षेत्र मुंबई शहरापुरते मर्यादित राहील.

- मुंबईतील राजकारण विषयाची पत्रकारिता करणारे काही निवडक मराठी पत्रकार आणि शिवसेनेचे सर्व स्तरातील आजी व माजी पदाधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

- काही निवडक विरोधी पक्षांचे नेते व विरोधी पक्षांतील लोकांना सामनाविषयी काय वाटते, त्यासंबंधी मुलाखती घेण्यात आल्या.

- भाजपबरोबर केंद्रात व राज्यात सत्तेत सहभागी असूनही सामनातून भाजपवर; तसेच राज्याचे मुख्यमंत्री व देशाच्या पंतप्रधानांवर बेधडक टीका केली जायची, याचे गमक काय व त्याचा पक्षावर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्यात आला आहे .

## १.८ वृत्तपत्रांचा इतिहास : एक आढावा

प्रसारमाध्यमे या शब्दात 'प्रसार आणि माध्यमे' असे दोन शब्द आहेत. प्रसार याचा अर्थ दूरवर पोहोचवणे. एखादी माहिती आपण एखाद्या माध्यमाच्या साह्याने दूरवर पोहोचवू शकतो. पूर्वीच्या काळी राजाला एखादी बातमी संपूर्ण राज्यात पोहोचवायची असेल तर त्यासाठी कित्येक दिवस लागायचे व त्याकरिता गावोगाव दवंडी पिटवत असत. एकाकडून दुस–याकडे, दुस–यांकडून तिस–याला असा बातमीचा प्रवास व्हायचा.

भारतात इंग्रजांचे आगमन झाल्यावर मुद्रणकला, वर्तमानपत्रे सुरू झाली. वर्तमानपत्रांमुळे छापील बातमी सगळीकडे पोहोचण्यास मदत होऊ लागली. वर्तमानपत्र हे  माहितीच्या आणि ज्ञानाच्या प्रसाराचे साधन झाले.

**१. ८.१ वर्तमानपत्र**:

मुख्यतः बातम्या, अग्रलेख, लोकांची मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे 'वर्तमानपत्र' होय. वर्तमानपत्र स्थानिक, देशांतर्गत व जागतिक रूपाच्या विविध बातम्या पुरवण्याचे काम करतात. चालू घडामोडींची नोंद म्हणजे वर्तमानपत्रे आणि हा एक ऐतिहासिक दस्तऐवज समजला जातो.

इजिप्तमध्ये इसवीसन पूर्वकाळात सरकारी आदेशांचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावून ठेवत असत. प्राचीन रोमन साम्राज्यात सरकारी हुकूम कागदावर लिहून काढत व ते कागद प्रांतोप्रांती वाटले जात व सरकारी आदेशांचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावून ठेवत असत. यामध्ये देश व राजधानीतील घटनांची माहिती असे. ज्युलिअस सीझरच्या आधिपत्याखाली 'अकट डायर्न' (डेली रक्त–रोजच्या घटना) नावाची वार्तापत्रे, रोममध्ये सार्वजनिक ठिकाणी लावत. लोकांपर्यंत सरकारी निवेदने पोहोचवण्याचा तो एक प्रभावी मार्ग होता, तर सातव्या शतकात चीनमध्ये सरकारी निवेदने सार्वजनिक ठिकावी वाटत असत. इंग्लंडमध्ये लढायांची किंवा महत्त्वाच्या घटनांची पत्रके अधूनमधून वाटत असत. धर्मशाळांमध्ये उतरणारे प्रवासी, फिरस्ते तेथील स्थानिक लोकांना दूरवरच्या बातम्या रंगवून सांगत असत. राजाचे प्रतिनिधी वेगवेगळ्या ठिकाणी असत ते ताज्या बातम्या राजदरबारात पाठवत. भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र २९ जानेवारी १७८० रोजी सुरू झाले.

’कलकत्ता जनरल अडव्हर्टायझर’ त्याला हिकीज बंगाल गॅझेट असे पण संबोधले जात असे. (लेले, रा. के. २००४).

२९ जानेवारी १७८० रोजी भारतातील पहिले वृत्तपत्र ’बंगाल गॅझेट’ या नावाचे इंग्रजी साप्ताहिक जेम्स हिकीने सरू केले. दुसरे वृत्तपत्र ‘इंडिया गॅझेट’ नावाने नोव्हेंबर १७८० मध्ये कोलकत्ता येथे सुरु झाले. १७८४ मध्ये सरकारच्या अधिपत्याखाली ‘कलकत्ता गॅझेट’ हे वृत्तपत्र निघाले. मद्रासचे सरकारी मुद्रक रिचर्ड जॉन्सन याने १२ ऑक्टोबर १७८५ रोजी ‘मद्रास कुरिअर’ हे वृत्तपत्र सुरु केले. मुंबई मध्ये १७८९ साली ‘बॉम्बे हेराल्ड’ हे पहिले वृत्तपत्र सुरु झाले.

जेम्स हिकी यांनी ‘बंगाल गॅझेट’ मधून मुख्य न्यायाधीशांवर टीका केल्याने त्यांचे मुद्रणालय जप्त करण्यात आले व १७८२ मध्ये त्यांना अटक करण्यात आली. जेम्स यांना भारतीय वृत्तपत्रांच्या इतिहासाचा अग्रदूत म्हणून ओळखले जातं. सॅन १७९९ मध्ये गव्हर्नर जनरल बॉर्ड वेलस्लीने भारतातील सर्व वृत्तपत्रांना बंधने घातली होती. संपादक, मुद्रक व मालक यांचा स्पष्ट अग्रलेख वृत्तपत्रांमध्ये करणे आवश्यक करण्यात आले. सन १९२३ मध्ये वृत्तपत्र परवाना कायदा अमलात आला.

### १. ८.२ मराठी वृत्तपत्रांचा इतिहास :

भारतात प्रारंभी इंग्रजी वृत्तपत्रे सुरु झाली. त्यानंतर पन्नास वर्षांनी स्वतंत्र अशा मराठी वृत्तपत्राला सुरुवात झाली. मुंबईत मुद्रणाची, मुद्रणालयाची सोय आणि वाचकवर्ग असे वृत्तपत्राला अनुकूल वातावरण होते. मुंबई हे बेट १६६१ पासून ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात होते. युरोपीय लोकांच्या सोयीसाठी व इंग्रजी भाषिकांसाठी अगोदर इंग्रजी वृत्तपत्रे निघाली. मुंबईत इंग्रजी वृत्तपत्रे सुरु झाल्यावर ४५ वर्षांनी मराठी वृत्तपत्र सुरु झाली. काही निवडक मराठी वृत्तपत्रांची माहिती पुढीलप्रमाणे:

- **दर्पण:**

दर्पणचा पहिला अंक शुक्रवार ६ जानेवारी १८३२ रोजी बाहेर पडला. प्रथम काही महिने हे पाक्षिक होते, त्यामुळे अनेक विषय पंधरा दिवसांनी लिहिले जात असल्याने ते शिळे होऊन जात. वाचकांनीच हे पत्र साप्ताहिक करण्याची मागणी केली व ४ मे १८३२ च्या अंकापासून दर्पण हे पत्र साप्ताहिक झाले असे दि. २७ एप्रिलच्या अंकात म्हटले आहे.

दर्पणमध्ये मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत मजकूर प्रसिद्ध होत असे. पानातील एकीकडच्या दोन स्तंभांत इंग्रजी मजकूर असे व त्याचेच भाषांतर उजवीकडच्या स्तंभात असे. दर्पण आपण का काढत आहोत ह्या मागची भूमिका बाळशास्त्री जांभेकरांनी स्पष्ट केली होती. स्वदेशीचं लोकांमध्ये विलायतेंतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण या विषयी स्वतंत्रतेच्या व उघड रीतीने विचार करण्यास स्थळ व्हावे या इच्छेने मुंबईत राहणा–या लोकांच्या मनात होते की, दर्पण नावाचे एक न्यूजपेपर म्हणजे वर्तमानपत्र छापून प्रसिद्ध करावे.

दर्पण हे मतपत्र असल्याने वृत्तांपेक्षा लोकांना काहीतरी सांगायला, समजावून द्यायला महत्त्व किंवा प्राधान्य दिले जात होते. त्याकाळी बातम्या मिळवण्याची फारशी साधनेही नव्हती म्हणून जनतेला ज्ञान देऊन प्रबोधन करणे हाच दर्पणचा हेतू होता. सरकारला माहिती देऊन लोकमत राबवण्याचा दर्पण प्रयत्न करत असे. जनता जुनी होती, पण राजवट नवीन होती. सत्ताधारी ब्रिटिशांनाही प्रजा व वातावरण नको होते. राजा आणि प्रजा यांच्यात सांगड घालण्याचे काम दर्पण करत असे. सरकार व जनता यांच्यातला दुवा म्हणूनच दर्पण काम करीत असे.

दर्पण हे पत्र साडेआठ वर्षे चालले. २६ जून १८४० रोजी शेवटचा अंक प्रसिद्ध झाला. दर्पणच्या वर्गणीदारांची संख्या २८० होती. त्याकाळी वर्तमानपत्रांचा खप ३००–४०० असावा अशी नोंद रा. ग. जांभेकर, संपादक बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर खंड ३२ पुणे १९५०, पृष्ठे ८६ असल्याची माहिती मराठी वृत्तपत्रांचा इतिहास (लेले, रा. के, २००४) या पुस्तकात आढळून येते.

- **मुंबई अखबार:**

संपूर्ण मराठी वृत्तपत्र म्हणून मुंबई अखबार व दर्पण हे दोन भाषेत प्रसिद्ध होत असे. ४ जुलै १८४० रोजी मुंबई अखबारचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. या पत्राची किमान ३ महिन्यास ५ पत्रके व आगाऊ दिल्यास ४ पत्र होती. सूर्याजी कृष्णाजी यांनी 'मुंबई अखबार' सुरु केले.

- **प्रभाकर:**

गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ यांनी विजयादशमीच्या दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबर १८४१ रोजी 'प्रभाकर' पत्र सुरु केले. 'मुंबई अखबार' नंतर निघालेले 'प्रभाकर' २० ते २२ वर्षे चालले. भाऊ महाजन हे एकहाती पत्र चालवत होते. प्रत्यकी २ कॉलमची ८ पाने होती. 'दर्पण' बंद पडल्यावर प्रभाकर सुरु झाला. भाऊ महाजन कधी सत्तेपुढे वाकले नाहीत, स्वतंत्र बाणा सोडला नाही. 'प्रभाकर' चालू ठेऊन भाऊंनी १८५३ मध्ये 'धूमकेतू' नावाचे साप्ताहिक सुरु केले. १८५४ मध्ये 'ज्ञानदर्पण' नावाचे त्रैमासिक काढले. विविध प्रातांतील विविध वृत्तपत्रातील उतारे, मजकूर 'प्रभाकर' मध्ये वाचायला मिळे; वाचकांची पत्रे, संपादकीय, टीका–टिपण्णी, सरकारी अधिका-यांच्या नेमणूक–बदल्या, मुंबई बंदरात येणारी जहाजे व प्रवासी यांची नोंद इत्यादी वाचायला मिळत असे. लोकहितवादी सरदार गोपाळराव

हरी देशमुख यांची शतपत्रे प्रभाकर पत्रातच प्रथम प्रसिद्ध झाली. भाऊ महाजनांनी पाश्चत्त्य विद्धेचा स्वीकार केला, प्रसारही केला पण आपली संस्कृती, भाषा या विषयी त्यांचा अभिप्राय कायम दिसून येत असे.

- **ज्ञानसिंधू व ज्ञानोदय:**

ज्ञानसिंधू व ज्ञानोदय ही पत्रे एकाच वेळी म्हणजे १८४२ साली चार महिन्यांच्या अंतराने निघाली. पुण्यातील पहिले मराठी वृत्तपत्र १८४४ साली विरेश्वर छत्रे यांनी काढले. 'मित्रोदय' असे या साप्ताहिकाचे नाव होते. कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी १२ फेब्रुवारी १८४९ रोजी पुरणे येथे ज्ञानप्रकाश हे साप्ताहिक सुरु केले. महाराष्ट्रातील जनतेशी संवाद साधण्यासाठी हंम्पी मिशन यांनी 'ज्ञानोदय' हे मराठी वृत्तपत्र काढले. १८४२ मध्ये सुरु झालेल्या या वृत्तपत्राचे पहिले संपादक हेन्री बॅलेंटाईन होते. ज्ञानोदय हे ७५ पेक्षा जास्त वर्षे चालले.

विरेश्वर ऊर्फ तात्या छत्रे यांनी ज्ञानसिंधू पत्र काढले व हे साप्ताहिक मुंबईतून सुरु केले. ज्ञानसिंधू हे दर सोमवारी प्रसिद्ध होत असे. सुरुवातील मासिक वर्गणी बारा आणे आणि एका प्रतीची किंमत चार आणे होती. ज्ञानसिंधू व प्रभाकर यांचे एकमेकांची खटके उडत असत. एकमेकांच्या चुका काढून वाद घालत.

ज्ञानोदय पत्र हे धर्मप्रसारासाठी प्रकाशित केले जात असे. ज्ञानोदयाच्या प्रकाशनात खंड पडला, नाही नंतर हे मासिक स्वरूपात प्रसिद्ध होत राहिले. जून १८४२ च्या पहिल्या अंकात आशिया खंडाचा नकाशा देण्यात आला होता व १८५१ मध्ये एका अंकात युरोपचा नकाशा प्रसिद्ध करण्यात आला होता. देशात रेल्वे प्रथम मुंबईत आल्याची सविस्तर माहिती ज्ञानोदयने प्रसिद्ध केली होती. देशातील अनेक ऐतिहासिक घटनांची नोंद ज्ञानोदयमध्ये दिसते. १८५७ च्या बंडाची माहिती,

सामाजिक घडामोडी, चळवळी यांचीही नोंद आहे. १८७३ मध्ये लहान मुलांची पुरवणी प्रसिद्ध केली होती.

- **ज्ञानप्रकाश :**

ज्ञानप्रकाशची मालकी गोपाळकृष्ण गोखले यांच्या भारतसेवक समाजाकडे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासून ते वृत्तपत्र १९५० मध्ये बंद होईपर्यंत होती. कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनी 'ज्ञानप्रकाश' हे साप्ताहिक सुरु केले. पहिला अंक १२ फेब्रुवारी १८४९ पासून दर सोमवारी सुरु झाला. याची वार्षिक वर्गणी १० रुपये, ६ महिन्याची ६ रुपये इतकी होती. सुरुवातीला त्याचे स्वरूप आठ पानी होते. १९५३ पासून ते साप्ताहिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागले. १० ऑगस्ट १९०४ पासून दैनिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागले व ज्ञानप्रकाशची मुंबई आवृत्तीही निघाली आणि तेव्हा काकासाहेब लिमये संपादक होते. १ जून १९२९ पासून ते रोज सायंकाळी प्रसिद्ध होत असे, मुंबई आवृत्ती मात्र फार काळ चालवता आली नाही. शंकरराव गोखले यांच्या हाती ज्ञानप्रकाशच्या संपादक पदाची सूत्रे कठीण काळात आली. ज्ञान प्रकाशचे महत्व कायम राखण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. समाजातल्या सर्वांना आधार वाटावा अशी आपुलकी काकासाहेब लिमये यांनी निर्माण केली होती. तोच कित्ता शंकरराव गोखलेंनी गिरवला. ज्ञानप्रकाशचे संपादक म्हणून कृष्णजी त्रिंबक रानडे, वामनराव रानडे, हरी नारायण आपटे, वासुदेव गोविंद आपटे, रामचंद्र मोरेश्वर साने, गोपाळकृष्ण देवधर, नरेश अप्पाजी द्रविड, अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन, बा. मा. आंबेडकर, कृ. ग. ऊर्फ काकासाहेब लिमये, श्री. ग. वझे, शंकर गोविंद गोखले, यांनी काम पहिले.

भारत सेवक समाजाने हे वृत्तपत्र बंद करण्याचे ठरवले तेव्हा महाराष्ट्रातील जनतेने ते बंद करू नका अशी मागणी केली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या

नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने भारतसेवक समाजाचे तेव्हाचे अध्यक्ष पं. हृदयनाथ कुंझरु यांची भेट घेतली. महाराष्ट्राची महान परंपरा एवढया ढिसाळ घाईने मोडू देता काम नये, ज्ञानप्रकाश बंद करणे हे पाप आहे. ते बंद करण्यामागील आर्थिक कारणे पटणारी नाहीत. जनतेला विश्वासात घ्यायला हवे होते असे बजावले पण उपयोग झाला नाही. ज्ञानप्रकाशचा शेवटचा अंक ३१ डिसेंबर १९५० रोजी प्रकाशित झाला. प्र. के. अत्रे यांनी नवयुग माह्ये ४ मार्च १९५१ च्या अंकात ज्ञानप्रकाशचा खून झाला असे लिहिले.

''ज्ञानप्रकाशच्या वाचकांना निरोप'' हा अग्रलेख ३१ डिसेंबर १९५० च्या अंकात शंकररावांनी लिहिला. '१ जानेवारी १९५१ पासून ज्ञानप्रकाश हे शतायुषी पत्र विराम पावले' असा अग्रलेखाचा शेवट केला. ज्ञानप्रकाशच्या वाचकांचा निरोप घेताना माझ्या मनात कल्लोळ आहे, त्यामुळे माझे लिहिलण्याचे सामर्थ्य उरलेले नाही, ज्ञानप्रकाश बंद पडला असला तरी त्याची स्मृती नष्ट होऊ देऊ नये एवढी विनंती आहे असे त्यांनी या अग्रलेखात म्हटले होते. दीर्घकाळ म्हणजे १०३ वर्षे चाललेले हे वृत्तपत्र होते..

- **केसरी** :

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनी एकत्र येऊन 'केसरी' हे वृत्तपत्र सुरू केले. लोकमान्य टिळकांच्या केसरीचा पहिला अंक दि. ४ जानेवारी १८८१ रोजी प्रसिद्ध झाला.

रस्तोरस्ती दिवे लागलेले असल्याने व पोलिसांची सारखी गस्त चालू असल्याने जो उपयोग होत असतो, तोच ज्या ज्या जागी वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी चालू असल्याने होत असतो असे केसरीने अग्रलेखात सुरूवातीला म्हटले होते. वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील होत, हे दोन्ही अधिकार होईल

तितक्या दक्षतेने बजावण्याचा संकल्प आम्ही केला आहे, असे केसरीने आपल्या अग्रलेखातच म्हटले होते. गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी मजकूर छापून लोकांचे मनोरंजन करणे हे काही वर्तमानपत्रकर्त्यांचे मुख्य कर्तव्यब नव्हे असे केसरीने बजावले होते. केसरीची वाटचाल एकेशे चाळीस वर्षांहून अधिक काळ चालू आहे, सुरूवातीला केसरी द्विसाप्ताहिक होते, नंतर जयंतराव टिळकांच्या काळात ते  दैनिक झाले.

- **मूकनायक व बहिष्कृत भारत:**

दि. ३१ जानेवारी १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांच्या प्रगतीमधील तो एक महत्त्वाचा टप्पा होता. अनेक अडचणींमुळे हे पत्र ८ एप्रिल १९२३ रोजी बंद पडले. पुढे त्यांनी बहिष्कृत भारत हे पत्र सुरू केले. या पत्राचा शेवटचा अंक १५ नोव्हेंबर १९२९ रोजी निघाला. अन्यायाच्या विरोधात उभे राहताना मोडेन पण वाकणार नाही, असा त्यांचा बाणा होता. आंबेडकरांचे लिखाण जहाल असायचे. बहिष्कृत भारत, जनता व मूकनायक या तिन्ही वृत्तपत्रांतील त्यांचे लिखाण स्फोटक होते. ही तिन्ही वृत्तपत्रे फार काळ चालली नाहीत. पण त्यांच्या पत्रकारितेची नोंद घेतल्याशिवाय मराठी वृत्तपत्रांचा इतिहासाची सांगता होणार नाही. उपेक्षितांचा आवाज व दलितांच्या वेदनेचा हुंकार मूकनायक व बहिष्कृत भारतमध्ये उमटायचा.

- **नवाकाळ:**

नवाकाळ हे वृत्तपत्र मार्च १९२३ रोजी सुरु करण्यात आले. नवाकाळचे संपादक असलेल्या निळुभाऊ खाडिलकरांना अग्रलेखांचा बादशहा ही वाचकांनीच पदवी दिली होती. अग्रलेख हा वृत्तपत्राचा प्राण असतो असे मानणारे ते होते. अग्रलेख जितका

श्रेष्ठ तेवढे वृत्तपत्र श्रेष्ठ असे ते सांगत. पानभर अग्रेलख म्हणजेच मॅरेथॉन अग्रलेख ही परंपरा निळुभाऊंनी नवाकाळमध्ये सुरू केली. सत्ताधारी जेव्हा जुलूम जबरदस्ती करतात तेव्हा शब्दांचा हातोडा झाला पाहिजे, असे ते म्हणत. जाहीर सभेची बातमी हशां–टाळ्यांसह नवाकाळमध्ये वाचायला मिळायची हे या पत्राचे वैशिष्ट्य होते. आता नवाकाळचे संपादक म्हणून सौ. जयश्री खाडिलकर–पांडे आणि संध्याकाळचे संपादक म्हणून सौ. रोहिणी खाडिलकर या भगिनी जबाबदारी सांभाळत आहेत.

- **तरुण भारत, नागपूर** :

तरुण भारत, वृत्तपत्र म्हटले की राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जन संघ, भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीचे वृत्तपत्र असे सर्वसाधारण चित्र आहे. तरुण भारतचा जनसंघ भाजपने निवडणुकीच्या राजकारणात आणि पक्ष विस्तार करण्याच्या उपयोगात आणला. भाजपच्या यशात किंवा वाटचालीत तरुण भारताचे योगदान किती, याचा अभ्यास केला तर पक्षाची बैठक असलेले प्रभावी वृत्तपत्र असे उत्तर मिळते. तरुण भारत हा संघ भाजपच्या विचारसरणीचा असला तरी भाजपचे मुखपत्र म्हणून अशी प्रतिमा बनली असे म्हणता येणार नाही. सामना हे जसे शिवसेनेचे मुखपत्र आहे, शिवसैनिकांना सूचना, आदेश व मार्गदर्शन करणारे दैनिक आहे, तसे तरुण भारत वृत्तपत्र हे भाजपचे मुखपत्र आहे, असे ठामपणे म्हणता येणार नाही.

तरुण भारत हे आज दैनिक असले तरी सुरुवातीला ते साप्ताहिक होते. तरुण भारताचे प्रकाशन हे नरकेसरी संस्था करते. हे बिरुद नागपूरचे सुप्रसिद्ध नेते मोरोपंत अभ्यंकर यांना लोकांनी प्रेमाने दिलेले होते. तरुण भारताच्या रौप्य महोत्सवी अंकात दैनिकाचे पहिले संपादक गजानन त्र्यंबक माडखोलकर यांनी म्हटले होते, ‘केवळ नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या नामकरणाबाबत नव्हे तर तत्त्वनिष्ठ, निःस्पृह धोरणाच्या दृष्टीने आपले कर्तव्य बेदरकारपणे बजावण्याच्या बाबतीतली दैनिक तरुण भारतने

साप्ताहिक तरुण भारतचा वारसा पुढे चालवलेला आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.‘ (माडखोलकर, ग. म्यं. १९६९).

पाठक, सुधीर (माजी संपादक)–तरुण भारत यांच्याबरोबर झालेल्या संशोधकाच्या चर्चेनुसार साप्ताहिक तरुण भारताचा पहिला अंक २० जानेवारी १९२६ रोजी प्रसिद्ध झाला. तरुण भारतच्या पहिल्या अंकात ‘आमचे धोरण’ हा अग्रलेख स्वतः अभ्यंकरांनी लिहिला होता आणि त्यात त्यांनी म्हटले होते – राष्ट्रीय सभा व स्वराज्य यांस पाठिंबा देऊन जनतेसमोर राष्ट्रविमोचनाचे मार्ग स्पष्टपणे मांडत राहणे व शक्य तो स्वालंबनपूर्ण उपायांनी हिंदी जनतेचे सामर्थ्य, तेज व संघटनेची वाढ तीच प्रतिकारशक्तीचा विकास करून हिंदी स्वराज्याचा झगडा अखंड सुरु ठेवण्याची खटपट करणे, हे तरुण भारतचे ध्येय राहील. तरुण भारत तत्त्वनिष्ठ आहे त्याचा वाद व्यक्तीशी नाही तत्त्वशी आहे. जेव्हा तत्त्व आणि व्यक्ती निगडित झालेल्या असतील आणि तत्त्वावर टीका करणे आवश्यक असेल तेव्हाच तरुण भारत बेदरकारपणे आपले कर्तव्य करीत असतो. यात व्यक्तीस तडाखे बसले तर ह्याचा नाईलाज आहे. १९३० नंतर विविध कारणांमुळे तरुण भारतचे प्रकाशन बंद पडले. १९४४ मध्ये या वृत्तपत्राचे पुनर्जीवन झाले व २ जानेवारी १९४४ रोजी दैनिकाचा पहिला अंक बाहेर पडला. बारा वर्षांच्या वनवासानंतर असे पहिल्या अंकातील अग्रलेखात म्हटले होते की, तरुण भारत हे कोणतेही प्रचलित राजकीय पक्षाचे मुखपत्र नाही. महात्मा गांधींच्या हत्येनंतर झालेल्या जाळपोळीत तरुण भारतला मोठी झळ पोहोचली. २ फेब्रुवारी १९४८ ला नागपुरात मोठी जाळपोळ झाली. तरुण भारतचे कार्यालय, मुद्रणालय, संपादक माडवोलकरांचे निवासस्थान यांची मोठी नासधूस झाली. पत्र सुरु होऊन अवघी ४ वर्षे झाली असताना पत्राचे अस्तित्व संपवणारी ही घटना होती. तरुण भारतने अग्रलेखात म्हटले होते की, ‘आज या क्षणी आम्ही वाळूवर उभे

आहोत. पण नरकेसरीच्या पुण्याईने आणि प्रांतातील जनतेच्या पाठिंब्याने या वाळूचा खडक बनेल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

– दि. २० फेब्रुवारी १९४८ रोजी फुलस्केप आकाराचा छोटा अंक ट्रेडलवर छापून प्रसिद्ध झाला. २६ फेब्रुवारी १९४८ रोजी पुनर्जीवन झाल्यानंतर तरुण भारताने 'न मे भक्त: प्रणश्यति' या मथळ्याखाली अग्रलेख लिहिला. ता. २ रोजी तरुण भारतवर किंवा संपादक यांच्यावर जी लोकक्षोभाची आपत्ती कोसळली, तिच्यामुळे त्याच्या धारणेत काय किंवा धोरणात कोणत्याही प्रकारचा फरक पडणार नाही. संयुक्त महाराष्ट्रात मराठी बहुजन समाजाचे लोकराज्य स्थापन झाले पाहिजे व हे ध्येय साध्य होण्यासाठी महाराष्ट्रातील जातीभेद आणि वर्गभेद हे समूळ नष्ट झाले पाहिजेत असे संपादकांचे ठाम मत होते.

– तरुण भारत हे संघाच्या विचारसरणीचे वृत्तपत्र आणि भाजप समर्थक वृत्तपत्र अशी आजही प्रतिमा आहे. जनसंघनंतर भाजपला तरुण भारतमध्ये अधिक अथवा झुकते माप असते. संस्थापकांपासून ते आजच्या संपादकांपर्यंतचा काळ पहिला तर तो संघाच्या विचाराचा आहे. १९८० च्या दशकापर्यंत तरुण भारत नागपूर व विदर्भात अग्रेसर वृत्तपत्र होते. पुढे दिवंगत मंत्री जवाहरलाल दर्डा यांचा लोकमत आला आणि विदर्भात लोकमतने जोर पकडला. पुढच्या काळात सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स ही वृत्तपत्रे नागपुरात आली. त्यांच्या नागपूर व विदर्भात आवृत्त्या सुरु झाल्या आणि तरुण भारत मागे पडला. मुंबईच्या आणि याच पातळीवरील मोठ्या वृत्तपत्रांच्या स्पर्धेत तरुण भारत टिकू शकला नाही. पण संघ – भाजप विचाराचे वाचक असा तरुण भारतचा एक निश्चित वर्ग कायम आहे.

केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता आली किंवा राज्यात भाजपचा मुख्यमंत्री निवडून आला म्हणून तरुण भारतचा खप वाढला असे झाले नाही. विचाराचे वृत्तपत्र व

निवडणुकांचे गणित हे नेहमीच वेगळे राहिले आहे. अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या भागात प्रकाश पोहरे यांच्या देशोन्नतीने मोठी मजल मारली, याचाही परिणाम तरुण भारतावर झाला. देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, महादेव शिवणकर, हंसराज अहिर, सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, बनवारीलाल पुरोहित, विनय सहस्त्रबुद्धे, बच्चाराज व्यास, मा. गो. वैद्य, रजनी राय, लक्ष्मणराव मानकर, सुमतीताई सुकळीकर, किसनलाल संचेती, मोतीरामजी लहाने, प्रमिला टोपे, अर्जुनराव वानखेडे आदी विदर्भाने राज्याला व देशाला भाजपचे मोठमोठे नेते दिले पण भाजपचा विदर्भात विस्तार झाला तो तरुण भारतमुळे असे ठामपणे म्हणता येणार नाही.

- **नवयुग** :

नवयुगचा पहिला अंक २१ जानेवारी १९४० रोजी प्रसिध्द झाला. हे साप्ताहीक पुण्यातून सुरू झाले. अत्रे उवाच हे सदर लिहायचे. साहित्य, विनोद आणि टीका यांवर त्यांचा भर होता. अत्रेंची लेखणी तलवारीपेक्षा धारदार होती. कोणाची व कशाची पर्वा न करता ते विरोधकांवर शब्दातून घाव घालत असत.

- **मराठा**:

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात राज्य आणि केंद्र सरकारला आपल्या लेखणीने गदागदा हलविण्याचे काम आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या मराठाने केले. आचार्य अत्रे हे ख-या अर्थांने अष्टपैलू व बहुभषिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे संपादकीय कर्तृत्व अफाट होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला सामर्थ्य देण्यासाठी त्यांनी मुंबईतून मराठा हे दैनिक सुरू केले. १२ नोव्हेंबर १९५६ रोजी त्याचा पहिला अंक निघाला. मराठा हे नाव सेनापती बापट यांनी सुचवले होते. मराठाच्या शिरोभागी मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे ब्रीदवाक्य होते. अग्रलेखाच्या वरती भले तरी देऊ

कासेची लंगोटी, ही संत तुकारामांची उक्ती होती. स. का. पाटील यांचा नासका पाटील, मोरारजी यांचा मर्डरजी, शंकरराव देव यांचा शंख देव, मधू लिमये यांचा अधु मेंदुचा मधू असा ते मराठातून उल्लेख करीत असत. पंडित जवाहरलाल नेहरूंवर सतत तोफा डागणा-या अत्रेंनी पंडितजींच्या मृत्युनंतर सूर्यास्त या शीर्षकाखाली त्यांच्या विशाल कर्तृत्वाला मानवंदना देणारे सलग तेरा अग्रलेख लिहिले होते.

- **विशाल सह्याद्री, पुणे** :

दिवंगत काँग्रेस नेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व नंतर देशाचे सरंक्षण मंत्री व उपपंतप्रधान पद भूषविलेले यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकारातून 'विशाल सह्याद्री' हे वृत्तपत्र पुण्यातून सुरु झाले. १९५० ते १९६० या काळात काँग्रेसच्या पाठीशी भक्कम उभे राहील, पक्षाची भूमिका चांगल्या पद्धतीने मांडेल असे त्यावेळी मुंबईत कोणते ही प्रमुख वृत्तपत्र नव्हते. या वेळी पुण्यात सकाळ व प्रभात ही दोन वृत्तपत्रे होती. ही दोन्ही वृत्तपत्रे काँग्रेसचा प्रचार करण्यासाठी उपयुक्त नव्हती. तेव्हा केसरी हे साप्ताहिक होते व हिंदुमहासभेची भूमिका केसरीत मांडली जात असे. १९५७ मध्ये पुण्यात तरुण भारत आला पण तो संघ–जनसंघ विचार सरणीला प्राधान्य देणारा होता. १९५७ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचा पराभव झाला आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचा जोर वाढू लागला. मुंबईतील वृत्तपते ही प्रामुख्याने भांडवलदारांच्या हाती होती त्या मुळे मुंबईतही काँग्रेसचा प्रचार करणारे कोणते ही वृत्तपत्र नव्हते. यशवंतराव चव्हाण यांचे अनेक संपादक व पत्रकार वैयक्तिक स्नेही होते पण ते यांच्या वृत्तपत्राच्या मालकांच्या भूमिकेशी बांधील असत. मुंबईत अगोदरच बरीच वृत्तपत्रे होती म्हणून आणखी नवे वृत्तपत्र सुरु केले तर ते स्पर्धेत टिकेल की नाही याची शास्वती वाटत नव्हती म्हणूनच यशवंतराव चव्हाण यांनी पुण्यात काँग्रेसच्या विचाराचे वृत्तपत्र सुरु करावे असे मनात ठरवले आणि पुण्यातून १९५८ मध्ये

’विशाल सह्याद्री’ सुरु झाला. विशाल सह्याद्रीचा पहिला अंक शुक्रवार दि. ३० मे १९५८ रोजी प्रसिद्ध झाला. या दैनिकाचे पहिले संपादक अनंतराव पाटील यांनी सलग २३ वर्षे संपादक म्हणून धुरा वाहिली. हे वृत्तपत्र स्वतंत्र ट्रस्टतर्फे चालविण्यात येत असे. यासाठी विशाल सह्याद्री ट्रस्टची स्थापना करण्यात आली. बडोदाचे नरे फत्तेसिंहराव गायकवाड, फलटणचे मालोजीराजे नाईकनिंबाळकर, के. के. शहा, बाबासाहेब घोरपडे, वसंतराव दादा पाटील, मामासाहेब मोहोळ असे मान्यवर या वृत्तपत्राचे ट्रस्टी होते.

लोकशक्ती या वृत्तपत्राचे संपादक म्हणून राहिलेले नरुभाऊ लिमये यांनी ही विशाल सह्याद्रीच्या संपादकीय पदाला बरीच वर्षे साथ दिली. कॉँग्रेसचे मुखपत्र असे विशाल सह्याद्रीचे स्वरूप कधीच नव्हते. कॉँग्रेस पक्षानेही तसे कधी म्हटले नाही पण कॉँग्रेसच्या भूमिकेचा पुरस्कार करणारे वृत्तपत्र अशी प्रतिमा विशाल सह्याद्रीची होती.

विशाल सह्याद्रीच्या अगोदर पक्षाने ‘लोकशक्ती’ नावाचे वृत्तपत्र काढले होते पण हाच अनुभव समाधानकारक नव्हता. विशाल सह्याद्री दैनिकाचे उगमापासून संपादक असलेले अनंतराव पाटील यांनी निवृत्तीच्या वेळी म्हणजे १ जानेवारी १९८१ रोजी ’सर्वांचा ऋणी आहे’ या मथळ्याखाली अग्रलेखा लिहिला व त्यात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेतून विशाल सह्याद्री सुरु झाला, असे म्हटले होते. ते या अग्रलेखात म्हणाले– ’संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या रणधुमाळीत यशवंतराव चव्हाण यांनी बोलावून घेऊन सांगितले की, एक नवे दैनिक सुरू करायचे आहे आणि त्याची जबाबदारी तुम्ही स्वीकारायची आहे, ही उडी आहे. कदाचित पाय मोडण्याची शक्यता आहे पण उडी घ्यायला हवी.’

विशाल सह्याद्रीला सत्तेवर राहिलेल्या कॉँग्रेसच्या व त्यांच्या नेत्यांचे पाठबळ राहिले पण ते वृत्तपत्र जनामनात स्थान निर्माण करू शकले नाही.

काँग्रेसमध्ये मुखपत्र असे विशाल सह्याद्रीचे स्वरूप कधीच नव्हते. काँग्रेस पक्षानेही तसे कधी म्हटले नाही पण काँग्रेसच्या भूमिकेचा पुरस्कार करणारे वृत्तपत्र अशी प्रतिमा विशाल सह्याद्रीची होती. विशाल सह्याद्रीच्या अगोदर पक्षाने लोकशक्ती नावाचे वृत्तपत्र काढले होते; पण हाच अनुभव समाधानकारक नव्हता. विशाल सह्याद्रीला सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसच्या व त्यांच्या नेत्यांचे पाठबळ राहिले पण ते वृत्तपत्र जनमानसात स्थान निर्माण करू शकले नाही.

विशाल सह्याद्रीचा दबदबा निर्माण झाला नाही. मोठा खप झाला नाही आणि आर्थिक दृष्ट्याही हे वृत्तपत्र स्थिर झाले नाही. काँग्रेस पक्षाचे वृत्तपत्र असा बोलबालाही फारसा झाला नाही. मे १९५८ मध्ये सुरु झालेले हे वृत्तपत्र ऑक्टोबर १९८१ पर्यंत चालले व या वृत्तपत्राला फार काही आयुष्य लाभले नाही. वृत्तपत्रांचे महत्व व पत्रकारांचे महत्त्व या विषयात काँग्रेस नेहमीच उदासीन राहिली, याचाही फटका विशाल सह्याद्रीला बसला.

अनंतराव पाटील यांनी सकाळमध्ये चौदा वर्षे वार्ताहर म्हणून काम केले होते. या अनुभवावर त्यांनी विशाल सह्याद्रीच्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली पण त्यांच्या संपादकाखाली निघणारे विशाल सह्याद्री हे वृत्तपत्र यशस्वी होऊ शकले नाही.

अनंतराव पाटील १ जानेवारी १९८१ रोजी निवृत्त झाल्यावर त्यांच्या जागी नाशिकच्या देशदूत दैनिकांचे संपादक असणारे शिशिकांत टेंबे संपादक झाले. पण काही काळात म्हणजे ८-१० महिन्यात हे वृत्तपत्र बंद पडले. १ ऑक्टोबर १९८१ पासून आर्थिक कारणामुळे विशाल सह्याद्री बंद झाला.

पुण्यातून महापालिकेत, विधानसभेत किंवा लोकसभेत काँग्रेसचे या काळात जे नगरसेवक, आमदार, खासदार निवडून गेले, त्यात विशाल सह्याद्रीचे मोठे योगदान

होते असे म्हणता येणार नाही. विशाल सह्याद्रीमुळे पुण्यात काँग्रेसची ताकद वाढली किंवा पक्ष विस्तार झाला, असे म्हणू शकत नाही. काँग्रेसच्या बड्या नेत्यांचे नियंत्रण आणि मार्गदर्शन असूनही विशाल सह्याद्री स्वतःचे अस्तित्व व ओळख राखू शकला नाही.

**महाराष्ट्र टाइम्स:**

टाइम्स ऑफ इंडिया समूहानी १८ जून १९६२ रोजी महाराष्ट्र टाइम्सची पहिली आवृत्ती प्रसिद्ध केली. महाराष्ट्र टाइम्सला गोविंद तळवलकरांच्या कारकिर्दीत प्रतिष्ठा मिळाली व भरतकुमार राऊत यांच्या काळात आकर्षकता प्राप्त झाली. तळवलकरांच्या काळात महाराष्ट्र टाइम्स हे वैचारीक पत्र होते, भारतकुमार राऊत यांच्या काळात ते युवकांनाही आकर्षित करणारे वृत्तपत्र झाले. तळवलकरांचा लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखांचा अभ्यास दांडगा होता. लोकमान्यांचा प्रभाव त्यांच्यावर होता. नेमक्या शब्दात पाल्हाळ न लावता ते मुद्दा स्पष्ट करीत असत. आकर्षक मथळा, थेट प्रारंभ व समर्पक शेवट हे त्यांच्या अग्रलेखाचे वैशिष्ट्य असे. तळवलकरांनंतर कुमार केतकर, भारतकुमार राऊत, अशोक पानवलकर, पराग करंदीकर यांनी महाराष्ट्र टाइम्सचे संपादकपद भूषवले.

- **प्रहार:**

मुंबईत चेंबूरच्या शिवसेना शाखाप्रमुखापासून ते आमदार, खासदार, मुख्यमंत्री व केन्द्रीय मंत्रीपदापर्यंत मजल गाठणारे श्री. नारायण राणे २०१८ मध्ये भाजप या पक्षात आले. यापूर्वी काही वेळ काँग्रेसमध्ये होते पण जवळपास ३९ वर्षे ते शिवसेनेत होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आशीर्वादाने ते केंद्रात उद्योग मंत्री झाले.

शिवसेना सोडल्यानंतर ते काँग्रेस पक्षात गेले, मंत्री झाले आणि २००८ मध्ये मुंबई व कोकणात 'प्रहार' नावाचे दैनिक सुरु केले. ठाकरेंचा 'सामना' व राणेंचा 'प्रहार'अशी दोन भिन्न विचारसरणीची पत्रके आहेत. सामना हे सेनेचे मुखपत्र आहे पण प्रहार हे राणे परिवाराचे मुखपत्र आहे. दोन्ही वृत्तपत्रे राजकीय आहेत. शिवसेना व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर प्रखर व आक्रमक टीका 'प्रहार' मध्ये दिसते. संधी मिळाली की सामनामधून शिवसेना राणेंवर हल्ला चढवते. राणे यांच्या विचारात व रक्तात शिवसेनेचे संस्कार आहेत. त्यांनी प्रहार सुरु केला व आपण हे वृत्तपत्र का सुरु करीत आहोत ही भूमिका मांडली. प्रहारला संपादक स्वतंत्र असतो पण श्री. नारायण राणे हे प्रहारचे सल्लागार संपादक आहेत.

सदर वृत्तपत्र काढण्याचा मुख्य हेतू महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकाच्या नागरिकांपर्यंत बातम्या पोहचविणे हा होता. त्या माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी 'प्रहार' विकासाच्या विचारांचे प्रामाणिक स्वरूप असेल आणि म्हणूनच प्रहार हे केवळ एक वृत्तपत्र विकले जाणार नाही; तर विकास, उन्नती आणि प्रगतीसाठी धारदार शब्दांनी प्रहार करीत राहील, असे ठाम मत श्री. नारायण राणे यांनी मांडले. महाराष्ट्र हे एक लोककल्याणकारी राज्य व्हावे व त्यामध्ये प्रहारचाही सहभाग असावा, अशी प्रहारमागची त्यांची भावना आहे. एक समर्थ महाराष्ट्र घडविण्यासाठी हे वृत्तपत्र सुरु करण्यात आले असून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकरिता न्यानाचे प्रबोधन करीत व वस्तुस्थितीवर आधारित बातम्या देण्यासाठी हे वृत्तपत्र असेल यावर राणे ठाम आहेत. प्रहारमध्ये मराठी माणसाला अभिप्रेत असेच वृत्तपत्र असेल असे मत राणे यांनी व्यक्त केले.

नारायण राणे हे भाजपमध्ये गेल्यापासून प्रहारमधून भाजपची भूमिका जोरदारपणे मांडली जाते. मोदी – शहा यांच्या भूमिकेला मोठे महत्त्व दिले जाते. मुंबई –

कोकणात भाजपचे समर्थन करणारे हक्काचे वृत्तपत्र नाही. प्रहारकडे भाजपचे मुखपत्र म्हणून बघितले जात नाही किंवा प्रहार हे भाजपचे दैनिक आहे असे मानले जात नाही. पण भाजपला झुकते माप प्रहारमध्ये दिसून येते. नारायण राणे व त्यांच्या परिवाराची राजकीय भूमिका प्रहारमध्ये आक्रमकपणे मांडली जाते. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई – कोकणात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्याविरोधात लढण्यासाठी भाजपला 'प्रहार' हे वृत्तपत्र एक धारदार शस्त्र म्हणून मिळाले आहे. भाजप विरुद्ध शिवसेना असे संघर्षाचे प्रसंग उभे राहतात तेव्हा त्याचे प्रतिबिंब सामना आणि प्रहारमध्ये दिसते. सामना विरुद्ध प्रहार किंवा राणें विरुद्ध ठाकरे असा संघर्ष महाराष्ट्राच्या राजकारणात वारंवार उदभवतो तेव्हा अन्य प्रसिद्धी आणि प्रसारमाध्यमांना त्याची दखल घ्यावी लागते.

मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाला सन २०३२ मध्ये दोनशे वर्षे पूर्ण होतील. बाळशास्त्री जांभेकरांचा 'दर्पण', काकासाहेब लिमयेंचा 'ज्ञानप्रकाश', लोकमान्य टिळकांचा 'केसरी', शि. म. परांजपे यांचा 'काळ', अच्युत बळवंत कोल्हटकरांचा 'संदेश', प्रल्हाद केशव अत्रे यांचा 'नवयुग' व 'मराठा', ना. भि. परूळेकरांचा 'सकाळ', डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत', पळणीटकरांचा 'ऐक्य', अगोदर बाबुराव ठाकूरांचा आणि आता किरण ठाकुरांचा 'तरूण भारत' (बेळगाव), विजय दर्डा व राजेंद्र दर्डा कुटुंबीयांचा 'लोकमत' अशी मोठी परंपरा मराठी वृत्तपत्राला आहे. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, नवशक्ति, नवाकाळ, सामना, प्रहार या वृत्तपत्रांनी मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाला नवी दिशा दाखवली. सुधाकर डोईफोंडेचा 'प्रजावाणी' (नांदेड), अनंत भालेरावांचा 'मराठवाडा औरंगाबाद', दादासाहेब पोतनीसांचा 'गावकरी' (नाशिक), गणपतराव जाधवांचा 'पुढारी' (कोल्हापूर), माडखोलकरांचा 'तरूण भारत' (नागपूर) यांनी प्रादेशिक वृत्तपत्र म्हणून आपला ठसा उमटवला. त्रंबक विष्णू  पर्वते, ह. रा. महाजनी, र. ना. लाटे, विद्याधर गोखले,

माधव गडकरी, अरूण टिकेकर, कुमार केतकर, गिरीश कुबेर अशा दिग्गज संपादकांच्या लेखणीने लोकसत्ताला प्रतिष्ठा प्राप्त झाली.

द्वा. भ. कर्णिक, गोविंदराव तळवलकरांनी महाराष्ट्र टाइम्सचा मराठी वाचकांमध्ये दबदबा निर्माण केला. प्रभाकर पाध्ये व पु. रा. बेहेरे यांनी त्यांच्या लेखणीने नवशक्ति गाजवला. बाळासाहेब ठाकरे व नंतर संजय राऊत यांच्या लेखणीतून मराठी अस्मिता व हिंदुत्वाचा पुरस्कार सामनाने केला. ग. वा. बेहेर यांचा सोबत श्री. ग. माजगावकरांचा 'माणूस', या साप्ताहिकांनी मोठी लोकप्रियता संपादन केली. न. चिं. केळकर, ज. स. करंदिकर, ग. वि. केतकर, जयंतराव टिळक, प्रबोधनकार ठाकरे, अग्रलेखांचा बादशहा बिरूद मिरविणारे नवाकाळकार निळुभाऊ खाडिलकर यांनी संपादक म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. अशी कितीतरी नावे सांगता येतील की हे सर्व संपादक मराठी वृत्तपत्रसृष्टीचेच नव्हे तर महाराष्ट्राचे वैभव आहेत. यातील अनेक संपादक आज हयात नाहीत, पण त्यांचे शब्द, लेखनशैली, धडाकेबाज अग्रलेख आजही तेवढेच प्रभावी वाटतात.

संशोधक गेली पाच दशके मराठी पत्रकारितेत सक्रिय असून केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, नवशक्ति, प्रहार अशा नामवंत वृत्तपत्रात जबाबदार पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध झाली असून संशोधकाला र. ना. लाटे, विद्याधर गोखले, अरूण टिकेकर. गोविंद तळवलकर, दि. वि. गोखले, चंद्रकांत ताम्हाणे, अ. स. मराठे, भारतकुमार राऊत. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा, दिनकर रायकर, श्री. ग. मुणगेकर, श्री. जयंतराव टिळक, डॉ. शरदचंद्र गोखले, अरविंद गोखले, ग. वा. बेहेरे अशा विविध दिग्गज व मान्यवरांच्या सहवासात व मार्गदर्शनाखाली पत्रकारिता करण्याची संधी प्राप्त झाली.

## १.९ शिवसेनेच्या स्थापनेत मार्मिकची भूमिका

भाषावार प्रांतरचनेनुसार मुंबईवर महाराष्ट्राचाच हक्क आहे ही मराठी माणसांची भूमिका होती, पण त्यावेळच्या काँग्रेस पक्षाची व अमराठी नेत्यांची मुंबई महाराष्ट्रला मिळता कामा नये, तिचे स्वतंत्र अस्तित्व ठेवावे असेच आग्रही मत मांडले होते. १९४८ मध्ये मुंबईत आलेल्या दार कमिशनने आपल्या अहवालात म्हटले की, मुंबईवर महाराष्ट्राचा मुळीच गमक नाही, या शहराला कोणत्याही एका प्रांतात घालता येणार नाही (दार, स क. १९४८). डिसेंबर १९४८ मध्ये जे. व्ही. पी. समितीनेही महाराष्ट्रात मुंबईचा समावेश होणार नाही, असा निष्कर्ष काढला होता (गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, १९५५).

केंद्र सरकारने नेमलेल्या राज्य पुनर्रचना आयोगाने मुंबई शहराविषयी निवेदने एकून घेतली, त्यातील काही प्रमुख संघटनांची भूमिका पुढीलप्रमाणे होती:

- मुंबई काँग्रेस – मुंबई शहराला कोणत्याही राज्यात न घालता त्याचे एक स्वतंत्र राज्य करावे. मुंबई हे देशाचे प्रमुख आर्थिक केंद्र असून, मुंबईला एका राज्यात कोंबले तर भारताच्या उद्योगधंद्यांची व आर्थिक संपदेचे पायमल्ली होईल.
- महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स – मुंबईमध्ये १४ लाख मराठी भाषिक असून गुजराती भाषिकांची संख्या ५ लाख २० हजार आहे. मराठी भाषा बोलणारे या शहरात ४८ टक्के असून गुजराती भाषा बोलणारे १८ टक्के आहेत. १८८१ पासून झालेल्या शिरगणतीत मुंबईत मराठी भाषिकांची संख्या नेहमीच पन्नास टक्यांच्या वरती राहिली आहे. महाराष्ट्रिय इतर व्यापारी समाजाने मुंबईची भरभराट करायला हातभार लावला म्हणून मुंबई महाराष्ट्रापासून तोडून स्वतंत्र करावी हा दावा चुकीचा आहे. मुंबईप्रमाणेच कलकत्ता, मद्रास, बंगलोर,

कानपूरमधेही स्थानिकांपेक्षा इतरांच्या हाती उद्योग व्यापार आहेत, त्याप्रमाणेच मुंबईची परिस्थिती आहे (पुरंदरे, वै. २०१२).

- गुजरात प्रदेश कॉँग्रेस – बहुतांशी गुजराती समाजाचे हेच मत आहे की, मुंबईचे आहे तसेच स्वरूप राहू द्यावे, त्याचे तुकडे करू नयेत. तरी सुद्धा भाषावाद्यांच्या संतोषासाठी राज्याचे विभाजन करावे असे समितीचे मत झाले तर गुजरातचे मात्र स्वतंत्र राज्य करावे आणि मुंबई शहराचेही वेगळे राज्य करावे असे मत मांडण्यात आले (सामंत, वि. आणि प्रधान ह. २०१६).

मराठी लोकांची मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी मागणी असताना राज्य पुनर्रचना आयोगाने मात्र डोळ्यांवर पट्टी बांधून मराठी – गुजराती द्विभाषिकांचे राज्य निर्माण करण्याची जगावेगळी सूचना केली होती.

त्यावेळचे मुंबई कॉँग्रेसचे अध्यक्ष स. का. पाटील आणि मुंबई राज्याचे गुजराती मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी दि. २० नोव्हेंबर १९५५ रोजी गिरगाव चौपाटीवर झालेल्या सभेत असे म्हंटले की पाच वर्षांनी मुंबई मिळेल म्हणून हुरळून जाऊ नका, पाच हजार वर्षात सुद्धा तुम्हाला मिळणार नाही. यावःचंद्र दिवाकरौ, मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही. मोरारजी देसाई म्हणाले होते की, कॉँग्रेस जिवंत आहे, तोपर्यंत मुंबईची जनता महाराष्ट्रात येणार नाही.

अशा सर्व खडतर पार्श्वभूमीवर संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबईसाठी कडवा लढा देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र केंद्राकडून पदरात पाडून घेतले व दि. १ मे रोजी मुंबई राजधानीसह महाराष्ट्राची स्थापना झाली. मुंबई महाराष्ट्राला मिळाल्याचा मराठी माणसाला आनंद झाला पण महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मुंबईतील मराठी माणूस पोरका होऊ लागला. संयुक्त महाराष्ट्र समितीत कॉँग्रेस वगळता सारे लहान पक्ष सामील होते, पण महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर ते पक्ष समितीतून दूर होऊ लागले व

प्रत्येक पक्ष आपला अजेंडा राबविण्यात दंग झाला. संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले म्हणून आपल्या आशा–आकांक्षा पूर्ण होण्यासाठी मराठी माणूस संयम बाळगून राहीला. शिक्षण, रोजगार, नोकरी, घर यांमध्ये आपला प्रथम हक्क आहे, आपला अधिकार आहे, हे समजत होते, पण मराठी माणूस म्हणून कोणी दखल घेत नव्हते. रेल्वे स्टेशनसमोर बसणार बुटपॉलीशवाला अमराठी, टॅक्सीवाला अमराठी, दुधवाला अमराठी, रेल्वेचा तिकीट चेकर अमराठी, केंद्र सरकारच्या कार्यालयात सर्वत्र अमराठी, खासगी कंपन्यांमध्ये अधिकारी अमराठी, व्यापार – उद्योग अमराठी, हॉटेलचे मालक व तेथील वेटर्सही अमराठी, असे मुंबईत चोहोबाजूला अमराठी वातावरण होते, परप्रांतीयांच्या गर्दीत तेव्हा मराठी माणसाची घुसमट होत होती. पण मराठी माणसाचे मन आणि त्याची नाडी जाणली ती बाळासाहेब ठाकरे यांनी व केवळ त्यांनी मराठी माणसाचे दुःख ओळखले. त्यांना स्वस्थ बसवेना, काही तरी केलेच पाहिजे, असे त्यांना सतत वाटू लागले नि त्यातूनच ‘मार्मिक’ या व्यंगचित्र साप्ताहिकाचा जन्म झाला.

त्या काळी बाळासाहेब ठाकरे हे फ्री प्रेस जर्नल मध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करीत होते. वयाच्या १९व्या वर्षी म्हणजे १९४५ मध्ये त्यांनी ही नोकरी पत्करली होती. वडिलांच्या सहवासाने त्यांना राजकीय जाण लहानपणीच आली. व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली होती. कम्युनिस्ट नेत्यांवर त्यांनी काढलेली व्यंगचित्रे खूप गाजली. पण अशी व्यंगचित्रे वृत्तपत्राच्या व्यवस्थापनाला आवडत नसत. व्यवस्थापनाबरोबर झालेल्या वादविवादातून बाळासाहेबांनी नोकरीचा दोन–तीन वेळा राजीनामाही दिला होता. पण फ्रि प्रेसचे संपादक एस. सदानंद यांचे बाळासाहेबांवर प्रेम होते व त्यांनी बाळासाहेबांना राजीनाम्यानंतर पुन्हा बोलावले. व्यवस्थापनाच्या दडपणाखाली काम करणे बाळासाहेबांच्या स्वभावात बसत नव्हते म्हणून त्यांनी १९५९ मध्ये फ्री प्रेसचा राजीनामा दिला व ते फ्रीलान्स

व्यंगचित्रकारिता करू लागले. त्याच सुमारास त्यांनी व त्यांच्या सहकारी मित्रांनी ‘न्यूज डे’ नावाचे इंग्रजी दैनिक सुरु केले होते पण पुढे ते बंद पडले. ज्येष्ठ पत्रकार दिनू रणदिवे आणि अशोक पडबिद्री हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत संयुक्त महाराष्ट्र पत्रिका नावाचे वृत्तपत्र चालवत होते, त्यात बाळासाहेब हे मावळा या नावाने व्यंगचित्रे काढत असत. ती व्यंगचित्रे कमालीची लोकप्रिय झाली होती. रणदिवे हे दीर्घकाळ महाराष्ट्र टाइम्स व पडबिद्री हे लोकसत्ता वृत्तपत्रात कार्यरत होते. नंतर पडबिद्री हे सामनाचे पहिले कार्यकारी संपादक झाले.

महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठी तरुणांच्या आशाआकांशा व स्वप्नांना उभारी येऊ लागली पण विविध कारणांमुळे त्याला खीळ बसू लागली. बाळासाहेबांनी नेमके हेच हेरले व स्वतःचे व्यंगचित्र साप्ताहिक काढायचे ठरविले. त्या काळात ‘शंकर्स विकली’ हे एकमेव इंग्रजी व्यंगचित्र साप्ताहिक होते, तोच प्रयोग बाळासाहेबांनी मराठीतून करण्याचे ठरवले.

बाळासाहेबांनी प्रबोधनकारांशी चर्चा केली. नोकरीत मन लागत नाही असे सांगितले. आपल्या मनात व्यंगचित्र साप्ताहिक काढावे असे वाटते हे ही सांगितले. प्रबोधनकारांनी उत्तम विचार असून सुरु करण्यास संमती दिली. एवढेच नव्हे तर ’मार्मिक’ हे नाव प्रबोधनकारांनीच सुचवले.

वाचकांचा आठवडाभरातील ताणतणाव घालवता येईल, तसेच चुरचुरीत मजकूर व व्यंगचित्राने तो उत्साहित होईल असे मार्मिकला स्वरूप द्यायचे ठरले. बाळासाहेब व त्यांचे बंधू श्रीकांत ठाकरे यांनी मार्मिकची जुळवाजुळव केली. मालक, मुद्राक, प्रकाशक ठाकरे बंधू व संपादक बाळ ठाकरे अशी रचना ठरली. वितरणाची जबाबदारी बुवा दांगट यांच्यावर सोपविण्यात आली. दि. १ मे १९६० रोजी

महाराष्ट्राची स्थापना झाली आणि अवघ्या साडेतीन महिन्यांत म्हणजे दि. १३ ऑगस्ट १९६० रोजी 'मार्मिक'चा पहिला अंक प्रकाशित झाला.

दादरच्या बाल मोहन विद्यामंदिरामध्ये मार्मिकचा प्रकाशन सोहळा पार पडला. त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकचे प्रकाशन झाले. त्या कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण म्हणाले, 'बाळ ठाकरे यांची व्यंगचित्रे मी नेहमीच आवडीने पाहतो. अनेकदा मीही त्यांच्या कुंचल्याचा विषय ठरत असतो. त्यांच्या व्यंगचित्रांमुळे आम्हाला अंतर्मुख होण्याची संधी मिळते. जनतेची प्रतिक्रिया कळू शकते, त्यांच्या या नव्या साप्ताहिकाला माझ्या शुभेच्छा'.

रविवारची जत्रामधील व्यंगचित्रे आणि राजकीय भाष्य मांडणारे संपादकीय हे कमालीचे लोकप्रिय ठरले व मराठी माणसाच्या मनाचा ठाव घेऊ लागले. मार्मिक मधील लिखाणाने मराठी माणूस आपल्या हक्काविषयी जागरूक झाला. मराठी माणसाची मने चेतवण्याचे काम मार्मिक करीत होता. स्वतः प्रबोधनकार ठाकरे मार्मिकमधून खणखणीत शब्दात लिखाण करीत असत. बाळासाहेबांची व्यंगचित्रे मराठी माणसाच्या मनात अंगार पेटवत असत. ज्येष्ठ पत्रकार द. पां. खांबेटे यांचे अग्रलेख मराठी माणसाला आता 'जागा हो' असे आत्मचिंतन करायला लावीत असत. जोडीला श्रीकांत ठाकरे यांचे 'शुद्धनिषाद' नावाने सिनेपरीक्षण असे. त्यातून मार्मिकची लोकप्रियता वाढली, एवढेच नव्हे तर मार्मिक ही मराठी माणसाची गरज बनली. हिंदुस्थान पेट्रोलियम किंवा इंडियन ऑइल कंपनीत असलेल्या अधिका–यांच्या नावे मार्मिकने प्रसिद्ध केली होती. त्या यादीत मराठी माणूस शोधा असे आवाहन केले होते. आयकर विभाग, मध्य व पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयातील अधिकारी यांच्या नावांची यादी छापून त्यात मराठी माणूस कुठे आहे, असा पश्न मार्मिकने विचारला होता. मुंबईच्या टेलिफोन डिरेक्टरीतील सलग पन्नास पानांमध्ये

शाह हे एकाच नाव कसे आहे, हे मराठी वाचकांना मार्मिकनेच दाखवून दिले. मग विचारले मुंबई महाराष्ट्रात आहे, महाराष्ट्रात मुंबई कुठे आहे? या प्रश्नाने मराठी माणूस अस्वस्थ झाला. 'वाचा आणि शांत बसा' अशी मोहीम मार्मिकने चालवली. पण काही दिवसांनंतर मराठी माणूस आपल्या हक्काविषयी जागरूक होऊ लागल्यावर 'वाचा आणि उठा' असे आवाहन मार्मिकने केले व त्यातूनच शिवसेनेचा जन्म झाला.

मार्मिकमध्ये बाळासाहेब ठाकरेंच्या कुंचल्यातून रविवारची जत्रा या सदरात व्यंगचित्रे प्रसिद्ध होत असत आणि त्याला वाचकांचा मोठा प्रतिसाद असे. मार्मिकमधून सेनेच्या बैठक आणि जाहीर कार्यक्रमांची माहिती दिली जात असे.

द्विभाषिक राज्याला विरोध करणा–या संयुक्त महाराष्ट्र समितीत त्यावेळी फाटाफूट सुरु झाली होती आणि मुंबईतील मराठी मनाचा विचार करायला कुणाला वेळ नव्हता किंवा कोणी पर्वा करीत नव्हते. काँग्रेस विरोधातील सर्व राजकीय पक्ष दुभंगू लागल्याने मार्मिकचे महत्त्व आपोआपच वाढू लागले. संयुक्त महाराष्ट्र समितीतून प्रथम प्रजा समाजवादी, नंतर रिपब्लिकन कांबळे गट, जनसंघ व लोहियावादी बाहेर पडले.

समिती गटबाजीने पोखरली गेली व यशवंतराव चव्हाण यांनी वेगवेगळ्या पक्षांतील नेत्यांना काँग्रेसकडे आकर्षित करायला सुरुवात केली. यशवंतरावांनी सर्वसमावेशक राजकारण करून विरोधकांना आपलेसे करायला सुरुवात केली. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारून मराठी अस्मितेचे आपण रक्षणकर्ते आहोत, असा संदेश तमाम महाराष्ट्राला देण्याचा यशवंतरावांनी प्रयत्न केला. मार्मिकने काळाची गरज ओळखून सादर केलेली व्यंगचित्रे व संपादकीय यातून मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी एका प्रभावी संघटनेची गरज भासू लागली. त्या काळात मार्मिकचा खपही ८० हजार ते एक लाखांवर गेला होता. आपले आपत्य म्हणून बाळासाहेब ठाकरे यांचे मार्मिकवर जीवापाड प्रेम होते.

सुरुवातीच्या काळातील पत्रकार म्हणून कार्यरत असलेले भाऊ तोरसेकर आणि पंढरीनाथ सावंत यांच्याशी संशोधकाने ‘मार्मिक‘ विषयासंबंधी माहिती मिळविण्याकरिता चर्चा केली. सुरूवातीस मार्मिक हे दैनिक नव्हते तर साप्ताहिक होते. शिवसेनेची स्थापना १९६६ मध्ये झाल्यानंतर १९८० च्या दशकात जसा पक्षाचा विस्तार होऊ लागला तशी पक्षाला दैनिकाची गरज भासू लागली. त्या काळात शिवसेनेवर प्रांतवादी, जातीवादी, संकुचितवादी अशी टीका होत असे. कॉंग्रेस व डावे पक्ष शिवसेनेच्या धोरणावर व भूमिकेवर सतत टीका करीत होते. शिवसेनेची बाजू मांडणारे त्या काळात कोणतेही वृत्तपत्र नव्हते. मार्मिक दर आठवडयाने प्रसिद्ध होत असे म्हणूनच पक्षाची गरज म्हणून सामनाचा जन्म झाला.

स्वतः ठाकरे सामनाच्या शुभारंभ प्रसंगी म्हणाले, मार्मिकच्या माध्यमातून शिवसेना उभी राहिली आणि शिवसेनेच्या प्रचार तंत्रातून ’सामना’ उभा होत आहे.

सामना हे शिवसेनेचे मुखपत्र आहे, पण मार्मिक हे शिवसेनेचे मुखपत्र नव्हते. कारण मार्मिक सुरु झाला तेव्हा शिवसेनेचा जन्मही झाला नव्हता. एका व्यंगचित्र साप्ताहिकाने एक आक्रमक व लढाऊ संघटनेला जन्म दिला व शिवसेना म्हणून हा पक्ष केंद्रात व राज्यात सत्तेवर आला हेच मार्मिकचे मोठे यश आहे. स्वतःचा चरितार्थ चालावा म्हणून सुरु केलेल्या व्यंगचित्र साप्ताहिकाचे रूपांतर मराठी माणसाच्या मनाच्या व्यथा मांडणा–या व्यासपीठात झाले म्हणूनच मार्मिकची शिवसेनेच्या स्थापनेतील भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मार्मिकला शिवसेनेच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत एक अनमोल स्थान आहे.

सदर संशोधन करण्यासाठी संशोधकाने हा विषय निवडला आहे, याचे कारण शिवसेना हा महाराष्ट्रातील पहिला प्रादेशिक पक्ष आहे आणि १९९० नंतर तो राज्य पातळीवर एक प्रबळ पक्ष म्हणून कार्यरत आहे. शिवसेना सर्वप्रथम राज्यात १९९५

मध्ये सत्तेत आली, शिवसेनेने लोकसभेचे अध्यक्षपद भूषविले व राज्याला दोन विरोधी पक्षनेते आणि दोन मुख्यमंत्री दिले. यंदा शिवसेनेला पंचावन्न वर्षे पूर्ण झाली आणि शिवसेनेचे केंद्रात अठरा खासदार, लोकसभेत तीन खासदार, राज्यसभेत आणि राज्यात नऊ मंत्री आहेत. राज्याच्या विधानसभेत छप्पन आमदार आहेत तर विधान परिषदेत बारा आमदार आहेत. त्यानंतर भाजपप्रणीत एनडीए (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) मध्ये दुसरया क्रमांकाचा पक्ष शिवसेना होता. पण महाराष्ट्रात केवळ मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर शक्तिमान पक्ष बनविणा–या व पन्नासहून अधिक वर्षांची वाटचाल करणा–या शिवसेनेच्या स्थापनेचे बिज हे मार्मिक या साप्ताहिकात आहे. मार्मिकच्या स्थापनेमागची संपादक म्हणून बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका, मार्मिकने मराठी माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी बजावलेली कामगिरी, मराठी माणसाला दिलेली ऊर्जा, मराठी माणसाची निर्माण केलेली एकजूट मराठी माणसाला म्हणजेच भूमिपुत्रांना रोजगार, नोक–या आणि निवासी घरांमध्ये ८० टक्के आरक्षण मिळाले पाहिजे म्हणून मार्मिकने उभे केलेले आंदोलन आणि त्यातून निर्माण झालेली शिवसेना हा अभ्यास व संशोधनाचा विषय आहे.

### १.१० शिवसेना: एक राजकीय पक्ष

मुंबईचे स्वरूप सुरुवातीपासून बहुभाषिक आणि कॉस्मोपॉलिटिन राहिले आहे. १९६१ साली मुंबईमध्ये मराठी भाषिकांचे प्रमाण ४३% होते जे इतर भाषिकांच्या तुलनेत खूपच कमी होते (शहा, र.२०१८). मार्मिकच्या माध्यमातून  शिवसेने पक्षाने हा मुद्दा उचलून धरला व शिव सेनेच्या वाढीत हा महत्त्वाचा टप्पा ठरला. रोजगार, नोकरी व कामधंद्यासाठी अन्य राज्यातून मुंबईकडे येण्याचा ओघ सतत वाढत राहिला व मुंबईवर परप्रांतीयांचे लोंढे सतत आदळत राहिले यातून मुंबईचा मराठी टक्का कमी होत गेला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सर्वाधिक काळ काँग्रेस सत्तेवर राहिली.

मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली पण राजधानीतील मराठी माणसाला असुरक्षित वाटू लागले व त्याची उपेक्षा सुरु झाल्याचे चित्र स्पष्ट दिसत होते. नोकरभरती पासून ते फेरीवाले – विक्रेते – व्यापारी – दुकानदार अगदी भिकारी सुद्धा जिकडे बघावे तिथे अमराठी माणूस नजरेत पडत असे. सर्वत्र अमराठी लोकांची गर्दी झाली व या गर्दीत मराठी माणसाची घुसमट सुरु झाली. १९६०–७० च्या दशकात मुंबईत दक्षिणात्यांची भरती जोरात होती व दाक्षिणात्यांचे लोंढे सतत आदळत होते. हे सर्व सामान्य मराठी माणसाच्या नजरेत आणण्याचे काम शिवसेनेने हाती घेतले होते.

'शिवसेना' – शिवाजी महाराजांची सेना हे नाव निश्चित झाल्यावर शिवसेनेचा शुभारंभ १९ जून १९६६ रोजी झाला. गाजावाजा न करता, निवडक लोकांच्या उपस्थितीत कोणाचा सल्ला नाही व मुहूर्त बघितला नाही. एकाने किराणा दुकानातून नारळ आणला, नारळ फोडला आणि सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा दिल्या व शिवसेना सुरु झाली. तेव्हा सर्व मिळून १८ जण उपस्थित होते. भूमिपुत्रांवर, मराठी माणसांवर होणा-या अन्यायाविरुद्ध लढा देण्याची सर्वांनी प्रतिज्ञा घेतली. जो कोणी शिवसेनेत येईल त्याने कसे वागावे, ह्याची शपथ घ्यावी लागत असे, त्यातील काही ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे:

(१) प्रत्येक मराठी माणसाने एकमेकांना मदत केली पाहिजे व मराठी माणूस समृद्धीच्या मार्गावर चालेल यासाठी प्रवृत्त केले पाहिजे.

(२) महाराष्ट्रीय लोकांनी त्यांची मालमत्ता बाहेरच्यांना विकू नये. कोणी स्थानिक व्यक्ती असे करताना आढळल्यास त्याची माहिती तत्काळ जवळच्या शिवसेना शाखेत द्यावी.

(३) मराठी दुकानदारांनी शक्यतो मराठी घाऊक विक्रीच्या दुकानदाराकडूनच माल खरेदी करावा. ग्राहकांशी सौजन्याने वागावे.

(४) ज्या महाराष्ट्रीय लोकांचे स्वतःचे उद्योग आहेत त्यांनी फक्त भूमिपुत्रांनाच नोकरीवर घ्यावे.

(५) तरुण मराठी मुलांनी इंग्रजी भाषेतून संवादाचे कौशल्य विकसित करावे आणि इंग्रजी टायपिंगही शिकावे.

(६) आळस झटकून सहकारी गृहरचना संस्था स्थापन कराव्यात तसेच नोकरीसाठी कोठेही जाण्याची तयारी ठवावी.

(७) मराठी बंधू–भगिनींनी मराठी सण – उत्सव साजरे करावेत आणि त्यात मोठया प्रमाणात सहभागी व्हावे.

(८) परिसरातील मराठी माणसांच्या संस्था, शाळा, आश्रम यांच्या कामात स्थानिक लोकांनी सहभागी व्हावे आणि अशा कामांना भरघोस आर्थिक मदत द्यावी.

(९) उडप्यांच्या उपाहारगृहांवर बहिष्कार घालावा आणि अमराठी व्यक्तींच्या दुकानातून काहीही खरेदी करू नये.

(१०) मराठी माणसांना व्यापार, उद्योग करण्यापासून परावृत्त करू नये. त्यांचे मनोधैर्य टीकवून ठेवण्यात शक्य तेवढी त्यांना मदत करावी.

(११) मराठी बांधवांशी उद्धटपणे व अरेरावीने वागू नये उलट कोणाला अडचण असल्यास त्याला सामूहिकरीत्या मदत करावी.

✻ संघटनेचा हेतू – मराठी माणसांच्या न्याय हक्कांसाठी भूमिपुत्रांना प्राधान्य

✻ संघटनेचे बोधचिन्ह – दोन टोकाचा भगवा

✻ संघटनेचे प्रमुख पद – शिवसेनाप्रमुख

मराठी माणसांची कोंडी बाळासाहेबांनी ओळखली आणि मराठी माणसाला त्याच्या न्याय हक्कासाठी जागे करायला सुरुवात केली. आपले सामाजिक स्थान परप्रांतीयांमुळे धोक्यात आले, अशी भावना मराठी माणसांत बळावू लागली. म्हणूनच बाळासाहेबांनी मार्मिकमधून स्थानिक आणि बाहेरचे हा मुद्दा प्रभावीपणे उचलून धरला. मराठी माणसाला तारणारी आपल्या भवितव्याविषयीची चिंता, भीती आणि साशंकता बाळासाहेबांनी त्यांच्या व्यंगचित्रातून मांडली. त्यात केवळ निषेध नव्हता तर मराठी माणसांत चीड आणि संताप प्रकट करणारी ताकद होती. आर्थिक विषमता आणि मराठी माणसाच्या मनाचा होणारा कोंडमारा याला भावनिक बाजूही होती. परप्रांतीय मुंबईत येऊन मराठी माणसाला तुच्छ लेखायचे, मराठी माणसाला रोजगार नाकारायचे, ‘मुंबई तुमची भांडी घासा आमची’ असे म्हणायचे. मराठी माणसाच्या अन्यायाला बाळासाहेबांनी वाचा फोडली. मार्मिकमधील आवाहनाला प्रतिसाद म्हणून शेकडो मराठी तरुणांच्या रांगा नोकरीसाठी अर्ज घेऊन बाळासाहेबांच्या घरासमोर लागू लागल्या.

शिवसेनेच्या स्थापनेची अधिकृत घोषणा करण्यासाठी प्रभादेवीतील रवींद्र नाट्यमंदिरामध्ये जाहीर कार्यक्रम झाला. बाळासाहेबांचे स्नेही महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक समारंभाचे प्रमुख पाहुणे होते.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली संघटना शिवसेना हे केवळ महाराष्ट्रापुरतीच नव्हे तर देशपातळीवर वादग्रस्त म्हणून ओळखली जाते. बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईत राहून राष्ट्रीय नेता म्हणून लोकप्रियता मिळवली आणि याच शिवसेनेने तीन वेळा राज्याची सत्ता मिळवून मुख्यमंत्री दिले. १९९५ मध्ये शिवसेना – भाजपची राज्यात सत्ता आली. शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले आणि भाजपचे गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री झाले. त्या कारकिर्दीत शेवटचे सहा महिने

नारायण राणे याना शिवसेनेचे मुख्यमंत्रीपद देण्यात आले होते. २०१४ मध्ये राज्यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष निवडून आला. तसा तीन महिन्यांनी भाजपने शिवसेनेला सरकारमध्ये सहभागी करून घेतले. भाजपचे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले, त्यांच्या सरकारमध्ये शिवसेना भागीदार म्हणून पाच वर्षे राहिली. २०१९ मध्ये शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांनी महाविकस आघाडी स्थापन केली व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले.

शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात दुवा साधण्याचे महत्त्वाचे काम संजय राऊत करीत असतात. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि राहुल गांधी यांच्यात समन्वय राखण्याचे व त्यांच्याशी सुसंवाद ठेवण्याचे काय संजय राऊत करीत असतात. शिवसेनेची भूमिका प्रसिद्धी व प्रसारमाध्यमांना सांगण्याचे कामही तेच करीत असतात व त्यांच्या भूमिकेचे प्रतिबिंब सामनामध्ये पडलेले दिसते.

मुंबई महापालिका ही देशातील प्रगत संपन्न आणि श्रीमंत महापालिका आहे. या महापालिकेचा २० हजार कोटींचा अर्थसंकल्प आहे. तीस वर्षांहून अधिक काळ शिवसेना महापालिकेत सत्तेत आहे. देशातील अनेक राज्यांपेक्षा मोठे अर्थसंकल्प असलेली ही महापालिका आहे. जवळपास एक डझन महापौर शिवसेनेने मुंबईला दिले आहेत. मुंबई – ठाणे आणि कोकण हा शिवसेनेचा गड आहे. मुंबई – कोकणातील मराठी माणूस ही शिवसेनेची व्होट बँक आहे. मराठी अस्मिता हा शिवसेनेचा मंत्र आहे.

- **शिवसेनेचा पहिला मेळावा:**

दि. १९ जून १९६६ ला शिवसेनेची स्थापना झाली तेव्हा सामना नव्हता. बाळासाहेब ठाकरे यांचे 'मार्मिक' हे व्यंगचित्र साप्तहिक होते. याच साप्ताहिकातून ते मराठी माणसांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडायचे. दि. २५ ऑक्टोबर १९६६

च्या मार्मिकमध्ये शिवसेनेच्या पहिल्या मेळाव्यासंबंधी मजकूर प्रसिद्ध झाला. रविवार, ३० ऑक्टोबर १९६६ सायंकाळी ५.३० वाजता शिवाजी पार्कवर शिवसेनेचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला. स्वतःच्याच राज्यात स्वतःची चाललेली ससेहोलपट थांबवण्यासाठी प्रत्येक स्वाभिमानी मराठी माणसाने या मेळाव्यास जातीने उपस्थित राहिलेच पाहिजे असे सांगण्यात आले. पिचक्या पाठीच्या कण्याच्या माणसांनी तर मेळाव्यास येऊ नये. जय महाराष्ट्र! या मजकुरासोबत एक व्यंगचित्र होते, 'अपेक्षाभंग, अन्याय, उप-यांचा धुमाकूळ, पिछेहाट या सर्वामध्ये बुडणा-या मराठी माणसाला शिवसेना मदतीचा हात देत आहे'. या मजकुरातील आवाहनामुळे आणि व्यंगचित्रामुळे शिवसेनेच्या शिवाजी पार्कवरील पहिल्या मेळाव्यास लाखोंच्या संख्येने मराठी जनता लोटली होती. शिवसेनेच्या पहिलया मेळाव्या प्रसंगी व्यायामशाळांनी कसरतीचे प्रयोग सादर केले. बाळासाहेब ठाकरे, रामराव आदिक यांनी या प्रयोगांचा आनंद लुटला. सुप्रसिद्ध संगीतकार वसंत देसाई यांनी समरगीत सादर केले. शाहीर साबळे आणि पार्टीने महाराष्ट्र गीत सादर केले यामुळे मराठी लोकांमध्ये मोठे चैतन्य निर्माण झाले.

याप्रसंगी प्रबोधनकार ठाकरे उपस्थित होते. त्यांनी ठाकरी भाषेत विरोधकांचा समाचार घेतला. 'अरे सामोपचाराच्या गोष्टी गांडूनी कराव्यात! मर्दांचं ते काम नव्हे! महाराष्ट्र हा काय लेच्यापेच्यांचा देश नाही ही वाघाची अवलाद आहे. या वाघाला कोणी डिवचल तर काय परिणाम होईल, याचे इतिहासात दाखले आहेत. भविष्यात पाहायची असतील ते पाहायला मिळतील.' शिवसेना कशी लढाऊ संघटना असेल हेच त्यांनी सांगितले.

अँ. बळवंत मंत्री म्हणाले 'सकाळी उठलं की रस्त्यावर सिंधी, ऑफिसमध्ये गेल्यावर दर्शन कुणाचं तर अंडू गुंडू, दमून भागून घरी आलात तर, यह बम्बई है '।

रामराव आदिक यांनी म्हटले, ठाकरे यांनी जे महान काम केलयं, ते तुम्हाला – आम्हाला पटलेलं आहे. पण सरकारला पटवून देण्याची आज गरज आहे म्हणून आम्हाला शिवसेनेची मदत करावी लागली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे भाषणाला उभे राहिले, तेव्हा शिवसेना झिंदाबादच्या घोषणांनी शिवाजी पार्कचे मैदान दुमदुमून निघाले.

बाळासाहेब म्हणाले, 'असं हे दृश्य आहे की जो कोणी इथे आला नसेल तो दुर्दैवीच म्हटला पाहिजे. मला वाटतं महाराज जर येथे असते तर त्यांचे घोडेसुद्धा उधळले असते. जे आमच्यावर आरोप करताहेत त्यांना मला सांगायचं आहे, जर मराठी माणूस जातीयवादी, प्रांतीयवादी, संकुचित मनोवृत्तीचा असता, तर सदोबाची ही मुंबई कॉस्मोपॉलिटिन झालीच नसती. आपण सगळे भारतीय आहोत, अशा दृष्टिकोनातून आम्ही नेहमी बघतो. मद्रासचे मुख्यमंत्री म्हणतात, ज्याला उत्तम तामिळ येतं त्यालाच या राज्यात नोकरी मिळेल. आम्हालाही आमच्या राज्यकर्त्यांना हेच सांगायचयं की, ज्याला उत्तम मराठी येतयं, त्यालाच या राज्यात नोकरी मिळेल, हौसिंगचा गाळा मिळेल ! हिंदीतून आलेल्या फतव्याला केराची टोपली दाखविणा-या दाक्षिणात्य नेत्यांनी राष्ट्रवाद शिकावू नये! 'महाराष्ट्राला लढल्याशिवाय, झगडल्याशिवाय, बलिदान दिल्याशिवाय काही मिळत नाही. काही महाभाग असा आरोप करतात की, शिवसेना हे नाव देऊन आपण शिवाजी महाराजांना प्रांतीयतेचे कुंपण घालीत आहोत, पण महाराजांच्या बाजूला जे कुंपण आहे ते प्रांतीयतेचे नसून आमच्या श्रद्धेचे आहे.

'शिवसैनिक मेळाव्याला येत असताना दादरच्या मल्याळी फेरीवाल्यांनी त्याच्या मिरवणुकीवर दगडफेक केली. त्यात काही शिवसैनिकांची डोकी फुटली. या गुंडांच्या गुंडगिरीचा खरपूस समाचार बाळासाहेबांनी आपल्या भाषणातून घेतला. दगड

फेकणा–यांची गय शिवसैनिकांनी करू नये, असा आदेश दिला. मेळाव्यानंतर दादरमध्ये मोठी गडबड झाली. काँग्रेस व डाव्या पक्षांनी शिवसेनेवर टीकेचा भडीमार केला पण तेव्हापासून मुंबईवर शिवसेनेचा दरारा निर्माण झाला.

सेनेने पहिला मेळावा शिवाजी पार्कवर घेऊ नये, असा सल्ला काहींनी बाळासाहेबांना दिला होता. गर्दी जमणार नाही, असे त्यांचे सांगणे होते पण त्यांचा अंदाज बाळासाहेबांनी खोटा ठरवला. प्रबोधनकार व बाळासाहेबांचे विचार ऐकण्यासाठी मुंबई व परिसरातून लाखो लोक आले होते. शिवसेना मेळाव्याची ही परंपरा एखादा अपवाद वगळता ५५ वर्षे अखंड चालू आहे. शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर बसून शरद पवारांनी शिवसेनेचा पहिला मेळावा बघितला होता, अशीही नोंद आढळते. दि. २७ नोव्हेंबर १९६६ च्या मार्मिकमध्ये मेळाव्याचा सविस्तर वृत्तांत छायाचित्रांसह प्रसिद्ध झाला होता.

(ठाकरे, बाळासाहेब १९८९): १९६७ – ६८ साली महाडच्या महिकाली देवळाचा प्रश्न आम्ही हातात घेतला होता. त्यानंतर कोकणच्या दुर्गाडी किल्ल्यावर असलेल्या देवळाचा प्रश्न सोडवला. भिवंडीतील शिवजयंतीच्या प्रश्नाबाबतीत सुद्धा बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असताना पुढाकार घेऊन तब्बल १२ वर्षांनंतर मिरवणुकीला परवानगी मिळवली, असे अनेक प्रश्न हिंदुत्वाच्या संदर्भात आम्ही हाताळले. काही काही कुजकट हिंदुत्वाचा वापर निवडणुकीसाठी करीत आहेत; परंतु खरं काय आहे ते जनतेला समजले आहे, म्हणूनच आमच्या पक्षाच्या तिस–या अधिवेशनानंतर आमच्या हिंदुत्वाच्या प्रखर प्रचारामुळे जो हादरा दिला त्यातून अनेकांचे जीव कासावीस झाले आहेत. कधी नाही ती हिंदुत्वाची व्होट बँक भरू लागली. आता इतरांच्या डोक्यावर औरंगाबादी टोप्या चढवून आमच्या या जातीस शक्तीचा बिमोड कसा करायचा यासाठी अधिवेशन सुरु झाले आहे. ठराव पास होतील, कायदे पास

होतील, परंतु त्यामुळे हिंदुत्व संपुष्टत येणार नाही. या देशाचे दुर्देव आहे की, मतांच्या लाचारीमुळे पोटच्या पोरालासुद्धा हे नरभक्षक, नख लावायला कमी करणार नाहीत. सर्वधर्म समभावाच्या नावाखाली हिंदू धर्माचे, लोक खासकरून हिंदू धर्माचे उच्चाटन चालू आहे, हे आम्ही तरी पाहू शकत नाही. आम्ही त्याची जाण आजच्या तरुण पिढीला करून दिल्यानंतर तो खडबडून उभा राहिला आणि मुठी आवळून तरुण नराधमांना जाब विचारू लागले आहे. ती आवळलेली वज्रमूठ सत्ताधा-यांना फोडता येणार नाही. ती तशी फुटू शकत नाही. जेवढे घाव घालाल त्यामुळे ती अधिक घट्ट होत जाईल, हे त्यांनी वेळीच लक्षात घेतले, तर देशावर उपकारच होतील, असो.

शिवसेनेचा पहिला मेळाव्याचा कार्यवृत्तांत:

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

मराठी माणसांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात आवाज उठविण्यासाठी शिवाजी पार्कला दस-याच्या दिवशी दि. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी सभा होणार असल्याचे मार्मिकमधून जाहीर करण्यात आले. या मेळाव्याचे आमंत्रण असे होते, 'महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करण्यासाठी महाराष्ट्राच्या पुनरुस्थापनासाठी कटिबद्ध अशा शिवसेनेच्या सैनिकांचा मेळावा रविवार दि. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी सायंकाळी ५ वाजता दादरमधील शिवाजी पार्क येथे आयोजित करण्यात आला आहे. तमाम शिवसैनिकांच्या वतीने मी तुम्हाला या मेळाव्यात उपस्थित राहण्याचे आवाहन करतो' या आवाहनाखाली मार्मिकच्या संपादकांची स्वाक्षरी तुमचा विनम्र महाराष्ट्र सेवक बाळ ठाकरे अशा स्वरूपाची होती. शिवसेनेच्या मेळाव्यात ठाकरे यांनी लुंगीधारी मद्राशांना आपल्या टीकेचे लक्ष्य

बनवले. मेळाव्यातून परत जाताना वाटेतील उडप्यांच्या उपाहारगृहांवर शिवसैनिकांनी हल्ले चालवले. शिवसेनेच्या दसरा मेळाव्याच्या यशाने बाळासाहेब ठाकरे आनंदित झाले. छोटे मैदान घ्या असे सांगणारे प्रा. डी. व्ही. देशपांडे रात्री १०.३० वाजता ठाकरेंच्या घरी आले. ते म्हणाले, 'बाळा, तू जिंकलास' यावर ठाकरे त्यांना म्हणाले, ''आम्ही ठाकरे आहोत, आम्हाला पराभव ठाऊक नाही. फक्त विजयाची भाषा आम्हाला समजते.'

पहिल्याच मेळाव्याला चार लाखांची गर्दी होती. ठाकरे स्वतः भारावून गेले, या मेळाव्यानेच मुंबईत शिवसेनेचा उदय झाला. हे एका रात्रीत घडले, मुंबई शहराला मराठी माणसाच्या हितासाठी संघर्ष करणारा वाघ मिळाला आणि राज्याला नवी घोषणा मिळाली. जय महाराष्ट्र!

शिवसेना प्रमुखांनी मराठी लोकांना सोप्या भाषेत सांगितले होते, 'भाषावार प्रांतरचनें प्रमाणे मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे. मराठी माणूस येथील भूमिपुत्र आहे, त्यामुळे मुंबईत जे तुमच्या हक्काचे ते तुम्हाला मिळायलाच हवे. ते देण्यास कोणी नकार देत असेल तर मात्र ते त्यांच्याकडून हिसकावून घ्यायला मागे-पुढे पाहू नये'. आपल्या हक्काचे अधिकार मिळवताना थोडा हिंसाचार झाला तरी त्यांना त्याची पर्वा नव्हती. आपल्याच राजधानीत आपण दबून, घाबरून का जगायचे? असा प्रश्न शिवसैनिकांच्या मनात पडला होता.

मुंबईतील मराठी जनतेला नायक मिळाला. शिवसेना प्रमुखांनी म्हटल्याप्रमाणे 'कोणी वंदा, कोणी निंदा, मराठी हिताचा आमुचा धंदा. आता आमच्या विरोधात जातीवादाच्या शक्तीचे ठराव पास होतील'.

१९६० साली मार्मिक हे साप्ताहिक सुरु झाले व त्यानंतर १९६६ साली शिवसेनेची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मुंबईतील मराठी माणसाच्या काय

समस्या आहेत हे जाणून घ्यावे हे संयुक्त महाराष्ट्र समितीला वाटले नाही आणि काँग्रेसला त्याकडे बघावे अशी इच्छाही नव्हती म्हणूनच शिवसेनेविषयी मराठी लोकांमध्ये आकर्षण वाढले.

१९६६ साली मुंबईत मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी स्थापन झालेली शिवसेना ही अन्य सर्वच राजकीय पक्षांचा अडसर ठरली. शिवसेनेला डावलून आणि शिवसेनेची उपेक्षा करून कोणत्याही पक्षाला मुंबई – महाराष्ट्रात राजकारण करता येत नाही, हेच वीस वर्षात दिसून आले आहे. शिवसेनेच्या संघटनेतून मोठे झालेले आणि शिवसेना प्रमुखांच्या आशीर्वादातून मोठ – मोठी सत्तेची पदे ज्यांना मिळाली आणि मोठे वलय प्राप्त झाले असे नारायण राणे, छगन भुजबळ, गणेश नाईक आणि अगदी राज ठाकरे यांनी शिवसेना सोडल्यावर आता शिवसेना संपणार असे वाटले होते. काँग्रेसच्या प्रत्येक मुख्यमंत्र्यांने वसंतराव नाईकांपासून ते पृथ्वीराज चव्हाणांपर्यंत आणि भाजपचे पहिले मुख्यमंत्री झालेला देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा शिवसेनेला संकुचित ठेवण्याचा प्रयत्न केला. शिवसेना संपणार अशी भाकिते अनेकांनी वर्तवली पण सेना संपली नाही. बाळासाहेब ठाकरे हे सामनाचे संस्थापक, संपादक व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र उद्धव ठाकरे संपादक झाले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यावर त्यांच्या पत्नी सौ. रश्मी ठाकरे यांनी सामनाच्या संपादक पदाची जबाबदारी स्वीकारली. सुरुवातीच्या काळात सामनाचे कार्यकारी संपादक म्हणून अशोक पडबिद्री यांनी अनेक वर्षे जबाबदारी सांभाळली. त्यानंतर शिवसेनेचे राज्यसभेचे खासदार संजय राऊत हे अनेक वर्षांपासून सामनाचे कार्यकारी संपादक आहेत.

मुंबई – महाराष्ट्रात ८० टक्के नोक-या मराठी लोकांना मिळाव्यात, ८० टक्के हौसिंग बोर्डाची घरे मराठी लोकांना मिळावीत, मुंबईवर आदळणा-या परप्रांतीय लोंढ्याना

बंदी घालावी, मुंबईतील दुकानांच्या पाटया मराठीत लावाव्यात हा शिवसेनेचा सुरुवातीपासूनच अजेंडा होता.

आमच्या घरच्या समस्या सोडवणारी संघटना म्हणजे शिवसेना अशी ओळख मुंबईतील मराठी वस्तीत होऊ लागली. व्यायामशाळा क्रीडामंडळे, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, शिवजयंती, गणेशोत्सव, रामनवमी, दत्तजयंती, दहीहंडी या माध्यमातून शिवसेना वाढत राहिली.

शिवसेना प्रमुखांनी सुरुवातीपासून कम्युनिस्टांना विरोधक म्हणून लक्ष्य बनवले होते. कामगार संघटनांवर डाव्यांचे वर्चस्व होते. त्यात मराठी कामगार कर्मचा-यांची संख्या लक्षावधी होती. मराठी अस्मितेचा जागर करताना कम्यनिस्टांवर लालभाई किंवा लाल माकडे अशा शब्दांत ठाकरे टीका करीत. दाक्षिणात्यांची हेटाळणी करताना ते यंडू गुंडू मद्रासी म्हणत. त्यानूनच हटाव लुंगी – बजाव पुंगी ही घोषणा पुढे आली. मद्रासी निर्माते असलेले चित्रपट मुंबईत प्रदर्शित होऊ देणार नाही, असा आदेश ठाकरे यांनी १९६७ साली काढला. मद्रासी निर्माते असलेले दो कलिया, आदमी, राम और श्याम, फर्ज हे चित्रपट मुंबईत शिवसैनिकांनी बंद पाडले. दाक्षिणात्य निर्मात्यांनी शिवसेना प्रमुखांपुढे लोटांगण घातल्यावर त्यांच्या चित्रपटांवरील बहिष्कार सेनेने मागे घेतला. नाक दाबले की तोंड उघडते, हेच तेव्हा बघायला मिळाले.

’मी हिटलर आहे. ठोकशाहीचा समर्थक आहे. मला लोकशाही मंजूर नाही. इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांसारखा नसून मी शिवसेना प्रमुख आहे, असे ठाकरे सांगत असत. बाळासाहेब ठाकरे यांचा शब्द म्हणजे अंतिम निर्णय, त्याला आव्हान देता येणार नाही. त्यांचा शब्द म्हणजे आदेश ही शिवसेनेची कार्य होती.

१९६७ च्या निवडणुकीत मराठी माणसाचे हित व कम्युनिस्टांना विरोध अशी शिवसेनेची भूमिका होती. दक्षिण भारतीय उपरे, कम्युनिस्ट, समाजवादी यांना विरोध करताना आचार्य अत्रे, जॉर्ज फर्नांडिस, श्रीपाद डांगे, एच. आर. गोखले आणि कृष्ण मेनन या पंचमहादूतांना गाडा असे आवाहन मार्मिकमधून केले होते. ठाकरेंच्या भूमिकेला आव्हान देताना अत्रे यांनी मराठामधून याच पांडवांना विजयी करा असा मथळा दिला होता. या निवडणुकीत कृष्ण मेनन व आचार्य अत्रे यांचा पराभव झाला. यापुढे मुंबईत बाळासाहेब ठाकरे हे केंद्रस्थानी असतील हेच या निकालांनी संकेत दिले होते.

शिवसेनेने सर्वप्रथम ठाणे नगरपालिकेची निवडणूक लढवली. १३ ऑगस्ट १९६७ रोजी ही निवडणूक झाली. नगरपालिकेच्या २० जागांपैकी शिवसेनेचे १५ अधिकृत आणि ६ पुरस्कृत असे २१ नगरसेवक निवडून आले आणि शिवसेनेने पहिली सत्ता ठाणे नगरपालिकेत काबीज केली. निकालानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी ठाण्यात जाहीर सभा घेतली. ते म्हणाले, ’तुम्हाला मनापासून सांगतो, शिवसेनेला राजकारणात यायचे नव्हते. पण अन्याय दूर करण्यासाठी नुसती संघटना असून भागत नाही तर त्यासाठी आवश्यक असणारी सत्ता लागते. म्हणूनच आम्ही निवडणुकीच्या रिंगणात उतरलो.’

१९६८ ला मुंबई महानगरपालिकेची निवडणूक झाली. शिवसेना म्हणजे गुंडांची सेना व ठाकरे म्हणजे हिटलर असा विरोधक प्रचार करीत. तेव्हा कम्युनिस्टांच्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेत सामील न झालेल्या प्रजा समाजवादी पक्षासोबत शिवसेनेने युती केली. प्रजा समाजवादी पक्षाचे नानासाहेब गोरे, मधू दंडवते व ठाकरे यांच्या मुंबईत सभा झाल्या.

शिवसेना प्रमुखांनी २४ मार्च १९६८ च्या मार्मिकमध्ये अवघा हल्लकल्लोळ करावा, असा लेख लिहिला होता. त्यात म्हटले, 'मुंबईकर मतदारांनो! सदोबा पाटील यांच्या भ्रष्टनेतृत्वामुळे भ्रमिष्ट झालेली मुंबई प्रदेश काँग्रेस आणि संपूर्ण महाराष्ट्राचा बुरखा पांघरून वावरणारे देशद्रोही लालभाई या दोघांचेही पेकाट तुम्ही कायमचे मोडू शकता. २६ मार्चला शिवसेनेच्या बाजूने कौल दिलात तर महाराष्ट्राच्या या राजधानीत शिवरायांचा पवित्र भगवा डौलाने फडकताना दिसेल. हा भगवा म्हणजे त्यागाचा ध्वज आहे.

२६ मार्च १९६८ मुंबई महापालिकेचे निकाल लागले. १४० सदस्यांच्या सभागृहात ६५ जागा मिळवून काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला, तर शिवसेनेला ४२ जागा मिळाल्याने, शिवसेना विरोधी पक्ष बनला. प्रजा समाजवादी पक्षाचे ११ नगरसेवक निवडून आले.

ठाणे– मुंबई नंतर १९६८ मध्ये शिवसेनेने पुण्यात महापालिका निवडणूक लढवली. तेथे सेनेचा केवळ एकच नगरसेवक निवडून आला. मराठी अस्मितेचा विषय मुंबई – ठाण्यात विजय मिळवून देऊ शकतो हा त्याचा अर्थ होता.

सीमा प्रश्न जिवंत ठेवला तो शिवसेनेनेच. ठाकरे म्हणत, महाराष्ट्राला मुंबई मिळाली म्हणून आपण खूश राहू नये. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदरसह संयुक्त महाराष्ट्र होईपर्यंत आपण जंग जंग पछाडले पाहिजे. सीमा प्रश्नाचे गांभीर्य समजावे म्हणून ठाकरे यांनी २० जानेवारी १९६९ रोजी इंदिरा गांधींना पत्र पाठवले होते. सीमा प्रश्न सुटावा म्हणून शिवसेनेने असा निर्धार केला आहे की, यापुढे आपण, आपले उपपंतप्रधान, कोणीताही केंद्रीय मंत्री व म्हैसूरचे मुख्यमंत्री– काँग्रेसचे अध्यक्ष यांना २६ जानेवारी १९६९ नंतर मुंबई शहरात पाऊल टाकताच कडवा विरोध केला

जाईल. शिवसैनिक त्यांच्या मार्गावर आडवे पडून त्यांच्या मोटारी अडवतील. आपण लोकशाही मार्गाने लोक इच्छेनुसार हा प्रश्न सोडवाल, अशी शिवसेनेला आशा आहे.

२७ जानेवारी १९६९ रोजी त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांची मोटार शिवसैनिकांनी अडवली. मुंबईत ५ ठिकाणी गाडी अडविण्यात आली. चव्हाणांना आपला मार्ग बदलावा लागला.

फेब्रुवारी महिन्यात उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांची मोटार शिवसैनिकांनी माहीमला अडवली पण न थांबताच मोटारींचा ताफा वेगाने पुढे गेला. मुंबईत दंगल पेटली. शिवसैनिकांच्या अंगावरून मोरारजींची गाडी गेली, रक्त सांडले म्हणून मराठी लोक संतप्त झाले. शिवसेनाप्रमुखांनी 'आता माघार नाही' असे जाहीर केले व मुंबई पेटली. दि. ९ फेब्रुवारी १९६९ ला पहाटे ४.३० वाजता बाळासाहेब ठाकरे यांना मातोश्रीतून अटक झाली आणि मुंबईत हिंसाचार सुरु झाला. संचारबंदी गोळीबार करूनही दंगल आटोक्यात आली नाही. कुलाबा ते दहिसर, मुलुंड ते ठाणे सर्वत्र जाळपोळ, तोडफोड, लाठीमार, गोळीबार अशा घटना घडल्या. लष्कराला पाचारण करण्यात आले. आंदोलन मागे घ्या म्हणून मुख्यमंत्र्यांनी ठाकरेंना विनंती केली. अखेर बाळासाहेब ठाकरे यांनी तुरुंगातून शांततेचे आवाहन केले. जादूची कांडी फिरावी तशी मुंबई एकदम शांत झाली.

मुंबईच्या हिंसाचारावर संसदेत जोरदार चर्चा झाली. कम्युनिस्ट पक्षाने शिवसेनेवर बंदी घालावी तसेच केंद्रीय गृहमंत्री व मुख्यमंत्र्यांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी केली. शिवसेना फॅसिस्ट संघटना असल्याचा आरोप केला गेला.

गृहमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले, 'शिवसेनेचा एक फॅसिस्ट संघटना म्हणून मी सर्वप्रथम धिक्कार केला आहे. शिवसेना ही मुंबईच्या जीवनात लांच्छनास्पद आहे. शिवसेनेचा हेतू पराभूत करण्यासाठी सर्वकाही केले पाहिजे'.

शिवसेनेने केलेल्या आंदोलनात मुंबईत भडकलेली दंगल सरकारला नियंत्रणाखाली आणता आली नाही म्हणून डाव्या पक्षांनी केंद्र सरकार विरोधात संसदेत अविश्वासाचा ठराव मांडला होता, पण तो ठराव २७३ विरुद्ध ८३ मतांनी फेटाळाल गेला.

इंदिरा गांधी उत्तर देताना म्हणाल्या, 'देशाची अखंडता, एकता व प्रगतीला शिवसेनेचा धोका आहे. अशा चळवळीला वीर पुरुष शिवाजी महाराजांचे नाव असणे खेदजनक आहे. मुंबईचे जीवन ठप्प करणारी संघटना या महान शहराला काय मिळवू शकते. शिवसेनेसारख्या संघटना का वाढतात याचा आपण सर्वांनीच खोलवर विचार करण्याची वेळ आली आहे.'

मुंबईत दंगल पेटली असताना शिवसेनाप्रमुख पुण्यातील येरवडा तुरुंगात बंदिस्त होते. मुख्यमंत्री वसंतराव नाईक शिवसेनेला सहकार्य करतात म्हणून शिवसेनेला वसंतसेना असे हिणवले जात होत.

ठाकरे ७६ दिवसांचा तुरुंगवास भोगून बाहेर आले. अटकेचा अमृत महोत्सव साजरा करून ७६ व्या दिवशी बाहेर आलो असे म्हणाले.

कम्युनिस्ट पक्षाचे लालबागमधील आमदार व कामगार नेते कृष्णा देसाई यांचा खून झाल्याची बातमी ६ जून १९७० च्या सकाळीच मुंबईत वा-यासारखी पसरली. या खुनामागे शिवसेनेचा हात आहे असा आरोप जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी केला. दि. १० जून १९७० च्या मार्मिकमध्ये ठाकरे यांनी, 'डोमकावळ्यांनो, फुकट श्राद्ध घालण्याच्या भानगडीत पडू नका' असा लेख लिहिला, 'कृष्णा देसाई आमचे विरोधक होते पण वैरी नव्हते'. कृष्णा देसाईच्या हत्या प्रकरणी १९ तरुणांना अटक झाली ते सर्व शिवसैनिक असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. याच गदारोळात २७ जून १९७० रोजी शिवसैनिक सदाकांत ढवण याची हत्या झाली. ही हत्या

म्हणजे राजकीय सूड असे म्हटले गेले. सर्व राजकीय पक्षांनी कृष्णा देसाईच्या हत्येनंतर शिवसेनेच्या विरोधात एकाच हल्लकल्लोळ माजवला होता तो सादाकांत ढवण यांच्या हत्येनंतर झाला नाही. कृष्णा देसाईच्या हत्येमुळे रिक्त झालेल्या जागेवर आमदारकीची पोट निवडणूक १५ सप्टेंबर १९७० रोजी झाली. कम्युनिस्ट पक्षाने कृष्णा देसाईची पत्नी सरोजिनी देसाई यांना तिकीट दिले.

शिवसेनेने मुंबई महापालिकेतील सुधार समितीचे अध्यक्ष वामनराव महाडिक यांना त्यांच्याविरोधात उमेदवारी दिली. काँग्रेस पक्षाने आपला उमेदवार उभा न करता सरोजिनी देसाई यांना पाठिंबा जाहीर केला. अन्य राजकीय पक्षांनीही कम्युनिस्ट पक्षाला पाठींबा दिला. शिवसेनेला तेव्हा जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व स्वतंत्र पक्षाने सहकार्य दिले होते. या निवडणुकीत सरोजिनी देसाई यांना २९,५९२ तर शिवसेनेचे महाडिक याना ३१,५९२ मते मिळाली. वामनराव महाडिक १६५९ मतांनी निवडून आले. कम्युनिस्टांचा बालेकिल्ला समजला जाणा-या लालबागमध्ये शिवसेनेचे अवघ्या ४ वर्षात पाय रोवले आणि लाल बावटा हरवून तेथे भगवा झेंडा फडकावून दाखवला.

निकालानंतर बाळासाहेब ठाकरे म्हणाले– ‘आमचे हे धर्मयुद्ध आहे. कम्युनिस्टांच्या बाबतीत आम्ही ठोकशाहीची भाषा करणार, कारण त्यांना लोकशाहीची भाषा समजत नाही.‘

१९७० च्या दशकात मुंबईत महानगरात ४२ टक्के मराठी भाषिक होते व पश्चिम महाराष्ट्रातून आलेला मराठी समाज हा काँग्रेसकडे झुकलेला होता; तर कोकणातून आलेल्या मराठी लोकांचा कल समाजवादी विचारांकडे होता. मुंबईतील मराठी कामगार हा कम्युनिस्टांकडे आकर्षित झालेला होता. मुंबईतील राजकीयदृष्ट्या विभाजित झालेला मराठी समाजाला राजकारणात अपेक्षेप्रमाणे लाभ मिळत नव्हता.

मराठी लोकांमध्ये घाटी, कोकणी, ब्राम्हण, ब्राह्मणेतर, सीकेपी, सारस्वत, भंडारी, कोळी, माळी, कुणबी, वैश्य, दलित, आंबेडकरवादी बौद्ध असे अनेक जाती समूहाचे भेदाभेद होते व ते वाद वाढवणारे होते. शिवसेनाप्रमुखांनी मराठी माणूस हा भूमिपुत्र या संकल्पनेसाठी एकत्र आणला आणि मराठी माणसाच्या ताकदीने शिवसेनेचा विस्तार केला. अगदी सुरुवातीला स. अ. रानडे, अँड. बळवंत मंत्री, माधव देशपांडे, श्याम देशमुख, पद्माकर अधिकारी हे अन्य सहकारी ठाकरेंबरोबर होते. १९६७ नंतर मनोहर जोशी, सुधीर जोशी, प्रमोद नवलकर, दत्ता प्रधान हे मध्यमवर्गीयांचे प्रतिनिधित्व करणारे सेनेत आले. नंतर दत्ताजी साळवी, वामनराव महाडिक, लीलाधर डाके, दत्ताजी नलावडे असे मराठा–बहुजन समाजाचे प्रतिनिधी शिवसेनेत आले. विजय पर्वतकर, छगन भुजबळ, अमरनाथ पाटील, भाई शिंगरे, बंडू शिंगरे, सुभाष देसाई असे तरुण या काळात सेनेत सक्रिय होते. शिवसेनाप्रमुखांचे प्रमुख सहकारी उच्चवर्गीय पदाधिकारी, शाखाप्रमुख, असंख्य शिवसैनिक हे बहुजन दलित समाजातील होते. पक्षात नेमणुका करताना जात हा निकष न ठरवता शिवसेनाप्रमुखांवर असलेली निष्ठा याला या संघटनेत सुरुवाती पासून महत्त्व दिले गेले. ठाकरेंनी एकदा आंदोलनाचा आदेश दिला की, त्यावर चर्चा नाही किंवा शंका नाही अशी पक्षाची कार्यपद्धती होती. विरोधक त्याला हुकूमशाही म्हणत पण स्वतः शिवसेनाप्रमुख त्याला शिवशाही म्हणत असत.

कृष्णा देसाईच्या हत्येनंतर शिवसेनेला पोट निवडणुकीत विजय मिळाल्याने संघटना जोरात कार्यरत झाली. १२ एप्रिल १९७० रोजी मार्मिकमध्ये प्रजा समाजवादी पक्षावर ‘अक्कल मार्शीच्या अवलादींचा अकरा जणांचा पक्ष’असे संपादकीय लिहून प्रजा समाजवादी पक्षाबरोबर शिवसेनेने असणारी युती तोडून टाकली.

१९७१ मध्ये शिवसेनेने लोकसभा निवडणूक लढवली. मुंबईत अपक्ष उमेदवार जनरल करिआप्पांना पाठिंबा दिला. 'मराठी माणसांच्या मारतात गप्पा, निवडून आणतात करिअप्पा', 'भगाव लुंगीच्या भारतात गप्पा, का हवे मग करिअप्पा' अशी विरोधकांनी सेनेवर टीका केली. तेव्हा ठाकरे म्हणाले– 'करिअप्पा हे केवळ दाक्षिणात्य नाहीत. त्यांनी देशाची लष्करी सेवा केली आहे. लष्करप्रमुख म्हणून काम केलेला माणूस हा आपल्या प्रांतापुरता विचार करणारा असू शकत नाही.'

हा निवडणुकीत देशातील विरोधी पक्षांनी इंदिरा हटावो घोषणा दिली होती. पण देशात काँग्रेसचे ३५२ खासदार निवडून आले व महाराष्ट्रात ४५ पैकी ४२ विजयी झाले. शिवसेनेचे चारही उमेदवार व करिअप्पा पराभूत झाले. 'हा विजय गाईचा नाही, बाईचा नाही तर शाईचा आहे.' अशी ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली होती. तेव्हा काँग्रेसचे निवडणूक चिन्ह गाय–वासरू होते.

मार्च १९७१ मध्ये शिवाजी पार्कवर झालेला इंदिरा काँग्रेसच्या सभेत यशवंतराव चव्हाण यांनी – 'शिवसेना ही विषवल्ली असून तिचा समूळ नायनाट करायला हवा.' अशी टीका केली होती.

मुंबई महापालिकेत काँग्रेस आय, काँग्रेस ओ व काँग्रेस आर असा तीन गटांत काँग्रेस पक्ष विभागाला होता. त्याचा फायदा घेत शिवसेनेने महापौर पदाची निवडणूक जिंकली व हेमचंद्र गुप्ते हे सेनेचे महापौर झाले. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे प्रमोद नवलकर हे एकमेव आमदार म्हणून निवडून आले. नंतर मुंबई महापालिकेतून विधान परिषदेवर मनोहर जोशी आमदार झाले.

मुंबईतील केंद्रीय आस्थापनांमध्ये मराठी माणसाला ८०% नोक–या मिळाल्या पाहिजेत म्हणून सेनेने आंदोलने केली. एअर इंडियामध्ये मराठी माणसाला डावलले जाते म्हणून मोर्चा काढला. एअर इंडियाचे चीफ पर्सनल मॅनेजर एस. के. नंदा यांच्या

थोबाडीत मारून त्यांना खाली पाडले हे प्रकरण खूप गाजले. या घटनेनंतर ठाकरेंनी मार्मिकमध्ये आम्ही षंढ झालो आहोत असा अग्रलेख लिहिला.

१९७२ मध्ये शिवसेनाप्रमुखांनी राजकीय सहकार्यासाठी मुस्लीम लिगबरोबर युती केली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व मुस्लीम लीगचे बनातवाला यांनी दक्षिण मुंबईत मस्तानी तलाव येथे एकत्र सभा घेतली.

काँग्रेस – मुस्लीम लीग, जनता पक्ष – मुस्लीम लीग जमतं मग शिवसेनेशी मुस्लीम लीगचं का जमणार नाही, असा प्रश्न ठाकरेंनी मार्मिकमधून भगवा आणि हिरवा लेख लिहून नव्या युतीचे समर्थन केले होते. अर्थात जनतेने या मैत्रीला साथ दिली नाही, ही मैत्री क्षणिक ठरली व १९७९ मध्ये संपली.

जानेवारी १९७४ ला मुंबई लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली त्यात शिवसेनाप्रमुखांनी काँग्रेसचे रामराव आदिक यांना पाठिंबा दिल्याने सर्वांना आश्चर्य वाटले. संपादक ग. वा. बेहरे 'काँग्रेसला पाठिंबा देणारे सेनापती की शेणपती' असा लेख लिहिला म्हणून शिवसैनिकांनी बेहरे यांना दादरमध्ये मारहाण केली व त्यांचे कपडे फाडले.

ठाकरे यांनी म्हटले–'मुंगूस व साप यांची मैत्री कधीही होणार नाही. त्याचप्रमाणे शिवसेनेचे कम्युनिस्टांबरोबर कधी जमणार नाही. या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराला आपण पाठिंबा दिला पण काँग्रेस पक्षात जा असे आपण शिवसैनिकांना कधी सांगणार नाही. माझ्या निर्णयाचा अर्थ काँग्रेस बरोबर युती अथवा विलीनीकरण असा लावू नये. काँग्रेस उमेदवारास पाठिंबा हा एक राजकीय डाव आहे'. त्या निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाच्या रोझा देशपांडे विजयी झाल्या व काँग्रेसचा पराभव झाला.

१९ जून १९७७ च्या मार्मिकमध्ये शिवसेनेचे यश आणि विस्तार या विषयी लेख लिहिला गेला. सेनाभवनाच्या उदघाटनाला याच लेखातून ठाकरे यांनी निमंत्रण दिले. त्यात म्हटले 'हा हा म्हणता शिवसेनेला ११ वर्षे पूर्ण झाली. शिवसेनेनंतर देशात ऐंशीच्या वर सेना निघाल्या, परंतु टिकली फक्त शिवसेनाच. शिवसैनिकाला गुंडगिरी आणि बंडखोरीचा अर्थ नीट समजला आहे. अगोदर हात उचलू नकोस मात्र कोणी हात उचललाच तर भेकडप्रमाणे वागू नकोस'.

दि. १९ जून १९७७ रोजी शिवसेनेच्या उदघाटन सोहळ्यात ठाकरे म्हणाले, इथे जातीभेद नाहीत, इथे बडवे नाहीत. सर्वांना 'दारं' उघडी आहेत. शिवसेना भवन ही शिवसैनिकांची हक्काची वास्तू आहे. तिथे आम्ही केवळ खासदार आहोत. हे भवन महाराष्ट्रातील राजकारणाची दिशा बदलायला लावेलच पण ह्याचवेळेला हे सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बनले पाहिजे असा माझा आग्रह आहे.

आणीबाणीनंतर केंद्रात जनता पक्षाचे सरकार आले. पेट्रोलियम मंत्री हेमवतीनंदन बहुगुणा यांनी जय महाराष्ट्र घोषणेवर आक्षेप घेताच ठाकरे यांनी २९ मे १९७७ रोजी मार्मिकमधून 'जो येतो तो महाराष्ट्राला अक्कल शिकवतो, असा लेख लिहिला. तामिळनाडूत 'सत्यमेव जयते' हे बोधवाक्य ज्यावेळी देवनागरीतून तामिळ भाषेत लिहिले, तेव्हा हे राष्ट्रवादी बहुगुणा कोणत्या फुटपाथवर पाणीपुरी विकत होते? असा त्यांनी प्रश्न विचारला.

२५ फेब्रुवारी १९७८ ला झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना उतरली. दलित पँथरचे नामदेव ढसाळ यांना सोबत घेऊन शिवशक्ती–भीमशक्तीचा नारा दिला होता. सेनेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. केवळ १.८२ टक्के मते मिळाली. मुंबईतील सर्वांच्या सर्व ३४ जागा जनता पक्षाने जिंकल्या. मुंबईकरांनी शिवसेनेकडे दुर्लक्ष केले.

मुंबई महापालिकेत शिवसेनेचे पूर्ण बहुमत नसतानाही १९७१ ते १९७८ मध्ये सेनेने महापालिकेच्या सर्व ११७ जागा लढवल्या व २१ नगरसेवक जिंकले. जनता पक्षाने मित्र पक्षांच्या मदतीने ८३ जागा जिंकून सत्ता काबीज केली. जनाधार कमी झाला म्हणून ठाकरे अस्वस्थ होते. पराभवानंतर शिवाजी पार्कवरील मेळाव्यात ठाकरे म्हणाले, 'मुंबई महापालिकेवर भगवा फडकविण्यास मी अपयशी ठरलो'. लोकांची माझ्यावर निष्ठा राहिलेली नाही, मी माझी गा-हाणी मांडण्यात वेळ कां वाया घालवावा? मी शब्दांना जागणारा माणूस आहे. आता लोकांना मी नको आहे. त्यामुळे मी शिवसेनेचा राजीनामा देत आहे'.

शिवसेनाप्रमुखांच्या भाषणानंतर शिवसैनिकांनी आकांत केला. 'तुम्ही जाल तर आमच्या प्रेतावरून' अशा भावना व्यक्त झाल्या. शिवसेनाप्रमुखांशिवाय शिवसेना ही कल्पनाच शिवसैनिक करू शकत नव्हता.

१९८० च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनाप्रमुखांनी इंदिरा गांधींना साथ दिली. दुभंगलेला जनता पक्ष व इंदिरा कॉँग्रेस यांच्या संघर्षात सेनेने इंदिरा कॉँग्रेसला मदत केली. 'इंदिराजींच्या हातात साथ आणि बाकीच्या पक्षांना सणसणसणीत लाथ असे शिवसेनाप्रमुखांनी आवाहन केले होते.' सेनेचे दोनही उमेदवार (वामनराव महाडिक – मुंबई व सतीश प्रधान – ठाणे) पराभूत झाले. महाराष्ट्रातून इंदिरा कॉँग्रेसचे ३९, शरद पवारांच्या समाजवादी कॉँग्रेसला १, तर जनता पक्षाला १ जागा मिळाली.

१९८० च्या विधानसभा निवडणुकीत इंदिरा कॉँग्रेस राज्यात सत्तेवर आली. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री झाले. इंदिरा कॉँगेसने शब्द दिल्याप्रमाणे विधान परिषदेवर प्रमोद नवलकर आणि मनोहर जोशी हे शिवसेनेचे आमदार इंदिरा कॉँग्रेसने निवडून आणले.

१९८२ मध्ये जानेवारी मुंबईत दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांचा संप झाला आणि १८ ऑगस्ट १९८२ ला पोलिसांचे बंड झाले. संपात मराठी कामगार संपला, तर शिवसेनेला धोका निर्माण होईल हे लक्षात घेऊन मुंबईच्या परळ मधील कामगार मैदानात ९ सप्टेंबर १९८२ रोजी शिवसेनाप्रमुखांनी काँग्रेसशी संबंध तोडून टाकायचे जाहीर केले. बाळासाहेब भोसलेंच्या काळात गिरणी कामगार काय अनू पोलीस काय, जे उध्वस्त होत आहेत, त्यात मराठी माणसांचे खच्चीकरण होत होते. काँग्रेसबरोबर असणारी दोस्ती मराठी माणसाच्या मुळावर येणार असेल तर आम्ही दोस्तीला लाथ मारू पण आम्ही आमच्या बांधवांची साथ सोडणार नाही.

मुंबईतील कामगार चळवळ संपली. ती वाचवण्यासाठी शिवसेना व सामना यांचे प्रयत्न अपुरे पडले. भारतीय कामगार सेना ही शिवसेनेची सलंग्न संघटना. पूर्वी दत्ताजी साळवी, सूर्यकांत महाडिक हे अध्यक्ष होते. आता खासदार अरविंद सावंत अध्यक्ष आहेत. महाडिक आपल्यात नाहीत पण त्यांच्याबरोबर व सावंत यांच्याशी संशोधकाने मुंबईतील कामगार चळवळ या विषयावर अनेकदा चर्चा केली. कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांनी १९८२ मध्ये पुकारलेल्या गिरणी कामगार संपानंतर मुंबईची कामगार चळवळ अस्ताला निघाली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, जॉर्ज फर्नांडिस यांनी एकत्र येऊन कामगारांना एकत्र येण्याचे आवाहन केले पण कामगारांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मुंबईतील पंचतारांकित हॉटेल्स व मोठमोठया खासगी कंपन्यांमध्ये शिवसेनेचे कामगार आहेत. गिरण्या–कारखाने बंद पडून तेथे टॉवर्स उभे राहिले व कामगार रस्त्यावर आले पण सेना किंवा सामना यांना वाचवू शकले नाहीत. पूर्वी सामानात कामगार सदर असायचे, ज्यामध्ये कामगार वेतनवाढीच्या बातम्या प्रसिद्ध होत. आता ते सदर काळानुसार बंद झाले. मराठी माणसाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी स्थापन झालेली शिवसेना व यावर आवाज उठवणारा सामना मराठी कामगार चळवळ वाचवू शकला नाही हे वास्तव आहे.

२७ ऑक्टोबर १९८२ च्या दसरा मेळाव्यात शिवसेनाप्रमुखांसोबत शरद पवार (समाजवादी काँग्रेस) व जॉर्ज फर्नांडिस (लोकदल) हे दोन्ही नेते व्यासपीठावर एकत्रित हजर होते. या मेळाव्यात सर्वांनी दत्ता सामंत व इंदिरा गांधींवर टीका केली. महाराष्ट्रात पुन्हा इंदिरा गांधींची सत्ता येणार नाही, त्यांना घालवणार म्हणजे घालवणारच असे ठाकरे यांनी म्हटले होते.

१९८४ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने भारतीय जनता पक्षासोबत युती केली होती. त्याचा फायदा दोघांनाही झाला नाही. भाजपतील ज्येष्ठ नेत्यांनी प्रांतीयवादी शिवसेनेबरोबर युती नको असा निर्णय घेतला. त्यावर शिवसेनाप्रमुखानी 'कमळाबाई आम्हाला सोडून गेली', असा उपहासात्मक टोला मारला.

१९८५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे छगन भुजबळ हे माझगाव मुंबई मधून एकमेव आमदार निवडून आले. पराभवानंतर ठाकरे म्हणाले, 'आम्ही खरोखरच व्यथित झालो आहोत. शिवसेनेचे ८ आमदार निवडून आले असते तर काही आमच्या बंगल्यावर ५ मजले चढवले नसते. शाखा शाखांवर सोन्याची कौले चढवली नसती. पण या बळावर शासनाला वेठीला धरून मराठी माणसाच्या विकासाचे आमचे स्वप्न साकार केले असते. शिवसेनेचा एकेक आमदार म्हणजे अणुशक्ती आहे. आठ आमदार आले असते तर तेच मराठी माणसाचे अष्टप्रधान मंडळ बनले असते. पराभव झाला तरी सेनेला लक्षावधी मते मिळाली आहेत. अनेक मतदारसंघात दोन क्रमांकाची मते आहेत. या शिवसेनेवर निष्ठा असलेल्या जिवंत मनाच्या मराठी माणसांना वाऱ्यावर सोडून चालणार नाही. हा अग्निकुंड आम्हाला धगधगता ठेवावाच लागणार आहे.

१९८५ मध्ये मुखमंत्री वसंतदादा पाटील यांनी मुंबई महाराष्ट्रपासून तोडून केंद्रशासीत करण्याचे कारस्थान केंद्रात शिजत आहे, असे उद्गगार काढले आणि शिवसेनेला संजीवनी मिळाली.

१९८५ च्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सेनेने स्वबळावर १७० पैकी १३९ जागांवर उमेदवार उभे केले. ही मुंबई मराठी माणसांची असून या 'मुंबईला हात तर लावून बघा असा इशारा दिला. मुंबई आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची' अशा घोषणा सुरु झाल्या. मुंबईतून काँग्रेसने विधानसभा निवडणुकीत ७० टक्के उमेदवार अमराठी निवडले. महापालिकेसाठी काँग्रेसला ३० टक्केही मराठी चल उठ, घे तो धनुष्य बाण हाती, ओढ ती दोरी, घे वेध आणि हाण त्या महाराष्ट्र द्वेष्ट्यांच्या छाताडावर मराठी अस्मितेचा तीर ... अशा शब्दांत ठाकरेंनी मराठी माणसाला चेतावले.

एप्रिल १९८५ मध्ये मुंबई महापालिका निवडणूक झाली. शिवसेनेने ७४ जागा जिंकल्या व सत्ता काबीज केली. काँग्रेसला ३७, भाजपला १३, जनता पक्षाला १०, समाजवादी काँग्रेसला ९ जागा मिळाल्या. शिवसेनेच्या स्थापनेनंतर १८ वर्षांनी सेनेला स्वबळावर महापालिकेवर भगवा झेंडा फडकविण्यात यश मिळाले.

१९८५ मध्ये मुंबईची लोकसंख्या ८२ लाख होती. त्यात ३८ टक्के मराठी भाषिक तर ६२ टक्के अमराठी होते. निकालानंतर ठाकरे म्हणाले '१९७४ नंतर मुंबईत आलेल्या परप्रांतीयांना परत पाठवायला हवे'. १९८५ च्या महाडमधील राज्य अधिवेशनात ठाकरे यांनी मुंबई जिंकली. आता घोडदौड महाराष्ट्रात अशी घोषणा दिली.

१९८५ नंतर शिवसेना आणि हिंदुत्व हे समीकरण पुढे आले. कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यात पूजा अर्चा करायला शासनाने १९६८ मध्ये बंदी घातली होती. त्या

विरोधात शिवसेनेने आंदोलन केले. दुर्गाडी किल्ला ही हिंदूंची वस्तू आहे अशी भूमिका मांडली.

१९७० मध्ये कम्युनिस्टांचा पराभव करून शिवसेनेचे वामनराव महाडिक निवडून आले तेव्हा ठाकरे म्हणाले, जनसंघ व राष्ट्रीय स्वयंमसेवक संघ यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे मी आभारी आहे. आमचा विजय हा हिंदुत्वाचा आहे. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनाप्रमुखांनी म्हटले – लोकसभेत हिंदूंच्या न्याय हक्कासाठी लढण्याची वेळ आली आहे.

१९८६ च्या नोव्हेंबर महिन्यात शिवसेनेने राज्यात ग्रामीण भागात भगवा सप्ताह योजला होता. डिसेंबर १९८७ मध्ये विलेपार्ले विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली तेव्हा महापौर रमेश प्रभू हे सेनेचे उमेदवार होते. भाजपने जनता पक्षाला पाठिंबा दिला होता व प्रभू निवडून आले. या निवडणुकीत 'गर्व से काहो हम हिंदू है', ही ठाकरे यांनी दिलेली घोषणा गाजली. हा विजय हिंदुत्वाचा असा लेख ठाकरेंनी मार्मिकमध्ये लिहिला.

विलेपार्ले निवडणुकीत केलेला हिंदुत्वाचा प्रचार, रिडडल्स प्रकरणावर नवबोध समाजाशी झालेला संघर्ष, छगन भुजबळ यांनी हुतात्मा स्मारकाचे गंगाजल शिंपडून केलेले शुद्धीकरण, पंजाबात खलिस्तानी हिंदूंच्या खात्मा करतात म्हणून शिखांचा आर्थिक बहिष्कार घालण्याची ठाकरे यांनी दिलेली धमकी, यातून तरुण वर्ग शिवसेनेकडे आकर्षित झाला.

१९८८ मध्ये शिवसेनेने औरंगाबाद महापालिका निवडणूक लढवली आणि ६० पैकी २७ जागा मिळाल्या. ठाकरे यांनी १ मे १९८८ रोजी मार्मिकमध्ये 'औरंगजेबाचे पिशाच्च गाडले' असा अग्रलेख लिहिला.

२५ जून १९८८ शरद पवार मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी शिवसैनिकांवर कारवाईचा बडगा उचलला. शिवसैनिक जबरदस्तीने हप्ते वसुली करतात असे म्हणाले. हिंमत असेल तर शिवसेनेच्या आर्थिक व्यवहाराची त्यांनी चौकशी करावी, असे आव्हान ठाकरे यांनी पवारांना केले.

३०/३१ डिसेंबर १९८८ पुण्यात स. प. महाविद्यालय मैदानावर शिवसेनेचे तिसरे राज्यव्यापी अधिवेशन पार पडले. त्या अधिवेशनात माझा शिवसैनिक महाराष्ट्रात मराठी व हिंदुस्थानात हिंदू असे विचार बाळासाहेबांनी मांडले.

शिवसेनेचा मुंबई – ठाण्यात राजकीय प्रभाव वाढत असतानाच ठाणे महापौरपदाच्या निवडणुकीत सेनेचे उमेदवार प्रकाश परांजपे १ मतांनी पराभूत झाले व काँग्रेसचे मनोहर साळवे विजयी झाले. शिवसेनेची शिळा बिघडली म्हणून ठाकरे यांनी सेनेच्या ३० नगरसेवकांना राजीनामे देण्यास सांगितले.

विश्वासघातक्यांना क्षमा नाही, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली होती. अशा वातावरणात २२ एप्रिलला सेनेचे नगरसेवक श्रीधर खोपकर यांची हत्या झाली आणि ठाण्यातील आनंद दिघे यांना टाडाखाली अटक झाली. नंतर पुराव्याअभावी दोघांची सुटका झाली पण खोपकर हत्या घटनेनंतर शिवसेनेची दहशत वाढली.

एप्रिल १९८९ मध्ये विलेपार्ले निवडणुकीत शिवसेनेने हिंदुत्वाच्या मुद्द्यावर प्रचार केला म्हणून मुंबई उच्च न्यायालयाने प्रभू यांची आमदारकी रद्द ठरवली. शिवसेनाप्रमुखांना ६ वर्षे मतदान करण्यात बंदी घातली.

त्यानंतर झालेल्या सभा – कार्यक्रमातून शिवसेनाप्रमुख सुरुवातच माझ्या हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो अशी करीत असत. हिंदुत्व म्हणजे राष्ट्रीयत्व, चैतन्य असे सांगत.

२८ ऑक्टोबर १९८१ मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत – पाकिस्तान मॅच (क्रिकेट) ठरली. सामना होऊ देणार नाही अशी भूमिका ठाकरेंनी मांडली. ईशान्य मुंबईचे विभाग प्रमुख शिशिर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी वानखेडेची खेळपट्टी कुदळ मारून व तेल ओतून उखडून टाकली आणि सामना रद्द झाला. शिवसेनेचा हा पराक्रम जागतिक पातळीवर पोहोचला.

१९८९ ची लोकसभा निवडणूक भाजप – शिवसेना युतीने लढवली. भाजपचे महाराष्ट्रातून प्रथमच १० खासदार निवडून आले तर शिवसेनेचे चार खासदार लोकसभेत पोहोचले. केंद्रीय निवडणूक आयोगाने १३ डिसेंबर १९८९ रोजी शिवसेनेला प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता दिली आणि धनुष्य बाण हे निवडणूक चिन्ह दिले. १९६६ साली स्थापन झालेल्या संघटनेला १९८९ मध्ये प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळाली. सप्टेंबर १९८९ मध्ये भारतीय विद्यार्थी सेनेच्या अध्यक्षपदावर राज ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली.

१९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनाप्रमुखांनी एकच लक्ष्य विधानसभा अशी घोषणा देऊन महाराष्ट्रात काँग्रेसला आवाहन दिले. राज्यातील २८८ जागा भाजप – शिवसेना युतीने लढवल्या. शिवसेना १७१ आणि भाजप ११७ असे युतीचे जागा वाटप झाले.

शिवसेनेने राज्यस्तरीय विस्तार करण्याचे ठरविल्यावर १९९० ची विधानसभा निवडणूक ही राज्यस्तरावर लढविलेली शिवसेनेची पहिलीच निवडणूक होती.

शिवसेना–भाजप युतीचे ९४ आमदार विजयी झाले. मार्च १९९० शिवसेना पक्षाला विधानसभेत विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळाली व श्री. मनोहर जोशी यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली.

**कोष्टक क्र. १.१ महाराष्ट्र विधानसभा १९९० निवडणूक निकाल**

| पक्ष | जिंकल्या | मतांची टक्केवारी |
|---|---|---|
| काँग्रेस | १४१ | ३८. १७ |
| शिवसेना | ५२ | १५.९४ |
| भाजप | ४२ | १०.७१ |
| जनता दल | २४ | १२.७२ |
| शेकाप | ८ | २.४२ |

(ठाकूर, योगेंद्र)

१९७०च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला बहुमत गाठता आले नाही. पण विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळाली.

* केंद्रातील व्ही. पी. सिंग सरकारने ७ ऑगस्ट १९९० रोजी मंडळ आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणार असे जाहीर केले आणि भाजपने 'मंदिर वही बनाऐंगे' अशी घोषणा देत लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली १९९० शिवाजी पार्क येथे मेळावा आयोजित केला. त्यामध्ये ठाकरे म्हणाले - 'मंडल आयोगामार्फत केंद्र जातीयवाद पसरवत आहे. जात आहे, पोट जात आहे, पण पोटाला जात चिकटवू नका. कुणाचे पोट रिकामे ठेवू नका. शिवसेनेत जे आहेत त्यांना विचारा, ते कोण आहेत? ते सांगतील - आम्ही शिवसैनिक आहोत.'

१९९१ मध्ये लोकसभा निवडणूक शिवसेना-भाजप युतीने लढवली. भाजपने ३१ व सेनेने १७ जागा महाराष्ट्रात लढवल्या त्यामध्ये भाजपला ५ तर शिवसेनेला ४ जागा मिळाल्या.

१९९१ मध्ये शिवसेनेत मनोहर जोशी विरुद्ध छगन भुजबळ अशी स्पर्धा सुरु झाली व डिसेंबर १९९१ ला नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात शिवसेनेतील १८

आमदारांसह भुजबळांनी सेनेला सोडचिठ्ठी दिली. सेनेतील फुटीमुळे ठाकरे संतप्त झाले. ६ डिसेंबर १९९१ च्या सामनामध्ये भुजबळांना शिवसेनेतून काढून टाकण्याचा आदेश प्रसिद्ध झाला.

भुजबळांनी शिवसेना फोडल्यामुले शिवसेनेच्या आमदारांची संख्या भाजपपेक्षा कमी झाली. मनोहर जोशी यांचे विरोधी पक्षनेते पद गेले आणि भाजपचे गोपीनाथ मुंडे हे विरोधी पक्षनेते झाले. माधव देशपांडे नावाच्या शिवसेनेच्या पदाधिका-याने जुलै १९९२ मध्ये पत्रकार परिषद घेऊन शिवसेनाप्रमुखांवर घराणेशाहीचा आरोप केला. मुंबईतील हिंदी चित्रपटसृष्टी व शिवसेनाप्रमुख यांचे नाते जिव्हाळ्याचे होते.

ठाकरे यांचे चित्रपट निर्माते–दिग्दर्शक–कलाकार यांच्याशी वैयक्तिक संबंध होते. चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या घरातील वाद–विवाद मिटविण्यात ठाकरे पुढाकार घेत असत. अनेक कलाकार मातोश्रीशी नियमित संबंध ठेवत असत. १९९२ – ९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटात अभिनेता संजय दत्त यांच्याकडे ए के ४७ मिळाली म्हणून त्याला टाडाखाली अटक झाली. राज्यात शिवसेनेचे सरकार आल्यावर संजय दत्त यांची जेलमधून सुटका झाली. संजय दत्त चुकला असेल पण तो देशद्रोही नाही, अशी भूमिका ठाकरे यांनी मांडली होती. संजय दत्त ठाकरे यांना डॅडी या नावाने संबोधित करत असे. शिवसेनेच्या उमेदवाराविरोधात संजयचे वडील सुनील दत्त लोकसभा निवडणुकीला उभे राहिले नाहीत, इतके त्यांचे कौटुंबिक संबंध होते.

दि. १८ जुलै १९९२ ला सामनामधून 'शिवसेनेला बाळासाहेब ठाकरे यांचा कुटुंबीयांसमवेत अखेरचा जय महाराष्ट्र' असे ठाकरेंनी जाहीर केले. तेव्हा हजारो शिवसैनिक मातोश्री बाहेर जमले. काहींनी आत्मदहनाची तयारी केली. २० जुलै रोजी शिवसेना भवन, शिवाजी पार्क येथे स्वतः ठाकरे आले व शिवसैनिकांनी प्रेमाचा व निष्ठेचा अभूतपूर्व वर्षाव केल्यामुळे मी शिवसेना सोडत नसल्याचे जाहीर केले.

’मला मरगळलेले, थंड शिवसैनिक नकोत, जागरूक, आक्रमक शिवसैनिक हवेत. शिवसैनिक थंड राहिले तर मी नेतृत्व करू शकत नाही. मला विस्तव हवा–राख नको’ – असे ठाकरे म्हणाले.

डिसेंबर १९९२ ला अयोध्येत बाबरी मशीद ऊध्वस्त झाली. मुंबईत दंगली सुरु झाल्या. मुंबईत हिंदूंच्या वस्त्यांवर आणि पोलिसांवर हल्ले सुरु झाले. सामनामध्ये ८ डिसेंबर १९९२ रोजी ठाकरेंनी ’देशद्रोह्यांना चिरडा’ असा अग्रलेख लिहिला. दि. ९ डिसेंबरला सामनामध्ये ’राष्ट्र जिवंत ठेवा’ असा अग्रलेख लिहिला. ‘मुसलमानांसमोर सरकारने गुडघे टेकले असतील पण आम्ही शांततेची कबुतरे सोडू इच्छित नाही, असे म्हटले, सरकार अकार्यक्षम आहे. पोलिसांकडे कमरेला रिव्हॉल्व्हर आहे पण राष्ट्रद्रोह्यांनी मारलेल्या व रस्त्यावर फेकून दिलेल्या मृतदेहांची गणना करणे हे एकच काम पोलिसांना दिले आहे. अशा षंढ सरकारवर आम्ही थुंकतो’ असा अग्रलेख लिहिण्यात आला.

१९९२–९३ च्या काळात सामनातील प्रक्षोभक अग्रलेखांवरून बाळासाहेब ठाकरेंवर कारवाई करण्याचा आदेश देण्यात आला. तेव्हाच विरोधी पक्षनेते नारायण राणे यांनी ’हिम्मत असेल तर शिवसेनाप्रमुखाना हात लावून दाखवा’, असे आव्हान दिले होते.

केंद्रातील एन. डी. ए. सरकारमधील शिवसेनेचे मंत्री सुरेश प्रभू, मनोहर जोशी, बाळासाहेब विखे–पाटील यांनी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडे राजीनामे दिले. सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत व प्रकाशक सुभाष देसाई यांना २५ जुलै २००० रोजी पोलिसांनी तांत्रिक अटक केली. माझगाव कोर्टाने आरोपपत्र दाखल करण्यात एवढा उशिरा कां, असा प्रश्न विचारून खटलाच रद्दबातल केला! शिवसेनाप्रमुखांनी स्वतःला अटक करवून घेतली व न्यायालयात स्वतः हजर राहिले पण भुजबळांचा डाव त्यांच्यावरच उलटला.

शिवसेना–भाजपमध्ये तीस वर्षे युती होती. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दोन्ही पक्षाने एकत्र लढल्या. काही अपवाद म्हणून स्वतंत्र लढल्या पण २०१९ नंतर ही युती संपुष्टात आली. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ ते २०१९ या काळात सेना सत्तेत सहभागी होती. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या केंद्रीय मंत्रिमंडळातही सेना सत्तेत होती. तरीही सामनामधून भाजप व पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्यावर टीका होत असे. सत्तेत सहभागी होणे म्हणजे आमचे अस्तित्व आम्ही गुंडाळले नाही, आमचा पक्ष, आमचा कार्यक्रम, आमची धोरणे वेगळी आहेत, असे शिवसेना सामनातून दाखवत असे.

२३ जानेवारी १९९३ ठाकरेंचा वाढदिवस आणि याच दिवशी सामनाने पाचव्या वर्षात पदार्पण केले. 'हिंदू तितुका मेळवावा, देश धर्म वाढवावा', हे मनोगत ठाकरे यांनी सामनामधून लिहिले.' ते म्हणतात, 'शिवसेना हिंदुत्व आणि सामना असा हा त्रिवेणी संगम आहे. माझ्यामुळे धर्मयुध्दास सुरुवात होणार असेल तर बेशक करा. बेधडक करा. आम्ही एक पिढी उभी केली. ज्वलंत पिढी शिवसेनेच्या रूपानं ही पिढी धगधगत ठेवण्याचे कार्य सामना करीत आहे. थोडी धार कमी करा, असे आम्हाला सांगणा-या एक जबाबदार अधिका-याला मी सांगितले, 'मी बाजूला होतो, सामना ही बंद करायला मी तयार आहे. शिवसेनाही बंद करूया. पण हे स्पिरिट तुम्ही मारले तर देश वाचू शकणार नाही.'

१९९५ च्या निवडणुकीत शरद पवार यांनी ठाकरेंच्या किरकोळ यष्टीच्या छातीची टिंगल – टवाळी केली.

**कोष्टक क्र. १.२ महाराष्ट्र विधानसभा १९९५ निवडणूक निकाल**

| पक्ष | लढवल्या | जिंकल्या |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | २८६ | ८० |
| जनता दल | १८२ | ११ |
| शिवसेना | १६९ | ७३ |
| भाजप | ११६ | ६५ |
| शेकाप | ४२ | ६ |
| अपक्ष | ३११६ | ४५ |

**(ठाकूर, योगेंद्र)**

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीत सेना–भाजप युतीला बहुमत मिळाले व युतीचे सरकार स्थापन झाले. सेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले.

१४ मार्च १९९५ मनोहर जोशी मुख्यमंत्री व गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी झाला. मुंबईतील ३४ जागांपैकी ३० जागांवर शिवसेना – भाजप युतीचे आमदार निवडून आले.

१९९५ सत्ता आली तेव्हा शिवसेनाप्रमुख ६२ वर्षांचे होते. ते मुळचे व्यंगचित्रकार. १९६६ मध्ये शिवसेना स्थापन केली तेव्हा ४० वर्षांचे होते. २९ वर्षांचा राजकीय संघर्ष व भाजपबरोबर युती करून राज्य जिंकून दाखविले. त्यांनी आयुष्यात कधीही कोणतेही सत्तेचे पद उपभोगले नाही. आपल्या सहका–यांना राज्यात व केंद्रात सत्तेची पदे दिली. ती संख्या शेकडयात जाऊ शकते. मुख्यमंत्रीय सेनेचा, महापौर सेनेचा, पण रिमोट मात्र शिवसेनाप्रमुखांनी त्यांच्या हातात ठेवला.

१९९६ ची लोकसभा निवडणूक सेना–भाजप युतीने लढवली. २ व ७ मे १९९६ ला निवडणूक झाली. भाजप २६ व शिवसेना २२ असे जागा वाटप झाले. महाराष्ट्रात भाजपचे १८ तर शिवसेनेचे १५ खासदार निवडून आले.

१९९७ मुंबई महापालिका निवडणूक. राज्यात युतीचे सरकार होते. युतीने निवडणूक एकत्र लढवली. शिवसेनेचे १०३ तर भाजपचे २६ नगरसेवक निवडून आले व महापौर शिवसेनेचा आला.

१९९८ लोकसभा निवडणूक. सोनिया गांधींना पंतप्रधान होऊ देणार नाही, असा प्रचार शिवसेनाप्रमुखांनी केला. देशात भाजपला १८२ जागा मिळाल्या. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले. या निवडणुकीत महाराष्ट्रात शिवसेनेला ६ व भाजपला ४ जागा मिळाल्या.

मुख्यमंत्र्यांच्या जावयाचे कोर्टात भूखंड प्रकरण म्हणून ठाकरे यांनी मनोहर जोशींना मुख्यमंत्रीपदाचा ३० जानेवारी १९९९ रोजी राजीनामा द्यायला सांगितले आणि १ फेब्रुवारी १९९९ रोजी नारायण राणे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

१९९९ च्या लोकसभा निवडणुकांत महाराष्ट्रातून शिवसेनेचे १५ तर भाजपचे १३ खासदार निवडून आले.

**कोष्टक क्र. १.३ महाराष्ट्र विधानसभा १९९९ निवडणूक निकाल**

| **पक्ष** | **लढवल्या** | **जिंकल्या** | **मतांची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| काँग्रेस | २४९ | ७५ | २७.२० |
| राष्ट्रवादी काँग्रेस | २२३ | ५८ | २२.५० |
| शिवसेना | १६९ | ६९ | १७.३३ |
| भाजप | ११७ | ५६ | १४.५४ |
| शेकाप | २२ | ५ | १.४९ |
| अपक्ष | ८३७ | १२ | ९.४९ |

**(ठाकूर, योगेंद्र)**

१९९९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना भाजप युतीला सत्ता गमवावी लागली.

काँग्रेस + राष्ट्रवादीचे सरकार आले. १८ ऑक्टोबर १९९९ ला शपथविधी. काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री. राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ उपमुख्यमंत्री झाले.

भुजबळ गृहमंत्री झाले. शिवसेनाप्रमुख त्यांचा लखोबा असा उल्लेख करीत. बाबरी मशीद पडल्यावर मुंबईत झालेल्या दंगलीच्या चौकशीचा श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी (२३ जानेवारी १९९६) रद्द केला होता. युती सरकारने फेटाळलेला अहवाल भुजबळांनी पुनरुजीवित केला.

सन २००० मध्ये कल्याण–डोंबिवली महापालिका निवडणूक शिवसेना – भाजपने एकमेकांच्या विरोधात लढवली. तेव्हा गोपीनाथ मुंडे यांनी 'बापाच्या जीवावर रेघोटया मारणारा नेता' अशी उद्धव ठाकरेंवर टीका केली. त्याला उद्धव ठाकरे यांनी उत्तर देताना – ''मेव्हुण्यांच्या (प्रमोद महाजन) पुण्याईवर उड्या मारण्यापेक्षा वडिलांची पुण्याई सर्वश्रेष्ठ अशी मुंडेंची खिल्ली उडावली.

शिवसेना विसर्जन करा. असा प्रचार मुंडे यांनी केला. हिंदू जिवंत असेपर्यंत शिवसेनेचे विसर्जन होणार नाही, असे उद्धव ठाकरेंनी उत्तर दिले. न्या. श्रीकृष्ण आयोगाच्या शिफारशीवरून विशेष कृती दलाने शिवसेनेच्या आमदार–नगरसेवकांवर (गजानन कीर्तिकर, नंदकुमार काळे, रवींद्र वायकर) यांच्यावर न्यायालयात गुन्हे दाखल केले. तेव्हा ठाकरे यांनी सामनामधून 'सुंताशाही' हा अग्रलेख लिहिला. 'न्यायालयाची ढाल पुढे करून काँग्रेसवाले श्री कृष्णाचे सूडचक्र चालवत आहेत. पण महाराष्ट्रातील विदेशातील कोट्यवधी हिंदू जनमानस या सुंताशाही विरुद्ध खवळून उठल्याशिवाय राहणार नाही.'

भारतीय कामगार सेनेचे अध्यक्ष दत्ताजी साळवी यांचे १९ फेब्रुवारी २००२ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. ते ३६ वर्षे शिवसेनेत कार्यरत होते. ठाकरे यांनी सामनामध्ये लिहिले – 'आमचे दत्ताजी गेले. शिवसेना हाच त्यांचा श्वास होता. दत्ताजी म्हणजे – प्राण जाय पर वचन न जाय या मुशीत तयार झालेले आमचे खंदे सहकारी होते.'

सन – २००२, मुंबई, ठाणे व नाशिक या महापालिका शिवसेना व भाजपने युती म्हणून लढवल्या. युतीच्या प्रचाराची शेवटची सभा शिवाजी पार्कला झाली. त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी बाळासाहेबांबरोबर हजर होते. मुंबई महापालिकेत शिवसेनेचे ९८, भाजपचे ३५ असे युतीचे १३३ नगरसेवक निवडून आले. मुंबईत सेनेची पुन्हा सत्ता आली.

दि. २७ फेब्रुवारी २००२ रोजी गुजरातमध्ये गोध्रा येथे स्थानकावर अयोध्येहून राम भक्तांना घेऊन आलेल्या साबरमती एस्प्रेसचे डबे पेट्रोल बॉम्ब टाकून पेटविण्यात आले. त्यात ६० रामभक्त पळून मूर्तिमुखी पडले. गुजरातमध्ये हिंदू–मुस्लीम अभूतपूर्व दंगल झाली. त्यात एक हजार लोक ठार झाले. ठाकरे यांनी सामना मधून अग्रलेख लिहिला 'जे घडले त्याला मुसलमानच जबाबदार'.

१९६६ सेनेच्या स्थापनेपासून शिवसेनाप्रमुख हे सेनेत एकमेव सर्वश्रेष्ठ पद होते. २००३ मध्ये सेनेत कार्यकारी प्रमुख' हे नवीन पद निर्माण करून त्यावर उद्धव ठाकरे यांची एकमताने निवड झाली. २००३ मध्ये शिवसेनेचा महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय मेळावा झाला. या मेळाव्यात राज ठाकरे यांनीच कार्यकारी प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव सुचवले. 'उद्धवची निवड झाली ठीक आहे. पण तुम्हाला मान्य आहे ना, तुमच्यावर जबरदस्ती तर होत नाही' असे ठाकरेंनी विचारले

उपस्थित शिवसैनिक व पदाधिका-यांनी 'नाही – नाही' असे म्हणून उद्धव यांच्या निवडीचे समर्थन केले.

२००४ मध्ये राज्यात सेना – भाजप युतीला सत्ता मिळाली नाही. नारायण राणे व राज ठाकरे पक्ष सोडून गेले. छगन भुजबळ अगोदरच बाहेर पडले. उद्धव म्हणाले, 'मी संयमी, शांत असलो तरी डरपोक नाही. नामर्द नाही. माझ्या शरीरात शिवसेनाप्रमुखांचे रक्त आहे. शिवसेना संपविण्याची जे भाषा करीत आहेत, त्यांना शिवसैनिक गाडल्याशिवाय राहणार नाहीत.'

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे १२ व भाजपचे १३ खासदार महाराष्ट्रातून निवडून आले. शिवसेनेच्या १९९९ च्या तुलनेने ३ जागा कमी झाल्या पण मतांची टक्केवारी १६.९ वरून २०.११ झाली.

**कोष्टक क्र. १.४ विधानसभा २००४ निवडणूक निकाल**

| छक्ष | लढवल्या | जिंकल्या | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| काँग्रेस | १५७ | ६९ | २१.०६ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | १२४ | ७१ | १८. ७५ |
| शिवसेना | १६३ | ६२ | १९.१७ |
| भाजप | १११ | ५४ | १३.६७ |
| मनसे | १६ | ३ | ०.६२ |
| शेकाप | ४३ | २ | १.३१ |
| अपक्ष | १०८३ | १९ | १४.०५ |

**(ठाकूर, योगेंद्र)**

२००४ च्या विधानसभा निवडणुकीतही सेना–भाजप युतीला पराभव पत्करावा लागला.

विलासराव देशमुख (काँग्रेस) पुन्हा मुख्यमंत्री झाले. आर. आर. पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) उपमुख्यमंत्री झाले. शिवसेनेचे विरोधी पक्षनेते म्हणून नारायण राणे यांची निवड केली.

संजय निरुपम यांना शिवसेनाप्रमुखांनी दोपहर का सामनाचे कार्यकारी संपादक नेमले व राज्यसभा खासदार केले. उपनेतेपद दिले पण त्यांनी पक्षाची परवानगी न घेता रिलायन्स उद्योग समूह व प्रमोद महाजनांवर टीका सुरु केली. ठाकरे यांनी त्यांना सांगूनही निरुपम यांनी महाजनांची माफी मागण्यास नकार दिला व दि. ९ मार्च २००५ रोजी शिवसेनाप्रमुखांनी निरुपम यांची शिवसेनेतून हकलपट्टी केली.

जून २००५ मध्ये मुंबई रंगशारदा सभागृहात नारायण राणे यांनी, 'पैसे देऊन शिवसेनेत पदं विकत घेतली जात आहेत', असा आरोप केला. त्याच दिवशी संध्याकाळी ठाकरे यांनी राणेंची पक्षातून हकालपट्टी केली. राणे यांच्याबरोबर सेनेचे १० आमदार पक्षातून बाहेर पडले.

२७ नोव्हेंबर २००५ रोजी राज ठाकरे यांनी शिवसेनेतील सर्व पदांचा राजीनामा दिला. 'आपली विठ्ठलावर श्रद्धा आहे पण मंदिरातील बडवे आपल्याला देवापासून दूर ठेवण्याचे नीच कृत्य करीत आहेत' असा त्यांनी आरोप केला व त्यांनी १८ डिसेंबर २००५ रोजी शिवसेना सोडल्याचे जाहीर केले. उद्धव ठाकरे पक्षाचे कार्यकारी प्रमुख झाल्याने आता आपल्या राजकीय महत्त्वकांक्षा पूर्ण होणार नाहीत हे राणे व राज ठाकरे यांना कळून चुकले होते.

२००७ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे म्हणाले, 'काँग्रेस आमचा २ नंबरचा शत्रू आहे. या निवडणुकीत शिवसेनेचे ८३ व भाजपचे २८ नगरसेवक निवडून आले. काँग्रेसचे ७१, राष्ट्रवादीचे १४ तर मनसेने ७ जागा मिळवल्या.'

प्रतिभा पाटील मराठी आहेत म्हणून शिवसेनाप्रमुखांनी २००७ मध्ये राष्ट्रपती निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा दिला. सेनेच्या या निर्णयाने भाजप मात्र नाराज झाला. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून शिवसेनेचे ११ व भाजपचे ९ असे युतीचे २० खासदार निवडून आले.

**कोष्टक क्र. १.५ महाराष्ट विधानसभा २००९ निवडणूक निकाल**

| छक्ष | लढवल्या | जिंकल्या | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| काँग्रेस | १७० | ८२ | २१.०१ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ११३ | ६२ | १६.३७ |
| शिवसेना | १६० | ४४ | १६.२६ |
| भाजप | ११९ | ४६ | १४.०२ |
| मनसे | १४३ | १३ | ५.७१ |
| शेकाप | १७ | ४ | १.११ |
| अपक्ष | १५२० | २४ | ११.५० |

**(ठाकूर, योगेंद्र)**

सून २००९ च्य विधानसभा निवडणुकीत सेना–भाजप युतीला पुन्हा पराभव पत्करावा लागला. राज्यात काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे सरकार आले. मनसेच्या मतविभाजनामुळे चाळीस जागांवर युतीचे नुकसान झाले.

१९८५ नंतर शिवसेनाप्रमुखांनी राज्यस्तरीय विस्तार करण्याचे ठरवले. भाजप बरोबर युती केली. ५ निवडणूक २००९ पर्यंत लढवल्या. त्यात १९९० मध्ये ५२, १९९५ – ७३, १९९९–६९, २००४ मध्ये ६२ आणि २००९ मध्ये –४४ आमदार निवडून आले.

२००९ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसचे अशोक चव्हाण हे मुख्यमंत्री व छगन भुजबळ हे उपमुख्यमंत्री झाले, विरोधीपक्षनेते पदी भाजपचे एकनाथ खडसे यांची निवड झाली. तेव्हा मनसेला मत देणे म्हणजे काँग्रेसला मत देण्यासारखे आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते.

दि. १७ ऑक्टोबर २०१० रोजी शिवाजी पार्क, सेनेच्या दसरा मेळाव्यात युवा सेनेची स्थापना करून त्याची धुरा उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांच्याकडे सोपविण्यात आली.

फेब्रुवारी २०१२ मुंबई महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला ७५, भाजपला ३१, काँग्रेस ५२, राष्ट्रवादी १३, मनसेने २८ जागा मिळवल्या. मुंबई – ठाण्यात दोन्हीकडे शिवसेनेचे महापौर झाले.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातून शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले. लोकसभेत भाजपचे २८२ व देशात भाजपचे मिळून ३३९ खासदार विजयी झाले. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले.

२०१४ विधानसभा निवडणूक – शिवसेना–भाजप युती तुटली. जागा वाटपात भाजप ११९ जागांवर राजी नव्हती. शिवसेना १५१ जागांच्या खाली यायला तयार नव्हती. या निवडणुकीत शिवसेनेने भाजपवरच जोरदार हल्ला चढवला. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांना अफजल खान ठरवले.

**कोष्क क्र. १.६ महाराष्ट्र विधानसभा २०१४ निवडणूक निकाल**

| **पक्ष** | **जिंकल्या** | **मतांची टक्केवारी** |
|---|---|---|
| भाजप | १२२ | २७.८ |
| शिवसेना | ६३ | १९.३ |
| काँग्रेस | ४२ | १८ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ४१ | १७.२ |
| शेकाप | ३ | १.० |
| मनसे | १ | ३.१ |

**(ठाकूर, योगेंद्र)**

२०१४ ची निवडणूक शिवसेना–भाजपने स्वतंत्र आणि एकमेकांच्या विरोधात लढवली. भाजपचे सर्व अधिक १२२ आमदार निवडून आले. सर्वाधिक आमदार निवडून आलेल्या भाजपने सरकार स्थापन केले. भाजपचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. तीन महिन्यांनंतर शिवसेनेला भाजपने सत्तेत सहभागी करून घेतले.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना – भाजप युती म्हणून लढली. भाजपचे १०५ तर शिवसेनेचे ५६ आमदार निवडून आले. शिवसेनेने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी केली व उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. उपमुख्यमंत्री पद राष्ट्रवादी काँग्रेसला अजित पवार याना देण्यात आले. भाजपचे सर्वाधिक आमदार असून बहुमत नसल्याने विरोधी पक्षात बसावे लागले व देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षनेते झाले.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत – महाराष्ट्रात भाजपचे १०५ आमदार विजयी झाले. शिवसेना ५६, राष्ट्रवादी काँग्रेस ५३ आणि काँग्रेसचे ४३ आमदार निवडून आले.

दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

२४ ऑक्टोबर २०१२ दसरा मेळाव्यात शिवसेनाप्रमुखांचे भाषण ध्वनिचित्र फितीतून सादर करण्यात आले – 'आज मी ८६ वर्षांचं आहे. गेली ४५ वर्षे शिवसेना सांभाळली. एकत्र या काँग्रेसला धूळ चारा. मुंबई म्हणे बहुभाषिकांची, असे म्हणायला शरद पवारांना लाज नाही कां वाटत? मुंबई ही माझ्या मराठी बांधवांची आहे. शिवसेनेला कोणी हरवू शकणार नाही. मी घराणेशाही लादली असेल तर विसरून जा. मी लादली नाही आणि तुम्हीही ती स्वीकारलीत सांभाळून घ्या. उद्धव, आदित्यला सांभाळा आणि इमानाला महत्त्व द्या. तमाम महाराष्ट्रात माझी ही नतमस्तक विनंती आहे.'

दादरचे शिवाजी पार्क मैदानाचा शिवसेनाप्रमुख नेहमी शिवतीर्थ असा त्याचा उल्लेख करत असे. जवळपास पाच दशके या मैदानावर शिवसेनेचा दसरा मेळावा होतोय. हा एक जागतिक विक्रम आहे. दसरा मेळाव्याला दरवर्षी राज्यातून लाखो शिवसैनिक येतात. १९६६ पासून हे मेळावे काही अपवाद वगळता चालू आहेत. दसरा मेळावा हा शिवसेनेचा वार्षिक उत्सवच असतो. प्रकृती बरी नसल्यामुळे दि. २४ ऑक्टोबर २०१२ च्या मेळाव्याला बाळासाहेब ठाकरे हजर नव्हते. उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांचा चित्रित केलेला व्हिडीओ दाखवला, तो पाहताना आणि बाळासाहेबांचे भाषण ऐकताना शिवसैनिकांच्या अंगावर काटा आला. साहेब खूप आजारी आहेत हे सर्वांना ठाऊक होते. पण साहेबांना इतके थकलेले कधी बघितले नव्हते. सभेचा नूर बदलला बाळासाहेबांचा प्रत्येक शब्द शिवसैनिक मनात साठवू लागले होते. बाळासाहेब म्हणाले, 'मी थकलोय. शारीरिकदृष्ट्या कोसळतोय आज ८६ वर्षांचा आहे. बोलतानाही धाप लागते आहे. मला चालताही येत नाही. दिवसभर पडून

असतो. इतकी वर्षे तुम्ही मला संभाळलेत आता उद्धव आणि आदित्यला सांभाळा ... .. '

गेल्या १० वर्षात काँग्रेसने ६ मुख्यमंत्री बदलले, तो पक्ष तुम्हाला स्थिर सरकार कसे देणार?

बाळासाहेबांचे ते नुसते भावनिक, आवाहन नव्हते तर त्यात आग्रह होता. त्यांनी अन्य कोणाचेही नाव घेतले नाही. पुढे उद्धव हे राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि आदित्य राज्याचे कॅबिनेटमंत्री झाले.

दि. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे देहावसान झाले आणि १८ नोव्हेंबरला शासकीय इतमानाने दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले.

शिवसेनाप्रमुखांच्या मृत्यूनंतर वृत्तपत्रांमध्ये बरेच अग्रलेख लिहिण्यात आले. त्या मधील काही निवडक अग्रलेखांचे शीर्षक खालीलप्रमाणे:

लोकसत्ता – पहाड प्रधान., सकाळ – बाळासाहेब, बाळासाहेब. पुढारी – महाराष्ट्र पोरका झाला. महाराष्ट्र टाइम्स– निरोप. तरुण भारत – एक था टायगर. लोकमत– शिवसैनिकांचा देव्हारा रिता. नवाकाळ – हिंदुत्व आणि नवशक्ती – महानिरोप. सामना – युगांत.



saamana.com
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
एका कुंचल्याचा स्फोट
उत्सव
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
# सामना

शिवसेनाप्रमुखांना अभिवादन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिवसैनिकांचा ओघ

## जनसागर नतमस्तक! शिवतीर्थ गहिवरले!!

मुख्यमंत्र्यांनीही केले अभिवादन; उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा

बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यात कोणाची पर्वा केली नाही. परिणामांचा कधी विचार केला नाही. पोटात एक आणि ओठात एक असा त्यांचा स्वभाव नव्हता. वयाच्या सत्तरीनंतरही त्यांच्या शब्दातून अंगार बाहेर पडायचा. त्यांच्या शब्दासाठी शिवसैनिक वाट्टेल ते करायला तयार असायचे. त्यांनी शिवसैनिकांना आणि मराठी लोकांना लढाऊपणा शिकवला. कोणत्याही प्रकारच्या दुबळेपणाचा त्यांना तिटकारा होता.

शिवसेनेचा सुवर्णमहोत्सवी मेळावा मुंबईत झाला. तेव्हा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसेनेने मराठी माणसाचा मुद्दा हाती घेतला त्यामुळे शिवसेनेवर टीका झाली. गुंडांची पार्टी व संकुचित पक्ष म्हणून हिणवले गेले. हेच टीकाकार मात्र ममता बॅनर्जींचे कौतुक करीत आहात. शिवसेनाप्रमुखांनी १९६६ मध्ये सांगितले तेच ममता बनर्जी माँ, माती, मानुष आता म्हणत आहेत. होय आम्ही रिजनल आहोत, पण ओरिजनल आहोत". (सामना, १९ जून २०१६)

दि. १९ जून २०१६ रोजी शिवसेनेला ५० वर्षे पूर्ण झाली. पण प्रादेशिक पक्ष म्हणून शिवसेना स्वबळावर राज्यात कधी सत्तेवर आली नाही.

शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री – मनोहर जोशी (ऑक्टोबर १९९५ ते जानेवारी १९९९)

शिवसेनेचे दुसरे मुख्यमंत्री – नारायण राणे (फेब्रुवारी १९९९ ते सप्टेंबर १९९९)

शिवसेनेचे तिसरे मुख्यमंत्री – उद्धव ठाकरे (नोव्हेंबर २०१९ पासून).

पण ज्या भाजपच्या केंद्रीय नेतृत्वावर अफजल खान म्हणून सामनाने टीका केली त्याच भाजपबरोबर २०१९ ची विधानसभा व लोकसभा निवडणुकीत युती करून लढवली आणि नंतर काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर युती करून राज्यात महाआघाडी सरकार स्थापन केले.

### १.११ सामना: एक ज्वलंत मुखपत्र

राज्यभर शिवसेनेचा विस्तार होत असताना शिवसेनाप्रमुखांचे विचार जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी एका दैनिकाची गरज शिवसेनेला भासू लागली.

फ्री प्रेस सोडल्यावर १३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक व्यंगचित्र साप्ताहिकाला ठाकरे यांनी हात घातला. त्यावेळची परिस्थितीही फारशी चांगली नव्हती कारण मराठी साप्ताहिके धडाधड बंद होत होती. आचार्य अत्रेंचा नवयुग, समीक्षक, रामभाऊंचे विविध वृत्त आणि बरीचशी मासिके यांनी केव्हाच राम म्हंटला होता. अशी परिस्थिती असताना त्यांनी साप्ताहिकाचे धाडस केले. दत्ताजी पंतांचा शाप तर नेहमीच असतो; परंतु त्या वेळी प्रबोधनकार ठाकरे म्हणजे आमचे वडील यांचे नैतिक पाठबळ आणि बुवा साहेब दांगट यांची मदत यामुळेच मार्मिक व्यंगचित्र साप्ताहिक निघू शकले. इतर दैनिकांनी आपली साप्ताहिके सुरु केल्यामुळे थोडक्यात रविवारच्या आवृत्या काढायला सुरुवात झाली; परंतु ह्याला टक्कर देऊन मार्मिक आपल्या व्यंगचित्र वैशिष्ट्यांमुळे उभं राहिला व मार्मिकला २८ वर्षे पूर्ण झाली. मार्मिकच्या माध्यमातून शिवसेना उभी राहिली आणि शिवसेनेच्या माध्यमातून सामना उभा राहिला.

दि. २ जून १९९२ – सामनाचे कार्यकारी संपादक म्हणून संजय राऊत यांची नेमणूक झाली. अगोदर ते लोकप्रभा साप्ताहिकात पत्रकार होते. १९९३ मध्ये ‘दोपहर का सामना’ हे हिंदी वृत्तपत्र सुरु झाले. त्याची जबाबदारी संजय निरुपम यांच्यावर सोपवली गेली.

१९८८ मध्ये दैनिक हवेच ही बाळासाहेबांनी मनातील इच्छा व्यक्त करून दाखवली. बाळासाहेब १३ ऑगस्ट १९८८ मार्मिकच्या कार्यक्रमानंतर झालेल्या बैठकीत दैनिकाचा विषय झाला. सदर बैठकीला उद्धव ठाकरेहि हजर होते. बाळासाहेब सामना सुरु करण्याचे ठरवले व प्रभादेवीला असलेली जागा ऑफिससाठी योग्य वाटत असल्याने पाहून येण्यास सांगितले. मीनाताई ठाकरे उर्फ माँ नि त्यांना थांबवून एकविरा देवीची प्रतिमा दिली आणि तिथे ठेवण्यास सांगितले. ऑफिसच्या रचनेचे काम आर्किटेक्ट जयंत टिपणीस यांना देण्यात आले. बाळासाहेब रोज तिथे जाऊ लागले व प्रबोधन प्रकाशनाची नोंदणी करून कार्यालय स्थापन करण्यात आले. वृत्तपत्रासाठी लागणारे छपाई मशीन फरिदाबाद, हरियाणा येथून आणण्यात आले. या सर्व कामासाठी सारस्वत बँकेकडून कर्ज घेण्यात आले. तेव्हा सारस्वत बँकेच्या अध्यक्षपदी श्री. सुरेश प्रभू होते.

नंतर संभाजी नगरला (औरंगाबाद) दौरा करण्याचे योजिण्यात आले व बाळासाहेबांनी तिथे लोकमतच्या कार्यालयाच्या वेगवेगळ्या शाखा बघितल्या. लोकमतचे संपादक श्री. दर्डा यांची त्यांनी भेट घेऊन सर्व खाती, छपाई व कामकाज बघितले. वृत्तपत्र कसे निघते ते पण बघितले. काहीच दिवसांत ’सामना’ हे नाव ठरले व त्यांच्या वाढदिवशी प्रकाशन करण्याचे ठरवले. पण त्या वेळी सामना हे वृत्तपत्र सोलापूर येथील बार्शीमधील श्री. वसंत कानडे यांच्या नावावर आधीच नोंदविण्यात आलेले असल्याचे त्यांना कळले. त्या वेळी जवळचे शिवसेनिक कानडे

यांना जाऊन भेटले व त्यांनी बाळासाहेबांना सामना हे टाइटल देण्यास विनंती केली. पण कानडे काही तयार नव्हते. नंतर बाळासाहेबांनी स्वतः तुळजापूर गेस्ट हाऊसवर जाऊन कानडे यांची भेट घेतली व ज्वलंत दैनिक–सामना नावाने सुरु करण्याची इच्छा व्यक्त केली. कानडे यांनी त्यांची मागणी पूर्ण करत त्यांना ना हरकत पत्र दिले. काही दिवसांनी वसंत कानडे मुंबईत आले व त्यांनी बाळासाहेबांची भेट घेतली. बाळासाहेबांनी त्यांना त्यांना धन्यवाद दिला व सोलापूर येथील सामनात पत्रकार प्रतिनिधी म्हणून काम करण्यास सांगितले. सामनाचा पहिला अग्रलेख या "असे सामन्याला" असा होता व ते ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव दैनिक. त्याला महाराष्ट्रभर दैनिक नव्हे सैनिक असे संबोधले जात असे. पहिल्या दिवशीच प्रिंट ऑर्डर १ लाख मिळाली. सामना – लढाऊ – आक्रमक – खणखणीत व्यक्तिमत्वाचे संपादक बाळ ठाकरे होते तर कार्यकारी संपादक म्हणून अशोक पडबिद्री यांची नियुक्ती करण्यात आली.

बाळासाहेब ठाकरे सामना सुरु करताना म्हणाले होते की, दैनिक सामना वेळोवेळी अनेक विषय हाताळणार आहे, होणारे हल्ले परतवणार आहे. अनेक प्रश्न आम्हाला प्राधान्याने हाताळावे लागतील, पण बरेच प्रश्न आम्ही आमची लेखणी ज्वालामुखीच्या लाव्हारसात बुडवून आम्हाला लिहावे लागेल. त्यामुळे क्षणभर काही लोकांना आमच्या भाषेचा तोल गेल्यामुळे, चक्रावल्यासारखे होईल; परंतु त्यामागील अन्यायाची चीड त्यांनी लक्षात घ्यावी. एरवी आम्हाला आपणहून कोणाला दुखवायचे नाही. आजपर्यंत आम्ही तसे केले नाही व करणार नाही. ज्या ज्या वेळी अंगावर आले, त्याचवेळी शिंगाचा वापर आम्ही केला आहे. एरवी काही चांगल्या गोष्टीचे आम्ही रणशिंग फुंकून स्वागतच केले आहे. सामनाचे वैशिष्ट्य म्हणजे दैनिक सामना हा वृत्ताचे पावित्र्य राखणारा आहे. विरोधकांच्या बातम्या कुठे दाबल्या जाणार नाहीत. प्रसिद्धी व्यवसायात जे पावित्र्य टिकवायचे असते, त्या दृष्टीने त्या बातम्यांना आवश्यकते

महत्त्व जाईल परंतु त्यानंतर 'भाष्य' आमचे राहील. वार्ताहरांच्या बातम्यातून वार्ताहराचे 'भाष्य' असणार नाही तर बातम्यात केवळ सद्य परिस्थितीचे चित्रण असेल आणि भाष्य सामनाच्या स्तंभातून केले जाईल. हे पावित्र्य सध्या नष्ट झाले आहे. ते सामना टिकवणार. थोडक्यात न्यूयॉर्क टाइम्सचे घोषवाक्य आहे, ऑल द न्यूस थॉट्स फट टू प्रिंट' ह्या त-हेची पत्रकारिता असायला हवी. परंतु प्रकार सध्या उलट चालू आहे.

आज दैनिक सामनाच्या प्रकाशनाच्या वेळी आम्हाला प्रकर्षाने जर कुणाची आठवण येत असेल तर प्रथम आमच्या वडिलांची, कारण त्यांची मनापासून इच्छा होती की, महाराष्ट्राचे असे एक प्रखर, स्वतंत्र विचार प्रणालीचे दैनिक असावे. ते जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने पुरे होत आहे. दुसरे स्मरण होत आहे ते नाशिकच्या वि. मा. दी. पटवर्धन यांचे प्रबोधनकारांनंतर वि. मा. दी. नींच आमच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला होता. आज ते हात जरी दुरावले असले तरीही स्पर्शाची जाणीव आम्हाला कुरवाळत आहे आणि तिसरे स्मरण आमचे बुवासाहेब दांगट यांच्यासारखी व्यक्ती आमच्या पाठीशी उभी राहिली नसती तर मार्मिकच्या बाबतीत आम्हाला फारच प्रभास घडले असते. या काटेरी वाटेकरून बुवासाहेब आमच्या बरोबर चालत आले आणि आश्चर्य म्हणजे काटे पायात टोचले; परंतु रक्तबंबाळ झालो नाही. आज बुवासाहेब नसले तरी त्यांची कुटुंबीय मंडळी दमदारपणे त्यांचा व्यवसाय पुढे नेत आहेत. थोडक्यात एक कौटुंबिक जिव्हाळा, बुवासाहेबांच्या वागणुकीतून निर्माण झाला जो आजपर्यंत टिकला आहे.

आता सर्वात शेवटी आभार मानायचे झाले तर आमच्या सर्व हितचिंतकांचे त्यामध्ये आमचा शिवसैनिक कुठे मागे राहिलेला नाही. त्यांनीही अनेक कार्यक्रम उभे करून जे काही जमेल ते दैनिक सामनासाठी आणून दिले. जे हात आमच्या मागे उभे

राहिले तेच आमचे खरे भांडवल. ह्या उभ्या राहिलेल्या हातानेच आम्ही 'सामन्या'ला तयार झालो. आजपासून सुरु होणारा हा 'सामना' ह्या हातांसाठीच पराकोटीचा लढत देणार आणि उद्या महाराष्ट्र विधानसभेवर शिवरायांचा हा भगवा झेंडा आई जगदंबेच्या आशीर्वादाने आणि महाराष्ट्राच्या साधू - संतांच्या साक्षीने मजबुतीने फडकविणारच ह्याबद्दल आम्हाला खात्री आहे.!

सामनाचा पहिला अंक पहिला अग्रलेख:

आता या असे 'सामन्या'ला-


सामना

सामना

आता या असे 'सामन्या'ला

सामना

आता या असे 'सामन्या'ला

त्यात ते म्हणाले, फ्री प्रेसमधील नोकरी सोडल्यानंतर १३ ऑगस्ट १९६० यावेळी 'मार्मिक' व्यंगचित्र साप्ताहिकाला आम्ही हात घातला. त्यावेळची परिस्थिती ही फारशी चांगली नव्हती. कारण मराठी साप्ताहिके धडधड बंद होत होती. आचार्य अत्रेंचा नवयुग, समीक्षक श्री रामभाऊ तटणीसांचे विविध आणि बाकीची मासिके यांनी केव्हाच राम म्हटला होता. अशी परिस्थिती असताना आम्ही साप्ताहिकाचे धाडस केले. रामाजीपंतांचा शाप तर नेहमीच असतो. परंतु त्यावेळी प्रबोधनकार ठाकरे म्हणजे आमचे वडील यांचे नैतिक पाठबळ आणि बुवासाहेब दांगट यांची मदत

यामुळेच मार्मिक साप्ताहिक निघू शकले इतर दैनिकांनी आपली साप्ताहिकी सुरु केल्यामुळे थोडक्यात रविवारच्या आवृत्त्या काढायला सुरुवात झाल्यामुळे मराठी साप्ताहिक त्याच परिणाम झाला. परंतु त्याला टक्कर देऊन मार्मिक आपल्या व्यंगचित्रीय वैशिष्ट्यामुळेच मजबुतीने उभे राहिले. आज मार्मिकला २८ वर्षे पूर्ण झाली. मार्मिकच्या माध्यमातून शिवसेना उभी राहिली आणि शिवसेनेच्या प्रचारतंत्रातून आज 'सामना' उभा होत आहे.

इथे केवळ आम्हाला नव्हे तर तमाम हिंदू बांधवांच्या भगिनींच्या आनंदाला पारावर राहिला नसेल. बँकेची कर्जे डोक्यावर घेऊन आम्ही 'सामन्यास' उभे आहोत. तरीपण आता मागे फिफ्ररायचे नाही. एरव्ही आम्ही या फंदात पडलो नसतो. परंतु शिवसेनेचा व्याप जसजसा वाढू लागला; आणि आता तर तिची पाळेमुळे ग्रामीण भागात पसरू लागली, तसतशी दैनिकाची अडचण भासू लागली. साप्ताहिकाची ताकद दोन हात करताना कमी पडू लागली. कारण शिवसेनेच्या वाढत्या यशामुळे क्षेत्र ही वाढू लागले. कुणाचे भले पाहणे आपल्या देशाच्या स्वभावात नाही कारण राजकारणाने सर्व नासवले. कौतुक नाही, सहकार्य नाही! पुन्हा पक्षीय लेबले असल्याने पोटदुख्या आणि मुरडेच जास्त. खासगी भेटीत मात्र आपण करत आहेत ते फार चांगले करता आहेत. तरी असे करायला हवे वगैरे वगैरे मुक्ताफळे उधळण्यात हे कावळे पटाईत. आम्ही महाराष्ट्रामध्ये भूमिपुत्रांच्या बाजूने म्हणजे मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी उभे राहिलो. त्यामुळे आम्हाला संकुचितवादी, प्रांतवादी, जातीयवादी अशी विशेषणे लावण्यात आली. तरी आम्ही हटलो नाही. आता देशावर छुप्या पाकधार्जिण्या मुस्लिमांचे मनसुबे लादले जात असताना आणि पंजाबमध्ये खलिस्तानवाद्यांचे हिंसाचाराचे हत्याकांड चालू असताना या देशात आता हिंदुत्वाच्या अस्तित्वालाच मोठा धोका निर्माण झाला आहे आणि धोका टाळण्यासाठीच माझ्या मराठी मातीने जर पुढाकार घेतला नाही तर केवळ हतबलतेने या देशाची दुसरी

फाळणी पाहण्याचे नशिबी येण्याची शक्यता आहे. केवळ याच पोटतिडकीने आम्ही हिंदुत्वाला धार आणण्यास बसलो. तसे हा हिंदुत्वचा प्रश्न काही प्रथमच हाताळतो आहोत, अशातला भाग नाही, नव्हे ते आम्हा मराठी माणसांच्या रक्तताच आहे.

काही दिवसांतच सामना आणि शिवसेना पस्पर पूरक एका नाण्याच्या दोन बाजू.असे दिसू लागले. १९८८ पर्यंत विधानसभेत शिवसेनेचा एखादा आमदार असायचा पण १९९० ला ५४ आमदार निवडून आले वामनराव महाडिक, प्रमोद नवलकर, छगन भुजबळ इ. अर्थात ते केवळ सामनामुळे नाही पण मुख्यतः बाळासाहेबांची भाषणे आणि प्रचार जे झंझावात असायचा. सर्व महाराष्ट्रात भगवे वातावरण झालं होते. सामना गावागावात पोहोचू लागला व तो संघटनेला पूरक आणि उपयोगी ठरू लागला. हळूहळू आमदार – नगरसेवक लोकप्रतिनिधी वाढले व सामना हे सेनेचे विचार जनतेपर्यंत पोहोचवणारे पक्षाचे प्रभावी माध्यम बनले.

सामनातील अग्रलेख दुस–या दिवशी देशभरातील अन्य भाषेतील वृत्तपत्रात छापून येऊ लागले व त्या बातम्यांची दाखल विरोधकही घेऊ लागले हे भाग्य इतरांना कधीच लाभले नाही. सामनामधून शिवसैनिकांना आदेश, सूचना व मार्गदर्शन मिळत असे. सामनामध्ये काय आहे हे बघून अनेकांचा दिवस, अजेंडा व भूमिका ठरते. सामनाच्या लेखणीतून शिवसेनिक हा गांधीवादी नसून तो धगधगता आणि आक्रमक असा झळाळून आला. सामनामध्ये कायम बाळासाहेबांची आक्रमक भाषा दिसून येत असे आणि विरोधी पक्षाचे लोक तर अगोदर सामना वाचत असे.

या दैनिकाच्या उभारणीची जबाबदारी उद्धव ठाकरे व सुभाष देसाई यांनी घेतली. दि. २३ जानेवारी १९८९ रोजी शिवसेनाप्रमुखांच्या वाढदिवसी शिवसेनेचे मुखपत्र म्हणून दैनिक सामना सुरु झाला. संपादक स्वतः बाळासाहेब ठाकरे, कार्यकारी संपादक अशोक पडबिद्री आणि वृत्तसंपादक म्हणून नंदकुमार टेणी यांची नेमणूक झाली.



(Source: InMarathi.com)

इनमराठी.कॉम या संकेतस्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार २३ जानेवारी १९८९ या दिवशी सामना हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून पहिल्यांदा प्रसिद्ध करण्यात आले व त्या वेळी सामनाच्या दीड लाख प्रति काढण्यात आल्या.

सामनाचा प्रकाशन सोहळा मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात झाला. तेथे ते म्हणाले – 'ज्या दिवशी  महाराष्ट्राच्या विधानसभेवर भगवा ध्वज फडकेल, तो दिवस म्हणजे मला मिळालेली वाढदिवसाची भेट असेल.'

दरवेळी मार्मिक साप्ताहिकाचा वर्धापनदीनी शिवसेनाप्रमुखांचे भाषण असायचे. मार्मिक नंतर सेनेचा जन्म झाला व पक्ष वाढू लागला. मार्मिक दर आठवड्यानंतर येते. साप्ताहिक पुरेसे नाही हे सतत जाणवू लागले. पक्षाची भूमिकेचं, नेत्यांचं टीका होत असते त्याला उत्तर देण्यासाठी दैनिक हवे ही भावना बळावली.

शिवसैनिक हाताशी आहेत व पक्षाचा विस्तार मोठा होत आहे. आता मनावर घेऊन दैनिक सुरु करण्याची गरज आहे असे बाळासाहेबांना वाटू लागले. भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठी शिवसेना स्थापन करण्यात आली. प्रबोधनकारांनी प्रोत्साहन दिले व आग्रह धरला. असे वाटले की आपल्या विचारांशी बांधिलकी असणारे दैनिक हवे. व यातुन सामनाच जन्म झाला.

सामना हे शिवसेना या राजकीय पक्षाचे मुखपत्र असून ते मुंबईत प्रसिद्ध होते. पुणे, औरंगाबाद, नागपूर अशा पुढे आवृत्त्याही सुरु झाल्या पण सामनाचे प्रमुख क्षेत्र हे मुंबई, ठाणे आणि कोकण असे राहिले आहे. या वृत्तपत्राची स्थापना शिवसेनाप्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी केली. तेच संस्थापक, संपादक होते. सुरुवातीला त्यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध होत व ते स्वतः अग्रलेख लिहीत. त्यांच्या मुलाखती, पदप्रमुखांच्या मुख्य भूमिका प्रसिद्ध होत.

दि. २३ जानेवारी १९८९, शिवसेनाप्रमुखांच्या वाढदिवसाला सामना सुरु झाला दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात मोठ्या थाटामाटात शिवसेना प्रमुखांच्या हस्ते सामनाचे प्रकाशन झाले. प्रकाशन प्रसंगी बोलताना ठाकरे म्हणाले, ‘हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी आणि दररोज येणा-या आरोपांना उत्तर देण्यासाठी सामना हे नवे शस्त्र असेल आणि उद्या पाळी आली तर ख-या शस्त्राला हात घालावा लागेल. तामिळनाडूत काँग्रेसचा पराभव केल्याबद्दल त्यांनी श्री. करुणानिधी यांचे अभिनंदन केले. शिवसेनेकडे आर्थिक कार्यक्रम नाहीत म्हणून आमच्यावर टीका होते पण द्रमुककडे तरी कोठे आर्थिक कार्यक्रम आहे? असा सवाल त्यांनी केला.‘ या समारंभाला मोठी उपस्थिती होती. सर्वांना प्रवेश नसल्याने अनेकजण बाहेर उभे राहून भाषणे ऐकत होते. सामनाचे प्रकाशन होताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. या समारंभात महापौर श्री. शरद आचार्य, शिवसेनानेते मनोहर जोशी, दत्ता साळवी, प्रमोद नवलकर यांचीही भाषणे झाली. सामनाचे कार्यकारी संपादक अशोक पडबिद्री यांनी प्रास्ताविक केले तर सुभाष देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

’सामना’ – मंगळवार, २४ जानेवारी १९८९ ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव दैनिक, वरती – एक बाजूला ’गिरनार चहाची’ जाहिरात असे. ’सामना’चे

प्रकाशन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झाले. डावीकडून 'सामना'चे विश्वस्त अँड. लीलाधर डाके, कार्यकारी संपादक अशोक पडबिद्री, भारतीय कामगार सेनेचे अध्यक्ष दत्ताजी साळवी, माजी महापौर आमदार छगन भुजबळ, श्रीकांत ठाकरे, प्रमोद नवलकर, सुधीर जोशी, दत्ताजी नलावडे फोटोत दिसतात.

सामनाचा पहिला अग्रलेख मथळा – या असे सामन्याला? या अग्रलेखात सामना सुरु करण्याची भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. वाचकांना उद्देशून बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की, 'प्रिय वाचकहो आज दैनिक सामना'स सुरुवात होत आहे. बरीच वर्षे दैनिक काढायचे काढायचे चालू होते; परंतु असंख्य अडचणी आणि कटकटी यांमधून दैनिकासारखा व्याप अंगावर घ्यायचा म्हणजे हल्लीच्या काळात द्रोणागिरी पर्वत उचलण्यासारखा प्रकार म्हणायचं; परंतु हे मारुतीचे बळ केवळ जनता जनार्दनानेच आम्हाला दिले आणि या बळावरच हे पर्वतप्राय कार्य आम्ही करू शकलो'.

सामनाचे वैशिष्ट्ये म्हणजे दैनिक सामना हा वृत्ताचे पावित्र्य राखणारा आहे. विरोधकांच्या बातम्या कुठे दाबल्या जाणार नाहीत जे प्रसिद्धीच्या माध्यमातून पावित्र्य टिकवायचे असते त्यादृष्टीने या बातम्यांना अवश्य महत्त्व दिले जाईल. परंतु यानंतर भाष्य आमचे राहील वार्ताहरांच्या बातम्यांमधून वार्ताहराचे भाष्य आणि त्यानंतर सामानाच्या स्तंभातून आमचे भाष्य राहील जे पाविशीत्र्य सध्या नष्ट होत आहे ते सामना टिकवणार. आज दैनिक सामनाच्या प्रकाशनाच्या वेळी आम्हला कुणाची प्रकर्षाने आठवण होत असेल ती प्रथम आमच्या वडिलांची! कारण त्यांची मनापासून इच्छा होती की, 'महाराष्ट्रात असे एक प्रखर व स्वतंत्र विचाराचे दैनिक असावे' ते स्वप्न आता जनताजनार्दनाच्या आशीर्वादाने पूर्ण होत आहे. दुसरे स्मरण होत आहे ते, नाशिकचे वि. मा. दि. पटवर्धन यांचे. प्रबोधनकारांनंतर वि. मा. दि. नीच

अक्षरशः आमच्या पाठीवरून आधाराचा हात फिरवला होता. प्रकाशन प्रसंगी सामनाचे संपादक बाळासाहेब ठाकरे म्हणाले, ‘सामना राज्यकर्त्यांना दाखवलेला आरसा आहे, त्यात आपली प्रतिमा पाहून स्वतःची प्रतिमा सुधारावी हा आरसा फोडण्याचा त्यांनी प्रयत्न करू नये कारण तो फुटला तर त्याचे तुकडे पडतील व प्रत्येक तुकड्यात त्यांची प्रतिमा अधिकच विद्रुप दिसेल. आमच्या वृत्तपत्राची भाषा जहाल असेल, तिखट असेल, बोचरी असेल काही वेळा ती अक्ष्यम्य वाटेल, त्यांनी हे वाचताना विषय समजावून घ्यावा त्याविषयावरील तिडीक व्यक्त करण्यासाठीच ती भाषा वापरली जाईल. काही वेळा जमाल गोटाचा घ्यावा लागेल (हशा पिकला) व तो आम्ही देणारच.

सामना सहा महिन्यांचा झाला तेव्हा अग्रलेखाचे शीर्षक होते ‘तुमचा सामना सहा महिन्यांचा झाला’ सामना सहा महिन्यांचा झाला दैनिक निघणार निघणार म्हणून बराच काळ गेला आणि सामना सुरु होऊन सहा महिने कसे गेले हे कळलेही नाही मात्र एक दैनिक सामना निघताच वृत्तपत्रसृष्टीत एकच हादरा बसला आणि खळबळ माजली. अनेकांचे धाबे दणाणले आजही शिवसेनेचे निर्भीड मुखपत्र म्हणून सामनाची स्वतःहाची ओळख आहे. शिवसेनाप्रमुख व संपादक सामना अशी दुहेरी जबाबदारी बाळासाहेब ठाकरे यांनी पार पाडली. सुरुवातीला कार्यकारी संपादक म्हणून अशोक पडबिद्री जबाबदारी सांभाळत. बाळासाहेबांच्या मृत्यूनंतर श्री. उद्धव ठाकरे हे सामनाचे संपादक झाले व खासदार संजय राऊत कार्यकारी संपादक म्हणून जबाबदारी सांभाळत. संजय राऊत हे शिवसेनेचे खासदार, पक्षाची प्रवक्ते, नेता अशी भूमिका समर्थपणे सांभाळत आहेत. नोव्हेंबर २०१९ मध्ये ते राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर सामनाचे संपादक म्हणून सौ. रश्मी उद्धव ठाकरे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली.

**दैनिक नव्हे सैनिक:**

सामनातील शेकडो नव्हे तर काही हजारांत असलेले अग्रलेख हे संजय राऊत यांनी लिहिलेले आहेत व संस्थापक संपादक बाळासाहेब ठाकरे हयात असताना त्यांनी त्याचे कौतुकही केले आहे. शिवसेनाप्रमुखांची भाषा, आवेश व भावना सामनाच्या अग्रलेखात अनुभवायला मिळते. बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाल्यावर संजय राऊत यांनी सामनामध्ये महाभारताची सांगता झाली, ही ज्वाला विझणार नाही, यमराजा तू हरलास, देव्हा–यातील मंगल कलश, महाराष्ट्र आळणी झाला, हिमालयापेक्षा सह्याद्री मोठा, महासागरही पेटून उठेल, सूर्य–चंद्र आणि ठाकरे, झाड कोसळले पाखरे फडफडली, देवांना सेनापती मिळाला असे सलग तेरा अग्रलेख लिहिले. सामना सुरू करताना दैनिक नव्हे सैनिक असे फलक मुंबईत झळकले होते.

प्रबोधनकर ठाकरे (वय ९०) कदाचित शेवटचं भाषण:

परमेश्वरानं परिस्थितीच्या ठोकरा देत देत ज्या ठिकाणी मला नेलं आणि ह्या रंगभूमीवर मला उभं केलं तिथली भूमिका मी चांगली वठवली. माझी भूमिका कशीही असेना, या नाटकातही काही वर्षे घालवली. तिथंही काही केलं ते मात्र समाजासाठी केलं, हे व्यसन आहे बघा, ते लागलं की सुटत नाही. रोज सकाळचा चहा झाला की वर्तमानपत्रं पुढ्यात येतात ती सगळी वाचून काढतो. काय जरुरी आहे हो या वयामध्ये? पण पाहतोय काय चाललय! विचार करतो. या धोरणांनी महाराष्ट्राचं आणि देशाचं पुढे काय होणार? पुढारी लोक असं का बोलतात? ह्याची कारणं काय? ह्याचा माझ्या डोक्यात नेहमी विचार चालू असतो. सकाळी अकरापर्यंत माझं वृत्तपत्र वाचन सुरु असतं. नवीन नवीन माहिती मिळते. आजच सकाळी भेटायला आलेल्या अनंत काणेकरांना सांगितले अरे बाबा, मी वाचतोय म्हणून वाचलोय.

काही महत्त्वाचे दिवस:

- २३ जानेवारी शिवसेनाप्रमुख – बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आणि सामना चा वर्धापन दिन.
- २७ जुलै – उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस.
- १३ ऑगस्ट – मार्मिकचा वर्धापन दिन.
- १९ जून – शिवसेनेचा स्थापना दिन

–हे ४ दिवस सामनाला अर्थबळ देणारे दिवस व ह्या ४ दिवशी सामनामध्ये शुभेच्छांची जाहिरात पुरवणी असते. ५०/६० पानी अंक जाहिरातींनी भरलेले असतो. मुंबईतले व्यापारी, उद्योगपती, बिल्डर्स, खासगी कंपन्यांच्या मोठमोठ्या जाहिराती असतात. शिवसेना नेते – विभागप्रमुख – शाखा यांच्या जाहिराती असतात. अशा मोठ्या पुरवण्यांतून सामानाची आर्थिक स्थिती भक्कम राहते.

दि. २३ जानेवारी २००६ रोजी ठाकरे यांनी त्यांच्या वाढदिवसाला सामनामधून 'या चिमण्यांनो परत फिरा रे --- ' असा अग्रलेख लिहिला. चाळीस वर्षांत अनेकजण सोडून गेले, पण शिवसेना कोठे थांबली नाही. रिकाम्या जागा भरल्या जातात. अगोदर माझ्या बाजूला उद्धव व दुस-या बाजूला राज बसायचा. आता ती जागा प्रमोद महाजनांनी घेतली आहे.

३१ वर्षे झाली पण अजून कोणत्याही राजकीय पक्षाचे इतके प्रभावी मुखपत्र नाही. संजय राऊत यांच्या धगधगती, प्रखर व ज्वलंत लेखणीचा तोड नाही. सामनाच्या अग्रलेखामध्ये शिवसेनाप्रमुख आणि नेते पक्ष प्रमुखांच्या मॅरेथॉन मुलाखती असतात.

सत्तेत असून पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्यावर शिवसेनेने सामनाच्या माध्यमातून टीका केली पण त्या वेळी सत्तेतून बाहेर पडले नाही किंवा मंत्रिपदाचे राजीनामे दिले नाहीत. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदी किंवा मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिवसेनेला कधी अपमानकारक वागणूक दिली नाही किंवा शिवसेनेवर आक्रमक टीका केली नाही. भाजपने मैत्रीचे भान राखले ते शिवसेनेने राखले नाही हेच सामन्यातील बातम्या, मथळे व अग्रलेख यातून वेळोवेळी दिसून येते.

बाळासाहेब ठाकरे यांनी सामानाला मराठी बाणा असे संबोधले आहे. सामनाने दैनिक म्हणून स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवला आहे. एक लोहारकीः पध्दतीची सामनातील पत्रकारिता कुणाचीही भीडभाड न बाळगणारी असते. हा मर्दानी बाणा वाचकांच्या चांगल्याच पसंतीस उतरला म्हणूनच सामनाने अल्पावधीतच चांगलीच घोडदौड केली, असे सामनाचे संस्थापक संपादक शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीच म्हटले आहे. १९९२ मध्ये सामनातील गाजलेल्या अग्रलेखांचे संजय राऊत यांनी संपादित केलेले ठाकरी या नावाने पुस्तक प्रसिध्द झाले. त्यात बाळासाहेब ठाकरे यांनीच प्रस्तावना लिहिली आहे.

ठाकरे लिहितात, मर्दानी बाज असलेले सामनाचे असंख्य अग्रलेख संजय राऊत यांच्या लेखणीतूनच उतरले आहेत. माझ्या ठाकरी भाषेचा इतका प्रभाव व पगडा त्याच्यावर एवढा आहे की, माझेच विचार आणि भूमिका तो अग्रलेखातून तंतोतंत मांडत असतो. सामनातील अग्रलेखावर अनेक खटले झाले, वाद, वादळे निर्माण झाली. पण या सगळ्यांची जबाबदारी संपादक म्हणून आम्ही कधीच झटकली नाही. कारण अग्रलेखाचा लेखक जरी संजय राऊत असला तरी भूमिका व विचार आमचेच होते. ठाकरी भाषेचा अंगार व अन्याय–अत्याचाराविरूध्द उडणा–या शब्दांच्या ठिणग्या त्यातून निर्माण झाल्या. अग्रलेखाचा खास वाचक सामनाने निर्माण केला.

गुळगुळीत कागदावर बुळबुळीत लिहिणा–यांची संख्या आज कमी नाही. पण त्यात विचार नाही की दिशा नाही.  सर्वच मामला निरस व पचपचीत, हे वर्तमानपत्र आहे की पत्रावळी तेच समजत नाही. या सर्व वातावरणात सामनाने ख–या अर्थाने क्रांती केली. सामनाने जनता जागरणाचे व मराठी माणसांबरोबर हिंदूंना स्वाभिमानाची जाणीव करून देण्याचे कार्य केले.

ठाकरे म्हणतात–सामनाची पत्रकारिता ही तलवारीच्या धारेवर बसून काम करण्यासारखी आहे.  सामनामधील अग्रलेखाने कुणाला वैचारिक प्रेरणा मिळाली तर विरोधकांच्या हाती कोलीत मिळाले. अग्रलेखावर ठपके ठेऊन आम्हाला तुरूंगात टाकण्याचा विचार राज्यकर्त्यांनी केला. पण सतीचे वाण असलेली पत्रकारिता आम्ही कधी नाकारली नाही (राऊत, सं. १९९२)


## १.१२  बाळासाहेबांची निवडक व्यंगचित्रे

बाळासाहेबांनी व्यंगचित्रांतून मारलेल्या फटका–यांद्वारे त्यांचे विचार व कल्पना स्पष्ट दिसून येत असत. मार्मिकच्या अंकातून काही निवडक व्यंगचित्र गोळा करून ती ‘फटकारे’ या पुस्तकातून खाली मांडण्यात आलेली आहेत. (ठाकरे, बाळ)

**व्यंगचित्रे काढत असतानाची बाळासाहेबांची काही दुर्मिळ चित्रे.**





श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या मते लोकांना राजकारण व प्रश्न समजावून सांगण्यासाठी व्यंगचित्रे हे एक उत्तम माध्यम होते. त्यांच्या मते ज्या लोकांसाठी काढली गेली आहेत त्यांना ती समजणे फार गरजेची आहेत.







सत्ता कोणाचीही असो पण कायदा व सुव्यवस्था कधीच बदलली नाही आणि बदलणार ही नाही दर्शवणारे वरील चित्र.



महागाई आणि बेकारी या दोन अशा सामाजिक गोष्टी आहेत ज्या काळाबरोबर वाढतच जाणार आणि कुठलेही शासकीय धोरण यामध्ये बदल करून शकणार नाही याबद्दलचे ठाम मत दर्शविणारे व्यंगचित्र.




कायम उद्भवणारी अडचण म्हणजे सणासुदीच्या दिवसांत महाग होणारी साखर. या महागाईबद्दल सरकार काही कार्यवाही करेल तर ते अश्यक्यच हे दर्शविणारे वरील व्यंगचित्र.







देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षं झाली तरी स्वातंत्र्याच्या झाडाला लोमकळणारी व पोकळ करणारी फळे दर्शविणारे व्यंगचित्र.

१९८३

दक्षिणेचे राजकारण. एकदम 'फिल्मी' स्टाईल!
तामीळनाडूचे मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन यांचा तामीळनाडूच्या जनमानसावर मोठा प्रभाव होता.
तामीळनाडूत कोणत्याही केंद्रीय मदतीस त्यांनी विरोध केला.




राज्यांच्या सीमेवर होत असणारी पाणी या विषयावरची मारामारी जी कधीही न संपणारी आहे.

१९८९

हा तर 'मास्टर स्ट्रोक'!





श्री. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी बाळासाहेबांना दिलेल्या शुभेच्छा दर्शविणारे व्यंगचित्र




सर्व पक्षांनी एकत्र येऊन शिक्षणाची लावलेली वाट दर्शविणारे व्यंगचित्र











जरी इंग्रजांनी देश सोडला तरी पोर्तुगीज गोवा सोडायला तयार नव्हते तेव्हा पंडित नेहरू वारंवार चर्चा सुरु आहे असे म्हणत पण लोकांची फसवणूक करून कोणाशी चर्चा सुरु ते दर्शविणारे व्यंगचित्र.

**१.१३ संशोधन आराखडा: सदर संशोधनाचा आराखडा पुढीलप्रमाणे:**

प्रकरण १: प्रस्तावना

प्रकरण २: पूर्व साहित्याचा अभ्यास

प्रकरण ३: संशोधन पद्धती

प्रकरण ४: माहिती विश्लेषण आणि सादरीकरण

प्रकरण ५: निष्कर्ष शिफारसी आणि पुढील संशोधनाची दिशा

## १.१४ सारंश:

सदर प्रकरणामध्ये विषय निवडीचे कारण, संशोधनाची गरज, संशोधनाची उद्धिष्ट व गृहीतके यांची माहिती देण्यात आली आहे. तसेच शिवसेनेचा इतिहास व सामना वृत्तपत्राबद्दल माहिती देण्यात आली आहे.

## १.१५ संदर्भ:


- दार, स क. (१९४८): रिपोर्ट ऑफ लिंग्विस्टिक प्रोव्हिन्सस कमिशन. Available at: https://indianculture.gov.in/report-linguistic-provinces-commission-1948. Viewed on १०/१२/२०२०.
- गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र (१९५५): रिपोर्ट ऑफ स्टेट्स री ऑरगॅनिझशन कमिशन: Available at: https://www.mha.gov.in/sites/default /files/ State%20Reorganisation%20Commisison% 20R>report%20o f % 201955_ 270614. pdf. Viewed on १०/१२/२०२०.
- माडखोलकर, ग. म्या. (२, जानेवारी १९६९): 'तरुण भारताचे सिंहावलोकन'. तरुण भारत – नागपूर, , पृष्ठ, २
- ठाकरे, बाळ (सामना १९८९, २३ जानेवारी): ज्वलंत हिंदुत्वाचा, पुरस्कार करणारे एकमेव दैनिक. पहिला अग्रलेख वर्षे १, अंक १

- ठाकरे, बाळ के. (२०१२) : फटकारे. प्रबोधन प्रकाशन, मुंबई २५७ पृष्ठ
- ठाकूर, योगेंद्र(): सत्तासंग्राम, महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची वाटचाल १९६०–२०१९. अमोद प्रकाशन, मुंबई
- सामंत, विजय य. आणि प्रधान हर्षल (२०१६): सुवर्ण महोत्सवी शिवसेना– ५० वर्षांची घोडदौड. श्री समर्थ प्रकाशन. मुंबई. ४०८ पृष्ठ
- पुरंदरे, वैभव (२०१२): बाळ ठाकरे आणि शिवसेनेचा उदय (संजय तांबट (अनुवाद). मंजुळ पब्लिशिंग हाऊस. भोपाळ २९९ पृष्ठ
- लेले, रा के (२००४): मराठी वृत्तपत्रांचा इतिहास. कॉँटिनेंटल प्रकाशन, पुणे. ११११ पृष्ठ.
- राऊत, संजय (१९९२): ठाकरी
- इनमराठी.कॉम (१५, सप्टेंबर २०२१): दस–याचा सामना बाळासाहेबांनी ह्या प्रमाणे जिंकला होता.... Available at: https://www.inmarathi.com / 127073/story-about-saamana-news-paper/. Viewed on 12/01/2022.
- शहा, राजुला (२०१६):ट्रॅजेक्टरीएस इन द कॉन्स्ट्रुक्टिव ऑफ्फ्र मराठी आयडेंटिटी. Journal of emerging technologies and innovative research. 5(8). Pp 238-245. Available at https://www.jetir.org/papers/JETIR1808931.pdf. Viewed on 10/12/2021.

# प्रकरण २ पूर्व साहित्याचा अभ्यास


| क्र. | शीर्षक |
|---|---|
| २.१ | प्रस्तावना |
| २.२ | शोधप्रबंध व संशोधनासंबंधी लेख |
| २.३ | इतर राज्यातील निवडक राजकीय पक्षांची मुखपत्रे |
| २.४ | सारांश |
| २.५ | संदर्भ |

## २.१ प्रस्तावना

पूर्व साहित्याचा अभ्यास ही एक अशी प्रक्रिया आहे जिथे सुसंघटित विषयांवरील संशोधनात्मक कामाचा शोध घेतला जातो. पूर्व साहित्य शोध हा व्यवस्थित पणे संरचीत आणि संशोधनाच्या विषयाला धरून असला पाहिजे जेणेकरून संशोधनाशी निगडित संदर्भ लवकरात लवकर प्राप्त होऊ शकतील. पूर्व साहित्याचा आढाव्या मध्ये व्यापक, सर्वसमावेशक आणि सखोल प्रकाशित व अप्रकाशित स्त्रोतांचा अभ्यास केला जातो. सदर स्त्रोत मुद्रत किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांची असू शकतात. पूर्व साहित्याचा आढावा संशोधनाच्या कार्यात एका मार्गदर्शकाचे काम करत असतो. पूर्व साहित्याचा आढावा घेण्यामागचा संशोधकाचा हेतू म्हणजे विषयाशी निगडित झालेला अभ्यास बघून संशोधनाच्या विषयासंबंधी ज्ञान वाढवणे. थोडक्यात वाचन साहित्याचा आढावा किंवा वाचन साहित्याचा पूर्वाभ्यास/पुनरावलोकन म्हणजे संशोधन विषयाचे पूर्वी झालेले संशोधन अभ्यासणे ज्यामुळे चालू संशोधनाला योग्य दिशा मिळते.

सदर संशोधनात संशोधकाने विविध प्राथमिक आणि द्वितीय माहितीच्या स्त्रोतांचा अभ्यास केला आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमात उपलब्ध असलेली माहितीची साधने तपासताना संशोधकाने नियतकालिक, इ–बुक, शोधगंगा, ऑनलाइन डाटाबेसे, विद्यावाचस्पती प्रबंध, संबंधित विषयावरील लेख, वर्तमानपतत्रातील लेख इत्यादींचा वापर केला आहे.

## २.२ शोध प्रबंध व संशोधनासंबंधी लेख:

रावळ, च आणि राव, अ. (१९९५) यांच्या अप्रकाशित पी. एच.डी. प्रबंधात वृत्तपत्र उद्योगाचा ऐतिहासिक दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यांनी आधुनिकीकरण आणि यांत्रिकीकरणाच्या गरजेसह संघटनात्मक, आर्थिक आणि

विपणन संरचनांमधील बदल देखील सादर केले आहेत. वृत्तपत्र उद्योगातील व्यवस्थापन, कर्मचारी आणि संघटना यांच्या विचारांचाही अभ्यास करण्यात आला आहे.

केइशाम, स. आणि लाहिरी, र. (२००४) यांच्या अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये माहितीच्या प्रसारात स्थानिक दैनिकांनी बजावलेल्या भूमिकेचा अभ्यास करण्यात आला आहे तसेच बातम्यांमधून वाचकांच्या समाधानाची पातळी जाणून घेण्याचा प्रयत्न पण करण्यात आला आहे. सदर संशोधनात असे निदर्शनास आले आहे की संपादकीय धोरणे प्रामुख्याने लोकांना सभोवतालची जाणीव करून देण्यासाठी आणि जनमत तयार करण्यासाठी निर्देशित केली जातात. दैनिक प्रकाशित करताना आर्थिक, विविध मंडळांकडून येणारा दबाव व काही इतर समस्या यांना सामोरे जावे लागते व संबंधीचे विवेचन सदर प्रबंधात आढळते.

गर्बर, ए आणि इतर (२००९) यांनी वर्तमानपत्राच्या मतदातारांच्या वर्तनावर होणारा परिणाम आणि राजकीय मते या विषयावर प्रयोग केला आहे. सदर अभ्यासात युनायटेड स्टेट्समधील मतदारांच्या राजकीय ज्ञानावर आणि मतांवर उदारमतवादी किंवा पुराणमतवादी वृत्तपत्रांची विनामूल्य सदस्यता प्राप्त करण्याचा प्रभाव मोजला आहे.

ह्जारवर्ड, स. (२०१०) यांनी बातम्यांमुळे दर्शकांच्यात राजकीय वर्तमान पत्रामध्ये होणारे बदल या विषयावर संशोधनपर लेख लिहिला आहे. वर्तमानपत्रे लिहिणे, प्रकाशित करणे आणि वाचण्यामागे राजकीय दृष्किोण आणि युक्तिवाद असतात. व्यापक अर्थाने त्यामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक जगाचा अर्थ लावला जातो. अशा प्रकारे, वैयक्तिक वर्तमानपत्रे आणि त्यांचे संबंधित वाचक सामाजिक विश्वास आणि मत निर्मितीचे वलय तयार करतात. सदर विश्लेषण आणि चर्चा डॅनिश राष्ट्रीय

दैनिकांच्या परिमाणात्मक माहितीचे विश्लेषण आणि वृत्तपत्र वाचकांच्या सर्वेक्षणांवर आधारित करण्यात आली होती.

मेनॉन, क्रि. (२०१०) यांच्या पुस्तकात डिजिटल मीडिया, भविष्यातील पत्रकारिता व्यवसाय इत्यादी विषयांवर लिखाण करण्यात आले आहे.

पुगलिसी, री. (२०११) यांनी न्यूयोर्क टाइम्स पेपरला राजकीय वर्तमानपत्र असे लेख मध्ये संबोधले आहे. सदर लेखात नमूद केल्याप्रमाणे विद्यमान अध्यक्ष आणि यूएस कॉँग्रेसच्या सर्व मुद्द्यांवर नियंत्रण ठेवताना, असे आढळून आले की, अध्यक्षीय प्रचारादरम्यान, न्यूयॉर्क टाइम्सने ज्या विषयांवर लोकशाही पक्ष अधिक सक्षम मानला जातो (नागरी हक्क, आरोग्य सेवा, कामगार, तसेच जेव्हा विद्यमान अध्यक्ष रिपब्लिकन असतो तेव्हा सामाजिक कल्याण) अशा विषयांवर अधिक भर दिला आहे.

मोने, गि. आणि दीक्षित, म. (२०११) यांनी मराठी वृत्तपत्रांच्या मुक्त प्रसाराच्या भूमिकेशी संबंधित असलेल्या एका अभ्यासात असा निष्कर्ष काढला आहे की, इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे काही वर्षांत वर्तमानपत्रे आधुनिक स्वरूपासह मोफ्फ़त वितरीत केली जातील. जागतिकीकरणामुळे प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रांवर मर्यादा आल्याचेही आढळून आले आहे.

पाटील, ज. आणि टिळक, दी. (२०११) यांच्या अप्रकाशित शोध प्रबंधात महाराष्ट्र ातील वृत्तपत्रांवर माहिती संप्रेषण आणि तंत्रज्ञान (ICT) चा प्रभाव दिसून येतो. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रावर अंतर्बाह्य परिणाम होत आहे. मूळ वृत्तपत्राचे स्वरूप बदलले आहे याचा अक्षर जुळवणीसाठी फ्फ़ार उपयोग होतो.

सरकार, री. (२०११) हिने मीडियाची मालकी, मीडियाचे आंतरराष्ट्रीय स्वरूप, भारतीय मीडियाचा इतिहास आणि विकास इत्यादी विषयांवर पुस्तकामध्ये विस्तृत माहिती दिली आहे.

गुहा, बि. (२०१२) यांनी पत्रकारिता संशोधन या विषयावर पुस्तक लिहिले आहे. सदर पुस्तकात पत्रकारितेची विविध प्रारूपे, मल्टिमिडीया, मास कम्युनिकेशन, वेब पेज डिझांग इत्यादी विषयांवर माहिती देण्यात आली आहे.

विजयपूरकर, म. (२०१२) यांनी बाळ ठाकरे आणि सामना यांच्यातील जवळचा संबंध प्रतिबिंबित करणारा एक लेख लिहिला आहे. ह्या लेखात सामना वृत्तपत्र त्यांच्या मनाची खिडकी म्हणून दर्शविला गेला आहे. या लेखाचा उपयोग सेवकांकडून दिशादर्शनासाठी केला जात असून बाळासाहेब ठाकरे यांच्या मृत्यूनंतरही हा पेपर वाचकांशी जोडण्याचा महत्त्वाचा मार्ग राहील, असे सांगण्यात आले आहे.

ठाकूर, अ. (२०१३) यांनी भारतातील ७ वृत्तपत्र जे राजकीय पक्षांना प्राधान्य देतात यांच्याबद्दल लेख लिहिला आहे. त्यात असे म्हंटले आहे की जेव्हा राजकीय बातम्या सशुल्क जाहिराती असतात तेव्हा व्यवसाय, बॉलीवूड आणि क्रीडा बातम्यांमध्येही ते वेगळे नसते. असेही निदर्शनास आले आहे की बहुतेक वृत्तवाहिन्या, वर्तमानपत्रे, प्रसारमाध्यमे, प्रकाशनसंस्था वेगवेगळ्या पक्षांच्या राजकारण्यांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणात असतात. पायोनियर, ट्रिब्यून, स्टेट्समन, हिंदू, टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, हिंदुस्तान टाइम्स या भारतातील विशिष्ट राजकीय पक्षांना समर्थन देण्यासाठी ओळखल्या जाणा–या मुख्य ७ वर्तमानपत्रांचा अभ्यास सदर लेखात केला आहे.

रत्नपारखी, शा. आणि टिळक, दी. (२०१३) यांनी त्यांच्या अप्रकाशित शोध प्रबंधात वृत्तपत्रातील मानव संसाधनांचा अभ्यास केला आहे, सदर अभ्यासावरून असे दिसून आले आहे की मानव संसाधन हा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे

आणि त्याकडे दुर्लक्ष व पदोन्नती आणि वेतनवाढीसाठी योग्य वाव असावा. या प्रबंधात छायाचित्र पत्रकारितेचे महत्त्वही सांगण्यात आले आहे.

खेडेकर, स. आणि गोखले, ए. (२०१३) यांनी जिल्हा आधारित मराठी भाषेतील वर्तमानपत्रांचे महत्त्व अभ्यासले आहे. त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की जिल्हा आवृतीची भूमिका महत्त्वाची आहे व अग्रलेख वाचक वाढवले आहेत. जिल्हा आवृत्यांचे भविष्य उज्ज्वल आहे असेही दिसून येते.

मोरे, ह. आणि कुलकर्णी, स. (२०१३) यांनी केलेल्या संशोधनामध्ये असे आढळून आले आहे की वृत्तपत्रे सरकारच्या विविध योजनांची जनजागृती करण्यात यशस्वी ठरत आहेत. बातम्यांमुळे या प्रकल्पांचा दर्जा सुधारत असल्याने या विकास प्रकल्पांमध्ये त्यांचाही मोठा वाटा आहे. विविध विकास प्रकल्पांद्वारे दळणवळणाच्या विविध पद्धतींमध्ये वाढ झाल्यामुळे लोकांची एकूण परिस्थिती सुधारली आहे.

मेथ्यू, ग. आणि इतर (२०१४) यांनी संशोधनपर लेखात वृत्तपत्रे राज्याची सेवा करण्याबाबतचा अभ्यास केला गेला आहे. त्यांच्या अभ्यासात असे आढळून आले की, सत्तेतील कोणताही पक्ष प्रेसच्या पक्षपाती रचनेवर परिणाम करत नाही.

खालिद, म. आणि अहमद आ. (२०१४) यांनी समकालीन संदिग्ध भाषा वर्तमानपत्रा मधून होणारा वापर या विषयी लेख लिहिला आहे. वृत्तपत्रे बातम्यांचे वृत्तांकन, मते व्यक्त करणे, जनतेला माहिती देणे आणि त्याद्वारे महत्त्वाच्या मुद्द्यांवर सार्वजनिक चर्चा करणे याद्वारे लोकमत तयार करण्यात आणि प्रतिमा तयार करण्यात मदत करतात असे या लेखात नमूद करण्यात आले आहे.

हेबर, नि. (२०१५) यांनी सदर लेखात 'ऑर्गनायझर' हे राष्ट्रीय सेवक संघाचे मुखपत्र आहे असे वर्णन केले आहे. ऑर्गनायझरच्या संपादकीयमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चीन दौ–याचे कौतुक करणारा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर हा प्रश्न निर्माण

झाला आहे. भारत प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या आणि आरएसएसचे मुखपत्र मानल्या गेलेल्या ऑर्गनायझरचाही त्यात उल्लेख आहे.

बुल्ला, डे. (२०१५) त्यांच्या लेखात १७८९ मध्ये सुरु झालेल्या युनायटेड स्टेट्सचे गॅझेट या विषयी लेख लिहिला आहे. हे राजकीय पक्षाचे अधिकृत अंग म्हणून स्थापित केलेले पहिले वृत्तपत्र मानले जाते. पार्टी प्रेसच्या काळात अमेरिकन प्रेसची व्यापक वाढ झाली. १७८३ मध्ये नव्याने स्वतंत्र झालेल्या देशात केवळ ३५ वर्तमानपत्रे होती, परंतु १८३३ पर्यंत त्यांची संख्या १२०० होती. पक्षाच्या पत्रकारितेच्या काळातील गैर-जाहिराती सामग्री ही प्रामुख्याने राजकीय बातम्या आणि प्रतिस्पर्ध्यांवरील शिवीगाळ यांचा समावेश होता. या

मध्ये संपादकांनी प्रमुख राष्ट्रीय आणि राज्य राजकीय नेत्यांची भाषणे तसेच महत्त्वपूर्ण सरकारी दस्तऐवज देखील छापले.

एलियासोन. प. (२०१६) मुंबई स्थित हिंदू राष्ट्रवादी आणि प्रादेशिक राजकीय पक्ष शिवसेना त्यांच्या दैनिक सामनाच्या हिंदी आवृत्तीच्या माध्यमातून अल्पसंख्यांकांबद्दल ज्या पद्धतीने संवाद साधला जातो त्याचे विश्लेषण करणे हा या संशोधनाचा उद्देश आहे. सदर लेखात अल्पसंख्याकांवर आधारित फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे विश्लेषण केले आहे आणि असे आढळून आले आहे की ते पाकिस्तान आणि दहशतवाद्यांशी संबंधित असलेल्या मुस्लिमांच्या आधीपासून व्यापलेले आहेत आणि त्यांना संभाव्य धर्मांध आणि राष्ट्राशी विश्वासघातकी म्हणून चित्रित केले आहे.

सेंटो, पौ. आणि कोस्टा, ब्रु. (२०१६) यांनी राजकीय पक्षाचे वर्तमानपत्र या विषयावर आशय विश्लेषण केले आहे. राजकीय संदर्भात, विशेषतः पोर्तुगीज प्रेसमध्ये, विविध पक्ष त्यांच्या पक्षाच्या वर्तमानपत्रांचा राजकीय संवादाचे साधन म्हणून कसा वापर करतात यावर या लेखाचे लक्ष केंद्रित केलेले आहे. या लेखाचा

उद्देश पक्ष आणि राजकारण यांच्या समर्थनाची आवड निर्माण करणे आणि वाढवणे यासाठी वृत्तपत्रांचे योगदान या विषयावर आधारित आहे.

पाटील, म. आणि टिळक, दी. (२०१६) यांच्या अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये आर्थिक साक्षरता सुधारण्यात वृत्तपत्रांच्या भूमिकेचा याचा अभ्यास केला होता. ह्यामध्ये असे नमूद केले आहे की, आर्थिक साक्षरता कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबविण्याची गरज आहे व वृत्तपत्रांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता सप्ताह राबवता येते. सदर संशोधनात असे आढळून आले आहे की स्थानिक वृत्तपत्रांनी सामान्य अर्थव्यवस्थेवर खूप कमी लेख प्रकाशित केले आहेत.

हुताशूत, म. आणि नगेंगेट, इ.(२०१७) यांनी राजकीय विपणनासाठी वर्तमानपत्राचा होणारा वापर या विषयावर अभ्यास केला आहे. सदर संशोधन इंडोनेशियाच्या अध्यक्षीय निवडणुकी दरम्यान बातम्यांमधील माहितीचा वापर करून राजकीय मार्केटिंग लागू करण्यात वृत्तपत्राची भूमिका निश्चित करण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. राजकारणाच्या क्षेत्रात मार्केटिंग पॉलिटिक्सची अंमलबजावणी करताना तटस्थ आणि स्वतंत्रपणे बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. यामध्ये प्रसारमाध्यमांचे मालकी राजकीय दृष्टीकोन निर्धारित करते असे दिसून येते.

सरकार, अ. आणि पांडे, ग्या. (२०१७) यांनी अप्रकाशित प्रबंधामध्ये विविध सामाजिक–आर्थिक विकासाच्या समस्यांशी संबंधित 'दैनिक जुगसंखा' आणि 'समयाक प्रसंगा' या दोन वृत्तपत्रांमधील तुलनात्मक अभ्यासाचा समावेश आहे. हे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, भारतातील निरक्षर लोकसंख्या अधिक आहे आणि अनेक प्रादेशिक वृत्तपत्रे सामाजिक, आर्थिक घटक आणि योजनांचा प्रसार करण्यात महत्वाची भूमिका बजावतात, जे लोक वाचू शकत नसले तरीही ते

स्थानिक प्रादेशिक भाषांमध्ये प्रकाशित झाल्यास ते या निरक्षर लोकांना वाचून दाखवले जातात.

मुंशी, स. (२०१७) राष्ट्रीय सेवक संघ यांच्या ओर्गोनाइझर या वृत्तपत्राची ७० वर्ष यावर लेख लिहिला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाद्वारे प्रकाशित केले जाणारे सदर 'ओर्गोनाइझर' हे खरोखर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र आहे किंवा नाही? असा प्रश्न सदर लेखामध्ये उपस्थित केला आहे. ओर्गोनाझरसाठी काम करणा-यांपैकी कोणीही संघाशी संबंध नाकारला नाही, परंतु त्यांना 'आरएसएसचे मुखपत्र' म्हटले जाणेही आवडले नाही. एखाद्या प्रकाशनाला 'माउथपीस' म्हटले जाण्याचा एकमेव निकष हा आहे की संबंधित संस्थेचा मुख्य अधिकारी  हा देखील प्रकाशनाचा मुख्य अधिकारी असावा.

घोलप, उ. आणि शेळके, र. (२०१९) यांनी 'नवाकाळ 'वृत्तपत्राचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय योगदान या विषयावर शोधप्रबंध सादर केला आहे. सदर अप्रकाशित विद्यावाचत्तपती प्रबंधात 'नवाकाळ' या मराठी वृत्तपत्राचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधन कार्यातून समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेत वृत्तपत्रांनी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. 'नवाकाळ' या वृत्तपत्राची स्थापना, वृत्तपत्राचा इतिहास, वृत्तपत्राची सद्यस्थिती या विषयीचे विवेचन तसेच पत्रकारिते विषयीचे सविस्तर वर्णन सदर प्रबंधात करण्यात आले आहे.

फडके, मा. (२०२०) हिने १९८९ मध्ये स्थापन झालेल्या 'सामना' या वृत्तपत्राचा आढावा सादर केला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळापासून ते उद्धव ठाकरे यांच्या काळातील भूमिका विकसित झाल्या असल्या तरी हा पेपर त्याच्या ज्वलंत संपादकीयांसाठी प्रसिद्ध आहे, असे संशोधकाने नमूद केले आहे.

गटकल, अ. (२०२१) यांनी त्यांच्या लेखात विविध वर्तमानपत्रांशी संबंधित तपशील दिला आहे. डीएनए, इंडियन एक्सप्रेस, टाइम्स ऑफ्फ इंडिया, द हिंदू या वृत्तपत्रांमध्ये सामना ज्या पद्धतीने शिवसेनेशी संबंधित आहे. तसेच ह्या सर्व वर्तमान पत्रांना थेटपणे वेगळे करणे शक्य नाही, असे म्हटले आहे.

सिंग, अ. (२०२१) यांनी त्यांच्या संशोधन अभ्यासात राजकीय पक्षांच्या मुखपत्रांचे संशोधनात्मक निरीक्षण केले आहे. या संशोधनात असे आढळून आले आहे की, राजकीय पक्ष मुखपत्राच्या माध्यमाशी संवाद साधण्यासाठी त्यांचे राजकीय हेतू आणि विचारधारा घेत अस्तात. राष्ट्रीय पक्ष त्यांच्या मुखपत्रातील मजकूर सर्वसमावेशक रीतीने सादर करतात व त्यात भाषेच्या संवादात्मक आणि सांस्कृतिक विविधतेकडे विशेष लक्ष दिले जाते. राजकीय पक्षांचे मुखपत्र हे आरसा आणि दिवा असे दोन्ही काम करते. मुखपत्र अंतर्गत संवाद तसेच बाह्य संप्रेषण करते. पक्षाच्या विचारसरणीचा माहितीचा प्रसार हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

मास्तुद, प आणि पाटील, ज. (२०२१) यांच्या अप्रकाशित शोधप्रबंधात मराठी वृत्तपत्रातील व्यंगचित्रांचा वाचकांवर होणारा परिणाम या विषयावर संशोधन करण्यात आले आहे. त्यांच्या संशोधनातून असे दिसून येते की व्यंगचित्र माणसांमध्ये सकारात्मक विचार निर्माण करतात. शहराजवळ राहणारे लोक शहरातील लोकांपेक्षा व्यंगचित्रांना जास्त प्राधान्य देतात. सदर संशोधन प्रबंधात व्यंगचित्रांचा शहरी लोकांवर आणि शहरालगत राहणा–या लोकांवर तुलनाकमत अभ्यास यावर आधारित आहे. या संशोधनात असे निदर्शनास आले आहे की व्यंगचित्र सामाजिक आणि राजकीय विषयांवर आधारित असतात. राजकीय वृत्तपत्रांमध्ये व्यंगचित्रांचा उपयोग जास्त केला जातो. राष्ट्रीय कार्यक्रमांवर व्यंगचित्र प्रसिद्ध होण्याची आवश्यकता आहे असे ही शिफारसींमध्ये मांडले गेले आहे.

## २.३ इतर राज्यातील निवडक राजकीय पक्षांची मुखपत्रे:

New18 (2021) जानेवारी २०२१ मध्ये जेडीयू पक्षाने स्वतःचे मुखपत्र म्हणून 'संधान' हे प्रसिद्ध केले.  बिहारमधील असे करणारा हा पहिला प्रमुख राजकीय पक्ष आहे. बिहारमधील सत्ताधारी जनता दल–जेडीयू युनायटेडने पक्षाच्या मुख्यालयात स्वतःचे मुखपत्र सुरू केले. जेडीयू संधान' हे मासिक हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषेत प्रकाशित होते. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणाले की सदर वृत्तपत्राचा उपयोग जेडीयू कशासाठी उभा आहे आणि कोणत्या बाबतीत ते अद्वितीय आहे याची लोकांना जाणीव करून देण्यास मदत होईल.

'विकशानम' हे केरळचे वृत्तपत्र असून ते काँग्रेस पक्षाचे मुखपत्र आहे असा उल्लेख केला गेला आहे. हे एक मल्याळम दैनिक आहे. वीकशानम प्रिंटिंग अँड पब्लिशिंग कंपनी ही केरळमधील अग्रगण्य मल्याळम दैनिकांपैकी एक आहे आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मुखपत्र आहे व केरळ प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मालकीचे आहे. वीकशानम केरळच्या सामाजिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनला आहे. वीकशानमची पहिली प्रत ११ फेब्रुवारी १९७६ रोजी प्रकाशित झाली व भारताच्या आयर्न लेडी श्रीमती यांनी उदघाटन केले. श्री. ए.के. अँटनी, भारताचे माजी संरक्षण मंत्री यांच्या हस्ते हे वृत्तपत्र सुरू करण्यासाठी सुरू करण्यात आले आणि त्यावेळी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. वीकशानम सहा केंद्रांवरून प्रकाशित होत आहे; तिरुअनंतपुरम, कोल्लम, कोची, त्रिसूर, कोझिकोड आणि कन्नूर.

'चंद्रिका' हे दुसरे वृत्तपत्र केरळच्या मुस्लीम प्रिंटिंग अँड पब्लिशिंग कंपनीद्वारे चालवले जाते. ते मल्याळम वृत्तपत्र असून इंडियन युनियन मुस्लीम लीगचे मुखपत्र आहे. कोझिकोड, कन्नूर, मलप्पुरम, कोची, त्रिवेंद्रम, कोट्टायम, दोहा, दुबई, रियाध, बहरीन, दम्मम आणि जेद्दाह येथून प्रकाशित होते. मागासलेल्या समुदायांना पाठिंबा

देण्यासाठी मलबार मुस्लिमांमधून वृत्तपत्र काढण्याचा पहिला प्रयत्न म्हणून चंद्रिकाची स्थापना करण्यात आली.

सिंग, स. यांनी त्यांच्या लेख मध्ये पायोनियर वृत्तपत्र हे भाजपचे वृत्तपत्र आहे असा उल्लेख केला आहे. सदर वृत्तपत्राचे संपादक हे राज्य सभेचे सदस्य आहेत असे म्हंटले आहेत. असेही निदर्शनास आले आहे की सदर वृत्तपत्रामध्ये बरेच स्तंभलेखकानी बाजपाशी संबंधित लेख लिहिले आहेत.

## २.४ सारांश:

सदर प्रकरणात संशोधन विषयाशी निगडित अशा साहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासामुळे संशोधकाला विविध राजकीय मुखपत्रांची माहिती मिळाली असून त्याचा उपयोग संशोधनात करण्यात आला आहे. विविध शोधप्रबंधाचा अभ्यास करून वृत्तपत्रं बद्दलची माहिती गोळा करण्यात आली आहे.

## २.५ संदर्भ:


- खेडेकर, संतोष आणि गोखले, अरविंद (२०१३): मराठी भाषक वर्तमानपत्रांच्या जिल्हा आवृत्यांची उपयुक्तता: अभ्यासासाठी निवडलेली वृत्तपत्रे– केसरी, लोकसत्ता, सकाळ, लोकमत व पुण्यनगरी (विशेष संदर्भ: अहमदनगर जिल्हा २००८–२०१३). अप्रकाशित संशोधन प्रबंध. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. २६४ पृष्ठ
- घोलप, उर्मिला आणि शेळके रघुनाथ (२०१९) २० व्या शतकातील नवाकाळ वृत्तपत्राचे सामाजिक आर्थिक आणि राजकीय योगदान. Available at https://shodhganga. inflibnet.ac.in/ bitstream/10603/315446 /6/06_chapter% 201. pdf. Viewed on 10/02/2019.

- पाटील, जगन्नाथ आणि टिळक दीपक (२०११): आधुनीक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम (१९८५ ते २००५) – विशेष अभ्यास: स्व. राजीव गांधी यांचा कालखंड. अप्रकाशित शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ३६० पृष्ठ.
- मास्तुद प्रवीण आणि पाटील जगन्नाथ (२०२१): मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणा–या व्यंगचित्र सदरच्या संशोधनातून प्रसारित होणा–या मूल्यांचा वाचकांवर होणा–या परिणामाचा अभ्यास. अप्रकाशित संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४४० पृष्ठ
- मोरे हेमंत आणि कुलकर्णी संतोष (२०१३) वृत्तपत्रांच्या विकासकामांवरील प्रभाव, विशेष संदर्भ– सांगली जिल्ह्यातील गेल्या दहा वर्षातील विकासकामे (कालावधी– १९९६ ते २००६). अप्रकाशित संशोधन प्रबंध. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ३०५ पृष्ठ
- रत्नपारखी श्यामसुंदर आणि टिळक दीपक (२०१३): वृत्तपत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्त्व (मराठवाड्यातील निवडक वृत्तसंस्थांचा अभ्यास, २०००–२०१०). अप्रकाशित संशोधन प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ५५१ पृष्ठ

- Bulla, David W. "Party press era". Encyclopaedia Britannica, 29 Dec. 2015, https://www.britannica.com/topic/party-press-era. Accessed 1 October 2021.
- Chandrika (nd): Available at https://en.wikipedia.org/wiki /Chandrika_ (newspaper). Viewed on 10/06/2019.

- Eliasson, Par (2016): Shivsena, Saamana and minorities. A study of Political rhetoric in an Indian Hindu nationalist and Marathi regionalist newspaper. Uppasala University, Department of Linguistics and Philology. Available at: http://www.diva-portal.org/smash/get/diva2:1330219/FULLTEXT01.pdf. Viewed on 14/07/2019.
- Gatkal, Akshay (2021): Which newspapers support which political parties in India? Available at: https://www.quora.com/Which-newspapers-support-which-political-party-in-India. Viewed on 13/12/2021.
- Gerber, Alan S., Dean Karlan, and Daniel Bergan (2009): "Does the Media Matter? A Field Experiment Measuring the Effect of Newspapers on Voting Behaviour and Political Opinions." American Economic Journal: Applied Economics 1(2): 35-52. Available at: https://www.povertyactionlab.org/ evaluation/effect-media-voting-behavior-and-political-opinions-united-states. Viewed on 22/12/2021.
- Guha, Biwajeet (2012): Multimedia communication and journalism research. Kanishka Publishers, distributors, New Delhi. 276p.
- Hebar, Nistula (2015): Is Organiser anything more than a mouthpiece of RSS? https://economictimes.indiatimes. com/news/politics-and-nation/is-organiser-anything-more-than-a-mouthpiece-of-rss/articleshow/47322697.cms. Viewed on 14/13/2021.
- Hjarvard, Stig (2010): The views of the news: The role of political newspapers in a changing media landscape. Northern Lights 8(1):25-48. Available at: https://www. researchgate. Net /pu blic ation/233571359_The_views_of_the_news_the_role_of_politic

al_newspapers_ in_a_changing_media_ landscape. Viewed on 14/07/2019.

- Hutasuhut, Masline W. and Ngenget, Indiana (2017): The Role of Newspaper as Political Marketing Tool during Indonesian Presidential Election of 2014. Available from: https://www.researchgate.net/publication/323396792_The_ Role_of_ Newspaper_as_Political_Marketing_Tool_during_Ind nesian_ Presidential_Election_of_2014. Viewed on 14/07/2019.
- Keisham, Sangita Devi and Lahiri, Ramansu (2004): Role of local dailies of Manipur in dissemination of information. Available at https:// shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/39618. Viewed on 14/07/2019.
- Matthew Gentzkow, Matthew, Petek, Nathan and Shapiro, Jesse M. (2014): Do Newspapers Serve the State? Incumbent Party Influence on the US Press, 1869-1928. Available at https://www.brown.edu/Research/Shapiro/pdfs/ Political Influence. pdf. Viewed on 10/06/2021.
- Menon, Krishna (2010): Research Methods for media and cultural studies. Manglam Publications. New Delhi. 309p.
- Mone, Geetali and Dixit, M. C. (2011): Role of free circulation of optimum newspaper management (with special reference to Marathi newspapers in Pune 2002 to 2009). Unpublished Ph D thesis, Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. 181p.
- Munshi, Suhas (2017): 70 years of uber Hindutva on cheap paper: the story of RSS Organiser. Available at: http://www.catchnews.com/politics-news/70-ye ars-of-uber-hindutva-on-cheap-paper-the-story-of-rss-organiser-147153730 9. html.

- News 18 (2021): JD(U) Launches Monthly Mouthpiece 'Sandhaan', First Major Political Party in Bihar to Do So. Available at: https://www.news18.com/news/ politics/jdu-launches-monthly-mouthpiece-sandhaan-first-major-political-party-in-bihar-to-do-so-3340082.html. Viewed on 10/11/2019.
- Patil, Mahesh and Tilak, Deepak (2016): Study the role of newspapers in improving financial literacy in Navi Mumbai. Unpublished Ph D thesis. Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. 214p
- Phadke, Manasi (2020): Journey of Bal Thackarey's Saamana-from Shivsena's daily newspaper to newsmaker. Available at: https://theprint.in/statedraft/journey-of-bal-thackerays-saamana-from-shiv-senas-daily-newspaper-to-new smaker/476437/. Viewed on 14/07/2019.
- Puglisi, Riccardo (2011): Being The New York Times: the Political Behaviour of a Newspaper. The B.E. Journal of Economic Analysis & Policy, 11(1). Available on: https://www.researchgate.net/publication/227377834_Being_ Th e _ New_York_Times_the_Political_Behaviour _ of_a_Newspaper. Viewed on 14/07/2019.
- Rawal, Chandrakant N. and Rao, A. B. (1995): An analytical study of the newspaper industry in Pune City during the period 1982 to 1992. Available at https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream /10603/157858/6/05_chapter%201. pdf. Viewed on 10/02/2019.
- Santo, Paula Espírito and Costa, Bruno (2016): Party Newspapers Perspectives and Choices: A Comparative Content Analysis View. Available at: https://journals.sagepub.com/doi/full/10.1177 /21 582 44016640 859. Viewed on 14/07/2019.

- Sarkar, Arindam and Pandey, Gyan Prakash (2017): Press and Social Change A Study of Language Newspapers in Silchar Town of Assam. Available at https://shodhganga.inflibnet.ac.in /handle/10603/293252. Viewed on 14/07/2019.
- Sarkar, Rita(2011): Media ownership: research and regulation. Arise Publishers and distributors. New Delhi. 269p.
- Singh, Anveshan (2021): The "Mouthpiece' as a communication tools of Indian political parties. Research Review International Journal of Multidiscilinary. 6(8). Pp 25-30. Available at:https://rrjournals.com/wp-content/u{loads/2021/08/25-30_RRIJM2021060800 7.pdf. Viewed on 11/08/2019.
- Singh, Shivam (nd): Indian newspapers and being political biasing. Available at https://themagzone.com/india-newspapers-political-biasing/. Viewed on 28/ 12/2021.
- Thakur, Aditya (2013): Top 7 newspapers known to favour specific political parties in India. Available at: http://hillpost.in/2013/08/top-7-newspapers-kno wn-to-favor-specific-political-parties-in-india/94800/. Viewed on 14/07/2019.
- Veekshanam(nd): Available at: https://veekshanam.com/about/. Viewed on 10/06/2019.
- Vijapurkar, Mahesh (2012): The importance of Bal Thackeray's Dainik Saamana. Available at: https://www.firstpost.com/ politics/the-importance-of-bal-thackerays-dainik-saamana-531496. html. Viewed on 12/08/2021.

# प्रकरण ३ संशोधन पद्धती

| क्र. | शीर्षक |
|---|---|
| ३.१ | प्रस्तावना |
| ३.२ | संशोधन |
| ३.३ | माहिती संकलनाची तंत्रे |
| ३.४ | प्रश्नावली : माहिती संकलनाचे महत्त्वाचे साधन |
| ३.५ | संशोधन पद्धती |
| ३.६ | संशोधनाची शास्त्रोत्तक बैठक |
| ३.७ | संशोधनाचा गट समूह |
| ३.८ | संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा |
| ३.९ | सारांश |
| ३.१० | संदर्भ |

## ३.१ प्रस्तावना

संशोधन करताना संशोधनाच्या विविध पद्धती, तंत्रे, साधने याचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या संशोधासाठी आवश्यक पद्धती, तंत्र आणि साधनाची निवड करणे सोपे जाते तसेच सखोल व विश्वसनीय संशोधन करणे शक्य होते. संशोधन करताना संशोधन आराखड्यामध्ये संशोधन पद्धती, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा या गोष्टींचा विचार अपरिहार्य आहे. संशोधनाची रूपरेषा आखण्यासाठी हे आवश्यक आहे.

सदर प्रकरणात संशोधन पद्धती, संशोधन गट समूह, संशोधनाची व्याप्ती व वमर्यादा या विषयीचे विवेचन केले आहे.

## ३.२ संशोधन

संशोधन ही एक प्रक्रिया आहे. संशोधन ज्ञान मिळविणे आणि मिळालेल्या ज्ञानाची नव्याने मांडणी करणे या उद्देशाने केले जाते.

सोप्या भाषेत संशोधन म्हणजे ज्ञानाचा शोध. संशोधन म्हणजे विशिष्ट विषयांवर किंवा समस्येवरील माहितीचा वैज्ञानिक आणि पद्धतशीर शोध आहे. याला वैज्ञानिक संशोधनाची कला म्हणूनही ओळखले जाते. अनेक शास्त्रज्ञांनी संशोधनाची व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केली आहे. काही निवडक संशोधनाच्या व्याख्या खाली नमूद केल्या आहेत–

**संशोधनाच्या व्याख्या**

**१. वेबस्टर शब्दकोशातील व्याख्येनुसार:**

संशोधनामध्ये नवीन ज्ञाननिर्मित करणे व त्याच्या आधारे उपलब्ध ज्ञानाची पुनर्मांडणी किंवा पुनर्मूल्यांकन केले जाते.

बॅबी, अर्ल रॉबर्ट नावाच्या एका मानसशास्त्रज्ञाने संशोधनाला एक पद्धतशीर चौकशी

ची क्रिया मानली आहे. संशोधनामध्ये ठरावीक घटनांचे वर्णनं आणि स्पष्टीकरण करून त्यांचे अनुमान लावले जाते व पाहणी केलेल्या घटकांवर नियंत्रण ठेवणे. या प्रक्रिये मध्ये आगमनात्मक आणि वजावटी पद्धतींचा समावेश करण्यात येतो असे नमूद केले आहे.

संशोधन पद्धती ही अभ्यासाच्या क्षेत्रात लागू केलेल्या प्रक्रियेचे पद्धतशीर, सैद्धांतिक विश्लेषण आहे (कोठारी, २००४). यामध्ये समस्या सोडविण्यासाठी घटनांचे वर्णन व अनुमान लावण्याची प्रक्रिया समाविष्ट आहे–

**(बुशा आणि हार्टर) यांनी दिलेल्या व्याख्येनुसार:**

संशोधन म्हणज सद्य स्थितीत उपलब्ध असलेल्या ज्ञानामध्ये वृद्धी करण्यासाठी केलेले बौद्धिक कार्ये होय.

वरील व्याख्यांवरून असे समजून येते की, एखाद्या समस्येचे निराकरण करण्यासाठी ठरावीक पद्धतीने शोध घेणे आवश्यक असते. यासाठी प्रथम प्रश्नाचा, समस्येचा अर्थ लावणे, आवश्यक संशोधन पद्धतीचा अवलंब करणे, संशोधन आराखडा तयार करणे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरवणे, या प्रक्रियेनंतर प्रत्यक्ष संशोधन करणे व निष्कर्ष मांडणे अशा ठरावीक मार्गाने शोध घ्यावा लागतो.

संशोधन करतांना वेगवेगळ्या संशोधन पद्धतीचा उपयोग केला जातो. विविध संशोधन पद्धतीबद्दल थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे.

### ३.२.१ विविध संशोधन पद्धती:

#### ३.२.१.१ प्रायोगिक संशोधन पद्धती (Experimental Research Method)

विशिष्ट एक बदल विशिष्ट एका कारणामुळे घडून येतो का, याचा शोध घेणाऱ्या संशोधनाला 'प्रायोगिक संशोधन' म्हणतात.

वृत्तपत्रातील वेगवेगळ्या सदारांच्या बाबतीत प्रायोगिक संशोधन उपयोगी ठरते.

कोणती सदरे वाचकांना कोणती सदरे आवडतात हे जाणून घेण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करून संशोधन केले जाते. एखादे वृत्तपत्र ज्या राजकीय पक्षाशी संबंधित आहे त्या बातम्यांचा पक्ष सभासदांवर होणार परिणाम अभ्यासण्यासाठी देखील प्रायोगिक संशोधन उपयोगी पडेल.

### **३.२.१.२ ऐतिहासिक संशोधन पद्धती** (Historical Research)

भूतकाळातील घटनांचे मानवाला नेहमीच आकर्षण वाटले आहे. भूतकाळातील घटनांचे योग्य आकलन झाले, त्या घटनांना कारणीभूत घटक माहीत झाले. आणि त्या घटनांमधील पॅटर्न समजले, तर मानवाला वर्तमान स्थितीचे योग्य आकलन होईल. विशिष्ट्य विषयाच्या ऐतिहासिक संशोधनाद्वारे त्या विषयाच्या विकासाची कारणे आणि विकासाचा वेग माहीत होतो. म्हणूनच सर्वच विषयांमध्ये ऐतिहासिक संशोधन केले जाते. भूतकाळातील वृत्तपत्राच्या उपयोगीतेसंबधिंत माहिती करून घेताना वृत्तपत्राचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे म्हणजेच ऐतिहासिक संशोधनाद्वारे अशी माहिती मिळवता येईल.

### **३.२.१.३ सर्वेक्षण** (Survey)

सर्वेक्षण करणे म्हणजे सखोल पाहणी करण व संबंधित बाबींची वैशिष्ट्ये जाणून घेणे. विशिष्ट विषयाचे / समस्येचे प्रचलित स्वरूप जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब केला जातो. सर्वेक्षण संशोधनाद्वारे लक्ष्यगटतील निवडक घटकांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून तर्कशुद्ध निष्कर्ष काढले जातात.

मोठ्या लक्ष्यगटाचे वर्णन करण्यासाठी निवडक उत्तरदात्यांकडून माहिती संकलन करण्याची पद्धतशीर प्रक्रिया म्हणजे ‘सर्वेक्षण’ होय व यामध्ये लक्ष्यगटाची मूलभूत वैशिष्ट्ये आणि अनुभव यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला जातो.

### **३.२.१.४ वर्णनात्मक संशोधन** (Descriptive Research)

सदर संशोधनात एखादी संस्था वा त्यातील साधने, सुविधा, प्रक्रिया, सेवा, उपक्रम, घटना, समस्या इत्यादींच्या सद्यस्थितीचे वस्तुनिष्ठ, अचूक वर्णन करण्यात येते. वर्णनात्मक संशोधनात संशोधकाचे चलांवर कोणतेही नियंत्रण नसते. केवळ काय घडले आहे किंवा काय घडत आहे याचे संशोधक वर्णन करत असतो. काय घडले किंवा काय सध्यस्थिती आहे याचा शोध वर्णनात्मक संशोधनात घेतला जातो.

### **३.२.१.५ व्यष्टी अध्ययन** (Case Study)

किचकट समस्यांचे स्वरूप समजून घेण्यास व त्यांचेस्पष्टीकरण मिळविण्यासाठी व्यष्टी अध्ययन हे एक उपयुक्त संशोधन पद्धती आहे. संशोधन समस्येच्या परिपूर्ण, सखोल अध्ययनासाठी व्यष्टी अध्ययन उपयुक्त ठरते. व्यष्टी अध्यनाआधारे सांखिकीय निष्कर्षापलीकडे जाऊन प्रतीसादाकाच्या दृष्टीने  त्याची वर्तणूक समजून घेणे शक्य होऊ लागले आहे. या व इतर अनेक फायद्यामुळे समाजशास्त्र स्त्र, व्यवस्थापन शास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी क्षेत्रांमध्ये व्यष्टी अध्ययनाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे.

इंग्रजीतील उरीश या शब्दासाठी 'व्यष्टी' हा शब्द वापरला जातो. तिच्या सद्यस्थितीत अध्ययन केले जाते. म्हणजेच संबंधीत व्यष्टी जेथे आहे, जशी आहे. त्या स्थितीत त्या व्यष्टीचा अभ्यास केला जातो.

समाजातील केलेल्या कार्याने महान असलेल्या किंवा विशेष योगदान दिलेल्या व्यक्ती आणि संस्थांबाबत परिपूर्ण ज्ञान मिळविण्यासाठी सखोल  ज्ञान संकलित करून तिचे विश्लेषण करण्याची प्रक्रिया म्हणजे व्यष्टी अध्ययन होय.

## **३.३ माहिती संकलनाची तंत्रे**

### ३.३.१ मुलाखत : माहिती संकलनाचे तंत्र

संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत घेतली जाते. माहिती संकानाचे मुलाखत हे तंत्र प्रामुख्याने सर्वेक्षणात वापरले जाते तसेच ते व्यष्टी अध्ययनातही वापरले जाते. ऐतिहासिक संशोधनातील मौखिक इतिहासासाठीही मुलाखत तंत्राचा अवलंब केला जातो.

मुलाखत म्हणजे तोंडी प्रश्नोत्तराची प्रक्रिया होय. प्रतीसाद्काची संशोधन समस्येबाबतची मते, दृष्किोन, विचार, स्पष्टीकरण जाणून घेण्यासाठी संशोधकाने घडवून आणलेला संवाद म्हणजे मुलाखत होय. संशोधन मुलाखतीवर संशोधकाचे नियंत्रण असते आणि ती मुलाखत संशोधन समस्येबाबत माहिती संकलनासाठीच आयोजित केली जाते.

संशोधनासाठी योग्य माहिती संकलित करण्यासाठी संशोधक आणि प्रतिसादक यांच्यातील प्रश्नोत्तर रूपातील संवाद म्हणजे मुलाखत संशोधक हा या संवाद प्रक्रियेचा सूत्रधार असतो. या प्रक्रियेमध्ये संशोधक प्रतिसाद्काला प्रश्न विचारतो आणि प्रतिसादकाच्या उत्तरांची नोंद करतो. बहुतांश संशोधन मुलाखतीमध्ये संशोधक आणि प्रतिसादक समोरासमोर असतात. सध्याच्या काळात का ही मुलाखती मात्र दूरध्वणी किंवा ई–मेल द्वारेही घेतल्या जातात.

### ३.३.२ निरीक्षण : माहिती संकलनाचे तंत्र

माहिती संकलनाचे निरीक्षण हे तंत्र प्रामुख्याने प्रायोगिक संशोधनात वापरले जाते. सर्वेक्षण आणि व्यष्टी अध्ययनातही या माहिती संकलन तंत्राचा अवलंब केला जातो. प्रश्नावलीमध्ये आणि मुलाखतीमध्ये उत्तरदाते स्वतः माहिती देतात. उत्तरदात्याने प्रशानावालीद्वारे आणि मुलाखतीदरम्यान दिलेली माहिती अचूक परिपूर्ण आणि नि:पक्षपाती असेलच असे नाही. संशोधन समस्ये संबधित अचूकच, परिपूर्ण आणि

नि:पक्ष माहिती मिळविण्यासाठी निरीक्षण हे तंत्र अधिक उपयुक्त ठरू शकते.

## ३.४ प्रश्नावली : माहिती संकलनाचे महत्त्वाचे साधन

माहिती ही कोणत्याही संशोधानासाठी आधारभूत सामग्री असते. माहितीशिवाय संशोधन होऊच शकत नाही. संशोधन हे एक समस्या सोडविण्यासाठीचे एक माध्यम आहे. समस्या समजून घेण्यासाठी समस्येच्या विविध बाबीसंबंधीची माहिती संकलित केली पाहिजे. संकलित केलेली माहिती परिपूर्ण आणि अचूक असली पाहिजे. मुलाखत, निरीक्षण व  प्रश्नावली हे माहिती संकलनासाठी उपयुक्त प्रमुख तंत्र आहेत.

### ३.४.१ प्रश्नावलीचे प्रकार (Types of Questionnaire)

मुक्त प्रश्नावली आणि बंदिस्त प्रश्नावली हे प्रश्नावलीचे दोन प्रकार आहेत.

**मुक्त प्रश्नावली** (Open Ended Questionnaire)

मुक्त प्रश्नांवालीमध्ये असे प्रश्न असतात की, ज्या प्रश्नांचे उत्तर देण्याची मुभा उत्तरदात्याला असते, या प्रश्नावालीमध्ये प्रश्नांखाली पर्यायी उत्तरे दिलेली नसतात. म्हणजेच उत्तरदात्याला स्वतःचे उत्तर स्वतःच्या शब्दात लिहिण्याचे स्वातंत्र्य असते. म्हणून अशा प्रश्नावलीला 'मुक्त प्रश्नावली' म्हणतात. उत्तरदात्याचे मत/कल/दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी मुक्त प्रश्नावली विशेष उपयोगी असते.

**बंदिस्त प्रश्नावली** (Close Ended Question)

बंदिस्त प्रश्नावलीमध्ये प्रश्नाखाली संबंधीत प्रश्नाची पर्यायी उत्तरे दिलेली असतात. उत्तरदात्यास या पर्यायांमधून योग्य त्या पर्यायाची उत्तर म्हणून निवड करावयाची असते. म्हणजेच बंदिस्त प्रश्नावलीतील प्रश्नांना उत्तरदाता स्वतःचे उत्तर देऊ सहकार नाही. स्वतःचे उत्तर देण्याची त्याला बंदी असते. म्हणून या प्रकारच्या प्रशानावालीस 'बंदिस्त प्रश्नावली' म्हणतात. बंदिस्त प्रश्नावलीतील पूर्वनिर्धारित पर्यायी उत्तरामुळे या प्रश्नावलीला एक निश्चित स्वरूप मिळते आणि म्हणून या प्रश्नावलीला 'संरचित

प्रश्नावली’ असेही म्हणतात.

**संमिश्र प्रश्नावली** (Mixed Questionnaire)

मुक्त आणि बंदिस्त या दोन्ही प्रश्नावालीमध्ये काही दोष आहेत. अर्थात या दोन्ही प्रकारच्या प्रश्नावालींमध्ये अनेक गुणही आहेत. दोन्ही प्रकाच्या प्रश्नावलीमधील गुणांचा फायदा करून घेता यावा यासाठी ग्रंथापालनातील बहुंताश संशोधक संमिश्र प्रश्नवलीचा वापर करतात. संमिश्र प्रश्नावली म्हणजे अशी प्रश्नावली की, ज्यामध्ये मुक्त आणि बंदिस्त असे दोन्ही प्रकारचे प्रश्न असतात. बंदिस्त प्रश्नावलीद्वारे वस्तुनिष्ठ तर मुक्त प्रश्नावलीद्वारे गुणात्मक माहिती (मते, विचार, दृष्टीकोन, भविष्यवेध इत्यादीबाबत) मिळवता येते.

उपरोक्त अभ्यासविषयासाठी अभ्यासकाने संमिश्र प्रश्नावली (Mixed Questionnaire) या माहिती संकलित करण्याच्या साधनाचा वापर केला आहे.

सदर संशोधनात संमिश्र प्रश्नावली’ हे संशोधनाचे साधन वापरण्यात आले आहे. प्रश्नावलीमुळे वाचकांच्या अभिप्रायाचे विश्लेषण करणे सोपे झाले आहे. एकूण ५८६ वाचकांना प्रश्नावली दिली गेली होती. एकूण २३ प्रश्नांद्वारे माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. सदर संशोधनात ’सामना’ वृत्तपत्र वाचकांचे लिंग, शिक्षण, वृत्तपत्र वाचनाचे प्रमाण व कल अशा विविध बाबी लक्षात घेऊन प्रश्नांची रचना करण्यात आली आहे. तसेच काही वाचकांच्या मुलाखतींद्वारे प्रत्यक्षरीत्या अभिप्राय जाणून घेतले त्याचे विश्लेषण सदर संशोधनात मांडले आहे.

## ३.५ संशोधन पद्धती:

संशोधकाने प्रश्नावलीच्या वितरण खालीलप्रमाणे केले आहे:

९४ नगरसेवक, २२७ शाखाप्रमुख, २० आमदार आणि ३ खासदार असे एकूण ३४४ शिवसेनेचे विविध पदाधिकारी. हा सर्व समूह ५ वर्षांकरिता म्हणजे ३४४ X ५= एकूण १७२० पदाधिकारी. याचबरोबर शासन मान्य प्राप्त झालेले मुंबईमधील मराठी

पत्रकार जवळजवळ यांची संख्या एकूण ४००. हे सर्व एकत्र करून २४८०+४००= २१२०.

क्रीगसी आणि मॉर्गन (१९७०) यांच्या नमुना निवडीच्या तथ्यानुसार २२०० गटाला ३२७ नमुना निवडीची संख्या देण्यात आली आहे. त्याला अधारधरुन संशोधकाने सदर संशोधनासाठी ५८६ असा लक्ष गट समूह निवडलेला आहे.

Table 3.1

*Table for Determining Sample Size of a Known Population*

| N | S | N | S | N | S | N | S | N | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | 10 | 100 | 80 | 280 | 162 | 800 | 260 | 2800 | 338 |
| 15 | 14 | 110 | 86 | 290 | 165 | 850 | 265 | 3000 | 341 |
| 20 | 19 | 120 | 92 | 300 | 169 | 900 | 269 | 3500 | 346 |
| 25 | 24 | 130 | 97 | 320 | 175 | 950 | 274 | 4000 | 351 |
| 30 | 28 | 140 | 103 | 340 | 181 | 1000 | 278 | 4500 | 354 |
| 35 | 32 | 150 | 108 | 360 | 186 | 1100 | 285 | 5000 | 357 |
| 40 | 36 | 160 | 113 | 380 | 191 | 1200 | 291 | 6000 | 361 |
| 45 | 40 | 170 | 118 | 400 | 196 | 1300 | 297 | 7000 | 364 |
| 50 | 44 | 180 | 123 | 420 | 201 | 1400 | 302 | 8000 | 367 |
| 55 | 48 | 190 | 127 | 440 | 205 | 1500 | 306 | 9000 | 368 |
| 60 | 52 | 200 | 132 | 460 | 210 | 1600 | 310 | 10000 | 370 |
| 65 | 56 | 210 | 136 | 480 | 214 | 1700 | 313 | 15000 | 375 |
| 70 | 59 | 220 | 140 | 500 | 217 | 1800 | 317 | 20000 | 377 |
| 75 | 63 | 230 | 144 | 550 | 226 | 1900 | 320 | 30000 | 379 |
| 80 | 66 | 240 | 148 | 600 | 234 | 2000 | 322 | 40000 | 380 |
| 85 | 70 | 250 | 152 | 650 | 242 | 2200 | 327 | 50000 | 381 |
| 90 | 73 | 260 | 155 | 700 | 248 | 2400 | 331 | 75000 | 382 |
| 95 | 76 | 270 | 159 | 750 | 254 | 2600 | 335 | 1000000 | 384 |

*Note: N is Population Size; S is Sample Size* *Source: Krejcie & Morgan, 1970*

वरील दिलेल्या गट समूहापैकी ५८६ (२६.६३%) प्रश्नावलींचे विश्लेषण सादर केले आहे.

तसेच मुलखात हे तंत्र वापरून संशोधकाने ३३ ज्येष्ठ शिवसेना पदाधिकारी, विविध वृत्तपत्र संपादक व वार्ताहर यांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

## ३.६ संशोधनाची शास्त्रोत्तक बैठक:

'राजकीय पक्षाचे मुखपत्र' हा संशोधनाचा विषय असल्यामुळे त्याला या विषयात वृत्तपत्र आणि राजकीय पक्षाच्या धोरणाचा प्रसार असे दोन्ही विषय सदर संशोधनात समाविष्ट आहेत.

वृत्तपत्र हा व्यवसायच मुळात माहितीची विक्री म्हणून अमेरिकेत सुरू झाला. त्यामुळे विविध घटनांची माहिती तसेच देश–विदेशातील माहिती वृत्तपत्रातून प्रसारित करण्यात येत असे व अशा तऱ्हेचे अनेक वृत्तपत्र जगभर सुरु झाले. मग पुढे प्रादेशिक भाषा, स्थानिक घटनांची माहिती हे वृत्तपत्रातून छापले जाऊ लागले व ते इतके लोकप्रिय झाले की, पहिले प्रसार माध्यम म्हणून त्याला मान्यता मिळाली.

वृत्तपत्र हे दोनदा विकले जाते. एक वृत्तपत्राची किंमत आणि त्यातील मोकळी जागा जाहिरातीच्या स्वरुपात विकली जाते. त्यामुळे त्याच्या खपावर जाहिरातीचे उत्पन्न अवलंबून असते.

भारतातील परिस्थिती पाहिली तर सुरुवातीची वृत्तपत्रे याच धर्तीवर सुरू झाली. मात्र स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळक, आगरकर, आंबेडकर, म. गांधी यांनी विशिष्ट ध्येय डोळ्यांसमोर ठेऊन वृत्तपत्रकारिता सुरू केली. यातील केसरी सोडला तर इतर सर्वच वृत्तपत्रे ही त्या व्यक्तीच्या बरोबर बंद पडली. पुढे ज्या वृत्तपत्रांनी व्यवसाय म्हणून याकडे पाहिले ती टिकली.

वृत्तपत्र हे प्रसारमाध्यम असल्यामुळे याचा लोकमानसावर परिणाम सहजिकच होतो. सर्व वर्तमानपत्रांना लोकाशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. ज्यात सर्वसामान्यांची मते सरकारपर्यंत व सरकारची ध्येयधोरणे जनसमान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम सर्व प्रसारमाध्यमे करीत असत.

व्यवसाय म्हणून वृत्तपत्र चालवायचे तर अधिकाधिक वाचक मिळावे म्हणून वृत्तपत्रांनी वाचक हा केंद्रबिंदू मानून आपला ढाचा तयार केला. त्यामुळे घटनांची माहिती किंवा ध्येय–धोरणांबाबतची टिपण्णी णी एवढेच स्वरुप न राहता सर्वसामान्यांना आवश्यक असलेली माहिती, साहित्य, कला, करमणूक, भविष्य, विज्ञान, बाजार इ. माहितीदेखील वृत्तपत्रांतून प्रसारित होऊ लागली. प्रत्येक वृत्तपत्रास आपला वाचकवर्ग कोण आणि अधिक वाचक कसे मिळवता येतील यासाठी विविध प्रकारची माहिती प्रसारित करीत असत.

राजकीय पक्षाचे मुखपत्र किंवा प्रसारमाध्यम अधिक वाचक मिळावेत म्हणून वाचक हा केंद्रबिंदू धरून वीपणन शास्त्रानुसार आपले धोरण ठरवत नाहीत. आपल्या पक्षाचे असलेले ध्येयधोरण, विविध उपक्रमांची प्रसिद्धी, पक्ष नेत्यांच्या मुलाखती व पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी आवश्यकत ती वृत्ते प्रकाशित करीत असतात.

कुठलाही राजकीय पक्ष हा त्यांची बंधने विचारात घेऊन आपले ध्येयधोरणे राबवत असतो. अखिल भारतीय पक्ष असल्यास तो अखिल भारतीय ध्येय ठेऊन त्याची धोरणे ठरवतो. अनेक पक्ष प्रादेशिक पातळीवर त्यांचा जनाधार वाढावा म्हणून ध्येयधोरणे ठरवतात.

वृत्तपत्र व्यवसाय किंवा प्रसारमाध्यमे व्यवसाय म्हणून चालवताना त्याला वाचकांची लोकप्रियता आवश्यक असते जी राजकीय मुखपत्राला आवश्यक नसते. त्याला पक्षाचे पाठबळ असते.

एखादा पक्ष सत्तेत असेल म्हणून त्याच्या मुखपत्राचा खप वाढतोच असे नही. त्यांचा खप त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या किंवा विरोधी पक्षांच्या नेत्यांपुरता मर्यादित असतो. त्यामुळे फारच थोडे राजकीय पक्ष स्वतःचे मुखपत्र सुरू करतात (टिळक, दी. आणि टिळक गी. २०१९). वृत्तपत्र किंवा प्रसारमाध्यम यांच्याकडे एखाद्या घटनेला प्राधान्य

द्यावयाचे असेल तर त्या तऱ्हेची सुविधा वृत्तपत्रात असतात. उदा. वृत्तपत्रामध्ये हेडलाईन, लहान, मोठ्या आकाराचा टाईपसेट, रंग, रगीत फोटो, चौकटी किंवा अशा बातम्यांकरिता आतील एखादे पान, लेख वा अग्रलेख अशा बातमीला अग्रक्रम देणारे घटक असतात किंवा अशा बातम्यांकरिता ब्रेकिंग न्युज सातत्याने त्याच त्याच गोष्टींचे प्रदर्शन, एखादे अर्धवट वाक्य, जुने प्रसंग, एखाद्या विषयाचे तज्ज्ञ बोलावून त्यांचे चर्चासत्र, नियंत्रित चर्चासत्र या मार्गांनी प्रसारमाध्यमांना वाचक किंवा प्रेक्षकांच्या मनावर आपणास पाहिजे तसा परिणाम घडवून आणता येतो. वृत्तपत्राचे अर्थकारण हे विक्रीच्या कीमतीवर अवलंबून नसून ते सर्व जाहिरातींच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. त्यामुळे प्रत्येक प्रसारमाध्यमाना आपल्या उत्पन्नाचा स्त्रोत शोधावा लागतो. त्याकरिता वृत्तपत्रांचे मालक हे संपादकाला आपली ध्येयधोरणे ठरवून देतात आणि मग संपादक प्रसंगानुरुप किंवा त्या त्यावेळी घटनांचा विचार करून आपला प्रचार व प्रसाराचा अजेंडा ठरवतात.

१९६८ मध्ये डॉ. मॅकोंबस आणि डॉ. डोनाल्ड शॉ यांनी अध्यक्ष निवडणुकीच्या वेळी चॅपल हिल या जागी एक संशोधन केले आणि शंभर लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले की, वृत्तपत्र अथवा प्रसारमाध्यमांनी जे वृत्त दिले किंवा परिस्थितीचे चित्र रंगवले आणि मुलाखतीतून प्रकट झालेले मत यात खूप तफावत आहे. त्यातूनच अजेंडा सेटींग थेअरी ठरवण्यात आली (Kashikar, V. et. al. 2020). राजकारण, अर्थकारण, शास्त्र, समाज यांच्यात अनेक घटना होत असतात. त्यातील कुठल्या घटना लोकांपर्यंत किती प्रमाणात जाव्यात हे प्रसारमाध्यमांचे संपादक ठरवत असतात आणि त्याच्यातून लोकमत घडते. उदा. कोरोनाच्या काळात वृत्तपत्रे सोडली तर दूरदर्शन चॅनल्सनी पुन्हा पुन्हा तीच तीच दृष्ये दाखवून सर्वसामान्य प्रेक्षकांना घाबरवून सोडले. एखाद्या ठिकाणी दुकाने उघडण्याची परवानगी दिली तर लोक त्याठिकाणी खरेदी करत असत. पण अशा

ठिकाणी गर्दी केल्याने कोरोना वाढतो अशा तऱ्हेचा मजकूर सातत्याने दूरदर्शनवर दाखवला जात होता. आजसुद्धा पाहिले तर रशिया आणि युक्रेन यांच्यातील लढाईची एकच बाजू सर्व वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे सांगत आहेत. केवळ पाश्चिमात्य माध्यमांनी दिलेली माहिती वाचकांपर्यंत पोचते आहे. रशिया किंवा युक्रेन येथील लोकांचे म्हणणे भारतातील प्रसारमाध्यमांनी दाखवले नाही हे सत्य आहे. अगदी आताचे उदाहरणे पाहावयाची तर राज ठाकरे यांनी भोंग्यावरून हनुमान चालिसा वाजवण्याचा जो मुद्दा मांडला त्याला माध्यमांनी नको इतकी प्रसिद्धी दिली. तसेच महागाई, बेरोजगारी, कोरोनामुळे बंद पडलेले उद्योगधंदे असे कितीतरी लोकहिताचे प्रश्न प्रत्यक्ष मांडले जाणे आवश्यक आहे, परंतु त्याबाबत प्रसारमाध्यमांत फारशी चर्चा होताना दिसत नाही. त्याऐवजी महाराष्ट्र अशांत करण्याकरिता भाजपने आखलेला कार्यक्रम आणि त्याला उत्तर म्हणून आघाडी सरकार करीत असलेली विधाने याचे रोजच्या रोज चित्रीकरण होताना दिसत आहे.

प्रसारमाध्यमांचा उत्पन्नाचा स्त्रोत हा जाहिराती असल्यामुळे ज्या पक्षाकडून अधिक आर्थिक पाठबळ मिळेल अशाच पक्षांचे राजकीय कार्यक्रम हे प्रसारमाध्यमातून दाखवले जातात आणि त्याठिकाणी संपादक हा खूप मोठी भूमिका बजावत असतो.

जगातील विविध मार्गाने हजारो वृत्त रोज माध्यमांकडे येत असतात. त्यातील कोणती वृत्ते, वाचकांपर्यंत पुढे मांडावयाची हे संपादक ठरवतो. समाजात, देशात राजकीय अस्वस्थता होऊ नये हे पाहणे संपादकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे कुठल्याही देशातील प्रसारमाध्यम हे त्या देशाच्या विरुद्धच्या बातम्या छापत नाही. अगदी सीमेवर चाललेल्या लढायांबाबत आपल्या सैनिकांनी जिंकलेल्या गोष्टीच फक्त त्या त्या वृत्तपत्रांतून येत असतात. त्याप्रमाणे जे काही वृत्त संपादकाच्या हाती येते त्यातील कुठले वृत्त वाचकांपर्यंत कमी–अधिक प्रमाणात पोहोचवायचे हे ठरवत असतो आणि

त्या वृत्ताला टीका–टिप्पणीदेखील करीत असतो. केवळ वृत्तपत्रातील हेडिंगने घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलता येऊ शकतो.

जेंव्हा एखाद्या पक्षाचे मुखपत्र असते तेव्हा अशा मुखपत्राचा संपादक त्या पक्षाच्या ध्येय–धोरणांनुसार वृत्तांच्या मांडणीचा पक्षाला फायदेशीर होईल अशा रीतीने करत असतो. असा राजकीय पक्ष सत्तेत आहे किंवा विरोधात आहे हे पाहून वृत्तांचा प्राधान्यक्रम बदलला जातो.

शिवसेना या राजकीय पक्षाचे मुखपत्र असलेल्या सामना वृत्तपत्र असा संशोधनाचा विषय असल्याने आज राज्यात सत्तेत असलेली शिवसेना आणि केंद्रात सत्तेत असलेली भाजप यांचा विचार करून राज्य आणि केंद्र याबाबतचे सामना व शिवसेनेचे धोरण हे वेगळे आढळून येते. त्यामुळे केवळ सांख्यकी संशोधन न करता सदर संशोधन मुलाखतींद्वारे गुणात्मक संशोधन करण्यात आले आहे.

घटना व प्रसारमाध्यमांचे वास्तव:– सामाजिक, राजकीय, आर्थिक इ. घटना माध्यमांचे वास्तव तसेच माध्यमांचे धोरण आणि त्याचा समाजावर किंवा वाचकांवर होणारा परिणाम या तीन गोष्टींचा विचार करून शिवसेनेचे राजकीय नेते, राजकीय पत्रकार आणि विरोधी पक्षाचे नेते या तीन घटकांच्या खुल्या पद्धतीने मुलाखती घेऊन सदर संशोधन केले आहे. त्याबरोबर पक्षकार्यकर्त्यांकडून प्रश्नावलीदेखील भरून घेतली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे पत्रकारितेच्या धोरणात्मक शास्त्रोक्त बैठकीचा विचार करून सर्व संशोधन करण्यात आले आहे.

## ३.७ संशोधनाचा गट समूह

सदर संशोधनात संशोधकाने शिवसेनेच्या स्थापनेत मार्मिकची भूमिका याचा अभ्यास

व संशोधन करताना १९६० ते १९६६ या काळातील मार्मिकचे अंक अभ्यासाले आहेत. शिवसेनेच्या स्थापनेनंतर तेवीस वर्षांनी ‘सामना’ हे दैनिक मुखपत्र सुरु झाले, त्यामुळे या तेवीस वर्षांत म्हणजे शिवसेनेच्या सरुवातीस मार्मिकची भूमिका कशी होती, याचा अभ्यास केला गेला आहे. मार्मिकचे काही निवडक लेखक, संपादकीय सहकारी, जुने वाचक आणि शिवसेनेचे जुने नेते यांच्या मुलाखती घेऊन मार्मिकच्या भूमिकेविषयी माहिती घेण्यात आली. शिवसेनेच्या वाटचालीत मार्मिकचे बदलते स्वरूप याचेही संशोधन करण्यात आले.

सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. सदर संशोधन हे व्यष्टी अध्ययन पद्धतीचे असून शिवसेना व सामना या समीकरणाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. संशोधकाने ५८६ प्रश्नावलीच्या वितरण करून त्या सर्व भरून घेतल्या आहे. तसेच निवडक मुलाखतीही घेण्यात आल्या आहेत ज्याद्वारे सामना आणि शिवसेना यामधील योगदान जाणून घेण्यास मदत होऊ शकली. सदर संशोधनातील विश्लेषण हे गुणात्मक पद्धतीने केले असून संशोधकाने विश्लेषणासाठी कोणतीही परिणामात्मक पद्धती वापरलेली नाही.

## ३.८ प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

सदर संशोधनाकरिता केवळ शिवसेना या राजकीय पक्षाचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. सदर संशोधन शिवसेनेचे मुखपत्र सामना या विषयाशी निगडित आहे. सदर संशोधनात अन्य कुठल्या मुखपत्राचे विश्लेषण केलेले नाही. सदर संशोधनात घेतलेल्या मुलाखतींचा गट समूह मुंबई पुरता मर्यादित आहे.

## ३.९ सारांश

सदर पाठात संशोधन म्हणजे काय?, संशोधन पद्धती कोणत्या आहेत?, सदार

संशोधनात कोणत्यापद्धतीचा वापर केला आहे – आशयविश्लेषण, संशोधनाची तंत्र आणि साधने तसेच संशोधनाचा गट समूह, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा यांचा गोषवारा घेतला आहे.

## ३.१० संदर्भ


- आगलावे, प्रदीप (२००३): संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रक ाशन,.
- क ऱ्हाडे, बी. एम., (२००४): सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर : पिंपळापुरे अँड कं . पब्लिशर्स,.
- टिळक, दीपक आणि टिळक गीताली (२०१९): आधुनिक वृत्तपत्र व्यवस्थापन. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. पृष्ठ ९६.
- Kashikar, Vasundhara, Sathaye, Keshav and Tilak Geetal ( 2020): Communication theory and Practice. Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. Pages: 152.
- Krejcie and Morgan (1970): Educational and psychological measurement. Available at: https://www.kenpro.org/sam{le-size-determination-using-krejcie-and-morgan-table/. Viewed on 10/12/2019.

## प्रकरण ४: माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण

| क्र. | शीर्षक |
|---|---|
| ४.१ | प्रस्तावना |
| ४.२ | मुलाखती |
| ४.३ | प्रश्नावलीच्या विश्लेषण आणि स्पष्टीकरण |
| ४.४ | संपादकीय अग्रलेखांचे विश्लेषण |
| ४. ५ | सारांश |

## ४.१ प्रस्तावना

'शिवसनेच्या वाटचालीत सामना वृत्तपत्राचे योगदान' या संशधनात शिवसेनेच्या पदाधिकारी यांचा अभिप्राय फार महत्त्वाचा आहे. सदर माहिती मिळवण्यासाठी 'प्रश्नावली' हे साधन वापरण्यात आले आहे. तसेच मुलाखत या संशोधन तंत्राचा वापर करून वाचकांचे अभिप्राय जाणून घेतले. मुलाखतीमध्ये प्रत्यक्ष प्रश्न विचारून अभिप्राय जाणून घेतला जातो त्यामुळे विश्वसनीय अभिप्राय मिळण्याचे प्रमाण जास्त आहे.

शिवसेना या पक्षाच्या संदर्भातील सर्व बातम्या 'सामना' या वृत्तपत्राद्वारे कळतात. शिवाय शिवसैनिकांना दिशादर्शनाचे कामदेखील या वृत्तपत्रद्वारे केले जाते. मराठी अस्मिता जपणाऱ्या 'सामना' वृत्तपत्राद्वारे अनेकांना उपयुक्त माहिती मिळते. शिवसैनिकांना 'सामना' वृत्तपत्राचा शिवसेनेच्या वाटचालीत कितपत आणि कसा उपयोग करून होतो यासंबंधीच्या माहिती विश्लेषण केले आहे.

## ४. २ मुलाखती

सदर संशोधनात संशोधकाने काही ज्येष्ठ शिवसेनेचे पदाधिकारी, विविध वृत्तपत्रांचे संपादक व पत्रकार यांच्या एकूण ३३ मुलाखती घेतल्या होत्या. सदर मुलाखती मुक्त पध्दतीने असल्याने प्रश्नावलीचा वापर करण्यात आलेला नाही. मुलाखतीमध्ये वाचकांना सामनाविषयीचे त्यांचे मत व सामनाचे बदलती भूमिका याबद्दल अभिप्राय मागितला होता व कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे समक्ष भेट होऊ शकत नसल्यामुळे ई–मेल द्वारे मागविण्यात आले.

❖ **श्री. सुभाष देसाई: उद्योगमंत्री/ शिवसेना नेता / प्रकाशक सामना**

दरवेळी मार्मिक साप्ताहिकाचा वर्धापनदिन शिवसेनाप्रमुखांचे भाषण, मार्मिकनंतर सेनेचा जन्म, पक्ष वाढू लागला. मार्मिक दर आठवड्यानंतर येते, साप्ताहिक पुरेसे नाही हे सतत जाणवू लागले. पक्षाचं, भूमिकेचं, नेत्यांची टीका होत असते त्याला उत्तर देण्यासाठी दैनिक हवे ही भावना कळवली.

शिवसैनिक हाताशी आहेत. विस्तार मोठा होत आहे. मनावर घ्या. दैनिक हवे. भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठी शिवसेना स्थापन. मार्मिकने सेनेचा पाया घातला. आता पक्ष विस्तारासाठी दैनिकाची गरज वाटू लागली. प्रबोधनकारांनी प्रोत्साहन दिले. आग्रह धरला. आपल्या विचारांशी बांधिलकी असणारे दैनिक हवे. नाव सांगा – तुम्हीच – यावर प्रबोधनकार म्हणाले – सामना

बाळासाहेब म्हणजे तुफान समजले जात असे. १९८० नंतर बाळासाहेबांचे दौरे व प्रखर भाषणे प्रचंड जन समुदाय आकर्षित करत असे. इतर वृत्तपत्रे साथ देत नव्हती. शिवसेना विरोधी भांडवलदारी मोठी वृत्तपत्रे सेना विरोध. मालक विरोध म्हणून नोकरदार, पत्रकार विरोधी गैरसमज पसरवत. खोटया बातम्या देत, अपप्रचार करीत. म्हणून दैनिकाची सेनेला गरज भासली. तीव्रपणे.

१९८८ मध्ये दैनिक हवेच ही भावना बळावली. माझी इच्छा आहे. बाळासाहेबांनी १३ ऑगस्ट १९८८ मार्मिकच्या कार्यक्रमानंतर बैठक घेतली व त्यात दैनिकाचा विषय मांडला. सदर बैठकीस उद्धव ठाकरे देखील हजर होते. आता मनावरघ्या बाळासाहेब सुभाष देसाई यांना म्हणाले. चला कामाला लागा.

- बाळासाहेब म्हणाले प्रभादेवीला आपली जागा आहे, ती बघून ये. तिथे ऑफिस सुरु करू या.

- मी निघालो. माँ म्हणाल्या थांबा. त्यांनी एक तसबीर दिली. एकवीरा देवीची, ती तिथे ठेव म्हणाल्या.
- आम्ही प्रभादेवीला गेलो. आर्किटेक्ट जयंत टिपणीस यांना बोलाविण्यात आले. बाळासाहेब म्हणाले तळमजला व पहिला मजला तुमचा आणि वरचा माझा. खिडक्या व दारे लावण्याचे काम सुरु झाले.
- मी तिथे रोज जाऊ लागलो व बसू लागलो. पूर्व तयारी सुरु. प्रबोधन प्रकाशन म्हणून ट्रस्ट स्थापन केला. विश्वस्थ संस्था नोंदविण्यात आली.
- छपाईकरिता लागणारे मशीन फरिदाबाद, हरियाणा येथून मागविण्यात आले. प्रिंटर हाऊस हवेच होते पण आता एवढे पैसे कोठून आणायचे असा प्रश्न पडला. कर्ज हवे होते आणि त्याकरिता सारस्वत बँक मदतीला आली. सुरेश प्रभू हे त्यावेळी बँकेचे अध्यक्ष होते.
- संभाजी नगरला जाण्याचा दौरा ठरला. बाळासाहेब म्हणाले, चला लोकमतचे कार्यालय बघू.  तिथे दर्डा होते. रात्रीच्या वेळी तिथे पाहेचलो व सर्व खाती बघितली. छपाई आणि सर्व कामकाज बघितले. वृत्तपत्र कसे निघते हे बघितले. तारीख ठरली. बाळासाहेबांचा वाढदिवस. २३ जानेवारी १९८९. नाव ठरले, सामना. नोंदणी प्रक्रिया सुरु झाली. सोलापूर – बार्शीचे पत्रकार वसंत कानडे यांच्या नावावर सामना टायटल नोंदवलेले होते. तिकडच्या शिवसैनिकांना निरोप देऊन त्यांना शोधले. तुळजापूरला गेस्ट हाऊसवर त्यांची भेट घेण्यात आली. त्यांना सांगितले की बाळासाहेबांची इच्छा आहे की  ज्वलंत दैनिक – सामना हे काढायचे. ते म्हणाले बाळासाहेब हे घ्या ना हरकत पत्र, कारण मी स्वतः तर दैनिक सुरु करू शकत नाही.

- त्यानंतर वसंत कानडे मुंबईत आले. बाळासाहेबांना भेटले व बाळासाहेब त्यांना म्हणाले तुम्ही सामनात लिहा. सोलापुरातील पत्रकार प्रतिनिधी म्हणून काम करा.
- नंतर सामना नाव मिळाले.
- पहिला अग्रलेख 'या असे सामन्याला'.
- ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव दैनिक.
- दैनिक नव्हे सैनिक होर्डिंगवर महाराष्ट्रभर
- पहिल्या दिवशी १ लाख प्रिंट ऑर्डर मिळाल्या
- सामना – लढाऊ – आक्रमक – खणखणीत
- संपादक बाळ ठाकरे.
- कार्यकारी संपादक – अशोक पडबिद्री
- सामना सामान्यांच्या मनातील नाद – निनाद
- सामना आणि शिवसेना पस्पर पूरक एक नाण्याच्या दोन बाजू असे सर्वांना वाटू लागले
- सामना सुरु १९८९
- १९८८ पर्यंत विधानसभेत शिवसेनेचा एखादा आमदार असायचा
- वामनराव महाडिक, प्रमोद नवलकर, छगन भुजबळ
- १९९० ला ५४ आमदार निवडून आले.
- अर्थात ते केवळ सामनामुळे नाही.
- बाळासाहेबांची भाषणे प्रचार झंझावात.

- तो बाळासाहेबांचा चमत्कार होता.
- महाराष्ट्रात भगवे वातावरण निर्माण केले.
- सामना गावागावात पोहोचू लागला. संघटनेला पूरक व उपयोगी ठरला.
- हळूहळू आमदार – नगरसेवक, लोकप्रतिनिधी वाढले. सेनेचे विचार जनतेपर्यंत पोहोचवणारे पक्षाचे प्रभावी माध्यम सामना.
- ३१ वर्षे झाली. कोणत्याही राजकीय पक्षाचे इतके प्रभावी वृत्तपत्र नाही.
- संजय राऊत धगधगती प्रखर लेखणी, ज्वलंत लेखणी आहे त्याला तोड नाही.
- सामनात अग्रलेख शिवसेनाप्रमुख आणि पक्षप्रमुखांच्या मॅरेथॉन मुलाखती.
- सामनातील अग्रलेख – दुस–या दिवशी अन्य भाषेत – इंग्रजी वृत्तपत्रात. विरोधांनी पण दखल घ्यावी हे भाग्य इतरांना नाही.
- शिवसैनिकांना आदेश, सूचना – मार्गदर्शन सर्व सामनामध्ये छापून येतात.
- आंदोलने – शिवसैनिक हा गांधीवादी नसतो. नाही तो धगधगता आक्रमक हवा. मिळमिळीत दैनिक नव्हता, तो लढाऊ हवा – बाळाची धगधगती – आक्रमक भाषा सामनात असे.
- विरोधी पक्षाचे लोक अगोदर सामना वाचतात. सामना मध्ये काय आहे हे बघून अनेकांचा दिवस ठरतो. अजेंडा ठरतो. भूमिका ठरते.
- सामना एक राजकीय पक्षाचे मुखपत्र आहे.

### ❖ श्री. संजय राऊत: कार्यकारी संपादक / सामना

सामना हा शिवसेनाप्रमुखांचा श्वास व शिवसेनेचा लाऊड स्पीकर आहे. हे बाळासाहेब ठाकरेंचे विचार मांडणारे एक व्यासपीठ आहे.

- बाळासाहेबांच्या घरातील वातावरण व त्या वेळी तीस वर्षांपूर्वीचे १९३० च्या दशकात समाजातील वातावरण याचा परिणाम सामनाची पत्रकारिता यावर दिसून येतो.

- सामना वृत्तपत्र प्रसिद्ध होण्याच्या अगोदर मार्मिक नावाचे साधे वृत्तपत्र होते. पण कालांतराने शिवसेनेच्या विस्ताराला दैनिकाची गरज भासू लागली.

- स्वतः ते पत्रकार आणि व्यंगचित्रकार होते. त्यांनी लेखणी – वाणी आणि कुंचला यांची ताकद किती मोठी असते हे सा–या महाराष्ट्राला दाखवले.

- लेखणी–कुंचला यावर बाळासाहेबांची श्रद्धा होती.

- लिखाण मिळमिळीत / गुळगुळीत असता कामा नये तर त्यात आग असली पाहिजे व त्यातून लोकांना ऊर्जा मिळाली पाहिजे असे त्यांचे मत होते. लेखणीमुळे शासनाला धडकी भरली पाहिजे.

- सामना म्हणजे शिवसेनेचा आवाज आहे. पक्षाचे विचार जनतेपर्यंत पोहोचवणारे प्रभावी माध्यम.

- आपला संपादक, सुश्रुत असावा. त्याचे वाचन भरपूर – चौफेर असावे. ते पुणे – नाशिकला गेले की ज्येष्ठ संपादकांची पुस्तके आणत व संपादकाला वाचायला देत असत.

- पूर्वीच्या संपादकांनी असे लिहिले, याचे ज्ञान असले पाहिजे.

- तू हे वाचलेस कां? हा प्रश्न असायचा.

- तेव्हा दूरदर्शन नाही. मोबाईल नाही. वुत्तपत्र हे एकच माध्यम. अन्य वृत्तपत्रे शिवसेनेला पुरेसे स्थान देत नसत. बातम्या अर्धवट छापत व विचार पूर्ण मांडला जात नसे. संघटना वाढीसाठी दैनिकाचे गरज भासू लागली आणि सामना सुरु करण्यात आला.

- संपादकाचा आवाका मोठा असला पाहिजे. संपादकाची क्षमता जबरदस्त असली पाहिजे. मराठासारखे आग ओतणारे दैनिक हवे. या हेतूने सामना निघाला.
- कोणी पाहुणे आले की – संपादकाची ओळख करून देत की, meet my fire brand Editor.
- आपला संपादक – ताठमानेने फिरला पाहिजे असे त्यांना कायम वाटत.
- बाळासाहेबांनी लेखणीतून क्रांती घडवली, मते पेटवली, हल्ले करण्यासाठी आणि झालेले हल्ले परतण्यासाठी सामना हे शिवसेनेकडे असलेले प्रभावी शस्त्र असे.
- सामना हे शिवसेनेचे लढण्यासाठी धारदार हत्यार आहे.
- १९९५ युतीची सत्ता आली व मनोहर जोशी हे राज्याचे मुख्यमंत्री तर गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री झाले.
- शिवाजी पार्कवर युतीचा विजयी मेळावा आयोजित करण्यात आला व बाळासाहेब म्हणाले मी भगवा फडकवला, तुमच्यामुळे फडकावला पण या प्रयत्नात आणखी दोन सहभागी आहेत. त्यांचा मोलाचा वाटा आहे. एक म्हणजे संजय राऊत आणि दुसरे म्हणजे सामना असे ते जाहीरसभेत बोलले.

●सामना हे साहेबांचे प्रेम होते. सामनाच्या ताकदीवर त्यांचा विश्वास होता व शिवसेनाप्रमुखांचे विचार महाराष्ट्रात सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम सामना करतो याची त्यांना खात्री होती. जिथे स्वतः साहेब पोहोचू शकत नाहीत तेथे सामना पोहोचतो.

● शिवसेनेला सामनामुळे मोठे बळ मिळाले. सामनामुळे सेना घराघरात पोहचली.

● शिवसेनेचे जेवढे मोठे व सामुदायिक हल्ले झाले, त्याला रोकठोक उत्तर देण्यासाठी सामनाचाच वापर केला गेला.

● मृत्यूपूर्वी शेवटची १०–१५ वर्ष बाळासाहेब घराबाहेर पडत नव्हते. मर्यादा होत्या अशा वेळी त्यांचे विचार, राजकारण सामनामधूनच जनतेपर्यंत पोहोचवले जात होते.

● सामना व सेना भाऊ– भाऊ. एकाच नाणेच्या दोन बाजू..

● सामना हे केवळ दैनिक नसून शिवसेनेचे मुखपत्र आहे. दैनिक नव्हे सैनिक हा सामनाचे अग्रलेखाचा उल्लेख दुस–या दिवशी सर्व टी.व्ही. चॅनेल्स व सर्व भाषिक वृत्तपत्रात दिसला. विदेशी वृत्तपत्रे सामनाची दखल घेतात, हे वैभव–भाग्य फक्त सामनाला मिळाले.

● एखाद्या घटनेवर तुमची भूमिका काय म्हणून पत्रकार मातोश्रीला गर्दी करायचे. साहेब म्हणत मी माझी भूमिका सामनातून मांडतो व त्यातून सामनाचे महत्त्व वाढले. महाराष्ट्रातील मराठी माणसाची मने आणि मनगटे मजबूत आहेत. ती पेटून उठली पाहिजेत अन्याय विरोधात अशी भाषा सामानात सदैव वापरली. ठाकरी भाषा लोकांनी स्वीकारली व त्यातून शिवसेनेला यश मिळाले.

● पक्ष विस्तारात सामनाचा वाटा फार मोठा आहे. पक्षात काय कुठे घडते हे सामनाच्या नेटवर्कमधून शिवसेनाप्रमुखांना कळते. सामनावर विश्वास, सामनाची माहिती १००% सत्तेवर असते व गावोगावी वार्ताहर असल्याने बातमी तपासून बघण्याची सामनाकडे यंत्रणा आहेत.

● २०१४ ने २०१९ मध्ये भाजपचे मुख्यमंत्री होते आणि शिवसेना पण सत्तेत होती पण भाजप सरकारवर सर्वाधिक टीका सामनामधूनच झाली.

● मी संपादक आहे – याचा बाळासाहेबांना अभिमान असायचा. मी संपादक, मी व्यंगचित्रकार या भूमिकेतून ते पत्रकारितेत खूप रमायचे.

● विरोधी पक्षाचे लोक प्रथम सामना वाचतात. सामनाशिवाय महाराष्ट्रात राजकारण होऊ शकत नाही.

● भांडवलदारी वृत्तपत्रांच्या तुलनेने साधन – सामग्री कमी पण राजकारणात दबदबा सर्वात प्रचंड.

● सामना – दैनंदिन गोष्टीत लक्ष घालत नाहीत. पण बाळासाहेबांचे बारीक लक्ष असायचे. संजय चुकला तर फाटकारायचे तू राजकारण करतोस का?

● पक्षाच्या नेमणूक– बातमी संघटना बांधणी यात सामना लक्ष घालत नाही.

● निवडणूक प्रचार– घोषणा आणि भाषणे या सर्व बाबतीत सामना ठळक प्रसिद्धी देतो. क्वचितच एखाद्या वृत्तपत्राला दिलेले असावे.

मुंबई बाहेर शिवसेना विस्तार झाला. तो सामना – मोठे योगदान. मराठवाडयात शिवसेना फोफावली.

- उद्धव ठाकरे रोज प्रत्येक विषयावर बोलत नाहीत. प्रतिक्रिया देत नाहीत. त्यांना जे म्हणायचे. पक्षाला जे सांगायचे ते सामनामधून.
- एक प्रत एक वाचक असे नव्हे. सामना – १ प्रत – १० वाचक वाचतात.
- तांत्रिक साधन सामग्रीत सामना कमी पडतो.
- सामनाचे अग्रलेख – TV – इतर वृत्तपत्रे – युट्यूबवर

- पक्षप्रमुख / शिवसेनाप्रमुख – मॅरेथॉन मुलाखती हि सामनाची वैशिष्ठे आणि बलस्थाने आहेत.
- सामना हा शिवसेनेचा ब्रँड आहे.
- 'सामना म्हणतो, सामनात असे म्हटले आहे, तुम्हाला काय वाटते?' असे प्रश्न पत्रकार इतरांना विचारतात. हेच सामनाचे मोठे यश.
- एक वृत्तपत्राच्या नावाने प्रश्न विचारतात हे प्रथमच घडत असावे.
- एखाद्या घटनेवर सामनाने मत मांडले नाही – की, सामना का बोलत नाही? सामना गप्पा कां ? असे विचारतात.
- सामना गप्पा आहे – हा सुद्धा चर्चेचा व बातमीचा विषय होतो असे यश क्वचितच एखाद्या वृत्तपत्राला मिळाले असावे.

**❖ श्री. महेश पांचाळ**

सामन्याच्या मनाचा नादनिदान हा प्रत्यक्ष अक्षरांमध्ये दडलेला अर्थ असला तरी, सामनाच्या सुरुवातीच्या काळात दैनिक वाचकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचा जाहिरातीसाठी  वापर केला गेला. ज्वलंत हिंदुत्वाचा प्रखर पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक अशी टॅगलाईन ही लक्षवेधी होती. वेगळ्या विचारधारेच्या पक्षांशी युती करून शिवसेना महाराष्ट्राच्या सतेतील प्रमुख घटक असला तरी आजही टॅगलाईन अधोरेखित करत आहे.

१९६६ साली मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी जन्माला आलेला शिवसेना हा राजकीय पक्ष महाराष्ट्राच्या सत्तेत बसला तो १९९५ साली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे महाराष्ट्र विधानसभेवर भगवा झेंडा फडकविण्याचे स्वप्न साकार झाले, पण त्यासाठी त्यांना  २९ वर्षे वाट पाहावी लागली. सत्तेच्या शिडीपर्यन्त

पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम केले ते १९८९ साली शिवसेनेचे मुखपत्र म्हणून प्रसिध्द झालेल्या सामना या दैनिकांच्या अंकामुळे.

त्याकाळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सभांना राज्यांच्या कानाकोप-यात लाखोंची गर्दी व्हायची. पण तत्कालीन प्रस्थापित वर्तमानपत्रात त्याची म्हणावी तशी दखल घेत जात नसे. शिवसेनेच्या स्थापनेपासून मार्मिकच्या व्यंगचित्र अंकातून विरोधकांवर आसूड ओढण्याचा प्रयत्न केला जात होता. त्यातून मुंबई ठाण्यात शिवसेनेचा किल्ला त्यावेळीं शाबूत ठेवणा-या शिवसैनिकांना मार्मिक मधुन बाळासाहेब काय इषारा देत आहेत याकडे लक्ष असायचे.. पण तळागाळातील जनतेपर्यंत आपले विचार पोहचण्यासाठी दैनिकांची गरज आहे याची जाणीव बाळासाहेब यांना झाली होती. त्यातून सामना या दैनिकाचा जन्म झाला.

मार्मिकमुळे शिवसेनेने मराठी माणसांच्या मनात स्थान निर्माण केले होते. मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर लढणा-या शिवसेनेचा सामनाच्या माध्यमातुन हिंदुत्वाच्या नव्या भूमिकेचा उदय झाला होता. हिंदुत्व या मुद्यावर बाळासाहेब यांचा मतदानाचा हक्क निवडणूक आयोगाने काही काळासाठी काढून घेण्याचा निर्णय असो, किंवा विलेपार्ले पोटनिवडणुकीत रमेश प्रभू यांची आमदारकी न्यायालयातून रद्द होण्याचा मुद्दा असो. सामना दैनिकातील बाळासाहेब यांचे भाषण याचा पुरावा म्हणून उपयोग प्रतीपक्षाच्या मंडळींनी केला. पण, अशा अनेक बिकट प्रसगानंतरही सामन्यांच्या विरोधाची धार ही कधीच कमी होताना दिसली नाही. माझ्या माहितीनुसार, कदाचित सामना दैनिकावर प्रक्षोभक लिखाणावर सर्वाधिक खटले न्यायालयात प्रलंबित असल्याची शक्यता अधिक आहे.

त्यातून शिवसेनेच्या वाटचालीचा एक अविभाज्य भाग म्हणजे सामना अशी ओळख केवळ शिवसैनिकांना नव्हें तर राजकीय पुढा-यांना झाली आहे.

आजही सामनामध्ये काय छापून आले आणि त्यांचा अग्रलेख काय आहे याची दखल राष्ट्रीय पातळीवरील दैनिके, इलेक्ट्रॉनिक माध्यमे घेतात, यावरुन शिवसेना आणि सामना यांचे नाते किती घट्ट आहे हे पुन्हा सांगण्याची गरज नाही. शिवसेनेचे धोरण, भूमिका काय यासाठी सामना वाचावा लावतो. एवढेच नव्हेतर लोकसभा, विधानसभा निवडणुकीत सेनेच्या कोणत्या उमेदवाराचे तिकिट जाहीर झाले हे सामनामध्ये जर प्रसिद्ध झाले तरच खरे मानले जाते. तसेच एखाद्या पदाधिका-यांची पक्षातून हकालपट्टी केली तर सामनामध्ये चौकट छापून आली याचा अर्थ त्याचा पत्ता कट हे शिवसेनेत प्रमाण मानले जाते.

बाबरी मशीद जर माझ्या शिवसैनिकांनी पाडली असेल तर त्याचा मला अभिमान आहे,' हे सामनातील त्यावेळेचे बाळासाहेब यांचे विधान. त्यानंतर बाळासाहेब यांना राष्ट्रीय पातळीवरील पॉवरफुल नेत्यांच्या रांगेत बसविण्यासाठी सामना कारणीभूत ठरला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज विरोधी विचारधारेच्या पक्षासोबत महाराष्ट्रात सत्ता उपभोगणा-या शिवसेनेची बाजु सांभाळण्याचे काम सामना दैनिक करत आहे.

❖ **श्री. सतीश पाटणकर:**

बरोबर ३१ वर्षापूर्वी सामना या दैनिकाची सुरुवात झाली आणि मराठी पत्रकारितेला एक नवे वळण मिळाले. परंतु सामना हे दैनिक असेच सुरु झाले नाही. व्यंगचित्रकार बाळासाहेबांनी मराठीत पहिले व्यंगचित्र साप्ताहिक सुरू केले. त्यातूनच शिवसेना

सारखी मोठी संघटना निर्माण झाली. ८०–९० च्या दशकात शिवसेनेची बाजू मांडण्यासाठी एका दैनिकाची गरज बाळासाहेबांना वाटली आणि त्यातूनच सामनाचा जन्म झाला.

सामना नावाचा चित्रपट १९७५ साली येऊन गेला होता आणि या नावाने बाळासाहेबांच्या मनात घर केले होते. आपल्या मुखपत्राचे नावही सामना असले पाहिजे हे बाळासाहेबांनी ठरवलेच होते. परंतु प्रश्न असा होता की, सामना नावाचे जिल्हापत्र आधीच सोलापूरमध्ये एक काँग्रेस कार्यकर्ते वसंत कानडे हे चालवत होते. पीआरबी कायद्यानुसार आपल्या दैनिकाचे नाव सरकारकडे नोंदणी करणे गरजेचे असते. त्यानुसार वसंत कानडे यांनी सामना हे शीर्षक नोंदवून १० ऑक्टोबर १९७५ साली या वर्तमानपत्राची सुरूवात केली. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते या वर्तमानपत्राचे उद्घाटन झाले होते.

बाळासाहेबांना याबाबत कळाले की सामना या शीर्षकाची यापूर्वीच नोंदणी झाली आहे. सोलापूरमधील काही शिवसैनिकांनी कानडे यांच्यांशी संपर्क साधून बाळासाहेब सामना हे शीर्षक त्यांच्या मुखपत्रासाठी घेण्यासाठी उत्सुक असल्याचे सांगितले. सुभाष देसाई आणि राम भटकळ यांनी स्थानिक शिवसैनिकांशी संपर्क ठेवून या कामाचा पाठपुरावा केला. परंतु कानडे हे शीर्षक देण्यास राजी नव्हते. कानडे यांच्या पत्नींनी कानडे यांना राजी केले. शेवटी कानडे आपले शीर्षक देण्यास तयार झाले, परंतु त्यांनी एक अट बाळासाहेबांपुढे ठेवली. सामनाचा सोलापूरचा स्वतंत्र वार्ताहर असावा अशी अट ठेवली आणि बाळासाहेबांनी ही दिलदार मनाने ती अट मान्य केली. अखेर १२ ऑगस्ट १९८८ रोजी सोलापूरच्या न्यायालयात कानडे यांनी हे शीर्षक बाळासाहेबांना सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून सुपुर्द केले आणि म्हणाले ‘माझे मुल मी तुमच्या हवाली करत आहे, काळजी घ्या.’ तुम्ही बाळासाहेबांची

मुंबईत भेट घ्या असा सल्ला राम भटकळ यांनी कानडेंना सल्ला दिला. त्यानुसार कानडे सपत्नीक मुंबईला गेले आणि बाळासाहेबांना भेटले. माँसाहेब मीनाताई ठाकरे यांनी त्यांचा सन्मानाने पाहुणचार केला.

काँग्रेसी विचारसरणीचे असले तरी कानडे यांचे लिखाण सामनामध्ये प्रसिद्ध होत होते. सामनाचे शीर्षक कानडे यांनी विकले अशी टीकाही त्यांच्यावर झाली. शेवटी वाजत गाजत २३ जानेवारी १९८९ रोजी दादरच्या सावरकर स्मारकात बाळासाहेंच्या हस्ते दैनिक सामनाचा पहिला अंक निघाला. दैनिकाच्या प्रकाशनापूर्वी शिवसैनिकांनी जोरदार वातावरण निर्मिती केली. 'दैनिक नव्हे सैनिक' हे घोषवाक्य त्यांनी राज्याच्या घराघरात पोहोचवले. सामना हे शिवसेना या राजकीय पक्षाचे मुखपत्र असून ते मुंबई शहरातून प्रसिद्ध होते. या वृत्तपत्राची सुरुवात दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. सुरुवातीच्या काळात सामनामधून बाळासाहेबांची फक्त व्यंगचित्रे प्रकाशित होत असत. पण शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर हे शिवसेनेचे मुखपत्र बनले.

२३ जानेवारी, १९८९ रोजी मध्यरात्री शिवसेनेचे मुखपत्र 'सामना' सुरू झाले. दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात, शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभ हस्ते 'सामना'चे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशन प्रसंगी बोलताना बाळासाहेब ठाकरे म्हणाले, "हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी आणि दररोज होणा-या आरोपांना उत्तर देण्यासाठी, सामना हे नवे शस्त्र असेल आणि उद्या पाळी आली तर, आम्हाला ख-या शस्त्रालाही हात घालावा लागेल." सर्वांना प्रवेश नसल्याने अनेक जण बाहेर उभे राहून भाषण ऐकत होते. सामनाचे प्रकाशन होताच, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. या समारंभात महापौर छगन भुजबळ, शिवसेना नेते सर्वश्री मनोहर जोशी, दत्ताजी साळवी, प्रमोद नवलकर यांचीही भाषणे

झाली. 'सामना'चे कार्यकारी संपादक श्री. अशोक पडबिद्री यांनी प्रास्ताविक केले तर, श्री. सुभाष देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

'सामना'चा पहिला अग्रलेख होता, 'या असे सामन्याला.' या अग्रलेखात सामना सुरू करण्यामागची भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. प्रकाशन प्रसंगी 'सामना' चे संपादक बाळासाहेब ठाकरे म्हणाले, सामना हा राज्यकर्त्यांना दाखवलेला आरसा आहे. त्यात आपली प्रतिमा पाहून त्यांनी स्वतःची प्रतिमा सुधारावी, हा आरसा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये. कारण तो फुटला तर, त्याचे तुकडे पडतील आणि प्रत्येक तुकड्यात त्यांची प्रतिमा अधिकच विद्रूप दिसेल.'

सामना सहा महिन्यांचा झाला तेव्हा बाळासाहेबांचा अग्रलेख त्यांच्या सहीनिशी प्रसिद्ध झाला. अग्रलेखाचे शीर्षक होते "तुमचा 'सामना' सहा महिन्यांचा झाला!" शिवसेना पक्षाच्या स्थापनेनंतर पुढे त्यांनी दैनिक सामना हे वृत्तपत्र सुरु केले. सामना हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून ओळखले जाते. सामनाच्या माध्यमातून बाळासाहेब शिवसेना पक्ष आणि आपल्या विचारांची रुपरेषा शिवसैनिकांपर्यंत पोहोचवत असत. सामनातील लिखाण खासकरुन संपादकीय हे भाषाशैलीचा एक नमूनाच असायचे. आजही सामनाची भाषा काही प्रमाणात तशीच असल्याचे पाहायला मिळते. सामनातील लेख अनेकदा वादग्रस्त ठरले. परंतू, शिवसेनेची भूमिका शेवटच्या शिवसैनिकापर्यंत पोहोचविण्यासाठी सामना यशस्वी ठरला. सामनाचे संस्थापक संपादक आणि संपूर्ण हायातभर बाळासाहेब ठाकरेच राहील्याने एक पत्रकार म्हणून ही बाळासाहेबांकडे पाहिले जाते. बाळासाहेबांच्या भाषणातील फटकारे, ओरखडे, शालजोडी, शिवराळपणा, शब्दांची पकड याचे येथेच्छ दर्शन सामना संपादकियात दिसते. सामनातील अग्रलेख हे नेहमीच चर्चात्मक आणि वादग्रस्त ठरले आहेत. सामनातील लिखाणाची स्टाईल ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ठाकरी

शैलीशी मिळतीजुळती राहिली आहे. त्यामुळे अनेकांना हा लेख बाळासाहेबांनीच लिहिला असावा, असे वाटत असे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतरही सामना संपादकियतील शैली कायम आहे. एकेकाळी क्राईम स्टोरी लिहिणारे संजय राऊत सामना दैनिकात रुजू झाले आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शैली त्यांनी लिखाणासाठी धारण केली. विविध विषयांवर ते बाळासाहेबांशी चर्चा करत, त्यांची भूमिका समजून घेत आणि मगच ती भूमिका अग्रलेखात उतरवत. बाळासाहेब ठाकरे अखेरच्या काळात आणि त्यांच्या निधनानंतर शिवसेनेची संपूर्ण जबाबदारी आणि सूत्रे उद्धव ठाकरे यांच्या खांद्यावर आली. त्यामुळे आता विविध मुद्द्यांवर उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करुन सामना संपादकियाची रेशा ठरते.

सामनातील भूमिका आणि शिवसेना नेतृत्वाची भूमिका यात फारसे अंतर कधी पडले नाही. परंतू, तरीही बाळासाहेब असताना किंवा त्यांच्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि सामना यांच्यातील भूमिका यात अपवादाचे काही प्रसंग आले. ज्या प्रसंगात शिवसेना आणि सामना संपादकीय यांतील भूमिकांमध्ये परस्परविरोध दिसला. पण, तो हाताच्या बोटांवर मोजण्यासारखा. एका पत्राच्या मुखपत्राचे संपादक म्हणून दै. सामनामधील भाषा शिवसेनेच्या भूमिकांसाठी अनुकुल असली तरी, वृत्तपत्राची भाषा म्हणून ती प्रवाहाच्या बाहेरचीच ठरते. त्यामुळेच अनेकदा सामनातील भाषा ही भडकाऊ आणि विखारी असल्याचा आरोप सामनातील लिखाण आणि भाषेवर होत असतो. शिवसेना विरोधात त्या काळात भूमिका घेतलेले शरद पवार, छगन भुजबळ, नारायण राणे यांच्यासारखे राजकीय विरोधक असोत की 'महानगर' सारखं एखादं दैनिक. यांविरोधात सामनातून नेहमीच अश्लाघ्य आणि शिवराळ भाषेचा खुलेआम आणि येथेच्छ वापर झाल्याचे पाहायला मिळते. खासकरुन

मुंबईमध्ये घडलेल्या हिंदू मुस्लीम दंगलीवेळीही सामनातून आक्षेपार्ह आणि प्रक्षोभक भाषा वापरल्याचे अनेक विश्लेषकांनी म्हटले आहे. एरवी मराठी प्रसारमाध्यमांची, मराठी माध्यमांची फारशी दखल न घेणारी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय (हिंदी, इंग्रजी) प्रसारमाध्यमं दै. सामनाची विशेष दखल घेतात. दै. सामनामुळे शिवसेना आपोआपच चर्चेच्या केंद्रस्थानी येते. अनेकदा हिंदी आणि हिंदी न येणारे दक्षणेकडील वाचकही सामना भाषांतरीत करुन किंवा कोणाकडून तरी समजावून घेऊन वाचतात, असे अनेक राजकीय अभ्यासक विशेष उल्लेखाने सांगतात.

त्या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आणि आता उद्धव ठाकरे यांच्या संजय राऊत यांनी घेतलेल्या अनेक मुलाखती प्रचंड गाजल्या आहेत. ही प्रसिद्धी शिवसेना आणि सामना यांच्या लोकप्रियतेसाठी परस्परपुरक ठरताना दिसते.

### ❖ श्री. विनायक सुतार:

मराठी आणि भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी तयार झालेली शिवसेना ही काही सहज वाढलेली नाही. मराठी अस्मिता होती. शिवसेनाप्रमुखांची परिणामांची पर्वा न करता मांडलेली भूमिका होती. त्यातून निर्माण होणारे वादग्रस्त विचार होते. सेनाप्रमुख आणि शिवसेना या चार शब्दांच्या वलयाभोवती निर्माण झालेली समर्पणाची भावना होती. या वाढीत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची अमोघ वाणी आणि लेखणी कुंचला महत्त्वाचा आहे. कुंचल्याने शिवसेनेच्या वाढीत पलत्याचे कार्य केले आहे.

शिवसेनेच्या वाढीच्या वेळी तत्कालीन काँग्रेससोबत घरोबा असल्याचे मानून 'वसंत सेना' म्हणून शिवसेनेची हेटाळणी झाली. शिवसेनेचा त्यावेळचा चेहरा हा पक्ष नसून एक लढाऊ संघटना असा होता. आक्रमक असलेली शिवसेना काँग्रेसला कळली नाही किंवा काँग्रेसने शिवसैनिकांवर अत्याचार केले नाही असे केव्हाच म्हणता येणार

नाही. जळगाव जिल्ह्यात चोपडा येथील जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुखांची काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निर्घृण हत्या केली. शिवसेनेच्या वाढीच्या वेळी मातलेले काँग्रेस नेते शिवसैनिकांची शेती, उद्योग, व्यापारात आणि इतर ठिकाणी पक्षीय भेदभावातून आर्थिक कोंडी करीत. प्रबळ अशा काँग्रेसची, रायगडमधील शेकाप सारख्या पक्षाला टक्कर देताना शिवसेनेला वेळोवेळी खूप मोठी किंमत मोजावी लागली. त्या काळातील बहुतांश वर्तमानपत्रे ही काँग्रेस धार्जिणी असल्याने शिवसेनेचा एकमेव आधार मार्मिक होता. पण वाढत्या शिवसेनेला भूमिका मांडायला मर्यादीत होत्या.

१९८७ मध्ये विलेपार्ले विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत डॉ. रमेश प्रभू यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांच्यासमोर काँग्रेसचे बलाढ्य नेते प्रभाकर कुंटे उमेदवार होते. या निवडणुकीत बाळासाहेबांनी म्हणजे शिवसेनेने उघड उघड हिंदुत्वाची भूमिका घेतली. हिंदुत्वाच्या नावाने मते मागितली. डॉ. प्रभू निवडून आले. पणधर्माच्या नावाने मते मागितल्याने लोकप्रतिनिधी कायद्यान्वये ही निवड रद्द झाली. हिंदुत्वाचा पुरस्कार करणा-या बाळासाहेबांना सहा वर्ष मतदानापासून निवडणूक आयोगाने वंचित केले. मतदान करण्यास बंदी घातली. पण यामुळे हिंदूत्वाचा मुद्दा ऐरणीवर आला. मात्र निवडणुकीमुळे 'गर्व से कहो हम हिंदू है' हा नारा सर्वव्यापी झाला.

शिवसेनाप्रमुखांना शिवसेनेची भूमिका मांडत असताना हक्काचे असे वर्तमानपत्र नव्हते. त्यामुळे नेहमीच स्पष्ट भूमिका घेणा-या आणि मांडणा-या शिवसैनिकांच्या बाबत काहीवेळा विपर्यास्त अर्थाने त्यांच्या भूमिका येत असल्यामुळे वर्तमानपत्राच्या पत्रकारांशी सुद्धा बाळासाहेबांचे पटत नसे. पत्रकारांवर उघड उघड टीका जर कोणी केली असेल त्या काळात तर ती म्हणजे बाळासाहेबांनीच. शिवसेनेच्या या वाढीसाठी शिवसेनेचे पर्यायाने शिवसेनेचे विचार व्यापक प्रमाणात महाराष्ट्रात पोहोचावेत तसेच

शिवसेनेच्या बाबतीत घडणा–या घटनांचे, स्पष्टीकरण ताबडतोबीने करता यावे. आपली भूमिका मांडता यावी या भूमिकेतून हक्काच्या अशा वर्तमानपत्राची गरज वाटू लागली. त्यातूनच ‘सामना’चा जन्म झाला.

वर्तमानपत्र सुरू केल्यानंतर बाळासाहेबांनी कार्यकारी संपादकपदी समाजवादी विचारांच्या अशोक पडबिद्री यांना विराजमान केले होते. यावरूनही अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. मात्र म्हणून शिवसेनेच्या मुखपत्रात त्याचा वेगळा काही परिणाम झाला नाही. शिवसेनेची त्या काळातली भूमिका आणि सामना यांचे नाते आज देखील एकसारखेच आहे. शिवसेनेला म्हणायचे असते तेच सामनाच्या संपादकीयातून येत असते आणि त्याचे पडसाद राजकारणात पडत असतात. सामना हे शिवसेनेचे मुखपत्र आहे. त्यामुळे सामनातील अग्रलेखातून मांडल्या जाणा–या भूमिकेचा कधीच इन्कार शिवसेनाप्रमुख व आताच्या पक्षप्रमुखांनी कधी केल्याचा जाणवत नाही. वा दिसला नाही.

सामनाच्या निर्मितीमुळे शिवसेना घरोघरी पोहचली. शिवसेना करत असलेली आंदोलने उपक्रम, कार्यक्रम,शिवसेनेची ज्वलंत विचारधारा यांचा प्रसार आणि प्रचार झाला. ज्या वर्तमानपत्रांमध्ये शिवसेनेच्या कार्याची माहिती येत नव्हती. ती माहिती हक्काच्या मुखपत्रामध्ये येऊ लागली. रोजच्या रोज बाळासाहेबांची भाषणे, त्यांचे विचार शिवसैनिकांपर्यंत पोहोचू लागले. त्यातूनही नवा शिवसैनिक घडत गेला आणि आजचे शिवसेनेचे रूप आपल्याला सामनाच्या रूपाने दिसत आहे. मुखपत्र म्हणून सामना पूर्णपणे या परीक्षेत पात्र ठरला आहे. सामनाची दखल आज राष्ट्रीय स्तरावरच्या मीडिया हाऊस, दूरचित्र वाहिन्या आणि सर्वाधिक खपाच्या दैनिकांना सुद्धा घ्यावी लागते हेच या मुखपत्राचे यश आहे. शिवसेना वाटचालीत सामना हे मुखपत्र मैलाचा दगड ठरले आहे. शिवसेनेच्या वाटचालीत सामनाचे योगदान

अधोरेखीत करण्यासारखे असले तरी या वाटचालीत मार्मिकलाही दुर्लक्षित करून चालणार नाही.

❖ **श्री. देवदास मटाले**:

सामना हे शिवसेनेचे मुखपत्र आहे, ते काही परिपूर्ण दैनिक नव्हे. सामनाचा वाचक हा शिवसेनेची भूमिका काय आहे हे जाणून घेणारा असतो. २३ जानेवारी १९८९ रोजी सामना सुरू झाला तेव्हा त्याची फार मोठी उत्सुकता होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे त्यांचे संपादक असल्याने सर्व सामान्य लोकांनाही सामनाचे आकर्षण सुरूवातीपासून होते. शिवसेनेप्रमाणेच सामना हे आक्रमक वृत्तपत्र आहे. शिवसेनेची भूमिका, निर्णय आणि ध्येय–धोरणे त्याच आक्रमक पध्दतीने सामनातून प्रसिध्द होत असतात. सामना व शिवसेना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिवोनेला सामना पूरक आहेच पण महापालिका, विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या प्रचाराची गती तीव्र करण्याचे काम सामना करीत असतो.

मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी शिवसेना स्थापन झाली. मराठी अस्मितेला साद घालत शिवसेनेचा विस्तार झाला. पण मुंबईतील दुकानांवर मराठी भाषेत पाट्या असल्याच पाहिजेत हा निर्णय सरकार दरबारी करून घेण्यास शिवसेनेला छपन्न वर्षे लागली. शिवसेनेसारखा पक्ष व सामनासारखे मुखपत्र हाती असताना मुंबईतील दुकानांवरील पाट्या मराठी भाषेत असाव्यात हे ५६ वर्षात सेना का साध्य करू शकली नाही?

शिवसेनेच्या विस्तारात भारतीय सेनेचा जसा मोठा वाटा आहे तसाच मुखपत्र म्हणून सामनाचा वाटा आहे. सामनाचे वैशिष्ट्य म्हणजे सामनामधील अग्रलेखाची दखल दुस–या दिवशी देशात विविध राज्यातील प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रे घेत असतात. अर्थात शिवसेनेची भूमिका काय आहे हे सामनातून समजते.

सामना सुरू झाला तेव्हा त्याचे मराठी वाचकांना मोठे आकर्षण होते. सुरूवातीला सामना काळ्या बाजारात म्हणजे छापील किंमतीपेक्षा जास्त पैसे घेऊन लोक विकत घेत असत पण नंतर ही क्रेझ कमी झाली. सामना हे मुखपत्र म्हणून यशस्वी म्हणता येईल पण ते प्रचंड खपाचे दैनिक कधी झाले नाही किंवा मुंबईत पहिल्या दोन किंवातीन दैनिकात त्याने स्थान मिळवले असे म्हणता येणार नाही. सामनाने शिवसेनाप्रमुखांची भाषा आत्मसात केली आहे. त्या भाषेचे आकर्षण मराठी माणसाला आहे. सामनाची तुलना लोकसत्ता किंवा महाराष्ट्र टाइम्स बरोबर होऊ शकत नाही. पण मुखपत्र म्हणून त्याचे वेगळेपण कायम आहे. शिवसेनेच्या वाटचालीत सामनाचे योगदान निश्चितच लक्षणीय आहे. सामनाने शिवसेनेला सतत चार दशकाहून अधिक काळ प्रभावीपणे साथ दिली आहे.

### ❖ डॉ. मिलिंद शेजवळ:

१९९० सालच्या विधानसभा निवडणूकीदरम्यान 'सामना' दैनिकाचा शुभारंभ झाला. तत्पूर्वी मार्मिक हे साप्ताहिक होते. वरिष्ठ पत्रकार अशोक पडबिद्री हे पहिले कार्यकारी संपादक होते. सौम्य प्रकृतीचे संपादक सामनाला मानवले नाहीत. त्यानंतर संजय राऊत संपादक झाले.

१९८५ साली मुंबई महानगरपालिकेत शिवसेना सत्तेत आली व त्यानंतर शिवसेना ख–या अर्थाने मुंबईबाहेर पसरु लागली. दादागिरीची संघटना असाच तिचा लौकीक होता. १९६८ साली ईशान्य मुंबईत झालेल्या लोकसभा पोटनिवडणूकीत शिवसेनेने कॉंग्रेसच्या तारा सप्रे ह्यांना पाठींबा दिला. त्या आधी समाजवाद्यांशी त्यांची जवळीक होती. कम्युनिस्ट द्वेष व त्यांचा बिमोड हे संघटनेचे मुख्य ध्येय होते. कृष्णा देसाई खूनामध्ये अनेक आरोपी शिवसैनिक होते. बाळासाहेब ठाकरेंची मराठी माणसाबद्दलची आपुलकी व परप्रांतियांबद्दलची जहाल मते ह्यामुळे ते तरुणांमध्ये

लोकप्रिय होऊ लागले. शिवसेनेच्या शाखा मुंबईत अनेक ठिकाणी सुरु होऊ लागल्या. तेथे समाजकार्य आणि मांडवली होऊ लागली. ७३ च्या पालिका निवडणूकीत अनेक तरुण शिवसैनिक नगरसेवक झाले. एक प्रकारचा आक्रमकपणा व लढाऊपणा त्यांच्यात होता. हाणामा–या करण्याची त्यांची नेहमी तयार असायची. अशा पाश्वभूमीच्या वर्तमानपत्राचे संजय राऊत संपादक झाले. त्यापूर्वीते लोकप्रभा मध्ये क्राईम रिर्पोटर होते. बाळासाहेबांचे विचार मराठी माणसाच्या फायद्याचे होते पण संघटनेत हुकुमशाही होती. हम करे सो कायदा तेथे होता. पाया पडणे, नतमस्तक होणे, गुरुदक्षिणा देणे ही प्रथा होती. न पाळणारे शिवसैनिक अडगळीत पडत होते.

संजय राऊत संपादक झाले तेव्हा अनेक शाखा मुंबई–ठाणे शहराच्या बाहेर देखील पसरल्या होत्या. शाखेच्या माध्यमातून वाचक वर्ग मिळत होता. त्यातही राजकारणात नसलेला पण बाळासाहेबांचे विचार आवडणारा असा एक मध्यमवर्ग होता. तो देखील सामनाचा वाचक झाला. १९९० साली विधानसभेच्या निवडणूकीत भाजप– शिवसेना युतीने चांगलीच मुसंडी मारली व काँग्रेसला सत्ता राखतांना नाकी नऊ आले होते. त्या काळात भाजप संघटन म्हणून वाढत होता. परंतू शिवसेनेच्या प्रगतीचा वेग अफाट होता. बाळासाहेबांचे आक्रमक नेतृत्व भाजपची साथ आणि सामना ह्यामुळे ९० च्या दशकात शिवसेनेच संघटन दूरवर गेले.

बाळासाहेबांचे सर्वच विचार पटत नव्हते. ते आरक्षण विरोधी होते आणि तिच रीत संजय राऊत ओढत होते. अनुसुचित जाती आणि जमातीचे आरक्षण का निर्माण झाले ह्याचा सामनाला अभ्यास नसावा. अनेक न पटणारी जहाल मते सामनात मांडली जायची. ३५ टक्के मिळवून आरक्षणामुळे झालेले डॉक्टर आणि इंजिनीयर्स ह्याच्यामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आहे. त्यांनी बांधलेले पुल कोसळतील अशा

त–हेची त्यांची वक्तव्ये असायची. आरक्षणास विरोध केला तर उरलेल्या समाजाची आपल्याला मते मिळतील असे त्यांना वाटायचे. मुस्लीम विरोध व दलित विरोध हा सामनाच्या लिखाणाचा पाया होता. मा. व्ही.पी.सिंगांनी मंडळ आयोगाची केंद्रात अंमलबजावणी केली, त्यास सामनाचा विरोध होता. पंतप्रधानाबद्दल अपशब्द लिहिण्याची प्रथा सामना व्ही.पी.सिंगाच्या काळा पासून पाळत आहे. काँग्रेसचे पंतप्रधान त्यास अपवाद असायचे.

हिंदुत्वाचा प्रचार करुन मुस्लीम व दलितांचा द्वेष सामन्यातून करण्यात आला. त्यांचा संधीसाधूपणा वेळोवेळी दिसून यायचा. पण बाळासाहेबांवर नितांत श्रद्धा असणारा एक वाचकवर्ग होता. बाळासाहेबांच्या निधनानंतर तो वर्ग हळूहळू शिवसेनेपासून दूर जाऊ लागला.

आघाडी सरकार आल्यापासून तर सामनाने ताळतंत्र सोडून दिले आहे. खुर्ची वाचविणे हा एक कलमी कार्यक्रम चालू आहे. कुठे सरकार वर, मुख्यमंत्र्यांवर टिका झाली तर त्याची तुलना लगेच केंद्र सरकार व पंतप्रधानांशी करुन संपादक महाशय मोकळे होऊ लागले. आपण असभ्य शब्द वापरले तर ती ठाकरी भाषा इतरांनी प्राण्यांचे आवाज काढले तर तो अक्षम्य गुन्हा. सरकार काय करतंय हे सांगण्यापेक्षा हे सरकार पाच वर्षे टिकणार हेच सांगण्यात सामना दंग आहे. ह्या सर्व गोष्टीमुळे सामनाचा वाचक वर्ग कमी होऊ लागला आहे. त्यावरील निष्ठा कमी होऊ लागली आहे.

❖ **श्री. मनोहर विश्वासराव:**

अन्यायाला वाचा फोडण्याचे प्रभावी माध्यम म्हणून वृत्तपत्राकडे पाहिले जाते. वृत्तपत्रातील एका बातमीने सरकारही हादरते, इतकी वृत्तपत्राची ताकद आहे. पण वृत्तपत्र क्षेत्रातील राजकीय घुसखोरीमुळे पत्रकारितेला वेगळेच वळण लागले आहे, हि

सत्यस्थिती आहे. अनेक राजकीय नेत्यांची स्वतःची वर्तमानपत्रे आहेत. नेत्यांची वर्तमानपत्र हि राजकीय हेतूने प्रेरित असतात.नेत्यांची राजकीय गणितं बदलली कि, त्यांच्या वृत्तपत्राचे विचारही बदलतात. याचे जीवंत उदाहरण म्हणजे शिवसेना पक्षाचे मुखपत्र सामना.

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव दैनिक असे सामनाचे घोषवाक्य आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्व आणि मराठी अस्मितेच्या विचारांवर सामना वृत्तपत्र सुरु केले. बाळासाहेबांच्या जळजळीत लेखणीने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला सळो कि पळो करून सोडले होते. हिंदुत्ववादी विचारांमुळे सामना प्रकाशात आला. सामनातील व्यंगचित्रांनी अनेक वाद निर्माण झाले. शिवसेनेला मोठं करण्यासाठी सुरु झालेले सामना वृत्तपत्र, हे अनेकदा शिवसेनेसाठी डोकेदुखी ठरले आहे. सामनातील लेखांमुळे शिवसेनेविरोधात जन आक्रोश उफाळून आल्याची अनेक उदाहरणे आहेत. सामनात छापून आलेल्या मुका मोर्चा व्यंगचित्रावरून मराठा समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. त्यावरून मराठा समाजाने सामनाचा

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव दैनिक असे सामनाचे घोषवाक्य आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेयांनी हिंदुत्व आणि मराठी अस्मितेच्या विचारांवर सामना वृत्तपत्र सुरु केले. बाळासाहेबांच्या जळजळीत लेखणीने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला सळो की पळो करून सोडले होते. हिंदुत्ववादी विचारांमुळे सामना प्रकाशात आला. सामनातील व्यंगचित्रांनी अनेक वाद निर्माण झाले. शिवसेनेला मोठं करण्यासाठी सुरु झालेले सामना वृत्तपत्र, हे अनेकदा शिवसेनेसाठी डोकेदुखी ठरले आहे. सामनातील लेखांमुळे शिवसेनेविरोधात जन आक्रोश उफाळून आल्याची अनेक उदाहरणे आहेत. सामनात छापून आलेल्या मुका मोर्चा व्यंगचित्रावरून मराठा समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. त्यावरून मराठा समाजाने सामनाचा तीव्र

निषेध नोंदवला होता. व्यंगचित्रकार श्रीनिवास प्रभुदेसाई यांनी मराठा समाजाची माफी मागितली होती. पण संजय राऊत यांच्या बेताल लेखामुळे मराठा नेते चिडले होते. त्यावेळी उद्धव ठाकरे यांना मराठा समाजाची लेखी माफी मागावी लागली होती. स्वतः बाळासाहेब ठाकरे यांनाही सामनातील लेखांबद्दल दिलगिरी व्यक्त करावी लागली आहे. सामनामुळे शिवसेनेची वारंवार नाचक्की झाली आहे. आता सत्तेसाठी शिवसेनेने ज्याप्रकारे हिंदुत्ववादी विचारांशी तडजोड केली आहे, त्याप्रमाणे सामनाही आपल्या हिंदुत्ववादी मुद्द्यांपासून भटकला आहे. सामनातून बाळासाहेबांनी ज्या काँग्रेस व राष्ट्रवादीला झोडपून काढले होते. आज त्याच लोकांचे गोडवे सामना गात आहे. सावरकरवादी असलेल्या सामनाचे सावरकरांकडे साफ दुर्लक्ष झाले आहे. शिवरायांच्या किल्ल्यां वरील अवैध बांधकामांबद्दल सामनाची शाब्दिक तोफ डागली जात नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचा विरोध करण्यासाठी सामनाला लगेच शब्द फुटतात. जो सामना एकेकाळी हिंदुत्वासाठी पेटून उठत होता, ती आग आज सामनात पाहायला मिळत नाही. महाराष्ट्रात हिंदुत्वाविरोधात बरेच काही सुरु आहे. हिंदूंच्या भावना दुखावणारे अनेक प्रकार समोर आले आहेत. पण त्याबद्दलसामना मौन आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्ववादी सामना आज हिंदुविरोधी पक्षांच्या नेत्यांचा आवाज बनतोय, हे मराठी व हिंदूंना पटत नाही. राहुल गांधी, प्रियंका गांधीसारखे नेते जे वारंवार हिंदुत्वाचा द्वेष करतात, अशा लोकांवर सामनातून स्तुती सुमने उधळली जाणे, ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. सामना वृत्तपत्र हे आज दाखवण्यापुरती हिंदुत्ववादी आहे. सामनातून आज काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसवाल्यांचा जो जयजयकार सुरु आहे, त्याचा फटका शिवसेनेला नक्कीच बसणार आहे. काही वर्षांपूर्वी सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी असा दावा केला होता कि, सामना हे जगात सर्वाधिक चर्चिले जाणारे वृत्तपत्र आहे. मुळात सामनापेक्षाही मोठमोठी वृत्तपत्र जगात आहेत. पण आजवर कुठल्याही बड्या

वृत्तपत्राने सामनासारखा हास्यास्पद दावा केला नाही. सामनापेक्षाही लोकप्रिय व सर्वाधिक खपाची वृत्तपत्रे भारतात व महाराष्ट्रात आहेत. त्यांनीही कधी तसा दावा केला नाही. पण स्वतःच स्वतःला मोठे बोलण्यात काय अर्थ आहे, ते जगाने म्हटले पाहिजे. सामनाने मोठे असल्याचा कितीही दावा केला, तरी ती सत्य परिस्थिती नाही. सामना वृत्तपत्र हे शिवसेना नेते व कार्यकर्ते वाचतात. शिवसेनेच्या शाखांमध्ये सामना असतो. पण सर्वसामान्य लोकांमध्ये सामनाची लोकप्रियता नाही. न्यूज पेपर स्टॉलवर सामनाची सत्यस्थिती सहज कळेल.

प्रसिद्ध पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी आपल्या एका व्हिडिओत म्हटले होते कि, 'जेवढं सामनाने शिवसेनेचं नुकसान केलं आहे, तितकं अन्य कुठल्याही वर्तमानपत्राने किंवा विरोधातल्या वर्तमानपत्राने केलेलं नाही.' तोरसेकर यांनी बाळासाहेबांशी सामनाबद्दल बोलताना, 'जाळायच तर पहिले सामना जाळा, तुमचा सर्वात जवळचा शत्रू सामना आहे.' असे विधान केले होते. १९९९ साली विधानसभा निवडणुकीत भाजप शिवसेनेला अपयशाचा सामना करावा लागला होता. त्यावेळी सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी सामनामधून मुख्य संपादक बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका केली होती. सामनाचा तो अंक भाऊ तोरसेकर यांनी स्वतः बाळासाहेब ठाकरे यांना दाखवला होता. 'तुमचा कार्यकारी संपादक तुमची कशी बेअब्रू करत आहे, हे पाहा',असे तोरसेकर बाळासाहेबांना म्हणाले होते. सामना हे शिवसेनेचे मुखपत्र असूनही, त्यात शिवसेनाप्रमुखांवर टीका होत असेल, तर हे शिवसेनेसाठी घातकच आहे. हिंदुत्ववादी विचारांवर चालणा-या सामनात मराठा समाजाच्या भावना दुखावल्या जाणे, हे सुद्धा भयंकर आहे. आज सत्तेसाठी सामनाने हिंदुत्वाकडे फिरवलेली पाठ, हे शिवसेनेला जड जाणार आहे.

### ❖ श्री. अजय वैद्य:

शिवसेनेच्या वाटचालीत मुखपत्र म्हणून योग्य उपयोग करून घेता यावा यासाठीच बाळासाहेबांनी मार्मिक व सामना दोन्हीचे संपादक पद स्वतःकडेच ठेवले, त्यांच्या पश्चात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे हे पद आले आणि आता उद्धवजी मुख्यमंत्री झाल्यामुळे त्यांच्या पत्नी रश्मी यांच्याकडे संपादकपदाची जबाबदारी आली आहे. मात्र बाळासाहेबांनी कार्यकारी संपादकपदी नियुक्त केलेले संजय राऊत हेच प्रामुख्याने सामनाची धुरा वाहत आहेत. त्यांची सर्व शैली बाळासाहेबांप्रमाणेच आक्रमक व रोखठोक असल्यामुळे सामनाचे स्वरूप तसेच कायम राहिले आहे.

शिवसेनेची भूमिका, विचार आणि वाटचाल याविषयीचे मार्गदर्शन शिवसैनिकांना आजही प्रामुख्याने सामनाच्याच माध्यमातून मिळते व त्यानुसार ते आपले कार्य शिस्तबद्धपणे व जोमाने करत असतात. संपूर्ण संघटनेला क्रियाशील व एकसंघ ठेवण्याचे बंधनासारखे काम सामना अव्याहहतपणे करीत आहे. अन्य कोणत्याही पक्ष किंवा संघटनेची मुखपत्रे इतक्या प्रभावी पद्धतीने कामगिरी बजावताना दिसत नाहीत. यासंदर्भात तरुण भारतच्या अवघड अवस्थेकडे लक्ष वेधावेसे वाटते, भाजपची मंडळी तरूण भारतला आपले मुखपत्र मानत नाहीत आणि अन्य सर्व जण मात्र या वृत्तपत्राला संघ – भाजपचे मुखपत्र समजतात!

एकूण, मुखपत्राचं स्वरूप आणि कामगिरी कशी असावी याचा वस्तुपाठव आदर्श म्हणून सामनाकडे पाहता येईल. शिवसेनेच्या वाटचाल व वाढीत सामनाचे योगदान निश्चितच मोलाचे आहे. त्यामुळेच मुखपत्राचा आयकॉन असे बिरूद या वृत्तपत्राला लावल्यास ते उचितच ठरेल !

## ❖ श्री. अरुण बेतकेकर:

साधारण १९६० दशकात मुंबईत मराठी माणसांची सर्वच क्षेत्रात होत चाललेली पीछेहाट यावर जालीम उपाय करण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. हे साध्य करायचे झाल्यास मराठी जनास संघटित करणे गरजेचे होते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या पाठबळाने त्यांचे सुपुत्र बाळासाहेब ठाकरे यांनी हे शिवधनुष्य उचलले. आपल्या व्यंगचित्रकार या कौशल्याचा पुरेपूर वापर करत ऑगस्ट १९६० साली 'मार्मिक' हे व्यंगचित्र साप्ताहिक सुरु केले. येथूनच शिवसेनेची मुहूर्तमेढ रोवली गेली व पुढे जून १९६६ साली शिवसेनेची स्थापना झाली. आपल्या न्याय हक्काच्या लढ्यासाठी आपल्या महाराष्ट्रभूमीत एक हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाल्याच्या भावनेने घराघरातून मराठी तरुण–तरुणी या लढ्यासाठी सज्ज झाले, एकवटत गेले. सुरवातीस या लढ्याचे कार्यक्षेत्र मुंबईपुरते मर्यादित होते. लवकरच रेटून असलेल्या ठाण्यात त्याचा प्रसार झाला. त्याकाळी मराठी जनाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर होता. यातूनच उडपी हॉटेल्स लक्ष ठरले. पुढे परप्रांतीय फेरीवाले टपरीवाले हे लक्ष ठरले. सरकारी, निमसरकारी, खासगी कंपन्यातील नोकरीसाठी आंदोलने होऊ लागली. एका ध्येयाने प्रेरित या आंदोलनास वाढता प्रतिसाद मिळायचा, पण त्यास सकारात्मक प्रसिद्धी मिळत नव्हती. टीकाटिप्पणी अधिक होत असे. यास्तव आंदोलनास खिळ बसत असे. त्याकाळी प्रसिद्धीचे एकमेव साधन म्हणजे वर्तमानपत्र. इंग्रजी तर सोडाच मराठी वर्तमानपत्र सुद्धा यावर सडकून टीका करत. यामुळे जनतेची दिशाभूलही व्हायची. येथे सर्व राजकारणी मराठी, प्रशासन मराठी, पोलीस मराठी आणि गुंडही मराठी तरीही पुरेसे पाठबळ शिवसेनेला मिळत नसे. पुढे ८०% समाजकारण व २०% राजकारण हे व्रत शिवसेनेने स्वीकारलेव राजकारणात पदार्पण केले. अंगीकृत ध्येय धोरणाबरोबरच धर्म, जात, प्रांत, भाषा अशा विविध कारणाने शिवसेना महाराष्ट्रभर फैलावत गेली. पसारा वाढला पण त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी,

संपूर्णतः वर्तमानपत्र हा एकमेव आधार, पण तो विरोधात आणि दुसरी किचकट अशी दूरध्वनीसेवा. या अडचणीवर मात करण्यासाठी स्वतःचे दैनिक वर्तमानपत्र असावे हा विचार पुढे आला आणि जानेवारी १९८९ साली सामनाचे प्रकाशन झाले. तत्पूर्वी डिसेंबर १९८८ साली पुणे येथे संपन्न झालेल्या शिवसेनेच्या महाराष्ट्रव्यापी अधिवेशनात त्याची जंगी जाहिरात करण्यात आली. ती अशी होती 'सामना– सामान्यांच्या मनाचा नादनिनाद'.

हाच सामना पुढे शिवसेनेच्या व्याप्तीतील मौलाचा दगड ठरला. उदाः मराठवाड्यातील हिंदू–सवर्ण, मराठवाडा विद्यापीठ नामकरण, हिंदू–मुस्लीम दंगली यात सामन्याची भूमिका महत्वाची ठरली. येथूनच संपूर्ण मराठवाड्यात तसेच विदर्भात शिवसेनेने आपला पाय मजबूत केला. त्याकाळी शिवसेनेचे कट्टर विरोधी शरद पवार यांनी बाळा साहेबांच्यावर कापसाच्या पिकावरून प्रखर भाषेत टीका केली होती. यास प्रत्युत्तर म्हणून राज ठाकरे यांनी सामन्याच्या पहिल्या पानावर शरद पवारांचे अंथरुणावर विवस्त्र पडलेले आणि शेजारी उशीतून कापूस बाहेर पडलेला असे एक भन्नाट व्यगंचित्र काढले. महाराष्ट्रात हडकंप झाला. पवारांनी बाळासाहेबांशी संपर्क साधून या वादावर पडदा टाकणे उचित समजले.

हा होता दैनिक सामन्याचा प्रभाव. विरोधक तर सोडाच स्वकीयावर सुद्धा चुकल्यास सामन्याद्वारे प्रहार केला गेला. उदाः मनोहर जोशी शिवसेनेचे मुख्यमंत्री असताना त्यांनाही सामानाने सोडले नाही. १९९९ साली त्यांचे राजीनामे नाट्यही सामन्यातून गाजले.बाळासाहेबांच्या विचारांची देवाण–घेवाण, त्यांच्या सभांचे छायाचित्र व इत्यंभूत माहितीया माध्यमाने जनतेकडे तातडीने पोहोचू लागली. शिवसेनेची आयुधे उदाः बंद, आंदोलने, मोर्चे याविषयीचे संदेश महाराष्ट्रभर पोहोचवणे सहज साध्य होऊ लागले आणि आंदोलनाची तीव्रता दाहक होत गेली. मुंबईत इंग्रजी नामफलका

विरोधात केलेले आंदोलन २४ तासात संपूर्ण महाराष्ट्रभर पेटले. शेतकरी, कामगार, व्यावसायिक, विद्यार्थी यांच्याविषयीची शिवसेनेची ध्येयधोरणे सामनातील बातम्यांद्वारे सर्वत्र पोहोचू लागले. देशात–महाराष्ट्रात घडलेल्या घटनास प्रत्युत्तर देण्यासाठी, शिवसैनिकांना तत्परतेने संघटित करण्यासाठी आणि स्वकीयांवर होऊ घातलेल्या परिणामास आवर घालणे सामन्याद्वारे शक्य झाले. यातूनच शिवसैनिक हे देश, धर्माचे रक्षक समजले जाऊ लागले. त्यांच्याही शब्दांना धार आली. राजकारणात आघाडी घेण्यासाठी, निवडणूक प्रचार–प्रसार व विरोधकांच्या टीकेवर सडेतोड उत्तर देण्यासाठी सामना हे प्रभावी माध्यम ठरले. सामन्यातून येणारा एक–एक शब्द शिवसैनिक, हा बाळासाहेबांचा आदेश मानत. सामन्यात स्वतःची नावे येणे हे शिवसैनिकांच्या दृष्टीने अभिमानास्पद झाले. त्यातूनच त्यांची कार्यक्षमता द्विगुणित होत गेली. स्वतःच्या हक्काचे वर्तमानपत्र सामना याचा पुरेपूर आधार वेळेवेळी शिवसेनेस मिळत गेला. सामना हे शिवसेनेच्या ऊर्जेचे साधन ठरले. सामन्यातील बाळासाहेबांचे अग्रलेख म्हणजे त्यांच्या विचाराचे निखारे. महाराष्ट्र टाइम्स उचललातर सर्वप्रथम त्यातील आर. के. लक्ष्मण यांचे व्यंगचित्र तर सामना उचलला कि बाळासाहेबांचा अग्रलेख असे समीकरण होते.

बाळासाहेबांच्या सामन्याची दाहकता, राजकारणाचे हत्यार जे जनतेस परिचित होते ते आज राहिले आहे का? जे राजकीय पक्ष व नेते, काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस, सोनिया गांधी आणि शरद पवार जे सामन्यासाठी शत्रू आज ते तसे राहिले आहेत का? उलट यांच्यावरच आज सामन्यातून स्तुती सुमने उधळली जात आहेत. त्यांचेच फोटो सकारात्मक रूपाने पहिल्या पानावर छापून येत आहेत. हे दुर्दैव. जे सामना वर्तमानपत्र शिवसेनेच्या व्याप्तीतील मैलाचा दगड ठरले तेच शिवसेनेच्या विनाशास कारणीभूत ठरेल हीच शक्यता आज अधिक वाटते.

❖ **श्री. अरूण सावंत:**

शब्द म्हणजे मनातील भावभावनांच्या अभिव्यक्तीचे साधन! माऊलीच्या कुशीत जी ऊब मिळते, तीच ऊब शब्दाच्या माध्यमातून ❉सामना❉ या वृत्तपत्रातून परावर्तित झालेली आज प्रकर्षाने दिसून येते.

सामना हे शिवसेना या राजकीय पक्षाचे मुखपत्र! २३ जानेवारी १९८९ रोजी मध्यरात्री शिवसेनेचे हे अढळ, निर्भिड व्यक्तित्व सुरू झाले. हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी आणि दररोज होणा-या आरोपांना उत्तर देण्यासाठी *सामना* हे नवे शस्त्र तयार झाले. त्यावेळी सामनाबद्दल बोलताना बाळासाहेब ठाकरे म्हणाले की, ‘सामना हा राज्यकर्त्यांना दाखवलेला आरसा आहे, त्यात आपली प्रतिमा पाहून स्वतःची प्रतिमा सुधारावी, हा आरसा फोडण्याचा प्रयत्न करू नये कारण तो फुटला तर त्याचे तुकडे पडतील व प्रत्येक तुकड्यात त्याची प्रतिमा अधिकच विद्रूप होईल‘ बाळासाहेबांनी हे जाणले होते की आपले विचार तळागाळापर्यंत पोहोचवायचे असेल तर वृत्तपत्राशिवाय पर्याय नाही आणि सरतेशेवटी सामना या वृत्तपत्राच्या माध्यमातून शिवसेना असामान्यांपासून ते सामान्यांपर्यंत पोहोचली.

मुंबईसारख्या मोहमाया नगरीत एखाद्या सभेच्या माध्यमातून हिंदुत्वाच्या रक्षणार्थ घेतलेली जबाबदारी मर्यादित जनसमुदायाला समजत होती. आकाशवाणीवरील बाळासाहेबांचे भाषण एखादा श्रृत समूहच ऐकू शकत होता. दूरदर्शनवरील बाळासाहेबांचे विचार एखादा उच्चभ्रू समाजच अवलोकन करू शकत होता. या मर्यादित वलयाला छेद देऊन संपूर्ण महाराष्ट्रात आपले विचार पोहोचवायचे असतील तर जनसामान्यांच्या मनावर कोरणारे शब्दरूपी वृत्तपत्र महत्त्वाची कामगिरी बजावू शकतात, या दूरदृष्टीने सामना हे वृत्तपत्र जनमनावर विराजमान झाले आणि शिवसेनेची भूमिका मनामनात आपले स्थान पक्के करू लागली.

सामानाने दोन दशके मराठी माणसाचे प्रश्न सातत्याने मांडले आहेत, त्यांनी हिंदुत्वाचा पुरस्कार केला आणि त्यामुळेच शिवसेनेने संपूर्ण महाराष्ट्रात अढळ स्थान प्राप्त केले. बाळासाहेबांच्या नेतृत्वाखाली हिंदुत्ववादी विचारांची बैठक सामन्यातून प्रकट झाली आणि शिवसेनेला प्रगतीची दिशा मिळाली. राजकीय आर्थिक, सामाजिक, नैतिक मानसिक अशा विविध कार्याचा आढावा सामना या वृत्तपत्रातून परावर्तित झाल्यामुळे शिवसेनेची लाट जनमानसात उसळायला लागली. आपल्या माणसासाठी कोणीतरी लढत आहे, ही भावना जागृत करण्यासाठी शिवसेनेने सामना या वृत्तपत्रातून आपली विधायक कार्याची नौका जनप्रवाहात आणली त्यामुळेच महाराष्ट्रात शिवसेना आपला ध्वजदिमाखाने फडकवित आहे. आनंदाच्या आणि अडचणीच्या वेळी सामना हा जनसमुदायाचा सहप्रवासी बनल्यामुळे शिवसेनेची गाडी तुफान वेगाने धावू लागली.

बाळासाहेबांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेने शिवसेना नामक जीवनाचा सामना हा आधार बनला. एखादे राजकीय अथवा आर्थिक घडामोडीवर व्यंगचित्राच्या माध्यमातून केलेले भाष्य सुद्धा शिवसेनेच्या सहेतुक विचारांचा परीसस्पर्श हिंदुत्ववादी जनसमुदायाला देऊन जायचा आणि ते मन शिवसेनेला आपलेसे करून जायचे, त्यामुळे शिवसेनेच्या यशस्वी वाटचालीत सामनाचे योगदान अमूल्य आहे. ❊नेपोलियन बोना पार्ट❊ हा महान कर्तुत्वाच्या जोरावर फ्रेंच सम्राट झाला. तो शूर योद्धा होता, मात्र तो वर्तमानपत्राला घाबरत असे, कारण त्याला शब्दाचे सामर्थ्य ज्ञात होते, याच शब्दांच्या सामर्थ्यावर शिवसेनेने सामना रुपी चावीने कधी मन मोकळे केले तर कधी तोंड बंद केले.

शिवसेनेच्या कृतीला सामन्यातील शब्दांनी अनुरूप केले तर सामन्याच्या शब्दाला शिवसेनेच्या कृतीने अनुरूप केले त्यामुळे शिवसेना मोठी होण्यामागे जगातील सर्वाधिक चर्चिले जाणारे ❊सामना❊ हेवृत्तपत्र महत्त्वाची भूमिका बजावीत आहे.

सामना वृत्तपत्राच्या माध्यमातून शिवसेना मानवाच्या अंतरमनात आपले स्थान प्राप्त करू लागली. 'उठा जागे व्हा आणि तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत तुमचे ध्येय मिळत नाही' या विचाराने आपले नेतृत्व करण्यात कोणीतरी तयार झाले आहे ही भावना दृढ झाली आणि प्रत्यक्ष स्वरूपात ती प्रत्ययाससुद्धा आली, त्यामुळे लोकांचा शिवसेना वरील विश्वास अधिक दृढ झाला. शिवसेनेत यशाची कितीउंची गाठली याची प्रचिती सामना नसता तर आलीच नसती. शिवसेनेच्या यशाचे मूल्यांकन करताना सामना या वृत्तपत्राने शिवसेनेला यशोमय उंचीवर नेऊन ठेवले आहे.

शिवसेनेचे कार्य अगाध आहे, त्यांनी अनेक समूह तसेच व्यक्तित्वाला न्याय मिळवून दिला आहे. समाज प्रबोधनाबरोबरच परखडपणा व नैतिकता ही जपली आहे. या कार्याची ❊इथपासून अहो पर्यंत❊ पोहोचविण्याची जबाबदारी सामनाने घेतली आणि घराघरात शिवसेना नांदू लागली, अर्थात त्याला सत्याचे, वास्तवतेचेही वलय आहे, याबद्दल शंका नाही कारण जिथे शिवसेना प्रत्यक्ष उपस्थित नव्हती, तिथे सामन्याच्या रुपाने अवतरून सेनेचे प्रतिनिधित्व करत होती. आपण कोणासाठी तरी चांगलं करत असतो हे सामन्यातून शिवसेनेने दाखवून दिले.

**थोडक्यात**

❊ सामना हा शिवसेनेचा तोफखाना

❊ शब्दाचीच प्रेरणा यास्तव आहे जाणा

❊ कृती आणि शब्दयांचा सहयोग माना

❊ शिवसेनेच्या वाटचाली सामनाचाच बाणा

**❖ श्री. राजू वेर्णेकर:**

१३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक व्यंगचित्र साप्ताहिक सुरु झाल्यानंतर,१९ जून १९६६ ला शिवसेनेची स्थापना होऊन ३० ऑक्टोबर १९६६ ला पहिला दसरा मेळावा शिवतीर्थावर संपन्न झाला. यानंतर जवळजवळ २३ वर्षांनी २३ जानेवारी १९८९ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ६२ व्या वाढदिवशी शिवसेनेचे मुखपत्र सामना सुरु झाले. त्यानंतर ४ वर्षांनी २३ फेब्रुवारी १९९३ रोजी दोपहर का सामना है हिंदी सांयदैनिक सुरु करण्यात आले.

सुरुवातीच्या काळात मार्मिक आणि नंतर सामनाची शिवसेनेच्या जडणघडीत भूमिका मोठी आहे. खर म्हटल तर १९८५ ला मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा जरी फडकला असला तरी १९८९ नंतरच शिवसेनेची ख–या अर्थाने घौडदौड सुरु झाली. त्या वर्षी झालेल्या लोकसभा विधानसभा निवडणूकीत शिवसेनेला ०४ जागा सर्वप्रथम मिळाल्या. नंतर १९९० साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत शिवसेनेला ५२ आणि भाजपला ४२ जागा मिळाल्या. त्यानंतर राम जन्मभूमीच्या मुद्द्यावर शिवसेना–भाजपची युति अधिक घट्ट होऊन दोन्ही पक्षांची चढती कमान अबाधित राहिली.

या सर्वात सामनाचे योगदान किती? तर ब–याच प्रमाणात असे उत्तर द्यावे लागेल. सुरुवातीला सामनाचे संपादकीय हे महत्वाचे आकर्षण असे. बाळासाहेब कोणत्याही मुद्द्यावर आपले मत परखडपणे मांडत असत. सामनाच्या माध्यमातून शिवसेनेचे निर्णय, शिवसेनेची भूमिका जनतेसमोर मांडली जाई. एखादया आंदोलना बाबत देखील शिवसैनिकांना सामनाच्या माध्यमातून आदेश मिळत असे.

रात्री मर्यादीत वेळेनंतर ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी असो, दिवाळी सारख्या सणाला फटाक्यांवर बंदी असो, मशिदीवरील भोंग्यांचा विषय असो, तिहेरी तलाक

किंवा हिंदूंच्या जिव्हाळ्याचा एखादा विषय असो, अशा सर्व विषयांबाबत सामनाच्या संपादकीयातून न्यायालयावरही ताशेरे ओढले गेले.

नंतरच्या काळात शिवसेनेचे कार्यक्रम, शिवसेना लोकप्रतिनिधींचे कार्य, शिवसैनिकांनी आपल्या विभागात केलेले काम जनतेसमोर आणण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले. कालांतराने मुंबई आवृत्तिनंतर, संभाजीनगर आवृत्ति सुरु करण्यात आली आणि सामनाची व्याप्ति वाढत गेली.

तीन चार वर्षांपूर्वी भीमा कोरेगांवच्या मुद्द्यावर उठसूठ बाम्हण समाजाला लक्ष केले जात असताना सामनाच्या "रोखठोक" मधून बाम्हण समाजातील नेत्यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान परखडपणे मांडल्यामुळे पुण्यात सामनाचे जाहीर पणे वाचन केले गेले.

सामन्यात आजही महाराष्ट्राच्या कानाकोप–यातील बातम्या आवर्जून दिल्या जातात, जेणेकरवी वृत्तसंकलन मुंबईपुरते मर्यादीत न राहता राज्यभरच्या बातम्यांची दखल घेतली जाते. शिवाय राष्ट्रपातळीवरच्या बातम्या सामनात वाचावयास मिळतात.

गेल्या दोन दशकांत दूरचित्रवाहिन्यांनी आणि वृत्तवाहिन्यांनी स्वत:हून सामना आणि पर्यायाने शिवसेनेची व्याप्ती वाढविली आहे. आता दररोज सांमनातील संपादकीयावर बातम्या होऊ लागल्या आहेत. मधल्या काळात भाजपबरोबर सत्तेत सहभागी असूनही सरकार संबंधित एखाद्या विषयावर जहाल टीका सामनात वाचावयास मिळत असे. शिवसेनेच्या भूमिका राज्यात तळागळापर्यंत पोहोचविण्यात सामनाचा वाटा नक्कीच मोठा आहे.

- **श्री. किरण हेगडे**:

परस्परांनापूरक ठरले आहेत शिवसेना आणि सामना!

१९८८ सालच्या उत्तरार्धात मुंबईच्या बहुतांशी सार्वजनिक भिंती रंगू लागल्या होत्या. पांढरी शुभ्र बॅकग्राऊंड आणि त्यावर भगव्या अक्षरात सामनाच्या जाहिराती झळकू लागल्या होत्या. ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक, अशी टॅगलाईन देत सामनाची जाहिरात होत होती. भिंती कोणाच्या, रंगवतो कोण, कोणाचा कोणाला पत्ता नव्हता. मात्र, मुंबईत सामनाच्या फुकटच्या जाहिराती दिमाखात केल्या जात होत्या. लवकरच येत आहे, असेही त्यात म्हटले जात होते. शिवसेनेकडून भिंतींवर होणारी रंगरंगोटी नेहमी सुंदर आणि सुवाच्य अक्षरांत केली जायची. ती प्रथापरंपरा सामन्याच्या जाहिरीतींमधूनही दिसून यायची. सुबक, आकर्षक अशा अक्षरांमध्ये या जाहिराती होत होत्या.

तसा शिवसेनेचा जन्म मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी झाला होता. याच मुद्द्यावर शिवसेना विविध निवडणुका लढवत होती. परंतु त्यात त्यांना फार यश येत नव्हते. त्यामुळेच मग शिवसेनेला अधिक व्यापक बनवत शिवसेनेने आपली कूस बदलली. मराठी माणसाच्या न्यायहक्काबरोबरच शिवसेना ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारी झाली. पुढे कालांतराने हिंदुत्वाला महत्त्व आले आणि मराठी माणसाचा मुद्दा दुय्यम ठरला तो भाग वेग वेगळा आणि आतातर दोन्ही गोष्टी फक्त नावासाठी आणि सोयीचा भाग म्हणून उरल्या आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

तर १९८८च्या उत्तरार्धात सामन्याच्या जाहिरातींनी मुंबईतल्या भिंती रंगू लागल्या. त्यावेळी मी मुंबईच्या सांज तरूण भारत, या दैनिकात होतो. गुन्हेगारी वार्तांकन करण्यात, एक्स्लुझिव्ह बातम्या देण्यात माझे नाव ब-यापैकी पुढे होते. संजय डहाळे हे माझे पत्रकार मित्र त्यावेळी माझ्यासोबत होते. लोकसत्ता दैनिकात डहाळे यांनी तेव्हाचे संपादक माधव गडकरी यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम केले होते. तेव्हा लोकसत्तेत असलेले ज्येष्ठ पत्रकार अशोक पडबिद्री यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध

होता. केवळ पत्रकार होण्यासाठी ते तरूण भारतमध्ये आले होते. त्यांनी मला सामन्याबद्दल सांगितले. पडबिद्री तेथे संपादक म्हणून काम पाहणार आहेत आणि तेथे आपल्या दोघांना ऑफर आहे, असे डहाळे म्हणाले. मलाही तरूण भारतमध्ये चार वर्षे झाली होती. पगारवाढीचे वेध मलाही लागले होते. डहाळेची सूचना मलाही भावली. लगेचच पडबिद्रींना भेटलो आणि सामन्यात जाण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले.

दैनिकाची सुरूवात करण्याआधी बाळासाहेबांनी काही निवडक पत्रकारांचे स्वतः इन्टरव्ह्यू घेतले. त्यात माझाही नंबर लागला होता. माझा इन्टरव्ह्यू होण्याच्या आदल्या दिवशीच गडचिरोलीत एका सरपंचांची नक्षलींनी फासावर लटकवून हत्त्या केली होती. नेमके या घटनेबद्दलच बाळासाहेबांनी मला विचारले. अशी घटना घडली तर काय करणार, असा सवाल त्यांनी केला. तेव्हा मी तेथे जाऊन रिपोर्टिंग करण्याचा मनोदय व्यक्त केला व बाळासाहेबांना ते आवडले. असे फर्स्टहँड रिपोर्टिंग झाले पाहिजे, असे म्हणत त्यांनी माझी निवड केली. त्यांनतर मिळत असलेल्या वेतनाच्या अडीचपट पगारवाढ देऊन मला सामन्यात घेण्यात आले.

२३ जानेवारी १९८९ला बाळासाहेबांचा वाढदिवस होता. त्याचदिवशी सामन्याचा शुभारंभ झाला. रात्री नरीमन पॉईंटच्या तेव्हाच्या ओबेरॉय शेरेटन, या पंचतारांकित हॉटेलमध्ये रात्री बर्फाच्या लाद्यांचे डेकोरेशन करत त्याचे थाटामाटात लाँचिंग झाले. यावेळी आपल्या दैनिकांचे आपणच लाँचिंग करत असल्याच्या विरोधकांच्या थट्टेला बाळासाहेबांनी तितक्याच मिश्किलपणे उत्तर दिले होते. माझ्या मुलाचे बारसे मीच करणार. शेजा-याला बोलावणार नाही, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. सामना हे आपले न्यूज पेपर असेल, व्ह्यूज पेपर नाही, असे जाहीर

करायलाही ते विसरले नाहीत. पण, प्रत्यक्षात मात्र, ते न्यूज पेपरपेक्षा व्ह्यूज पेपरच झाले, हा भाग वेगळा.

माझा सामन्यातला कार्यकाळ फारच अल्प राहिला. तेथील व्यवस्थापनाचे धोरण माझ्या मानसिकतेला पटणारे नव्हते. त्यामुळे वारंवार माझे व्यवस्थापनाबरोबर खटके उडत होते आणि अखेर मी आजारपणाच्या रजेवर असतानाच त्यांनी मला सेवेतून काढून टाकले. पण माझे सामन्याबद्दलचे मत काही बदलले नाही. शिवसेनेने हिंदुत्वाच्या बाजूने आपली भूमिका मांडताना नेहमीच सामन्याचा मुक्तपणे वापर केला. सुरूवातीला बाळासाहेब, नंतर उद्धव ठाकरे आणि आता रश्मी ठाकरे सामन्याच्या संपादक राहिल्या. त्यामुळे सामन्यातल्या संपादकीयाचे श्रेय ठाकरे परिवारा भोवतीच कायम घुटमळले. परिणामी सामन्याच्या अग्रलेखामधून व्यक्त होणारी मते ठाकरे परिवाराची तसेच शिवसेनेच्या प्रमुखांची मते म्हणून आपोआपच ओळखली जाऊ लागली आणि सामन्याला फुकटची प्रसिद्धी मिळू लागली.

सुरूवातीच्या काळात शिवसेनेच्या शाखाशाखांमध्ये सामना घेणे बंधनकारक करण्यात आले होते. नंतर नंतर शिवसेना आपल्या घोषणा सामन्याच्या माध्यमातूनच करू लागल्याने प्रत्येक शाखेला सामना घेणे अपरिहार्य ठरू लागले. अगदी महापालिका निवडणुकीतल्या उमेदवारांची नावे ही सामन्यातूनच जाहीर व्हायची. शिवसैनिकांच्या कामाची मोजदादही सामन्यातल्या बातम्यांवरूनच होऊ लागली. त्यामुळे मग सामन्यातून बातम्या छापून आणण्यासाठी शिवसैनिकांकडूनच फिल्डिंग लागू लागली जी प्रथा परंपरा आजही कायम आहे. आज इलेक्ट्रॉनिक मीडियात शिवसेनेचे सिंपथायझर मोठ्या प्रमाणात आहेत. त्यातच शिवसेना महाराष्ट्राच्या सत्तेत आहे. त्यामुळे शिवसेनेच्या बाजूने बातम्या देण्यात इलेक्ट्रॉनिक मीडियात अहमहिका चालते. यात सामन्याला जरा जास्तच महत्त्व आले आहे. सामन्याच्या माध्यमातून शिवसेनेचे प्रवक्ते आणि सामन्याचे कार्यकारी संपादक संजय राऊत याच वृत्तपत्राच्या

माध्यमातून रोजच्या आपली पक्षाची भूमिका मांडत आहेत. त्यामुळे शिवेसेनेवर सामन्याचा कितपत प्रभाव आहे हे सांगण्यापेक्षा शिवसेना आणि सामना परस्परांना पूरक कसे आहेत, हे पाहणे जास्त रंजक ठरेल.

❖ **श्री. प्रसाद मोकाशी:**

साधारणपणे १९८९–९० चा काळ हा शिवसेनेचा महत्वाचा काळ मानला जातो. तेव्हा भाजपाबरोबर हिंदुत्वाचा नारा देणा–या शिवसेनेला केवळ काँग्रेसशी लढायचं नव्हतं तर डाव्या विचारांशीही पंगा घ्यायचा होता. आपली भूमिका महाराष्ट्रातल्या जनतेला पटवून देण्यासाठी शिवसेने प्रयत्न करत होती पण प्रसार माध्यमांमध्ये (तेव्हा फक्त छापील वृत्तपत्रे होती) असणारे पत्रकार सेनेचे समर्थक असूनही सेनेला हवी तेव्हढी प्रसिद्धी मिळत नव्हती. स्वाभाविकपणे साप्ताहिक मार्मिकमधील व्यंगचित्रे आणि काही लेख यावरच शिवसेनेची विचारधारा जनसामान्यांपर्यंत जात होती.

त्याच काळामध्ये वृत्तपत्रांमध्ये असलेल्या डाव्या विचारांच्या किंवा पुरोगामी विचारांच्या समर्थकांनी शिवसेनेच्या हिंदुत्वाच्या विरोधात दंड थोपटले. एकीकडे भाजपसारखा पक्ष रथयात्रेच्या माध्यमातून आपली ताकद राष्ट्रीय पातळीवर वाढवत असताना शिवसेनेला महाराष्ट्रात आपली वैचारिक भूमिका पटवून देताना मर्यादा येत होत्या. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या दौ–याच्या बातम्या त्रोटक स्वरूपात प्रसिद्ध होत होत्याच पण त्या दौ–यातील शिवसेना विरोधी बातम्या अधिकभडकपणे येऊ लागल्या होत्या आणि त्यामुळे शिवसेनेला त्याची जबर किंमत निवडणुकीमध्ये भोगावी लागत होती. भाजपमधील काही माध्यमप्रेमी नेत्यांनी बाळासाहेबांच्या हे निदर्शनास आणून दिले, त्याचवेळी आपले एक मुखपत्र असावे हा विचार बाळासाहेबांच्या डोक्यात सुरू होता आणि १९८९–९० च्या दसरा मेळाव्यामध्ये त्यांनी सामनाची घोषणा केली.

त्याचवेळी मुंबईमध्ये शिवसेनेतील अंतर्गत वाद जोरात सुरू होते आणि सायंदैनिक महानगर त्याची जोरदार प्रसिद्धी करत होते. त्यामागचे राजकारण हा स्वतंत्र विषय आहे. पण महानगरला प्रत्युत्तर देण्यासाठी आणि आपली विचारधारा किमान शिवसैनिकांपर्यंत पोहोचावी यासाठी शिवसेनाप्रमुखांनी सामना सुरू केला. शिवसेनेच्या विविध संस्था, संघटना यांच्या कार्याची प्रसिद्धी, बाळासाहेबांच्या मॅरेथॉन मुलाखती यांना या वृत्तपत्रामधून ठळक प्रसिद्धी मिळू लागली. बाळासाहेबांचा विचार, शिवसेनेची वैचारिक (?) भूमिका, हिंदुत्वाचा विचार हा महाराष्ट्रातल्या शाखाशाखांमधून जाऊ लागला. शिवसेनेला त्यामुळे एक प्रकारचे पाठबळ मिळाले आणि शिवसेना फोफावू लागली. सामनाने महानगर तसेच अन्य वृत्तपत्रांमधून न मिळणा–या प्रसिद्धीला जागा मिळवून दिली. शिवसैनिकांना ती संजीवनी ठरली. अर्थात मार्मिकला सामनाची जोड मिळाल्यामुळेच शिवसेनेमध्ये काही प्रमाणात वाचनसंस्कृती वाढली असे म्हटले तर वावगे ठरू नये.

अर्थात सामना ज्या काळात आला त्या काळात अयोध्येतील राम मंदीराचा प्रश्न ऐरणीवर होता. त्या काळामध्ये भाजपने आपले सर्वत्र जाळे पसरवले असताना महाराष्ट्रात सामनाच्या माध्यमातून शिवसेना आणि मगच भाजप असे चित्र उभे करण्यात शिवसेना यशस्वी ठरली. १९९० च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेला आधीच्या तुलनेमध्ये घवघवीत यश मिळालेच पण १९९२–९३ च्या दंगलीमध्ये हिंदुंचा प्रखर कैवारी अशी प्रतिमा सामनाने निर्माण केली. असे म्हणतात की १९९२ च्या शमलेली दंगल १९९३ च्या जानेवारीमध्ये झालेल्या घटनेला भडक स्वरूप देऊन सामनाने प्रतिशोधाची ज्वाला मराठी माणसात चेतवली. स्वाभाविकच संपूर्ण जानेवारी महिना मुंबई धगधगत राहिलीच पण नंतर बॉम्बस्फोट मालिकेलाही खतपाणी घातले. अर्थात हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. पण सामनाने मराठी वृत्तपत्राच्या इतिहासामध्ये आपले स्थान अधोरेखीत केले ते एका राजकीय पक्षाचे मुखपत्र म्हणून. सर्वच राजकीय

पक्षांची आपापली विचारधारा मांडणारी मुखपत्र असतात पण ती साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक, सहामाही किंवा वार्षिक या स्वरुपात. पण सामनाने या प्रतिमेला छेद दिला आणि रोजच्या रोज आपली भूमिका मांडणारे, आपल्या संस्था, संघटनांना व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देऊन त्याद्वारे आपले कार्य लोकांपर्यंत पोहोचविणारे वृत्तपत्र नव्हे मुखपत्र अशी प्रतिमा यशस्वी केली.

❖ **श्री. रवींद्र यशवंत बिवलकर:**

त्यावेळचा सामना शिवसैनिकांच्या आत्मियतेचा मात्र...

सामना या स्वतंत्र अशा हिंदुत्त्वाचा पुरस्कार करणा-या दैनिकाला सुरुवात केली गेली ती मुळात प्रजा समाजवादी असलेल्या अशोक पडबिद्री यांच्या संपादकत्वाखाली. त्यांच्याबरोबर बाळासाहेब ठाकरे यांचे मला वाटते बहुधा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी मध्ये संबंध आले असावेत. वास्तविक सामनाची निर्मिती शिवसेना पक्षाच्या प्रचारासाठी, तसेच लोकांपर्यंत आपली ध्येय–धोरणे पोहोचावीत आणि शिवसेनेतील शिवसैनिकांनाही हक्काचे वृत्तपत्र मिळावे या दृष्टीने झाली. ज्वलंत हिंदुत्त्वाचा पुरस्कार करणारे वृत्तपत्र ही टॅग लाईननंतर घेतली गेली. स्थानिक भूमिपुत्रांचा म्हणजेच मराठी माणसासाठी आवाज उठवणारा पक्ष अशी शिवसेनेची प्रथमपासून असणारी भूमिका सामनामुळे अधिक प्रगल्भ झाली. राज्याच्या अनेक भागांमध्ये आणि विशेष करून कोकणातील गावागावांमध्ये शिवसेनेचे अस्तितत्व होते. शाखाप्रमुख, शाखा असणे तसेच तेथील समस्यांबद्दल आवाज उठवणारे नेतृत्व निर्माण होणे हे शिवसेनेचे त्या वेळचे बहुतेक लक्ष्य असावे. सर्वसामान्यांमधून नेतृत्व तयार करण्याचा शिवसेनेचा तो प्रकार खरे म्हणजे आगळा होतो. त्यामुळेच नगरसेवक, महापौर, मंत्रीपदापर्यंत मराठी माणूस मजल मारू शकला हे नाकारता येत नाही.

१९९३ च्या दंगलींनंतर मुंबईतील अनेक भागांमध्ये हिंदु पण मराठी नसणा–यांना शिवसैनिकांनी अनेक बाबतीत वाचवले. मुस्लीम दंगेखोरांपासून संरक्षण दिले. त्यामुळे सामना मराठी असूनही तेव्हा अमराठी लोकांनी तो हिंदुंचा पेपर आहे, तो टिकला पाहिजे, अशी भूमिका घेत सामनाचे ते वाचक बनले, ही अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळालेली बाब आहे.

शिवसेनाप्रमुख सामनामध्ये विशिष्ट कारणासाठी येत. अन्यथा त्यांची सारी मदार ही अशोक पडबिद्री यांच्यावर होती. पडबिद्रींचे लिखाण हे जरी शिवसेनेत नसल्याने आणि अन्य विचारसरणीचे असल्याने त्यांनी त्याचा पगडा मात्र जाऊ दिला नाही. मुलायम मुल्ला असे नाव त्यांनी मुलायम सिंग यादव यांना ठेवले होते. अशा प्रकारे शाब्दिक करामती करणारे पडबिद्री संपादक असताना आणि ते प्रजा समाजवादी असले तरीही त्यांना संपादक म्हणून नेमले गेल्यानंतरही त्यांनी शिवसेनेचे धोरण अतिशय कौशल्याने तेथे राबवले होते. त्यांनी तयार केलेली पुरवणी ही देखील कलात्मक आणि सुसह्य संस्कारित होती. ठाकरी भाषा जी काही आज बोंब मारीत सांगितली जातेतशी काही ठाकरी वगैरे भाषा त्यांनी वापरली नाही आणि तरीही त्यावेळी सामनाचा खप साडेतीन लाख इतका होता. मात्र आज तो खप माझ्या माहितीप्रमाणे लाखापर्यंत आला असावा.

पडबिद्रींना रिपोर्टिंग आणि बातमी कशात आहे याचे अचूक ज्ञान होते. त्यांनी शिवसेनेचा मुखपत्र असणा–या सामन्याची स्थिती ख–या अर्थाने वृत्तपत्र म्हणून कौशल्याने वापरली. केवळ भडक भाषा असून चालत नाही, तर त्यात वैचारिक वाद, कौशल्य, तार्किकता असावी लागते हे सारे नाही म्हटले तरी शिवसेनेच्या त्यावेळच्या सामनामध्ये होते.

सामनामध्ये काम करतो म्हटल्यानंतर मुंबईत विविध भागामध्ये त्या त्या पत्रकाराचा वट असायची. शिवसेना हा पक्ष तळागाळात गेला होता. शिवसेना शाखाप्रमुख हे लोकांचे प्रश्न सोडवणारे कार्यकर्ते, नेते वा एखाद्या दादाप्रमाणे असायचे. त्यामुळे विविध समस्यांची माहिती मिळण्यासाठी पत्रकारांना शिवसेना शाखाप्रमुख निकट असणे महत्त्वाचे असे. केवळ शाखाप्रमुखच नव्हे तर गटप्रमुखापर्यंत अनेक शिवसैनिकही मानाने राहात. शिवसेना शाखा म्हणजे विविध भागांमध्ये संध्याकाळी एका मेळ्यासारखा असे.

शिवसेनेच्या अनेक शाखांमधून, नगरसेवकांमधून वा तेथील कार्यकर्त्यांकडून सार्वजनिक वाचनालये वृत्तपत्रांसाठी चालवण्यात येत होती. त्यात सामना हे अग्रक्रमाने येऊ लागलेले दैनिक तेथे सुरुवातीला लोकांच्या उड्या पडत. शिवसेनेच्या पक्षांतर्गत कार्यक्रमाची माहिती, बातमी, फोटो कार्यकर्त्यासह आला की कॉलर टाईट व्हायची त्याची. किंबहुना सामना आणि शिवसेना यांचे हे एक असे अतुट नाते होते. जे आज नाही.

सामनात बातमी येणे वा सामना वाचणे हे प्रत्येक शिवसैनिकाला आद्यकर्तव्य वाटायचे. सामनामध्ये बातमी येण्यासाठी धडपड असायची त्या त्या शिवसेनेच्या शाखांची. एकूणच सामनामध्ये काम करणायांसाठी शिवसेना हा एक सोर्स होता. अनेक छोट्या पण महत्त्वाच्या बातम्या त्यांची माहिती ही शिवसेनेतील शिवसैनिकापासून ते शाखाप्रमुख, विभागप्रमुख यांच्यापर्यंत असायची, त्यांनी पत्रकारांना नेहमीच सहकार्य केले. त्यामुळे सामना आणि अन्य वृत्तपत्रांनाही शिवसेना हा बातमीचा सोर्स वाटत होता. संपादक बदलल्यानंतर सुरुवातीला असणारा एक आत्मियतेचा भाग मात्र नंतर कमी झाला. काही शाखांमध्ये वा शिवसैनिकांमध्ये सामनाविषयी असणारी आत्मियता संपादकांच्या धोरणांमुळे, राजकीय प्रवेशामुळे

संपुष्टात आली. किंबहुना सामनाचे महत्व ही त्यामुळे शिवसैनिकांच्या मनातून त्यावेळेपासून हळूहळू ओसरू लागले आणि त्यामुळे संस्थापक बाळ ठाकरे असे नाव असूनही शिवसैनिकामध्येच सामनाबाबत विश्वासार्हता राहिलेली नाही.

### ❖ सौ. पूर्णिमा नार्वेकर:

आमच्या घरी नेहमीच लोकसत्ता, नवकाळ आणि मटा बरोबर आवर्जून येणारा अंक म्हणजे मार्मिक. लहानपणी त्यातले फ्फारसे काही कळायचे नाही पण त्यातील व्यंगचित्र बघायला मजा यायची. आजोबा मात्र बाळासाहेब ठाकरेंच्या बदल बोलायचे. मराठी माणसाचा आवाज म्हणजे शिवसेना आणि बाळ ठाकरे अस ते सांगत. वडा पावची गाडी म्हणजे शिवसेनेची एवढंच काय ते सेनेबद्दल ज्ञान (आता खाकी टूर्सचा कोर्स करताना कळलं की अशोक वैद्य याने पहिली वडा पावची गाडी दादरला सुरू केली.) पुढे मुंबई बंद, संप किंवा निषेध म्हणजे सगळ्यात शिवसेना बलवान हे कळायला लागले.  शिवसेनेची स्थापना आधी आणि मग सामनाचा जन्म. १९७० साली कम्युनिस्ट पक्षाचे नेते कृष्णा देसाई यांच्या हत्येने महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली आणि त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत शिवसेनेचे वामनराव महाडिक निवडून आले आणि पहिला शिवसेनेचा आमदार झाला. सत्तेत येण्याची बहुधा हीच पहिली वेळ. मराठी माणसाचे प्रश्न आणि त्याला न्याय मिळावा म्हणून सतत झटणारी सेना आणि तिचा तडफदार सेनाप्रमुख म्हणजे बाळ ठाकरे. शिवसेना अधिक बळकट करायची तर त्यासाठी आपला हक्काचा पेपर हवा या विचारातून सामनाचा जन्म झाला असावा. पहिल्या पानावरील झणझणीत आणि सणसणीत बातम्या आणि अग्रलेख याने सामनाची विक्रीही वाढली आणि सेना घराघरात पोहोचायला मदत झाली. राजकीय घडामोडीच्या मोठ्या बातम्या तर  सगळेच वृत्तपत्र छापतात पण छोट्या छोट्या कार्याच्या बातम्यांसाठी स्वतःचा पेपर असावा. शिवसेनेने जागोजागी

स्थापन केलेल्या शाखा, शाखा प्रमुख, उप शाखाप्रमुख, गट प्रमुख... यांनी त्यांच्या भागात केलेले काम, वृक्षारोपण, हळदीकुंक या सारख्या ब–याच गोष्टींचा लेखाजोखा अहवाल सामनामधून प्रसिद्ध व्हायला लागला आणि शाखा, शाखाप्रमुख मोठ्या व्हायला लागल्या. त्याचा परिणाम म्हणजे मराठी जनमानसात शिवसेनेबद्दल आस्था निर्माण व्हायला लागली. याचा परिणाम शिवसेनेला निवडणुकीत नक्कीच व्हायला लागला. सत्तेत बळकट होण्यासाठी मदत झाली. आता त्याची परिणीती समोर दिसतेच आहे. शिवसेनेला मोठे करण्यात सामानाचे बहुमूल्य कार्य आणि योगदान नक्कीच आहे त्याशिवाय एवढे मोठे यश संपादन करणे शक्य नाही.

### ❖ श्री. अरविंद कुलकर्णी

दैनिक सामना हे शिवसेनेचे मुखपत्र आहे. मुखपत्रासमोर साधारणपणे तीन उद्दिष्टे असतात. पक्षाच्या ध्येयवादाचा परिवर्तनाच्या हेतूने सर्वसामान्य वाचकाला कळेल आणि पचेल असा प्रचार २) विचाराबरोबर ताज्या आणि सम्यक वार्ता देणा–या परिपूर्ण वृत्तपत्राची निर्मिती आणि ३) चढता आलेख असणारा खप.

आपण हिंदुत्वनिष्ठ आहोत असे ह्या दैनिकाने पहिल्या पानावरील शीर्षस्थ स्थानी उद्घोषित केले आहे. तथापि राष्ट्र जीवनातील हिंदुत्वाचे महत्व, तत्वज्ञान म्हणून त्याचा अलिकडच्या काळात झालेला प्रवास,चढ उतार आणि विविध पैलू ह्यांना सर्वसामान्य वाचकांपर्यंत व्यवस्थित पोहचविण्यात हे दैनिक तसे कमीच पडले आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनात हिंदुत्व कसे आचरणात आणायचे ह्याविषयी वाचकाची क्षुधा समाधानकारक पणे भागविली जात नाही. भारतात हिंदी राष्ट्रवादाचा प्रचार गेली १३७ वर्षे चालू आहे. राजकीय, सामाजिक आणि वैचारिक पातळीवर संपूर्ण शासकीय सहकार्याने हा प्रचार चालू आहे. ह्या प्रचाराचे जनतेच्या मानसिकतेवर झालेले बरेवाईट परिणाम ह्याची मोजदाद न करता म्हणजे आत्मपरीक्षण न करता हा प्रचार

चालू आहे. जगातील प्रत्येक सहावा माणूस हिंदू आहे. भारत हा हिंदू बहुसंख्यांकांचा देश आहे. प्रदीर्घ इस्लामी शासनकाल भोगूनही इस्लाम धर्मीयांना बहुसंख्यांक होऊ न देणारा जगातील हा एकमेव देश आहे. तथापि हिंदू बहुसंख्यांक असले तरी ते राजकीय दृष्ट्या हिंदून राहता हिंदी झाले आहेत आणि त्यामुळे ह्या देशाच्या अखंडतेवर, एकात्मतेवर आणि सार्वभौमत्वावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे असे अनेक टीकाकारांचे मत आहे. त्यामुळे हिंदी झालेल्यांना राजकीय दृष्ट्या पुन्हा हिंदू करणे हे कोणत्याही हिंदुत्वनिष्ठ चळवळीचे प्रधान उद्दिष्टअसले पाहिजे. हिंदू करणे म्हणजे हिंदुहिता विषयी आणि अर्थातच राष्ट्रहिताविषयी जागरूक करणे. हिंदुहित आणि राष्ट्रहित समान आहे हा विश्वास सामान्य माणसाच्या मनात जागविणे. त्यासाठी हिंदुत्वाच्या अनेकविध पैलूंची सतत चर्चा होत राहून हिंदू विचाराने सामान्य माणसाचे व्यक्तिमत्व उजळून टाकायचे हे हिंदुत्वनिष्ठ वर्तमानपत्राचे मुख्यकार्य म्हणजे मिशन पाहिजे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की हिंदु राष्ट्रवादाचा प्रचार केवळ ३७ वर्षे झाला आहे. सावरकरांनी १९३७ ते १९४० अशी चार वर्षे आणि १९८९  पासून वाजपेयी, अडवाणी आणि ठाकरे ह्यांनी आजपर्यंत म्हणजे ३३ वर्षे केलेला प्रचार. थोडक्यात १३७ विरुद्ध ३७ असे हे विषम युद्ध आहे. ह्या जाणिवेने हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी आपल्या यंत्रणा सचेत केल्या पाहिजेत. त्यादृष्टीने झालेली वाटचाल पाहता ’सामना’ तितका सचेत आणि संपूर्ण वाटत नाही.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोखले, टिळक, आगरकर, जांभेकर, लोकहितवादी, भाऊ महाजन, लिमये, गद्रे, कोल्हटकर, प्रबोधनकार ठाकरे, न. चिं. केळकर, काळकर्ते परांजपे, श्री. म. माटे, ज्ञानकोशकार केतकर, बाबासाहेब आंबेडकर, विवेकानंद, योगी अरविंद अशा अनेक नेत्यांनी आणि पत्रकारांनी हिंदुत्वाच्या अनेक विशेषांवर लेखन केले आहे. शिवाजीचे चरित्र प्रसंगा प्रसंगाने वारंवार सांगत राहणे आणि त्यातील तात्पर्य वाचकांच्या मनावर बिंबविणे म्हणजे हिंदुत्वाचा मूलगामी प्रचार

करणे होय. ह्यापासून दै. सामना बराच अलिप्त राहिलेला दिसतो. शिवाजीचा राष्ट्रवाद ह्या मातीतून निर्माण झाला असला आणि म्हणून तो देशी असला तरी आम्हाला त्याहून विशाल राष्ट्रवाद आकारास आणायचा आहे असे पं नेहरूंनी डिस्कव्हरी ऑफ इंडियामध्ये म्हटले आहे. त्यावर एकदा तरी साधकबाधक चर्चा व्हायला हवी होती. एकाही हिंदूला फाळणी नको असतांना ती कशी झाली असा प्रश्न विचारायला आणि त्याचे उत्तर शोधण्यासाठी धावपळ करायला वाचकाला उद्युक्त करणे हे खरे म्हणजे कोणत्याही वर्तमानपत्राचे काम असले पाहिजे. हिंदुत्वनिष्ठ वृत्तपत्राचे तर ते मिशन असले पाहिजे. दुर्दैवाने आपल्याकडे अनेक चळवळींच्या संस्थापकांना प्रेषिताचा आविर्भाव लगडलेला पाहावयास मिळतो. जसा आपण नवे राष्ट्र निर्माण केल्याचा काँग्रेसचा दावा आहे आणि त्यामुळे १८८५ च्या आधीच्या ऐतिहासिक प्रवाहांचा अभ्यास करायला पाहिजे ह्याची त्यांना निकड वाटत नाही. श्रीधर व्यंकटेश केतकर लोकमान्य टिळकांकडे ज्ञानकोशासाठी लेख मागायला गेले तेव्हा लेख देण्याचे मान्य करून आपला शब्द अंतिम मानू नका ,आपले लेख दुस–या विद्वानांकडे तपासण्यासाठी द्या असे त्यांनी नम्रपणे विनविले होते. सावरकरही आपले साहित्य सापेक्ष आहे असे सांगत असत. दुर्दैवाने आपल्याकडे राजकीय आणि बौद्धिक नीतिमत्तेच्या क्षेत्रात टिळक सावरकरांपेक्षा गांधींचा प्रभाव अधिक घट्ट दिसतो. शिवसेनेच्या पक्षवाढीच्या आणि सत्तासंपादनाच्या हालचाली आणि ह्यात अडथळा म्हणून येणा–या विरोधकांवर रस्त्यावरील भाषेत केलेली टीका असा परीघ ह्या दैनिकाने आपल्या भोवती आखून घेतला होता नि आहे असे म्हणावेसे वाटते. त्यामुळे हिंदुत्वावरील सर्वांगीण आणि विधायकर्चेचे राष्ट्रीय किंवा व्यापक असे स्वरूप दै. सामनाला मिळाले नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने पूर्णपणे जनतेच्या सहकार्यातून दैनिक मराठा ह्या वर्तमानपत्राला जन्म दिला हे दैनिक त्या चळवळीची तोफ होते. आचार्य अत्र्यांसारखा

अत्यंत प्रतिभा संपन्न साहित्यिक आणि पत्रकार ह्या दैनिकाचा संस्थापक आणि संपादक होता. पण त्यांनाही आदर्श वृत्तपत्राचे स्वरूप ' मराठा 'ला देता आले नाही. कोणाचे ना कोणाचे तरी थोबाड फोडणारे एका महान शब्द प्रभूचे खासगी मतपत्र असेच स्वरूप पुढे ह्या दैनिकाला प्राप्त झाले. तात्यासाहेब केळकर केसरीचे संपादक असतांना त्यांनी सतत १८ वर्षे गांधीवादाचे वैचारिक आक्रमण थोपवून धरीत आणि टिळकांचे प्रतियोगी सहकारितेचे राजकारण मांडत रहात मराठी पिंडाचे, शिवाजी बाण्याचे आणि गीताधर्म उपदेशांणारे वृत्त अणि लेख ज्यात आहेत असे वर्तमानपत्र सादर केले. एका अर्थाने ते पक्षीय वृत्तपत्र होते पण वाचकांची ज्ञान संपादन करण्याची भूक भागविण्यात ते कोठेही कमी पडले नाही. मूल मांडीवर असल्यावर आईला जसा पान्हा फुटतो तसे संपादकाच्या खुर्चीवर बसल्यावर वाचकाला किती देऊ आणि काय काय देऊ असे केळकरांना होई असे श्री. म. माट्यांनी त्यांच्यावरील एका लेखात लिहिले आहे. केसरी साप्ताहिक होते पण ते वाचल्यावर महाराष्ट्र, भारत आणि जग येथील राजकीय घडामोडींचा अन्वय आणि अर्थ वाचकाला यथार्थपणे अवगत होत असे. अन्य क्षेत्रांशीही त्याचा व्यवस्थित संपर्क होत असे. प्रौढ भाषेच्या सहवासाने त्याचे व्यक्तिमत्व काहीसे उन्नत होत असे. असे संयुक्त योगदान मराठा आणि सामना ह्या दैनिकांना करता आले नाही.

बाळासाहेब ठाकरे सामनाचे संस्थापक आणि संपादक ह्या वर्तमानपत्राचे पहिले दोन कार्यकारी संपादक श्री. अशोक पडबिद्री आणि श्री. संजय राऊत ह्यांनी आपण हिंदुत्वनिष्ठ असल्याचा दावा कधीही केलेला नाही. आपल्याला 'सामना' ही हिंदुत्वनिष्ठ बनवायचा नाही असे संजय राऊत ह्यांनी माझ्याशी बोलतांना एका समारंभात अनेक पत्रकारांच्या उपस्थितीत प्रक्टपणे घोषित केले आहे हे दोघे असलेच तर हिंदुत्व विरोधक किंवा सौम्य भाषेत बोलायचे तर कसलाही अभ्यास न करता फ़ॅशन किंवा सवय म्हणून टीकाकार होते. पत्रकार म्हणूनही ते विशेष नव्हते.

विशिष्ठ विषयाचा व्यासंग, भाषाप्रभुत्व, बातमी मिळविण्याच्या दृष्टीने विश्वसनीय लोकसंपर्क आणि मुख्य म्हणजे ध्येयवाद हे त्यांच्या चरित्रात आणि चारित्र्यात शोधावे लागत होते. पत्रकाराची म्हणून नीतिमत्ता असते  सगळ्यांची सारखी असतेच असे नाही. पण एक विशिष्ठ स्तर असावाच लागतो.  तुम्ही सज्जनांना जवळचे वाटता की दुर्जनांना ह्यावर तुमची विश्वसनीयता ठरते. ह्या विषयात ह्या दोघांना बरेच काही कमवायचे राहून गेले आहे असे म्हणावेसे वाटते.

पक्षीय वृत्तपत्रांना जगण्यासाठी आवश्यक तेव्हढा खप नेहमी मिळतोच असे नाही. दै. सामना भाग्यवान दिसतो. त्याला सुरवातीपासून केवळ जगण्यासाठीच नव्हे तर टाकटुकीने संसार करण्याइतका वाचकांचापुरेसा खप प्राप्त झाला. पण त्याहून अधिक वाचकांचा लोभ मुंबईच्या दै. नवा काळने मिळवून दाखविला कोणत्याही संघटनेचे पाठबळ नसतांना संपादक आणि धनी नीलकंठ खाडिलकर ह्यांनी वाचकवर्ग निश्चित करून आणि त्याच्या आवश्यकतांना सर्वतोपरी प्राधान्य देऊन लाखाच्या वर खप नेला. सामना 'शिवसैनिकांनी शिस्त म्हणून पैसे टाकून वाचायचे ठरविले. त्यामुळे शिवसेनेची संघटना म्हणून ती बाजू भक्कम झाली. पण 'सामना' हे शिवसैनिकांचे बौद्धिक हत्यार कधी झाले नाही. शिवसैनिकांनी संघटनेचे आणि लोकांचे प्रश्न बाहुबलाने सोडविण्यावर भर दिला. प्राचीन काळापासून खंडनमंडन पद्धतीने म्हणजे वादविवाद करीत हिंदू विचाराचा प्रसार झाला. ती परंपरा लोकशाही बळकट करणारी आहे. वर्तमानपत्र म्हणून 'सामना' ने ह्या परंपरे विषयी आस्था दाखवायला हवी होती. शेषराव मोरे आणि मुजफर हुसेन ह्या सारखे हिंदुत्व आणि इस्लामी मानसिकता ह्या विषयावरचे जाणकार लेखक ह्यांचे नियमित लिखाण काही काळ ह्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत असे. पण ह्या लेखांमधील आशय ही 'सामना'ची प्रकृती कधी झाली नाही. वसंत गडकर नावाचे ज्येष्ठ पत्रकार 'सामना 'च्या संपादक मंडळात होते ते मध्यपूर्वेतील राजकारणाचे संदर्भात संपादकीय पृष्ठावर

स्फुटे लिहीत असत. त्यात अभ्यास असे, दृष्टी असे आणि ताजेपणा असे, वाचनीय असे ते लेखन होते. तुमच्या संपादक मंडळात ते कोणी वाचतो का असा प्रश्न विचारल्यास गडकर सभ्य असल्याने उत्तर देण्याचे टाळत आणि विषय बदलत. महाराष्ट्राने ठाकरे ह्यांच्यावर प्रेम केले. त्या प्रेमाचे उतराई होण्याची फार मोठी संधी ह्या दैनिकाला प्राप्त झाली होती. राष्ट्रासाठी आणि हिंदुत्वासाठी जगतो तो मराठी माणूस हा संस्कार करणारे लेखन ह्या दैनिकातून ओसंडून वाहायला हवे होते. मराठी माणसाची ती भूक होती आणि तसे संस्कार झाले असते तर मराठी माणसाचे व्यक्तिमत्व पुष्कळसे बदलले असते.

बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार होते. वक्ते होते. लेखक नव्हते. सामनाला जेव्हढी वर्षे झाली तेव्हढ्या ओळीही त्यांनी ह्या दैनिकात कधी लिहिल्या नसतील. त्यांना अभिव्यक्त व्हायचे असेल तर कार्यकारी संपादकाला बोलावून त्याला मुलाखत देत आणि ती छापून येई. संपादकाच्या त्याच्याच वृत्तपत्रात मुलाखती हा सामनाने मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात पाडलेला पायंडा होय. आता त्याच निष्ठेने शरद पवार ह्यांच्या मुलाखती ’सामना ’त छापून येतात.

### ❖ श्री. नरेंद्र विश्वनाथराव वाबळे:

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर, दि. २३ जानेवारी, १९८९ रोजी मध्यरात्री शिवसेनेचे मुखपत्र यसामना’ सुरू झाले. शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभ हस्ते शिवतीर्था समोरील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात थाटामाटात सामनाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना बाळासाहेब ठाकरे म्हणाले की, हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी आणि दररोज होणा-या आरोपांना उत्तर देण्यासाठी यसामना’ हे नवे शस्त्र असेल आणि

उद्या पाळी आली तर आम्हाला ख-या शस्त्रालाही हात घालावा लागेल. सामना'चा पहिला अग्रलेख होता, या असे सामन्याला.'' या अग्रलेखात सामना सुरू करण्यामागची भूमिका स्पष्ट करण्यात आली होती.

आज या घटनेला तेहतीस वर्षे झाली. सामना'चे पहिले कार्यकारी संपादक होते ज्येष्ठ पत्रकार अशोक पडबिद्री. त्यानंतर काही दिवसातच तरुण पत्रकार श्री. संजय राऊत यांच्यावर बाळासाहेबांची नजर पडली.ते बाळासाहेबांच्या नजरेत भरले. बाळासाहेबांनी त्यांची कार्यकारी संपादकपदी नियुक्ती केली. सुरुवातीला केवळ पत्रकारिता करणारे राऊत नंतर बाळासाहेबांच्या आशीर्वादाने खासदार झाले. शिवसेनेचे प्रवक्ते झाले. खासदार म्हणून त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात जाण्याची संधी होती. बाळासाहेब आणि उद्धवजी या दोघांचाही विश्वास त्यांनी संपादन केला होता. पण सामनाचे कार्यकारी संपादकपद सोडून त्यांना मंत्रीपद नको होते. म्हणूनच त्यांनी सामनाला आणि सामनाने शिवसेनेला वाहून घेतले. बाळासाहेबांनी एक शस्त्र म्हणून सामना सुरू केला. बाळासाहेबांचा तो शब्द पदोपदी खरा करून दाखविण्याचे काम सामनाने केले. केवळ शिवसैनिकच नव्हे तर शिवसेनेचे विरोधक देखील बाळासाहेबांची आणि शिवसेनेची भूमिका जाणून घेण्यासाठी सामना वाचू लागले. वास्तविक कोणत्याही पक्षाचे मुखपत्र हे त्या पक्ष कार्यकर्त्यांत देखील लोकप्रिय नसते. सर्वसामान्य जनतेची तर बातच सोडा. पण सामना त्याला अपवाद ठरला. तो तळागाळात लोकप्रिय झाला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या संजय राऊत यांनीघेतलेल्या मुलाखतींच्या मालिकांनी तर कधी बाळासाहेबांच्या ठाकरी भाषेतील संपादकीयामुळे सामना गाजू लागला. राऊत यांचे रविवारचे रोखठोक हे सदर तर सामनाच्या प्रतिमेला साजेसेच ठरले आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत शिवसेनेच्या विरोधकांना रोखठोक भाषेत सुनावण्याचे काम सामनाने सतत केले आहे.

वर्तमानपत्रातील अग्रलेख, मग ते कितीही मोठे असो, फक्त त्या वर्तमानपत्रांतच प्रसिद्ध होतो. पण शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनाची बातच काही और आहे. सामनाचे अनेक अग्रलेख देशभरातील वर्तमानपत्रांतील मुख्य मथळे बनून दुस–या दिवशी प्रसिद्ध झाले आहेत. हेच सामनाचे आणि शिवसेनेचे मोठे यश आहे. देशात विविध पक्षांची मुखपत्रे आहेत. त्यात त्यांच्या पक्षांची भूमिका मांडणारे लेख आणि अग्रलेख प्रसिद्ध होत असतात. पण त्या लिखाणाची छोटी बातमी देखील कोठे येत नाही. जे भाग्य सामनाला लाभले ते इतर मुखपत्रांना कधी लाभले नाही. शिवसेनेच्या वाढीमध्ये सामनाचा निश्चितच सिंहाचा वाटा आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जशी आचार्य अत्रे यांनी मराठामधील आपल्या धारदार लेखणीने यशस्वी केली तशीच शिवसेनेची हिंदुत्वाची चळवळ बाळासाहेबांनी सामना या शस्त्राद्वारे यशस्वी करून दाखविली. मंत्रालयावर भगवा फडकवून दाखविला. त्यांच्या पश्चात त्यांचे कर्तबगार चिरंजीव मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ही परंपरा पुढे चालविली आहे. शिवसेनेकडे सामना नावाचे मुखपत्र नसते तर शिवसेनेला मिळालेले घवघवीत यश कोठेतरी आटले असते. पण सामनामुळे एक आग ओकणारी तोफ शिवसेनेला लाभली. या तोफेने शत्रूपक्षाच्या छातीत वारंवार धडकी भरविली. म्हणूनच शिवसेनेचा दरारा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशात कायम राहिला. शिवसेनेचे यश हे एकाअर्थी दैनिक सामनाचे देखील यश आहे.

### ❖ श्री. प्रकाश जोशी:

सामनाचा जन्म साप्ताहिक मार्मिकमधूनच झाला. सुरूवातीच्या काळात १९७० च्या दशकात बाळासाहेब ठाकरे हे मार्मिकमधून व्यंगचित्रे व लेखातून मराठी जनतेशी संवाद साधत होते. तेव्हा राजकारण कमी आणि समाजकारण जास्त यावर त्यांचा भर होता. मराठी जनतेचे प्रश्न मांडून त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरोधात

आवाज उठविण्याचे ते आपल्या लेखणीतून आणि भाषणांतून काम करीत होते. ठाकरेंच्या आक्रमक भूमिकेचे मराठी जनतेला आकर्षण वाढू लागले. त्यातून मराठी भाषिक हे शिवसेनेच्या झेंड्याखाली एकत्रित झाले. जशी शिवसेना वाढू लागली, पक्षाचा विस्तार होऊ लागला तेव्हा मार्मिक पक्षाला कमी पडू लागला. पक्षाला व ठाकरेंना दैनिकांची गरज भासू लागली. मार्मिक हे साप्ताहिक असल्याने शिवसेनाप्रमुखांची भूमिका समजण्यासाठी आठवडाभर वाट बघाली लागत असे. मुंबईतील अन्य वृत्तपत्रे शिवसेनेला फारशी साथ देत नव्हते उलट शिवसेनेच्या परप्रांतीय विरोधी धोरणांवर बहुतेक माध्यमे कठोर टीका करीत असत. म्हणूनच शिवसेनेला आपल्या हक्काच्या दैनिकाची नितांत गरज भासू लागली.

शिवसेनेने निवडणुकीच्या राजकारणात भाग घेण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून म्हणजे १९८० च्या दशकाच्या सुरूवातीपासूनच आपले दैनिक वृत्तपत्र हवेच अशी शिवसेना प्रमुखांची धारणा बनली.

मुंबई महानगरात आणि कोकणात शिवसेना म्हणजे सामना व सामना म्हणजे शिवसेना हे समिकरण बनले आहे. सामना हे शिवसेनेचे केवळ मुखपत्र नव्हे तर शिवसेनेचा तो अविभाज्य भाग आहे. मुंबई, ठाणे हा शिवसेनेचा वर्षानुवर्षे गड राहीला आहे. पण मुंबईनंतर शिवसेनेचा विस्तार झाला तो मराठवाड्यात. मराठवाडा विद्यापीठ नामांतरला शिवसेनेने जो विरोध दर्शवला त्यातून शिवसेना मराठवाड्यात वाढली. सामनाची औरंगाबाद आवृत्ती सुरू झाली. जशी शिवसेना वाढली तसा सामनाचा दबदबा आणि खपही वाढला. म्हणूनच शिवसेना व सामना हे परस्परांना पूरक आहेत व दोघांना ते लाभदायक ठरले आहे.

सामनाची जळजळीत व आक्रमक भाषा ही शिवसेनेला साजेशी असते. शिवसेना प्रमुखांची ठाकरी भाषा ही सामनाने आत्मसात केली आहे. त्यामुळे सामनाचा प्रभाव

वाढण्यास मदत झाली. सामना शिवसेनेच्या बातम्या, भूमिका, ध्येय धोरणे, निर्णय, संघटनात्मक नेमणुका मांडत असतोच. पण अन्य राजकीय पक्षांच्या बातम्यांचीही दखल घेतो. आपले वृत्तपत्र शिवसेनेचे मुखपत्र आहे म्हणून इतर पक्षांच्या किंवा विरोधकांच्या बातम्या दाबण्याचा सामना प्रयत्न करीत नाही. विरोधकाचा समाचार घेताना सामना शिवसेना स्टाइल नेत्याची दखल घेतो हे वारंवार बघायला मिळते. काँग्रेस पक्षाचे, डाव्या पक्षांचे किंवा समाजवादी विचाराचे लोक शिवसेनेवर टीका करतील पण आवर्जून सामना वाचतील असे चित्र आहे. शिवसेनेच्या वाटचालीत सामनाची भूमिका निश्चितच महत्वाची आहे. शिवसेनेच्या विस्तारात व सत्ता प्राप्त करण्यात सामनाचा वाटा मोठा आहे.

### ❖ श्री. प्रकाश कुलकर्णी:

शिवसेनेच्या स्थापनेनंतर तेवीस वर्षांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सामना हे दैनिक वृत्तपत्र मुंबईतून सुरू केले. सामनाविषयी लोकांना मोठी उत्सुकता होती आणि आकर्षणही होतेच. सामना सुरू होताना मुंबईत सर्वत्र मोठ मोठी होर्डिंग्ज लागली होती व त्यावर दैनिक नव्हे सैनिक अशी घोषणा रंगवलेली होती. त्यामुळे सामना हे वृत्तपत्र हे शिवसेनेप्रमाणेच आक्रमक व आवेशपूर्ण असणार हे शिवसेना प्रमुखांनी जाहीरच करून टाकले.

सामनाचे संपादक बाळासाहेब ठाकरे हे स्वत: होते व कार्यकारी संपादक पदावर त्यांनी अशोक पडबिद्री यांची नेमणूक केली. अशोक पडबिद्री हे काही शिवसैनिक नव्हते किंवा शिवसेनेच्या विचारसरणीचे नव्हते. ते समाजवादी विचाराचे होते. पण पत्रकार म्हणून ते मोठे होते. लोकसत्तामध्ये ते अगोदर मुख्य उपसंपादक होते व नंतर वृत्तसंपादक झाले. पत्रकार म्हणून सर्व पक्षात त्यांचे उत्तम राजकीय संबंध होते.

त्यांच्यातला धाडसी पत्रकार व आक्रमक भाषेतून लिहिणारा पत्रकार हेरूनच ठाकरे यांनी त्यांची सामनाचे पहिले कार्यकारी संपादक म्हणून निवड केली.

पडबिद्री यांनी सामनाची कार्यकारी संपादकपदाची सूत्रे हाती घेतल्यावर शिवसैनिकांना सामना कार्यालयात येण्यास मज्जाव केला. पक्षाचे कार्यालय वेगळे आणि वृत्तपत्राचे कार्यालय वेगळे हा त्यामागचा हेतू होता. सामनामध्ये शिवसैनिकांची वर्दळ सुरू झाली तर रोजचे काम करणे अशक्य होईल याची कल्पना पडबिद्री यांना होती. पडबिद्री यांनी सामना वाचकप्रिय होईल यासाठी भरपूर कल्पना राबवल्या. पक्षाची ध्येय–धोरणे व भूमिका सामनात नियमित येत असतेच. पण असा पुजिला गौरीहार हे नवे सदर पडबिद्री यांनी सुरू करून मोठ मोठ्या नेत्यांच्या सौभाग्यवतींना त्यात लिहिण्यासाठी सहभागी करून घेतले. ते सदर खूपच लोकप्रिय झाले होते.

पडबिद्रींनंतर संजय राऊत हे सामनाचे कार्यकारी संपादक झाले. ते शिवसेनेच्या विचाराचे होतेच पण हाडाचे शिवसैनिकच होते. सामनापूर्वी ते लोकसत्ताचे भावंड असलेल्या साप्ताहिक लोकप्रभामध्ये काम करीत होते. पडबिद्रींच्या काळात सामना केवळ पक्षाचे मुखपत्र म्हणून चालवला गेला नाही तर सर्व वाचकांसाठी हे दैनिक असावे अशी संकल्पना त्यांनी राबिवली. सामनामध्ये कधी महत्वाची बातमी चुकत नसे. जरी शिवसेनेचे मुखपत्र असले तरी अन्य पक्षांच्या बातम्याही सामना आजही प्रसिध्द करतो. पडबिद्रींनी सामनाचा पाया भक्कम घातला त्याचा विस्तार संजय राऊत यांनी केला. संजय राऊत यांची लेखणी आक्रमक आहेच पण त्यांना बाळासाहेब ठाकरे यांना विशेष प्रेमही लाभले. नवशक्ति, तरूण भारत, विशाल सह्याद्री अशी काही राजकीय पक्षांच्या मुखपत्रांची नावे सांगता येतील पण काळाच्या ओघात ती वृत्तपत्रे दुर्बल झाली. त्या त्या राजकीय, पक्षांची मुखपत्रे म्हणून ती

यशस्वी ठरली असे म्हणता येत नाही. सामना मात्र रोज वाजत गाजत येतो हे वास्तव आहे.

मुखपत्रामुळे राजकीय पक्ष वाढतो असे ठामपणे म्हणता येणार नाही. त्यासाठी पक्षाची केडर व पक्षाचे काम महत्वाचे असते. काँग्रेस पक्षाने देशावर साठ वर्षे सत्ता गाजवली पण त्याचे श्रेय काँग्रेसचे मुखपत्र असलेल्या नॅशनल हेराल्डला कोणी देत नाही. नॅशनल हेराल्डमुळे काँग्रेस वाढली किंवा काँग्रेसला लाभ झाला असे कोणीच म्हणत नाही. नॅशनल हेराल्डमुळे पं. नेहरू मोठे झाले असेही कुणी म्हणत नाही. पण नॅशनल हेराल्ड्मुळे यशपाल कपूर मोठे झाले हे सत्य आहे.

तसेच शिवसेनेबरोबर सामना वाढला असे माझे मत आहे. शिवसेनेच्या विस्तारात केवळ सामनाचे योगदान आहे असे म्हणता येणार नाही. मुंबईतील सर्वच वृत्तपत्रांचे योगदान आहे. शिवसेनेच्या भूमिकेला किंवा आंदोलनांना मुंबईतील वृत्तपत्रांनी वेळोवेळी भरपूर व ठळक प्रसिध्दी दिली आहे. शिवसेना ही मुंबईची व मुंबईकरांची गरज आहे म्हणून प्रत्येक निवडणुकीत मुंबईकरांचे लक्षणीय मतदान शिवसेनेला होते. शिवसेनाप्रमुखांनीही सामनातून त्यांच्या राजकीय शत्रूंवर बेलगाम ठाकरी भाषेत टीका अनेकदा केली पण मिडियाच्या कोणा मालकांवर किंवा संपादकांवर त्यांची नावे घेऊन वाट्टेल तसे आरोप केले नाहीत.

सामना हे शिवसेना विरोधकांना झाडणारे प्रभावी हत्यार आहे. लोकसत्ता सेनेच्या विरोधात बातम्या देतो म्हणून तो पेपर वाचू नका असे ठाकरेंनी आवाहन केल्यावर अनेक वर्षे असंख्य शिवसैनिक लोकसत्ता वाचत नव्हते. पण दुसरीकडे हजारो कट्टर शिवसैनिक आजही सामना वाचत नाहीत. मात्र सेनेच्या प्रत्येक शाखेवर सामना हमखास दिसणार. तो त्यांना पुरेसा वाटतो. आपल्या मुखपत्रापेक्षा कट्टर शिवसैनिक हा शिवसेनेचा आधार आहे. सामनाचा विस्तार व्हावा किंवा त्याचा खप वाढावा

म्हणून सेनेच्या कोणाही नेत्यांनी ठोस प्रयत्न केलेत असे कधी दिसले नाही. बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाल्यावर त्यांचे नाव सामनावर संस्थापक संपादक असे प्रसिध्द होऊ लागले. सुरूवातीला उद्धव ठाकरे हे संपादक झाले. ते राज्याचे मुख्यमंत्री झाल्यापासून रश्मी उद्धव ठाकरे यांचे नाव संपादक म्हणून सामनावर झळकू लागले.

❖ **वैजयंती आपटे:**

सामना हे वृत्तपत्र १९८९ साली सुरू झाले. खरे तर वृत्तपत्र सुरू करण्यामागे बाळासाहेबांचा एकच हेतु होता. त्यावेळी शिवसेनेच्या बातम्या इतर वृत्तपत्र फारश्या छापत नसत. छापल्या तरी त्यात सेनेवर भरमसाट टीका असे. तथाकथित पुरोगामी विचारांचे संपादक, बाळासाहेब आणि शिवसेनेवर कडाडून टीका करत. त्यातच महानगर वृत्तपत्राचे तेव्हाचे संपादक निखिल वागळे ह्यांनी तर शिवसेनेला लक्ष्य केले होते. रोज बाळासाहेबांवर टीका केल्याशिवाय त्यांचा दिवस जात नसे. त्या वेळी तर बाळासाहेबांनी जाहीर पणे सांगितले होते की महानगरमध्ये आमच्या बातम्या छापू नका. पण महानगर हे सायंकाळचे वृत्तपत्र असल्याने रोजच्या हेडलाइनवरच त्या वृत्तपत्राचा खप अवलबून असे.

त्यामुळे शिवसेनेवर बहिष्कार टाकणे त्या वृत्तपत्राला परवडणारे नव्हते. तर असे बाळासाहेब आणि वृत्तपत्र आणि पत्रकार ह्यांचे संबंधींणले गेले होते. अशातच साहेबांनी शिवसेनेचे मुखपत्र म्हणून सामना सुरू केला. त्यावेळी बाळासाहेबांसमोर आचार्य अत्र्यांच्या मराठाचा आदर्श होता. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी, अत्र्यांनी जसे मराठातून नरणशिंग फुंकले होते, तसाच सामनाचा वापर आपले विचार मांडण्यासाठी करण्याचा उद्देश त्या मागे होता. १९८५ मध्ये मुंबई महापालिकेत शिवसेनासत्तेत आली १९९०च्या लोकसभा आणि नंतर येणार्या विधानसभा

निवडणुका युतीनेच लढवण्याचे बाळासाहेबांनी ठरवले होते. त्यासाठी आपल्या स्वत:च्या वृत्तपत्राचा वापर करण्याचे साहेबांनी ठरविले. त्रुरूवातीला अशोक पडबिद्री ह्यांना संपादक म्हणून नेमले गेले. मुखपत्र म्हणून रोज शिवसेनेच्या शाखांच्या बातम्या त्यात छापून येऊ लागल्या बाळासाहेब स्वत:एक पत्रकार होते. रोज ते सकाळीच ईीर वृत्तपत्र वाचून त्या दिवशीच्या अग्रलेखाचा विषय ठरवत असत. ते स्वत: जातीने लक्ष घालत. स्वत: अग्रलेख लिहीत असत. कित्येकदा लेखनिकला डिर्क्टें करत असत. विविध विषयांवर पक्ष्याची भूमिका मांडत असत. अेूकवेळा शिवसैनिकाना त्यात आदेश असे, किंवा आंदोलनाचा नारा असे. त्राहेबांचा सामनातील आदेश शिरसावंद्य मानून शिवसैनिक त्याचे पालन करत. व्यंगचित्रे हा तर सामनाचा आत्मा असे. सुरुवातीच्या काळात बाळासाहेब स्वत: व्यंगचित्रे काढत. नंतर राज ठाकरे ही व्यंगचित्रे काढत.

संजय राऊत ह्यांना जरी नंतर सामनाचे संपादक म्हणून नेमण्यात आले तरी ही बाळासाहेबांचे पूर्ण लक्ष होते. आक्रमक, शिवराळ ठाकरी भाषा हे सामनाचे वैशिष्ट्ये मानले जात होते. विशेषत: शिवसैनिकांना ही अशीच भाषा आवडत असे. सामना हा शाखा शाखांमध्ये वाचला जायचा. त्यावेळी ज्येष्ठ शिवसेना नेते सुभाष देसाई आणि राज ठाकरे हेही सामनाच्या प्रकाशनाच्या जबाबदारीत होते. उद्धव ठाकरे कधी कधी सामना कार्यालयात येत. पण बाळासाहेब गेले आणि नंतर सामनात हळूहळू बदल होत गेले. त्रंजय राऊत ह्यांना बाळासाहेबांनी राज्यसभेचे खासदार बनवले आणि त्यांची मिजास आणखीनच वाढली, आता तर सामना हे वृत्तपत्र तर नव्हतेच, आता ते मुखपत्र ही राहिलेले नाही. सतत अर्वाच्य भाषेत टीका, रोखठोकमधून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर सतत टीका, राज्यपालांच्या पदाचा आदर नाही. त्यांच्यावर ही घाणेरड्या भाषेत टीका. असे सामनाचे सध्याचे स्वरूप आहे. कोंग्रेस आणि राष्ट्रवादी ह्या दोन हिंदुत्व विरोधी पक्षांच्या मांडीला मांडी लावून बसलेल्या शिवसेनेच्या ह्या

मुखपत्रातुन काही स्वत: च्या पक्षाच्या संघटनेसाठी काही असते नका ही हिंदुत्वाच्या बाजूने लिहिली असते. त्यामुळे सध्या तरी सामना हा पेपर वाचवत नाही की हातात धरवत नाही. ऋमनाच्या सध्याच्या स्वरूपामुळे माझ्यासारख्या अनेकांनी हे वृत्तपत्र घेणे, वाचणे थांबवले आहे.

❖ **श्री. प्रमोद तेंडुलकर:**

शिवसेना शब्द उच्चारला की पहिल्यांदा शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे डोळ्यांसमोर येतात. मग हळूहळू शिवसेनेची वाटचालही. शिवसेना, शिवसैनिक व सामना यांचे नाते परस्परांना पूरक असेच आहे. या छोटेखानी लेखात शिवसेनेच्या वाटचालीचा संपूर्ण तपशील तसेच शिवसेनेच्या विस्तारामध्ये अनेक नेत्यांचे व शिवसैनिकांचे योगदान आहे, हे मान्यच. पण त्या सर्वांचा नामोल्लेख करणे लेखाच्या शब्द मर्यादेमुळे शक्य होणार नाही. शिवसेनेच्या स्थापनेनंतर महागाई विरोधी व परप्रांतीयांविरोधातील आंदोलने, रक्तदान शिबिरे, स्थानिकांना नोकरीत प्राधान्य यासाठी उठविलेला आवाज, कामगार संघटना, युवासेना यांच्या माध्यमातून कार्य करीत शिवसेना घराघरात पोहोचली. अडीअडचणीला शिवसैनिक धाऊन येतो असा अनुभव लोकांना येऊ लागला आणि शिवसेनेचा विस्तार वाढू लागला. मार्मिकचा वाचक वर्ग मोठा असला तरी दै. 'सामना' सुरु झाल्यावर रोजच्या रोज शिवसेनेचे कार्य मतदारांपर्यंत पोहोचू लागले. दै. 'सामना' चे कार्यकारी संपादक पद संजय राऊत यांनी स्वीकारल्या नंतर त्यांच्या 'रोखठोक' शैलीमुळे त्यांचा एक वाचकवर्ग निर्माण झाला. या सर्वांचा परिपाक म्हणून दोन दशकांहून अधिक काळ मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेचे वर्चस्व आहे. महाराष्ट्रात १९९५ ला शिवसेना–भाजप युतीचे सरकार आले. त्यानंतर युतीचे सरकार आले २०१४ साली मधल्या काळात काँग्रेस–शिवसेना युती होती. या निवडणुकीनंतर देशभर माननीय पंत्रप्रधान नरेंद्र

मोदीजी व माननीय अमितजी शहांचा बोलबाला झाला. संपूर्ण देश मोदीमय झालाय असे भाजपला वाटू लागले. काही अंशी ते खरेही होते त्यानंतर सहा महिन्यांनी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणूका झाल्या जागा वाटपात मोठा भाऊ कोण हे ठरविता न आल्याने युती तुटली. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे यांनी युतीत २५ वर्षे सडली अशी घणाघाती टीकाही केली. भाजपाला १२२ जागा (१९९९ नंतर शिवसेनेतील अनेक मोठे नेते शिवसेना सोडून गेल्यावर आणि माननीय बाळासाहेब हयात नसताना) आणि शिवसेनेला ६३ जागा मिळाल्या. खरे तर स्वतंत्रपणे लढून मिळविलेले हे यश होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने मंत्रिमंडळ बनवले. शिवसेनेने विरोधी पक्षाची भूमिका स्वीकारली आणि कालांतराने शिवसेना मंत्रिमंडळात सहभागी झाली. अगोदर एकमेकांविरुद्ध निवडणूक लढवली. प्रथम विरोधी पक्षाची भूमिका नंतर मंत्रिमंडळात सहभागी होणे हे पक्ष विजयासाठी अविरत परिश्रम करणा–या शिवसैनिकाला किंवा शिवसेनाप्रेमींना थोडे धक्का देणारे होते. परंतू पक्षप्रमुखांनी दिलेला आदेश पाळणे हे कर्तव्य शिवसैनिकांनी अंगी बाणवून घेतले आहे. हे पाहता आक्रमकतेसाठी प्रसिद्ध असलेल्या शिवसेनेने दोन पावले मागे येऊन प्राप्त परिस्थितीत तडजोड स्वीकारली असावी व मंत्रिमंडळात सामील होण्याचा निर्णय घेतला असावा. परिस्थितीनुसार राजकारणात निर्णय घेतले जातात. माननीय उद्धवजीनी दिलेला शब्द पाळल्यामुळे पाच वर्षे युतीचे सरकार टिकले. पण 'सामना' मधून वेळोवेळी भाजप पक्षावर व भाजप नेत्यांवर सडकून टीका चालूच होती. आक्रमक शिवसेना पक्षाने सरकारमध्ये सामील होण्यासाठी तडजोड स्वीकारली पण त्याच वेळी समानाने बोचरी टीका करण्याचे सोडले नाही. सर्वसामान्य जनतेच्या लक्षात हा विरोधाभास येत होता. शिवसेनापक्षा पेक्षाही 'सामना' मध्ये अधिक आक्रमक पणे प्रहार चालू होते. तेही मित्र पक्षावर. तरीही युतीच्या सरकारने कारभार चालू ठेवून मुदत पूर्ण केली. २०१९

ची लोकसभा युतीने लढवली व भरघोस यश मिळवले. २०१४ ला स्वतंत्रपणे लढून शिवसेनेला ६३ जागा मिळाल्या तर २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत युती करून शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या. भाजपला १०५ जागा मिळाल्या. निकालानंतर लोकसभा निवडणुकी पूर्वी बंद दाराआड झालेल्या चर्चेतील सत्तेतील समसमान वाटपाचा मुद्दा पुढे आला आणि ठिणग्या पडल्या. उभय पक्षांत समाधान कारक तोडगा निघू शकला नाही आणि मविआचा उदय झाला. हा भाजपप्रमाणेच मतदारांना धक्का देणारा निर्णय होता. शिवसैनिकांना ही अचंबीत करणारा निर्णय होता. राजकारणात कधीही काही होऊ शकते याची पुनःप्रचिती आली. माननीय उद्धवजी ठाकरे हे मुख्यमंत्री झाले हा शिवसैनिकांना एक भरभरून आनंद देणारा क्षण होता हे नक्कीच. राजकीय पक्षांचे वरिष्ठ पातळीवर युती, आघाडीचे निर्णय होतात. पक्षाचा आदेश कार्यकर्त्यांनी निमूटपणे शिरसावंध्य मानून काम करायचे असते. वरिष्ठ पातळीवरील नेते हा बदल सहज स्वीकारतात पण स्थानिक पातळीवर पक्षाच्या कार्यकर्त्यांना हा बदल त्वरेने स्वीकारणे कठीण जाते. हे अनेकदा दृष्टीपथात आले आहे. कार्यकर्त्यांचे हे दुःख वरिष्ठांना समजले नसेल का? बरे, कार्यकर्त्यांनी आता हा बदल स्वीकारला, पुन्हा जोमाने काम चालू केले तरीपुढील निवडणुकी अगोदर काय होईल व नंतर काय होईल याचा कार्यकर्त्यांना अंदाज येऊ शकणार नाही अशी सद्यस्थिती बहुतेक पक्षांची आहे. तशीच शिवसेनेची आहे. शिवसेनेने आघाडीबरोबर जाण्याचा घेतलेला निर्णय हा मतदारांना किती पटलंय हे सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला आणि २०२४ ची विधानसभा निवडणूक झाली की लक्षात येईल. त्यापूर्वी लोकसभेची निवडणूक होणार आहे. त्या निकालाचे परिणामही विधानसभा निवडणुकीवर होऊ शकतात. राजकीय विश्लेषकाही आशा व्यक्त करू शकत नाहीत की शिवसेना आघाडी सोबतच राहील की पुन्हा युती होईल. त्यामुळे शिवसैनिक ही भविष्यातील युती की आघाडी याविषयी संभ्रमात असू शकतात.

२०१४ ला युती तुटेपर्यंत महाराष्ट्रातील काही छोट्या पक्षांचे किरकोळ अपवाद वगळता शिवसेना–भाजप युती प्रेमी व काँग्रेस–राष्ट्रवादी आघाडी प्रेमी अशी मतदारांची सर्वसाधारण विभागणी झाली होती. ही विभागणी विचारधारेला शोभणारी किंवा पटेल अशी होती. चूक शिवसेनेची की भाजपची या चिकित्सेत जाण्यापेक्षा हे गणित कुठेतरी चुकलंय ते सुधारायला हवे, असे सर्वसामान्य युती समर्थक मतदाराला अजूनही वाटतेय. म्हणून हा युती प्रेमी मतदार आशा बाळगून आहे आणि डोळे लावून बसला आहे, भविष्यातील युतीसाठी एवढे मात्र खरे.

❖ **श्री. दीपक परब:**

साधानतः ६०–७० ह्या दशकापासून ३० वर्षे आम्ही चेंबूरच्या सुभाषनगरात रहात होतो. त्यावेळी शाळेत ८ वी – ९ वीत असताना म्हणजे मला कळू लागलं तेव्हा पासून आमच्या कॉलनीत शिवसेनेचे चांगलेच वर्चस्व होते. कॉलनीतील बहुतेक नागरिक हे मराठी भाषिक, कोकणातील आणि मुख्यत्वे कामगार क्षेत्रातील होते. शिवसेनेची स्थापना झाल्यापासून येथे सेनेचेच वर्चस्व दिसत होते. त्याला कारणीभूत तेव्हाचे कट्टर शिवसैनिक असलेले भाऊप्रधान, नंतर शाखाप्रमुख झालेले नारायण राणे, त्यांचे अत्यंत जिवलग मित्र हनुमंत परब, अरुण राणे, अविनाश डोळस, राजन प्रधान, विद्यमान आमदार सूर्यकांत फातर्पेकर अशी अनेक मंडळी आमच्या कॉलनीतील सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील घडामोडींमध्ये ही सर्व मंडळी अग्रेसर असायची. त्यावेळी आमच्या कॉलनीतील काहीजण आणि शेजारची थोडी उच्चभ्रू वस्ती येथे दाक्षिणात्य मंडळींना वास्तव्य मंडळींचे होते. शिवसेनेच्या प्रारंभीच्या काळात चेंबूर परिसरात दाक्षिणात्यांच्या विरोधातील आंदोलन खूप गाजले होते. आम्ही लिंबू–टिम्बु पोरं ही या आंदोलनात म्हणजे कुठे घोषणाबाजी करा, कुठे दगड भिरकावा, नुसती बोंबाबोंब करून दाक्षिणात्य मंडळींना घाबरवा अशा गोष्टीत पुढे

असायचो. ते करताना थोडं बहुत वाईटही वाटत होतं. पण मोठी मंडळी करतात म्हणून आम्ही ही लपून–छपून त्यास हात भार लावत होतो. मग लक्षात आलं की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्यातून रेखाटलेली 'मार्मिक' ची जागा 'सामना' वृत्तपत्राने घेतली. त्यावेळी महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता आणि रविवारी नवशक्ती दैनिक लोकांच्या घरात येत असत आणि नंतर ती एकमेकांच्या घरी वाचण्यास हक्काने नेली जात. वृत्तपत्रात छापून येणारी प्रत्येक गोष्ट किती परिणामकारक असते हे त्या वेळच्या एकूणच वातावरणातून दिसत असे. बाळासाहेबांचे चक्क आदेशच त्यावेळी सामनातून जाहीर होत असत आणि लगोलग परिसरातील वातावरण बदलून जाई. मराठी माणसावर अन्य भाषिकांकडून विशेषतः दक्षिणात्यांकडून विविध नोक-यांमध्ये कसे डावलण्यात येते किंवा विविध क्षेत्रात कसा अन्याय केला जात आहे, याला प्रथम 'मार्मिक' आणि नंतर 'सामना' तून वाचा फ्फ़ोडली जाई व आपसूकच त्यातून वातावरण निर्मिती होत जाई. बाळासाहेबांच्या काळात सुरु झालेल्या 'सामना' चे स्वरूप सर्वसामान्य शिवसैनिकांना मनोमनी भावणारे होते. सामनात आपले नाव किंवा आपल्या नावाची बातमी, आपण केलेल्या कामांची नोंद सामनाने घेतल्यास त्या शिवसैनिकांचा आनंद गगनात मावेनासा असे, हे मी पाहिलेय. शिवाजी पार्कात (शिवतीर्थ, हे नाव ही बाळासाहेबांच्या मुखावाटे बाहेर पडले आणि सामनामुळेच सर्व मुखी झाले) होणार दसरा मेळावा आणि त्यानंतर सामनात प्रसिद्ध होणारी बातमी म्हणजे शिवसैनिकांसाठी वैचारिक सोनच होते. कालांतराने आमच्या कॉलनीत सामना वाचणारे 'जहालमराठी' आणि मटा, लोकसत्ता, नवशक्ति व इतर दैनिक वाचणारे 'मावळमराठी' किंवा 'समाजवादी' अशी वर्गवारी झालेली दिसली. पण प्रामुख्याने मुंबईसह कोकण आणि राज्यात सर्वत्र शिवसेना पसरण्यास, फ्फ़ोफ्फ़ावण्यास बाळासाहेबांचा 'सामना' कारणीभूत ठरला असे ठामपणे म्हणावेसे वाटते याच

दैनिकामुळे शिवसेनेला प्रारंभी मुंबई, ठाणे महापालिकांवर भगवा फडकावता आला आणि नवीमुंबई, नाशिक, औरंगाबाद अशी घोडदौड कायम ठेवत राज्यातील सत्ताही शिवसेनेला प्राप्त झाली. विशेष म्हणजे बाळासाहेबांनंतरचा 'सामना' पहिला तर कालही तो व्यावसायिक नव्हता आणि आजही तो व्यावसायिक नक्की नाही. सामना आजही शिवसेनेचे मुखपत्र म्हणूनच ओळखला जातो. या दैनिकात प्रसिद्ध होणारी जवळजवळ प्रत्येक बातमी ही शिवसेनेसाठी कशी पोषक किंवा लाभदायक ठरू शकेल अशा त–हेने फिरविलेली म्हणजेच 'ट्विस्ट' केलेली दिसते आणि तेच त्याचे वेगळे पण आज ही कायम आहे. शिवसेनेला फायद्याच्या असणा-या प्रत्येक बातमीचे 'सामना' तून चक्क भांडवल केले जाते आणि जर एखादी बातमी 'मारक' किंवा पक्षाच्या हिताची नसेल तर जाणीवपूर्वक ती दुर्लक्षिली जाते किंवा ती पूर्णपणे आपल्या बाजूने करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आपल्या शाखाप्रमुखांनी किंवा नगरसेवकांनी, आमदारांनी, कार्यकर्त्यांनी केलेल्या कामांची बातमी लोकांपर्यंत पोहोचविण्याचे मोठे काम आजही सामनातून केले जाते. 'सामना'त बातमी किंवा नाव छापून आल्यास ते आता पक्षप्रमुख व त्यांच्या अत्यंत जवळच्या माणसांपर्यंत पोहोचल्यास त्यातून आपली पुढची पक्ष स्तरावरील कामे सहज होतील असा आज ही अनेक शिवसैनिकांचा ठाम विश्वास आहे, हे अनेक सैनिकांच्या बोलण्यातून जाणवले. याचाच अर्थ शिवसेनेच्या जडणघडणीत त्यावेळी बाळासाहेबांच्या मार्गदशनाखाली 'सामना' चा सिंहाचा वाट होता आणि आजही राज्यातील सत्तेची गणिते पूर्णपणे बदलण्यात 'सामना' चे योगदान आहे हे निश्चित. 'सामना' तून पक्षाची भूमिका व्यवस्थितपणे सर्वसामान्य शिवसैनिकांपर्यंत (जो शिवसेनेचा कणा आहे.) पोहोचविण्याचे काम आजही अविरत सुरु आहे आणि म्हणूनच 'सामना – शिवसेना हे परस्परावलंबी' आहेत हे नक्की.

## ❖ श्री. योगेश वसंत त्रिवेदी

मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. त्यांच्याबरोबर सहा वर्षांपूर्वी म्हणजे १९६० साली १३ ऑगस्टला बाळासाहेबांनी संपूर्ण व्यंगचित्राला वाहिलेले, (जगातील पहिले असं म्हटलं तरी चालेल) 'मार्मिक' हे व्यंगचित्र साप्ताहिक सुरु केलं. स्वतः उत्कृष्ट व्यंगचित्रकार असल्यानं आणि वडील प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे उर्फ दादा यांच्या मार्गदर्शन असल्याने त्यांचे कुंचल्याचे 'फटकारे' जबरदस्त होते.

शिवसेना ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे सूत्र घेऊन बाळासाहेबांनी सुरु केली. पण बाळासाहेबांवर होत असलेल्या टीकेचे उत्तर 'मार्मिक' मधून देताना त्यांना एकेक आठवडा लागायला लागला. नाही म्हणायला मध्यंतरी त्यांनी श्रीकांतजी, पंढरीनाथ सावंत, विजय वैद्यांना घेऊन 'सांजमार्मिक' या प्रजोग केला पण तो फार काळ त्यांनी चालविला नाही. दिवसा मागून दिवस आणि वर्षा मागून वर्ष गेली. शिवसेनेची घोडदौड मुंबई ठाण्याहून पुढे जोरात सुरु झाली. विले–पार्ल्याची विधानसभेची निवडणूक हिंदुत्वाच्या मुद्द्यावर गाजली आणि जिंकली. पण हातात दैनिक नव्हते. बाळासाहेबांनी दैनिक सुरु करण्याचा निर्णय घेतला. प्रबोधन प्रकाशाची सुरुवात केली. दैनिकाचे नाव काय असावंयाचा विचार सूर झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 'मराठा' ने जी भूमिका घेतली तशीच भूमिका घेणारा चाबूक हाती हवा होता. टीकाकारांना शब्दांच्या आसूडांनी घायाळ करून दिशा दाखविणारा हवा होता.

सोलापूरच्या वसंत कानडे यांचे 'सामना' नावाचे नियतकालिक सुरु होते. बाळासाहेबांनी सुभाष देसाई, ॲड. लीलाधर डाके, गजानन कीर्तिकर आदींना सोबत घेऊन कायदेशीर बाबींची पूर्तता करून 'सामना' हे शीर्षक मिळविले. सगळी जमवा

जमव झाली. ’ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक’ असे अभिमानाने मिरविणारे ’सामना’ (सामान्यांच्या मनाचा नाद निनाद) हे दैनिक सुरु करण्याचा निर्णय पक्का झाला. ज्येष्ठ पत्रकार अशोक पडबिद्री यांची कार्यकारी संपादक म्हणून बाळासाहेबांनी निवड केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, स्वातंत्र्यलढा, समाजवादी चळवळ हे सारे अनुभवणारे पडबिद्री कार्यकारी संपादक होते आणि संपादक अर्थातच बाळासाहेब !

अशोक पडबिद्री हे जवाहरलाल दर्डांच्या लोकमतमधून सामनामध्ये आलेले होते. आधी लोकसत्तेत काम केल्यामुळे पडबिद्रींचा मुंबई, औरंगाबादच्या पत्रकारांशी चांगला संबंध होता. लोकमतमधून त्यांनी नंदकुमार टेणी, रमेश राऊत, डॉ. अनिल फळे यांना मुंबईत आपल्यासोबत आणले आणि मुंबई/सांज तरुण भारत मधून संजय डहाळे व किरण हेगडे यांना सोबत घेतले. तो पर्यंत प्रबोधन प्रकाशनाच्या जाहिराती करून अनेक जणांनी आतापर्यंत उमेदवारी नोंदवण्याचा प्रयन्त केला. रीतसर परीक्षा झाल्या. विविध पदांसाठी पत्रकारांची निवड झाली. ’सामना’ करण्यासाठी ’सैनिक’ सज्ज झाले. साप्ताहिक ’आहुती’ मधून वसंतराव त्रिवेदी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी संपादक, पत्रकार म्हणून जून १९७३ मध्ये माझी कारकीर्द सुरु झाली होती. सन्मित्र, ठाणे वैभव, नवशक्ती, मुंबई सकाळ, कोकण सकाळ अशा वृत्तपत्रांतून काम करता करता एक दिवस अखिल भाटीया मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यलयात बसलो असताना खिडकीतून ’अरे योगेश ! आजच्या लोकसत्तातली जाहिरात बघ आणि अर्ज करून टाक’ असे फर्मान विजय वैद्यांनी सोडले आणि मी पटकन अर्ज केला. परीक्षेस बोलावले आणि परीक्षा दिली, ती उत्तीर्ण झालो आणि श्री. सुभाष देसाई यांचे पत्र आले. दै. ’सामना’ साठी उपसंपादक/ वार्ताहार या पदासाठी बाळासाहेबांनी आपली नोंद केली असून १५ डिसेंबर १९८८ रोजी शिवसेना भवन येथे मुलाखतीला बोलावले आहे. बाळासाहेबांचा

आदेशच होता. १५ डिसेंबर १९८८ रोजी सकाळी शिवसेना भवन गाठले. संजय डहाळे, प्रकाश सावंत, राजेश दर्यापूरकर, रवींद्र राऊळ, सूचित मराठे (आता करमरकर), सुधा मधुसूदन जोशी, संजय घारपुरे, शिल्पा राजे (आता सरपोतदार), शुभांगी वाघमारे (आता पुणतांबेकर), रवींद्र खोत असे आम्ही शिवसेना भवन येथे टॅक्सीने 'मातोश्री' वर पोहोचलो. अशोक पडबिद्रींनी सर्वांची ओळख करून दिली. बाळासाहेबांनी यशस्वी व्हा ! असा आशीर्वाद दिला आणि आम्ही सदगुरू दर्शनाच्या पाय–या चढलो.

अशोक पडबिद्री, नंदकुमार टेणी, रमेश राऊत, किरण हेगडे, संजय डहाळे, रवींद्र खोत आणि आम्ही सर्व कंबर कसून कमला लागलो. राजकीय, शैक्षणिक, साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा आदी बाबतच्या जबाबदा–या वाटून देण्यात आल्या. मंत्रालय, महापालिका, न्यायालय, गुन्हेगारी जगत आदींचे वृत्त संकलन करण्याबाबत कामे देण्यात आली. उत्सव, फुलोरा पुरवण्यांची घडी बसवण्यात आली.

'सामना' सुरु होण्यापूर्वी त्याच्या डमी अंकाची छपाई करायची होती. विवेक कदम, प्रसाद ठाकूरदेसाई, सुदेश म्हात्रे, वाडेकर, वीणा (रुपाली गोगवेकर) ही मंडळी प्रशासनाची बाजू सांभाळत होती. अनेकजण आपापल्या जबाबदा-या इमानेइतबारे पार पडत होते.

माझे नाव'बाळ ठाकरे'च राहणार ! –––––सामनाचे पहिले पान तयार करण्यासाठी आर्टवर्क बनविण्यात आले. सामनाशीर्षका खाली किल्ल्यांच्या बुरुजांवर मधोमध संपादक बाळासाहेब ठाकरे असे तयार करून आणले आहे. सदगुरू दर्शनमध्ये बाळासाहेब आले होते. मुख्य संपादक म्हणून त्यांच्या दालनात बसले होते आणि अशोक पडबिद्री, नंदकुमार टेणी, संजय डहाळे, रवींद्र खोत आणि मी असे समोर उभे होतो. बाळासाहेबांनी आर्टवर्क पहिले. ते स्वतः चित्रकार, व्यंगचित्रकार,

कलाकार आणि कलेची जाण असलेले होते. त्यामुळे त्यांच्या चाणाक्ष नजरेतून त्यांनी ते पहिले आणि म्हणाले, तुम्ही मला भले बाळासाहेब म्हणत असाल पण संपादक मी आहे आणि संपादक म्हणून माझे नाव बाळ ठाकरे हेच राहणार! असे म्हणून त्यांनी आपल्या लेखणीने बाळासाहेब या शब्दातला काना आणि साहेब या वर वर्तुळ करून मुद्रित शोधनातली डीलीटची खूण केली. तेव्हा पासून 'संपादक बाळ ठाकरे' असे छापले जाऊ लागले ते थेट नोव्हेंबर २०१२ पर्यंत.

२३ जानेवारी १९८९ च्या दिवशी सामनाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. मराठी पत्रकारितेत ज्वालाग्राही जाज्वल्य अभिमानाचे पाऊल दमदारपणे उंचावले गेले. १९८९ च्या जानेवारीच्या २२ तारखेला रात्री दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात प्रकाशनाचा अभूतपूर्व सोहळा झाला आणि मध्यरात्री १२ च्या ठोक्याला बाळासाहेबांनी सामनाच्या पहिल्या अंकांचे प्रकाशन धुमधडाक्यात केले. पहिल्या अंकाचे पहिल्या पानावरच बाळासाहेबांच अग्रलेखाचं शीर्षक होतं. 'या असे सामन्याला'! १९८८ सालीच आम्ही सारे 'बाळकडू' घेऊन दमदार वाटचाल करीत आहोत. साहेबांना मानाचा मुजरा !

------------------------------ चौकट : - ------

उद्धव आणि राज यांची दालने शेजारी होती.

सदगुरू दर्शन या प्रभादेवीच्या इमारतीत दै. सामनाचा व्याप वाढू लागला. महाराष्ट्राचे ते एक सत्ता केंद्र बनले. बाळासाहेबांचा 'मार्मिक' 'शिवसेना' आणि 'सामना' हा त्रिशूळ होता. या सदगुरू दर्शनच्या पहिल्या मजल्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची सुभाष देसाई, लीलाधर डाके यांच्या प्रमाणेच शेजारी शेजारी दालन होती. देसाई, डाके, उद्धव ठाकरे हे विश्वस्त होते, तर राज ठाकरे व्यंगचित्रकार !

❖ **श्री. राकेश जाधव:**

’ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी ‘दैनिक’ असे बिरुदावली असणारे दैनिक ’सामना’ शिवसेनेचे मुखपत्र म्हणून ओळखले जाते. शिवसेनेची स्थापना केल्यानंतर संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेला तळागाळातल्या मराठी माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात पिंजून काढला.विविध भागांचे दौरे केले. त्यासाठी त्यांच्यासोबत अनेक जण ओढले गेले. हेच ते शिवसैनिक. या शिवसैनिकांपर्यंत व त्या आनुषंगाने प्रत्येक मराठी माणसापर्यंत आपली भूमिका, आपली परखड मत पोहोचवण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी माध्यमाचा आधार घेतला. सुरुवातीला ’मार्मिक’ या साप्ताहिकातून प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळासाहेबांना व्यंगचित्रांद्वारे आपली म्हणजेच शिवसेनेची भूमिका स्पष्ट करण्यास उद्युक्त केले. नंतर बाळासाहेबांनी ’सामना’ सुरु केला आणि शिवसेनेचा ’शब्द’ प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचायला हळूहळू सुरुवात झाली.

शिवसेनेशी निगडित असणारी प्रत्येक बातमी (अर्थातच, सकारात्मक) सामनामध्ये कव्हर केलेली असते. तसेच, सेनेतील महत्वाच्या नेत्यांनी केलेल्या काही महत्वाची वक्तव्यांनाही ’सामना’ मध्ये खास जागा दिलेली असते. तसेच, मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या खास मुलाखती ’सामना’ मधून प्रकाशित होतात. त्यांच्याद्वारे शिवसैनिकाला आपल्या पक्षाची, नेत्याची भूमिका समजते.

दुसरीकडे, ’सामना’ मधून आपल्या विरोधकांवर अत्यंत तीव्र शब्दांत टीका केलेली पाहण्यात येते. ’राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ)’ मध्ये असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ’मुक्तशब्दांनी’ स्तुती करणारे ’सामना’तील लेख आता त्यांच्या प्रत्येक मुद्यावर सडकून टीका करणारे झाले आहेत. यातील टीका ब-याचदा पंतप्रधानांच्या धोरणांविरोधात असते, तर कधीकधी ती उपहासात्मक ही असते. ’सामनातून’ तीव्र शब्दांत केल्या जाणा-या टीकेला ’ठाकरीशैली’ असे नाव देऊन

ती टीका कशी लोकांचे मनोगत आहे हे पटवण्याचा पुरेपूर प्रयन्त ’सामनाकारांकडून’ नेहमीच करण्यात येतो. (कधीकधी तर या ’ठाकरीशैली’तून राज यांच्यासारखे ’ठाकरे ही सुटत नाहीत!) तथापि, विरोधकांवर केलेली एकूणच टीका शिवसैनिकाला आणि पर्यायाने शिवसेनेला काही प्रमाणात उपयोगी ठरतेच, असे म्हणणे चुकीचे होणार नाही. शिवसेनेचा एकूणच राजकीय प्रवास, बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आता आदित्य ठाकरे यांचे राजकीय क्षितिज विस्तारण्यात ’सामना’चा मोठा वाटा आहेच. शिवाय, शिवसैनिकांचा विश्वास ’सामना’ने कमावल्यामुळे ’सामना’तील प्रत्येक प्रमाण मानून त्यानुसार प्रत्येक शिवसैनिक आपली कार्यपद्धती सुरु ठेवतो, असे ही म्हणणे वावगे नसेल.

❖ **श्री. मनोज जोशी:**

सामना : बाळासाहेबांच्या ऊर्जेचे प्रतीक

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक असे बिरुद मिरवणारे शिवसेनेचे मुखपत्र ’सामना’ २३ जानेवारी १९८९ रोजी सुरु झाले. दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात, दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते ’सामना’चे प्रकाशन करण्यात आले. हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी आणि दररोज होणा-या आरोपांना उत्तर देण्यासाठी, सामना हे नवे शस्त्र असेल, असे बाळासाहेब ठाकरे यांनी त्यावेळी म्हटले होते. यावरून या दैनिका मागची भूमिका स्पष्ट झाली होती.

शिवसेनेचा दसरा मेळावा तसेच इतर सभा – समारंभात होणा-या बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणांना इतर दैनिकांमध्ये प्रसिद्धी मिळत असे. इतर दैनिकां मध्ये ही

बाळासाहेबांच्या कोणत्याही भाषणाची जागा ही पण क्रमांक एक वरच असायची. त्यांच्या प्रत्येक शब्दाला महत्व होते. खुद्द बाळासाहेब देखील अगदी सहजगपणे प्रत्येक शब्द निवडून प्रतिक्रिया देत असत. ते उत्तम वक्ते असल्याने त्यांची भाषा कधीही अघळपघळ नसायची. पण त्याव्यतिरिक्त शिवसेनाप्रमुख म्हणून आपली मत मांडण्याचे व्यासपीठ सहजासहजी उपलब्ध नव्हते. शिवसेनेची, विशेषतः बाळासाहेबांच्या प्रतिक्रियेला विशेष महत्व होते. त्यावेळी सोशल मीडियाचा विचारही कोणी केला नव्हता. शिवाय, वृत्तवाहिन्यां ही अस्तित्वात नव्हत्या. त्यामुळे एखाद्या घटनेवर किंवा राजकीय घडामोर्डीवर भाष्य करण्यासाठी एक पत्रक तयार करून ते राज्यभरातील दैनिकांसह वृत्तसंस्थांना द्यावे लागत होते. सामना प्रसिद्ध होऊ लागल्याने बाळासाहेबांची भूमिका लागलीच लोकांसमोर येऊ लागली. एखादी मोठी घटना अथवा घडामोड घडली तर, त्यावर बाळासाहेब ठाकरे काय भाष्य करतात, हे पाहण्यासाठी दुस-या दिवशी सामना दैनिक वाचले जायचे. महत्वाच्या राजकीय तसेच सामाजिक घडामोर्डीवर शिवसेनाप्रमुखांची परखड मते या दैनिकात मांडली जायची. प्रत्येक परिसरात त्याचीच चर्चा असायची.

शिवसेना पुरस्कृत रुग्णवाहिका राज्याच्या ग्रामीण भागात उपलब्ध करण्यात आल्या होत्या. त्यामुळे ग्रामीण भागात शिवसेनेचे जाळेही पसरले होते. बहुतांश गावांत शिवसेनेच्या शाखा होत्या आणि या शाखांमध्ये तर सामना दैनिक हमखास असायचे. तिथे येणारा केवळ शिवसैनिकच नव्हे तर, शिवसेनेला मानणारे सामना दैनिकात 'साहेबांचा' अग्रलेख काय आहे, हे उत्सुकतेने वाचत होते. भले ही तो अग्रलेख कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी लिहिलेला असला तरी. कारण ते विचार बाळासाहेबांचेच असायचे. शिवसैनिकांसाठी बाळासाहेब म्हणजे ऊर्जा आणि त्यांचे विचार म्हणजे हत्यार होते. त्यामुळे बाळासाहेबांचे आदेश मिळताच तसे पडसाद

राज्यभरात उमटत होते, १९९५ साली शिवसेना–भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी शिवसेनेतील काही ज्येष्ठ नेत्यांमध्ये कुरघोडीचे राजकारण सुरु झाले होते. त्या पार्श्वभूमीवर एके दिवशी सामना दैनिकात 'शिवसेनाप्रमुखांचा शिवसेनेला अखेरचा 'जयमहाराष्ट्र'' अशी हेडलाईन छापून आली आणि राज्याचे राजकारणच ढवळून निघाले होते. सेना भवनाजवळ प्रचंड संख्येने शिवसैनिक जमले होते. त्यावरून सामान दैनिक किती लोकांपर्यंत पोहोचले आहे, ते लक्षात येते. बाळासाहेबांच्या परखड विचारांमुळेच सामना वाचण्याची सवय लोकांना त्यावेळी लागली होती. पण आता ते केवळ एक दैनिकच उरले आहे, त्यातील धग आता खूपच कमी झाली आहे.

### ❖ श्री. दीपक मोहिते:

सेनेची मुहूर्तमेढ ५६ वर्षांपूर्वी म्हणजे १९६६ साली बाळासाहेबांनी आपल्या काही मित्रमंडळींच्या साथीने रोवली. त्याकाळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा सर्वत्र बोलबाला होता. काँग्रेसच्या या साम्राज्याला धक्का देण्याचे सामर्थ्य एका ही राजकीय पक्षांमध्ये नव्हते. परप्रांतीयांचे वाढते प्रस्थ, रोजगार क्षेत्रात दाक्षिणात्यलोकांचे वर्चस्व, उद्योग व व्यापारक्षेत्रात गुज्जू मंडळींचे अधिराज्य, यामुळे बाळासाहेब सतत अस्वस्थ असत. या सर्व वावटळीत माझ्या मराठी माणसाचा पालापाचोळा होतोय, हे शल्य त्यांना सतत बोचत होते. मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना आपण स्थापन केली, पण ती केवळ मुंबई शहरापुरती न राहता तिचा राज्यभरात विस्तार व्हायला हवा, अशा विचाराने त्यांना पछाडले होते. या महाराष्ट्रात माझ्या मराठी माणसाला दुय्यम वागणूक मिळणे, त्यांना मान्य नव्हते. सुरुवातीच्या काळात संघटनेने अनेक निवडणूक लढवल्या, पण पदरी केवळ अपयशच पडत गेले. सुरुवातीचा हा काळ अत्यंत त्रासदायक असा होता. मुंबई शहरात सेनेला जनाधार

मिळण्यास सुरुवात झाली होती, पण पक्षाच्या विस्तारीकरणाला वेग येत नव्हता. कम्युनिस्टनेते कृष्णा देसाई यांची हत्या झाल्यानंतर सेनेशी ओळख जहाल संघटना म्हणून निर्माण झाली व विविध वर्तमानपत्रे सेनेविरोधात आग ओकू लागली. आरोप खोडून काढण्यासाठी आपल्याही हाती दैनिक असावे, असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला व तो त्यांनी दिवंगत प्रमोद नवलकर, वामनराव महाडिक, दत्ता साळवी, मनोहर जोशी यांना बोलून दाखवला व या सर्वानी आपले हक्काचे दैनिक असायला हवे, असा निर्वाळा दिला. २३ जानेवारी १९८९ रोजी ‘सामना‘, या नावाने दैनिक सुरु केले. या घटनेला आज २३ वर्षे पूर्ण झाली. कालांतराने हे पक्षाचे ’मुखपत्र’ झाले. सुरुवातीच्या काळात अशोक पडबीद्री संपादक होते त्यानंतर संजय राऊत यांच्याकडे धुरा आली. बाळासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली सामन्याची घोडदौड सुरु झाली.

बाळासाहेबांनी जे उद्दिष्ट उराशी बाळगले होते, ते सामनाच्या माध्यमातून साध्य होत गेले. सामना मराठी माणसात रुजला. आपल्या पाठीशी उभे राहणा-या बाळासाहेबांवर प्रेम करणा-या मराठी माणसाने सामनावरही भरभरून प्रेम केले. रस्त्यावरची हाणामारी व हमरीतुमरीला फाटा देत बाळासाहेबांनी लेखणीला शस्त्र बनवले व त्याच्या वारानी अनेकांचे मराठी द्वेष्टे राजकारण संपवले. राजकारणी मंडळींना सामनाची भीती वाटू लागली, उद्या सामनात काय असेल? याची उत्सुकता प्रत्येक मराठी माणसामध्ये निर्माण झाली. बाळासाहेब हयात असेपर्यंत सामनाने कधीही कोणाच्या वैयक्तिक जीवनावर शिंतोडे उडवले नाहीत. सार्वजनिक जीवनात वावरणा-या राजकारण्यांचे चाळेही खपवून घेतले नाहीत. वास्तवाला धरून सडेतोड लिखाण, ही बाळासाहेबांची शैली असायची मात्र ते गेल्यानंतर सामनाला

एकतर्फी व एककल्ली असे स्वरूप आले आहे. एखाद्या दैनिकाची सारी सूत्रे जेव्हा नोकरशाहीच्या हाती जातात, तेव्हा ते दैनिक बेफाम होते व त्याचे ताळतंत्र सुटते. आज सामनाचे तेच झाले आहे. हल्ली सामन्याचा वाचक केवळ शिवसैनिकच आहे. मराठी वाचक सामनापासून दुरावला गेला आहे. मुखपत्र असले तरी बाळासाहेबांच्या काळात त्यास वैभव प्राप्त होते, आज तशी स्थिती नाही. बाळासाहेबांच्या काळातील सामना व सध्याचा सामना याची तुलनाच होऊ शकत नाही. आणि ते खरंच आहे केवळ आगपाखड करणे म्हणजे पत्रकारिता नव्हे. एखाद्यावर टीका करताना त्याचे मुद्दे खोडून काढणे व त्यासाठी खोलात जाऊन पडताळणी करणे, आवश्यक असते. पण हे पथ्य सध्या पाळले जात नाही. बाळासाहेबांच्या ज्वलंत विचारसरणीला तिलांजली देत सध्या सामनाच्या लेखात हेकेखोरपणा व एखाद्याला टार्गेट करणे असे प्रकार आवर्जून पाहायला मिळतात. याला निकोप पत्रकारिता म्हणता येणार नाही. अग्रलेख किंवा संपादकीय सदर म्हणा, त्यामध्ये वास्तवाचे भान असलेले लिखाण आवश्यक आहे. बुरसटलेले विचार व मनात कटुता ठेवून झालेले लिखाण दर्जदार वाचकांच्या पचनी पडत नसते.

पत्रकारितेची आचार संहिता गुंडाळून सध्या त्यांची होत असलेली वाटचाल मराठी माणसाला मान्य नाही, बाळासाहेबांनी हे उद्दिष्ट उराशी बाळगले होते ते विद्यमानव्य वस्थापनाला मान्य नाही असे चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या दहा वर्षात सामना मराठी मनापासून दुरावत चालला आहे, हेच खरं...

❖ **श्री. अजित राऊत:**

शिवसैनिकांसाठी 'सामना' म्हणजेच बाळासाहेब

२३ जानेवारी १९८९ रोजी हिंदुत्वाचा पुरस्कार करणा-या सामना दैनिकाचे प्रकाशन करणा-या सामना दैनिकाचे प्रकाशन बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनी झाले. त्यावेळी सामनाचे कार्यकारी संपादक होते अशोक पडबिद्री.

शिवसेना त्यावेळी उदयास येत होती. स्थानीय लोकाधिकार समितीच्या माध्यमातून मराठी माणसाला नोक-या मिळवून देण्याचे काम सुरु होते. बाळासाहेबांच्या हृदयस्पर्शी आणि सडेतोड भाषणांनी तरुण वर्ग साहजिकच शिवसेनेकडे झुकू लागला होता.

सामनातून शिवसेनाप्रमुखांची भूमिका आणि ध्येयधोरणे शिवसैनिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सेनेचे आघडीचे नेते सक्रिय होते. शाखाशाखांत सामना पोहोचला होता. शिवसेनेचे मेळावे, निवडणुकीबाबतची भूमिका आणि मराठी माणसांवर झालेला अन्याय मोडून काढणारी भाषणे मराठी माणसात स्फुल्लिंग चेतवत होती. शिवसेनेचे बळ मिळाल्यावर कामगार वर्ग आक्रमक झाला. अनेक संघटनांमध्ये, कंपन्यांमध्ये शिवसेनेच्या युनियन स्थापन झाल्या. मराठी माणसाला स्वाभिमानाने जगण्यासाठी शिवसेनेचे फार मोठे योगदान आहे. सामना वर्तमानपत्रातून पदाधिकारी, शाखाप्रमुख, विभागप्रमुख आणि गट प्रमुखांच्या नियुक्तीची बातमी प्रसिद्ध होऊ लागली. सामना हे मराठी माणसाचे वृत्तपत्र बनले.

दै. सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत यांच्या 'रोखठोक' शैली मुळे त्यांचा एक वाचकवर्ग तयार झाला आहे. त्यामुळे सामना वर्तमानपत्र प्रत्येक शाखेमध्ये घेण्यास सुरुवात झाली. काही शिवसैनिकांना सामनातून होणारी टीका अस्वस्थ करू लागली. सामना प्रत्येक शाखेमध्ये असायलाच हवा, असा काही जणांकडून दबाव आणण्याचा प्रयत्न केला; परंतु काही शिवसैनिकांना हे पटत नव्हते. सामना एक

कल्ली बातम्या देत असल्याचे त्यांचे म्हणणे होते, संपादक यांची मते अनेकांना पटत नव्हती. भाजप–शिवसेना युती तुटायला नको होती, असे अनेक शिवसैनिकांना वाटत होते.

बाळासाहेब असताना आणि आता नसता नाही सामना वृत्तपत्र हे सच्च्या शिवसैनिकांसाठी केवळ वृत्तपत्र नसून बाळासाहेबांची आठवण आहे. पूर्वीचे बाळासाहेबांचे सडेतोड अग्रलेख, बोलणे, मुलाखती फक्त सामनातून छपून येत असत. केवळ शिवसैनिकच नव्हे, तर इतर विरोधकांना देखील बाळासाहेब सामना मधून काय बोलतायेत याची उत्सुकता असायची. एवढेच नव्हे तर, सामनात आज छापून आलेले दुस-या दिवशी इतर वृत्तपत्रासाठीची बातमी व्हायची.

सामना शिवसैनिकांसाठी केवळ बातम्या छापणारे वृत्तपत्र नसून इतर दैनिकांना बातम्या देणारे सुद्धा ठरले आहे. त्यामुळे प्रत्येक शिवसैनिकांसाठी सामना सोबतचे नाते म्हणजे जिव्हाळ्याचा आणि अभिमानाचा विषय आहे.

’सामना म्हणजे बाळासाहेब’ अशी धारणा आजही जुन्या कट्टर शिवसैनिकांच्या मनात आहे. बाळासाहेबांच्या विचारांनी प्रेरित असलेल्या आणि त्यांना मानणा-या प्रत्येकाचं घर ’सामना’ शिवाय अपूर्ण आहे.

- **श्री. सुनील सकपाळ**

सामना हे शिवसेनेचे मुखपत्र आहे. पक्षाची भूमिका जाहीरपणे मांडण्यासाठी त्याचा थोड़ाफार उपयोग होत असला तरी पक्ष वाढीसाठी किंवा सर्वसामान्य शिवसैनिकांसाठी त्याचा उपयोग होत नाही.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि त्यांना अभिप्रेत शिवसेना उभी करण्यासाठी स्वतःचे साप्ताहिक, दैनिक असावे म्हणून सामनाची निर्मिती झाली. बाळासाहेबांची स्वतःची वेगळी भूमिका कट्टर हिंदुत्ववाद सामनामध्ये त्यांच्याच जहाल भाषेत मांडण्यात आली. त्यामुळे सामना अल्पावधीतच शिवसैनिकांचा आदार बनला. सर्वात महत्वाचे म्हणजे बाळासाहेब हयात असेपर्यंत सामनामध्ये निष्ठावंत आणि सर्वसामान्य शिवसैनिकाला स्थान दिले जात होते. आता पक्षापेक्षा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना प्रमोट करण्यासाठी सामानाचा अधिक वापर होतोय. शिवसेनेचा मुख्यमंत्री बनवण्याचे बाळासाहेबांचे स्वप्न होते. समविचारी पक्षांशी युती नाकारता कायम विरोधात असलेल्यांना जवळ करून सत्ता मिळवली आणि म्हणे बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण केले.

सर्वसामान्य शिवसैनिकाला शिवसेनेची नवी सोयरीक पसंत नाही. पण ही नवी शिवसेना आहे. सामनाद्वारे आता हेच बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत शिवसेना आहे, असे ठसवण्याचा प्रयत्न आहे.

बदललेल्या सामनामध्ये केवळ पुढे पुढे करणा-यांना स्थान आहे. कुणी तळमळ, तडफड मांडण्याचा प्रयत्न केला तर त्याचे ऐकून घेतले जात नाही.

शिसेनेच्या नव्या रूपाप्रमाणे सामनाही बदलला. आताचा सामना हा पक्षाचे नव्हे तर पक्षप्रमुखांचे मुखपत्र बनला आहे.

### ❖ श्री. रवींद्र पांचाळ:

शिवसैनिकांच्या मनामनातील सामना !

१९८९ सालच्या २३ जानेवारीला सामना वर्तमानपत्राला जेव्हा प्रारंभ करण्यात आला तेव्हा हे वर्तमानपत्र पुढे इतके मानदंड निर्माण करणार आहे, याची कल्पना खुद्द शिवसेनाप्रमुख आणि या वर्तमानपत्राच्या बळावरच पुढे हिंदुहृदयसम्राट झालेल्या

श्रीमान बाळ ठाकरे यांना नक्कीच नसणार. मराठा या आचार्य अत्रे यांच्या रोखठोक भाषेच्या वर्तमानपत्राच्या पावलावर पाऊल टाकताना श्रीकांत आणि बाळ ठाकरे बंधूंनी १३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक या व्यंगचित्र साप्ताहिकाची मुहूर्त मेढ रोवली होती. मार्मिक ही जशी त्या काळातील अस्वस्थ मराठी मनांची गरज होती तशीच गरज सुमारे ३० वर्ष पुढे आल्यानंतर सामना या दैनिकांबाबत निर्माण झाली होती. याचे कारण म्हणजे मराठी माणसाच्या हितरक्षणासाठी असा दावा करणा-या शिवसेनेची ढाल आता अधिक व्यापक म्हणजे हिंदुत्व रक्षणाची आहे, असे दाखवायला शिवसेनेला १९९०च्या दशकात विविध घटना – दुर्घटनांनी मोठी संधी प्राप्त करून दिली.

१९८९ साली भाजपासह युतीचे रणशिंग फुंकल्यानंतर झालेल्या गुप्त कराराप्रमाणे भाजपने देशभरात आणि युतीतील शिवसेनेने महाराष्ट्रात हिंदुत्वाची मशाल अधिक आक्रमकपणे फिरवायला सुरुवात केली. देशद्रोही मुसलमानांची शिवसेना खैर करणार नाही, असा इशारे वजा एल्गार सामनातून पुकारला गेला. त्यामुळे पहिल्या अंकापासून लाखाचा खप मिळालेल्या सामानाची आक्रमक हिंदुत्वाची भूमिका समजून घेण्याची गरज वाचकांना भासू लागली. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मस्जिद पाडण्यात आल्यानंतर पुढे लगेचच उसळलेल्या दंगली आणि नंतरच्या मुंबईतील आगीत महाआरत्यांचे तेल ओतत नेऊन १९९५ च्या युतीच्या सत्तेचा पाया रचला. या काळातील सामना हे शिवसेनेचे मुखपत्र दररोज शाब्दिक तोफा डागत होते आणि हिंदुत्वाच्या, चेहरा नसलेल्या शत्रु विरोधात आभासी युद्ध करत होते. त्याचा समाजमनावर अत्यंत गडद असा परिणाम होऊन युतीला पोषक असे वातावरण तयार झाले. कोणत्याही क्षणी निवडणूका झाल्या तरी युती सत्तेवर येणार याची तजवीजच जणू सामनाच्या संपादकीय लेखांनी आणि अग्रलेखांनी केली.

यादृष्टीने शिवसेनेच्या पहिल्या वहिल्या सत्तेचा मानकरी सामना दैनिक आहे. याच दैनिकातील बाळासाहेब ठाकरे यांच्या दिशा दिग्दर्शनामुळे विशेषतः अग्रलेखांमुळे भाबड्या शिवसैनिकांना आपल्याला पुढे काय करायचे आहे, याचे भान आले. मुंबई पासून शेकडो मैलांवरील खेड्यापाड्यांतील लाखो बेरोजगार तरुणांनी याच हिंदुत्वाच्या अस्मितेपोटी शिवसेनेचा भगवा खांद्यावर घेतला.

थोडक्यात १९६० च्या दशकात मुंबई, ठाणे परिसरात सीमित असलेली शिवसेना राज्यभर पसरली. त्यातच मराठी मतांपुढे जाऊन मुंबई व महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या उत्तर प्रदेशी यांची मते मिळवण्याचा शिवसेनेचा घाट ही यशस्वी ठरला तो दोपहर का सामना, या हिंदी अर्धं दैनिकामुळे. शिवसेनेचा मेरू असा मराठे सह अन्य परप्रांतीय मनांनाही जाऊन भिडला.

सामनाचा सर्वात प्रमुख मानदंड जर कोणता असेल तर या वर्तमानपत्राला राष्ट्र ीयस्तरावर मिळालेली स्वीकृती. आजवर काँग्रेस आणि भाजपलाही जे जमले नाही ते सामनाने करून दाखवले! या वर्तमानपत्रातील लेख, अग्रलेखांद्वारे शिवसेनेची ध्येयधोरणे व भूमिका जगापुढे येतात आणि प्रसार माध्यमापासून सर्वानाच नव्या घडामोडींचा अंदाज मांडता येतो. मसालेदार बातम्या पेरता येतात. या अग्रलेखांचा हवाला देत मांडणी करता येते. थोडक्यात पक्षाची भूमिका सामना मांडतो, अशी विश्वसार्हता निर्माण करण्याचे काम सामनाने केले आहे.

एकेकाळी शिवसेनेतील संघटनात्मक म्हणजे शाखाप्रमुख पदापासूनच्या नियुक्त्या या शिवसेनाभवनातून प्रसिद्ध होऊन त्या ठिकठिकाणच्या फलकांवर जनतेसाठी जाहीर केल्या जायच्या. आज अशा नेमणूक या सामनात प्रसिद्ध होतात. सामना अशा रीतीने शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेचा एक भाग झाला आहे. सामनाने प्रस्थापित केला आणखी एक मानदंड म्हणजे शिवसेनेवर टीका करणा-या विरोधकांचा समाचार

सामनातून सहज घेता येतो. या अर्थाने सामना खरोखरच समाचार पत्र आहे! या मुखपत्राच्या आयत्या तोफखान्यामुळे सतत पत्रकार परिषदा घेऊन जनतेसमोर जाण्याची प्रमुख नेतृत्वाला गरज उरत नाही!

भाषा हा कोणत्याही वर्तमानपत्राचा चेहरा आणि आत्माही असतो. तटस्थ समतोलपणा हा प्रसार माध्यमांचा केंद्रबिंदू मनाला जातो. मात्र सामनाने पहिल्या अंकातच आपली या बाबतची भूमिका स्पष्ट करून आपल्याला हव्या त्याच भाषेत हवे ते मांडणार, असे ठासून सांगितले आहे. शिवसेनेला आडवे जाणा-यांचा मुलाहिजा केला जाणार नाही, असे संपादक आणि शिवसेना प्रमुखांनी प्रारंभीच स्पष्ट केल्याने पहिले कार्यकारी संपादक अशोक पडबिद्री यांच्यानंतर सामनात दाखल झालेल्या संजय राऊतांनी भाषेबाबतचे हे धोरण कटाक्षाने पाळले आणि आपले रोखठोक हे सदरही अल्पावधीत लोकप्रिय केले. त्यांच्याकडे प्रमुख प्रवक्तेपदाची आणि शिवसेना नेतेपदाची जबाबदारी आल्यनानंतर तर या सदरातील राजकीय मतांमुळे शिवसेनेची भूमिका स्पष्ट होत असल्याने या सदरची दखल राष्ट्रीय स्तरावरही घेतली जाऊ लागली आहे.

❖ **श्री. शिशिर शिंदे:**

*'सामान' हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून प्रभावी आहे पूर्वी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आणि आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भूमिका सामना आक्रमकपणे मांडत असतो.

* मराठी माणसाची अस्मिता मराठी जनांचे हित, मराठी लोकांची एकजूट यासाठी सामनाचा उपयोग शिवसेना पक्षाला झाला. नंतर शिवसेनेची हिंदुत्वाची भूमिका सामनाने प्रभावीपणे मांडली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सामनाने भाजप

विरोधात प्रचार तीव्र केला. भाजपचे नेतृत्व नामोहरम कसे होईल यासाठी, सतत नरेंद्र मोदी, अमित शहां पासून फडणवीस चंद्रकांत पाटील याने त्यांना टीकेचे सतत लक्ष्य ठेवले.

* सामनाला २०१९ नंतर हिंदुत्वाचा विसर पडला आणि निधर्मीपणाचा सामनाने स्वीकारकेला. काँग्रेस आणि राष्ट्रवादीकाँग्रेस बरोबर राज्यात सत्तेत राहण्यासाठी सामनाने हिंदुत्व केले.

* शिवसेनेची भूमिका – धोरणे यावरून मराठी माणसाला उत्तेजन देणे चेतावण्याचे काम सामनाने सुरुवातीला नंतर सातत्याने केले. भाजप बरोबर युती असताना सज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे दैनिक असे बिरुद अभिमानाने मिरवले. पण भाजपशी युती तुटल्या पासून सामना केवळ भाजप विरोधी झाला. सामनाने सामाजिक प्रश्नांवर मराठी मुद्द्यांच्या महागाईवर, मुंबईच्या प्रश्नावर अनेक आंदोलने पेटवली पण आता सामनामधून आंदोलने पेटवली जात नाहीत. पूर्वी सच्चाई या सदरातून संजय राऊत शिवसैनिकांना नवी दिशा देत असत. पक्षाची भूमिका मांडत असे. आता ते सदरच बंद झाले.

सामना हे पूर्वी शिवसेना प्रमुखांचे शब्द व भावना व्यक्त करणारे मुखपत्र होते. आता ते केवळ ठाकरे कुटुंबाचे वृत्तपत्र बनले आहे. हिंदू–मुस्लिम दंगलीत हिंदूंना उत्तेजन देण्याचे काम सामनाने केले. बाबरी मस्जिद उध्वस्त झाल्यावर सामना तेजीत होता. त्याचा लाभ सामनाने मराठी व हिंदूंना सेनेकडे आकर्षित केले व शिवसेनेला (निवडणुकीत) फायदा झाला.

बाळासाहेब ठाकरे यांच्या अखेरच्या काळात सामनाने बारा अग्रलेख सलग प्रसिद्ध केले. त्यांचे वर्णन अविस्मरणीय शब्दात केले. मराठी मनावर सामनाने तेव्हा पकड निर्माण केली होती.

अगोदर सामना काँग्रेसच्या विरोधात होता. आता सामना भाजपच्या विरोधात आहे, हा गेल्या ७/८ वर्षातील मोठा फफरक आहे.

जे शिवसेना सोडून गेले त्यांच्या विरोधात सामनाने प्रचंड आगपाखड केली. विशेषतः छगन भुजबळ आणि नारायण राणे याने त्यांचा सामनाने प्रचंड आक्रोश केला. आकांडतांडव केले.

सामना हे शिवसेनेचे धगधगते मुखपत्र आहे. त्यातील अग्रेलेखांचे पडसाद राष्ट्रीय व आंतरराज्यीय – प्रादेशिक भाषेत ही उमटतात. हे भाग्य कोणत्याही राजकीय पक्षाच्या मुखपत्राला या देशात मिळालेले नाही.

सामनाने शिवसैनिकांच्या मनगटाला ताकद दिली. हातात धोंडा उचलण्याची शक्ती दिली. उच्चपदस्थ अधिकारी असो किंवा राजकारणी नेता असो त्याच्या तोंडाला काळे फसण्याची हिम्मत दिली.

भाजपशी काडीमोड झाली पासून मुंबईत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला सामनाच्या रूपाने आयते प्रसिद्धीसाठी वृत्तपत्र मिळाले आहे.

सामानाला अनेकदा माघार घ्यावी लागली किंवा घुमजाव करावे लागले. प्रबोधनकार ठाकरे यांच्या वायय प्रकाशन कार्यक्रमात – पुस्तकाचे प्रकाशन य. दि. फडके यांच्या हस्ते झाले. मुंबईत दीनानाथ नाट्यगृह, विले पार्ले. प्रबोधनकारांनी शाहू महाराजांना कसे वागवले, असा किस्सा शिवसेना प्रमुखांनी त्यात सांगितला. तो सामनाने ठळकपणे प्रसिद्ध केला. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात ठाकरेंच्या विरोधात प्रक्षोभ उसळला. त्यांचे पुतळे जाळले. सामना मधून बाळासाहेबांनी त्या मुद्यावर खुबीने माघार घेतली व देशातील वाद शांत केले.

मराठा मोर्चा वेळी मूकमोर्चा असताना मुका घेतानाचे व्यंगचित्र सामनाने छापले. मराठा समाजात मोठा संताप प्रकटला. सामनाने माफी मागितली.

बाळासाहेब ठाकरे यांनी जात–पात नेहमीच दूर ठेवली. शिवसेनेत त्याला स्थान नव्हते. पण आता व्होट बँक राजकारणच सेनेने स्वीकार केलेला दिसतो व त्याचे प्रतिबिंब सामनात पडताना दिसते.

आता सामना मध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी, शरद पवार, अजित पवार त्यांच्या बातम्या, कार्यक्रम, मुलाखती, अग्रलेख यांना ठळकपणे स्थान दिसते. सेना–भाजप युती असताना असे कधी दिसले नव्हते.

पूर्वी सामना हे मुखपत्र शिवसैनिक आपुलकीने वाचत असत. आता ती आपुलकी दिसत नाही.

शिवसेना नेते, पदाधिकारी यांच्या वाढदिवसांच्या व कार्यक्रमांच्या जाहिराती सामनात असतात. ज्याची जाहिरात मोठी तो नेता मोठा, असा पक्षात समज झाला आहे.

राज्याचा मुख्यमंत्री शिवसेनेचा आहे. बाळासाहेबांचा पुत्र मुख्यमंत्रीआहे. पण शिवसैनिकांना महाआघाडी सरकार आपले वाटत नाही. सत्ता निवडक नेते व ठाकरे परिवारापुरती मर्यादित आहे. सामान्य शिवसैनिक सत्तेपासून लांब आहे. शिवसेनेचे मंत्री व शिवसैनिक यांच्यात मोठे अंतर पडले आहे. पक्ष नेतृत्वाशी भेटी, चर्च, संवाद नाही. सामनामधून ही गरज पूर्ण होत नाही.

शिवसेनेचा मुख्यमंत्री राज्याची सत्ता शिवसेनेकडे मुंबई महापालिकेची सत्ता ३० वर्षे शिवसेनेकडे. सामनामध्ये रंगी–बेरंगी पूर्णपान मोठंमोठ्या जाहिराती सतत असतात. पण त्यातून शिवसैनिकांना काही मिळत नाही. पक्ष व ठाकरे परिवाराचे दैनिक म्हणून

सामना मोठे आहे पण शिवसैनिकांना जे अभिप्रेत आहे ते सामनात मिळत नाही, ही खंत आहे.

❖ **श्री. जयंत होवाळ:**

संघटना वाढवणारे ’मुखपत्र’

बाळासाहेब ठाकरे यांचे विचार शिवसैनिकांपर्यंत सातत्याने पोहोचवून त्यांना चार्ज ठेवण्यात प्रारंभीच्या काळात सामना मुख्य भूमिका बजावत होता.शिवसेनेची वैचारिक भूमिका, आक्रमक वृत्ती यावर सडकून टीका व्हायची. या टीकेचा सामना मधून आक्रमक समाचार घेतला जाई. त्यामुळे अमुक एका मुद्द्यावर बाळासाहेबांची भूमिका काय आहे, किंवा टीका करणा-या प्रती बाळासाहेबांचा काय रोख आहे,काय ’संदेश’ आहे याचे ’आकलन’ सामान्य शिवसैनिकाला व्हायचे. त्यानुसार मग शिवसैनिक पुढची ’कारवाई’ करायचे. शिवसेना ही संघटना आणि पक्ष म्हणून मोठी होत असताना, या वाटचालीत सामनाची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. पुढची दिशा काय असेल, अक्शन प्लॅन काय असेल,कोणाच्या विरोधात कशी भूमिका असली पाहिजे, प्रसंगी शिवसेना स्टाईलने धडा शिकवणे गरजेचे आहे, याचे ’मार्गदर्शन’ सामनातून व्हायचे. मुळात सामनातून काही वैचारिक संदेश मिळेल किंवा तो दिला जावा अशी खुदद शिवसैनिकांचीही अपेक्षा नसेल. त्यांच्या दृष्टीने सामना हा ’आदेश’ देणारा,एवढेच समिकरण होते.

स्वतःचे वर्तमान पत्र, नव्हे मुखपत्र असणे ही राजकीय पक्षाची जमेची बाजू असते. फारच कमी पक्षांकडे मुखपत्र आहेत. ज्यांच्याकडे आहेत,त्यांच्याकडे सामना सारखा दम नाही. इतर वृत्तपत्र जशी आहेत, तसे सामनाचे स्वरूपही तसेच असाव, अशी शिवसैनिकांची अपेक्षा कधीच नव्हती. त्यांच्यासाठी सामना हे वृत्तपत्र कधीच नव्हते.

सुरुवातीला सामना फक्त आठवड्यातून एकदा प्रकाशित होत असे. त्या दिवशी एखाद्याच्या काखेत सामनाची गुंडाळी दिसली, हातात सामना दिसला की, ती व्यक्ती शिवसैनिक आहे, असेच समजले जायचे.

सामना हा तेव्हा बातम्यांसाठी वाचला जायचा नाही, असे म्हटले तर वावगे ठरू नये आणि शिवसैनिकानाही बातम्यांपेक्षा बाळासाहेब काय म्हणतात, त्यांनी कोणता नवा कार्यक्रम दिलाय यात जास्त रस असायचा. सुरुवातीच्या काळात संघटनेचा महाराष्ट्र ात सर्वत्र प्रसार झाला नव्हता, तेव्हा सामना शिवसेनेला फार उपयोगी ठरला. तेव्हा आताच्या प्रमाणे असंख्य वृत्तवाहिन्या नव्हत्या, सोशल मीडिया नव्हता. त्यामुळे प्रसिद्धी मिळवण्यासाठी, लोकांपर्यंत पोहचण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांना प्रचंड कष्ट उपसावे लागत. काँग्रेसकडे प्रारंभीपासून कार्यकर्त्यांचे जाळे, साधन सामग्री, धनशक्ती असल्याने त्या पक्षाला शक्य होते. परंतु शिवसेनेकडे या सगळ्याचा अभाव होता. सामनाच्या माध्यमातून शिवसेनेला राज्याच्या जील्ह्या जिल्ह्यात शिरकाव करता आला. बाळासाहेबांची भूमिका, सामनातील कडक भाषा या माध्यमातून शिवसेनेला संघटन वाढवता आले; किंबहुना सामनाच्या माध्यमातून बाळासाहेब ठाकरे हे नाव खेडोपाडी पोहचवता आले. केवळ सामनामुळे अनेकजण शिवसेनेकडे आकृष्ट झाले.

बाळासाहेबांची भाषणे,त्यांच्या मॅरेथॉन मुलाखती हे सामनाचे बलस्थान! अगदी विरोधकांनाही या मुलाखतीची दखल घ्यावी लागे. बाळासाहेबांनंतर हे सर्व वजा झाले. परंतु संजय राऊत यांनी सामनाचे अस्तित्व कायम ठेवले.

विकास आघाडी अस्तित्वात आल्यानंतर भाजपच्या सतत होणा-या टीकेला उत्तर

देण्यास शिवसेनेला

सामना चांगलाच उपयोगी पडत आहे. परंतु आपल्या राजकीय भूमिकेतील बदल, ते का करावे लागले, त्या मागची तात्विक भूमिका काय, एखाद्या सामाजिक मुद्द्यावर पक्षाची काय भूमिका आहे, आरक्षणाविषयी पक्षाचे धोरण काय आहे, विविध राजकीय पक्षांच्या नेत्याबद्दल मत का बदलले, युतीचे राजकारण आदी धोरणात्मक बाबी स्पष्पणे शिवसैनिकांपर्यंत पोहोचवण्यात सामना फार प्रभावी ठरला असे दिसले नाही.

हिंदुत्वाची बदलती व्याख्या, उत्तर भरतीयांविषयीची बदललेली भूमिका, मुस्लीम धर्मीयांबद्दलच्या पूर्वीच्या कडव्या भूमिकेत झालेला बदल आणि आता अगदी अलीकडे काँग्रेस आणि राष्ट्रवादी सारख्या वेगळ्या विचारधारेच्या पक्षांशी करावी लागणारी युती, यामागची ठोस भूमिका सामनाच्या माध्यमातून मांडली गेल्याचे दिसले नाही. त्यामुळे अनेक धोरणात्मक विषयांच्या बाबतीत शिवसैनिक अनभिज्ञ असल्याचे दिसते.

शेवटी सामना हे एका पक्षाचे मुखपत्र आहे. त्यामुळे आपल्या कार्यकर्त्यांपुढे काय मांडावे, काय मांडू नये, हा त्यांचा विषय आहे. परंतु शिवसेना वाढण्यात सामनाचा मोठा वाटा आहे, हे निश्चित!

❖ **श्री. दिनेश गुणे:**

सामनाः शिवसेनेचे शस्त्र!

हिंदुत्वाचा प्रभावीपणे प्रचार करण्यासाठी आणि दररोज होणा–या आरोपांना उत्तर देण्यासाठी सामना हे शिवसेनेचे नवे शस्त्र असेल आणि भविष्यात वेळ आली, तर आम्हाला खरी शस्त्रे हाती धरावी लागतील..." २३ जानेवारी १९८९ च्या मध्यरात्री दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात सामना या शिवसेनेच्या मुखपत्राच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याप्रसंगी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब

ठाकरे यांनी या नेमक्या शब्दांत सामनाच्या स्थापनेची भूमिका स्पष्ट केली. शिवसेनेचा व्याप वाढू लागला आणि त्यासोबत संघटनेचे शत्रूही वाढत गेल्याने दैनिकाची गरज भासू लागली. पुरेसे आर्थिक पाठबळ नसतानाही, बाळासाहेबांनी सामनाची मुहूर्तमेढ रोवली. संघटनेच्या महाराष्ट्रव्यापी विस्तारात गावोगावीच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्याचे साधन, ज्वलंत हिंदुत्वाचा प्रखर पुरस्कार करणारे भगव्या विचारांचे दैनिक आणि हिंदुत्वाला धार आणण्यासाठी परजलेले हत्यार अशी सामनाची भूमिका राहणार हे पहिल्या अंकातील संपादकीयातूनच स्पष्ट झाले होते. सामना है वर्तमानपत्र असेल, त्यामुळे, वर्तमानपत्राच्या नैतिकतेचे भान राखूनच बातम्या दिल्या जातील, बातम्यांवर कोणताही पक्षीय रंग न लावता, निःपक्षपातीपणे त्या वाचकांपर्यंत पोहोचविल्या जातील, मात्र, त्यावरील टीकाटिप्पणी या दैनिकांच्या विविध स्तंभातून केलीच जाईल असेही बाळासाहेबांनी स्पष्ट केल्याने, शिवसेनेचेहे मुखपत्र वाचण्यासाठी पहिल्या अंकापासूनच राज्यात त्यावर अक्षरशः उड्या पडत होत्या. या दैनिकातून व्यक्त होणारे बाळासाहेबांच्या विचारांचे दैनंदिन सोने मनावर लेऊन शिवसैनिकांची पिढी अधिक भक्कमपणे घडत गेली आणि बाळासाहेबांच्या जिवाला जीव देणारा सैनिक महाराष्ट्रभर उभा राहिला. बाळासाहेबांनी सामनामधून इशारा करावा आणि त्यानुसार कृती करण्यासाठी राज्याच्या कानाकोप–यातील सच्चा सैनिकाने जिवाची बाजी लावून रस्त्यावर उतरावे, एवढी ताकद सामनाच्या स्तंभांतील प्रत्येक शब्दाला लाभली होती. सुरुवातीचे सामनाचे ते दिवस म्हणजे शिवसेनाविरोधी राजकीय शक्तींना जबर आव्हान देणारे दिवस होते. पहिल्या अग्रलेखाचा मथळाच मुळी, या असे सामन्याला असा होता. सहाजिकच, त्या वेळी काँग्रेससमोर शिवसेनेने सामनाच्या मैदानातून शड्डू ठोकला होता. नव्या, तरुण पिढीला राष्ट्रवादी मार्गदर्शन, हिंदुत्वाचा ज्वलंत प्रसार करणारे माध्यम, जनतेच्या दुःखावर फुंकर मारणारा मंत्र, असे सामनाचे सुरुवातीचे रूप होते. सामनामधून

हिंदुत्वाचा प्रसार सुरू झाला आणि १९९० च्या निवडणुकीकरिता सामनामधूनच बाळासाहेब ठाकरे यांनी भाजपसोबतच्या युतीचे संकेत जाहीर केले आणि काँग्रेसविरोधी मतदारांच्या ध्रुवीकरणाचा पहिला प्रयोग महाराष्ट्रात सुरू झाला. यामुळे राज्यातील राजकीय वातावरण एवढे ढवळून निघाले, की बलाढ्य काँग्रेसला त्याची दखल घ्यावी लागली. शरद पवार यांनी त्यावेळच्या एका प्रचार सभेत बाळासाहेबांचा उल्लेख हिंदु खोमेनी असा केला, तर बाळासाहेबांनी शरद पवारांना अल्लाउद्दीन खिलजी म्हणून खिजविले. सामनाचा स्थापनादिन हा शिवसेनेच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस. त्या दिवशी बाळासाहेबांनी विधानसभेवर भगवा फडकावण्याचा संकल्प सोडला आणि सामनामुळे महाराष्ट्राच्या कानाकोप–यातील शिवसैनिकांच्या घराघरात पोहोचला. शिवसैनिक झपाटून कामाला लागले. सामना हा शिवसेनेचा आवाज झाला.

सामना सुरू झाला, त्याला आता तीन दशके उलटून गेली आहेत. बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आता रश्मी ठाकरे यांच्या संपादकत्वाखाली सामनाच्या माध्यमातून शिवसेनेने आपली भूमिका वेळोवेळी जनतेसमोर मांडली. पुढे तर अन्य प्रसार माध्यमांनाही सामना हेच सेनेच्या भूमिकेचे अधिकृत माध्यम झाले. काँग्रेसविरोधात राज्यभर शिवसेनेचा प्रखर प्रचार करणे हा सामनाचा स्थापनेच्या काळातील हेतू होता. पण राजकारणाचे रंग सतत बदलत असतात. बाळासाहेबांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सातत्याने आक्रमक, लढाऊ आणि रस्त्यावरच्या राडेबाजीसाठी मराठी मनांत घर करून राहिली होती. सामना हे त्यांच्यासाठी बाळासाहेबांच्या शब्दाचे साधन होते. काळ बदलला, राजकारणाची गणितेही बदलली आणि सामनाची राजकीय भूमिकाही बदलली. बाळासाहेबांनी विचारपूर्वक घडविलेली शिवसेना–भाजप युती ही घोडचूक होती, असा निष्कर्ष काढण्यापर्यंत राजकारणाचे रंग बदलले. धर्माच्या नावाने राजकारण केले हे चुकलेच, अशी नवी भूमिका घेत

बाळासाहेबांच्या पश्चात उद्धव ठाकरे यांनी नव्या राजनीतीचा अवलंब केला आणि युतीमुळे शिवसेना २५ वर्षे सडली, अशी रोखठोक भूमिका त्यांनी घेतली. नव्या समीकरणात शिवसेना आणि भाजपची फारकत झाली व बाळासाहेबांनी ज्या काँग्रेसवर सातत्याने प्रहार केले, त्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने सत्ताग्रहण केले. शिवसेनेचा मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभावा अशी बाळासाहेबांची इच्छा त–हेने पूर्ण झाल्यानंतर सामनाचे तेव्हाचे रूप आता बदलले आहे. सामना ही शिवसेनेस सत्तेपर्यंत पोहोचविणारी प्रभावी शीडी होती, हे वास्तव आहे. आता सत्ताप्राप्तीचे ते ध्येय पूर्ण झाले आहे. सामनाच्या स्तंभांतून काँग्रेसवर कोरडे ओढले जातील, असे बाळासाहेब तेव्हा म्हणाले होते. आता बदललेल्या राजकारणात हेच स्तंभ एकेकाळचा सहकारी असलेल्या भाजपवर कोरडे ओढताना पाहावयास मिळतो. काहीही झाले तरी, सामना हे शिवसेना नावाच्या संघटनेचे मुखपत्र आहे, त्यामुळे, ज्या ज्या वेळी संघटनेची जी भूमिका असेल, त्याप्रमाणे वृत्तपत्रीय भूमिका घेणे ही मुखपत्राची अपरिहार्यता सामना समोरही आहे. शिवसेनेच्या वाढीस सामनाने निर्विवाद हातभार लावला आहे. भविष्यात सामना ही जबाबदारी किती समर्थपणे पेलेल, ते राजकारणाच्या भविष्य काळावरच अवलंबून असेल.

## ४.३ प्रश्नावलीच्या विश्लेषण आणि स्पष्टीकरण


- **सामान्य प्रश्न**

### ४.३.१ लिंग

**सारणी क्र. ४.१ लिंग**

| वाचक | वाचकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पुरुष | ४६४ | ७९ |
| महिला | १२२ | २१ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.१ लिंग**




**निरीक्षण:**


वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि संशोधकाने निवडलेल्या गट समूह मधून सामना वाचन करणाऱ्यामध्ये ४६४ (७९%) पुरुष आहेत, तर १२२ (२१%) महिला आहेत.

### ४.३.२ शिक्षण

**सारणी क्र. ४.२ शिक्षण**

| शिक्षण | वाचकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| दहावीपर्यंत | २८८ | ४९ |
| पदवीपर्यंत | २४४ | ४२ |
| पदव्युत्तर | ५४ | ९ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र ४.२ शिक्षण**




**निरीक्षण:**


वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि वृत्तपत्र वाचकांमध्ये दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या वाचकांची संख्या २८८ (४९%) इतकी आहे, तर पदवीपर्यंत शिक्षण झालेल्या वाचकांची संख्या २४४ (४२%) आहे आणि पदव्युत्तर वाचकांची संख्या ५४ (९%) इतकी आहे.

### ४.३. ३ शालेय शिक्षण कुठे झाले?

**सारणी क्र. ४.३ शालेय शिक्षणाचे ठिकाण**

| शालेय शिक्षणाचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शहरात | ४९८ | ८५ |
| ग्रामीण भागात | ८६ | १५ |
| एकूण | ५८६ | १०० |

**आलेख क्र ४. ३ शालेय शिक्षणाचे ठिकाण**




**निरीक्षण:**


वरील तखत्या वरून असे निदर्शनास येते कि शालेय शिक्षण शहरात झालेल्या व्यक्तींची संख्या ४९८ (८५%) इतकी आहे, तर ग्रामीण भागात शिक्षण झालेल्या व्यक्तींची संख्या ८६ (१५%) इतकी आहे.

### ४.३.४ महाविद्यालयीन शिक्षण कुठे झाले?

**सारणी क्र. ४.४ महाविद्यालयीन शिक्षणाचे ठिकाण**

| महाविद्यालयीन शिक्षणाचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शहरात | २४४ | ८२ |
| ग्रामीण भागात | ५४ | १८ |
| **एकूण** | **२९८** | **१००** |

**आलेख क्रं. ४.४ महाविद्यालयीन शिक्षणाचे ठिकाण**




**निरीक्षण:**

वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि २४४ (८२%) यांनी त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण शहरात प्राप्त केले आहे, तर ५४ (१८%) यांचे ग्रामीण भागात शिक्षण झाले आहे.


### ४.३.५ रोज किती वृत्तपत्र वाचता?

**सारणी क्र. ४.५ रोज वाचली जाणारी वृत्तपत्र संख्या**

| वृत्तपत्र संख्या | वृत्तपत्र संख्या | टक्केवारी |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| एक | २९० | ४९ |
| दोन | १९८ | ३४ |
| तीन | ९८ | १७ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्रं. ४. ५ रोज वाचली जाणारी वृत्तपत्र संख्या**




**निरीक्षण:**


निवडलेल्या गट समूहामध्ये एक वृत्तपत्र वाचणाऱ्या वाचकांची संख्या २९० (४९%) इतकी तर दोन वृत्तपात्र वाचणाऱ्या वाचकांची संख्या १९८ (३४%) आणि तीन वृत्तपत्र वाचणाऱ्या वाचकांची संख्या ९८ (१७%) इतकी आहे.

### ४.३.६ वृत्तपत्र कोठे वाचता?

**सारणी क्र. ४.६ वृत्तपत्र वाचनाचे ठिकाण**

| वृत्तपत्र वाचनाचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| घरी | ४४८ | ७७ |
| प्रवासात | ४४ | ७ |
| कार्यालयात | ९४ | १६ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४. ६ वृत्तपत्र वाचनाचे ठिकाण**




**निरीक्षण:**


घरी वृत्तपत्र वापरणा–यांची संख्या ४४८ (७७%) इतकी आहे, तर प्रवासात वृत्तपत्र वाचणारे ४४ (७%) आहेत. कार्यालयात वृत्तपत्र वाचणारे ९४ (१६%) इतके आहेत.

## ४.३.७ वृत्तपत्र किती वेळ वाचता?

**सारणी क्र. ४.७ वृत्तपत्र वाचनाचा वेळ**

| वृत्तपत्र वाचनाचा वेळ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १५ मिनिटे | २१८ | ३७ |
| ३० मिनिटे | २७० | ४६ |
| ६० मिनिटांपर्यंत | ९८ | १७ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४. ७ वृत्तपत्र वाचनाचा वेळ**




**निरीक्षण:**


लक्ष गटातील २१८ (३७%) हे वाचक सामना वृत्तपत्राचे १५ मिनिटे वाचन करतात तर ३० मिनिटे वृत्तपत्र वाचणा-या वाचकांची संख्या २७० (४६%) वाचक आहे ६० मिनिटांपर्यंत वृत्तपत्र वाचणारे वाचक ९८ (१७%) इतके आहेत.

### ४.३.८ वृत्तपत्र कशासाठी वाचता?

**सारणी क्र. ४.८ वृत्तपत्र वाचनाचा उद्देश**

| वृत्तपत्र वाचनाचा उद्देश | होय | टक्केवारी | नाही | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अग्रलेख/ संपादकीय पान | ३२६ | १७ | २६० | १६ |
| राजकीय बातम्या | ५२४ | २७ | ६२ | ४ |
| मनोरंजन | २४६ | १३ | ३४० | २१ |
| क्रीडा | २८० | १३ | ३०६ | १९ |
| सर्वसाधारण वाचन | २८४ | १५ | ३०२ | १९ |
| शिक्षण / करिअर | २४४ | १३ | ३४२ | २१ |

**आलेख क्र. ४.८ वृत्तपत्र वाचनाचा उद्देश**




**निरीक्षण:**

वृत्तपत्रातील अग्रलेखांचे वाचन करणारे वाचक जास्त म्हणजेच १७% (३२६) आहे, तर संपादकीय पानावरील अग्रलेखांचे वाचन न करणारे वाचक १६% (२६०) इतकी आहे. राजकीय बातम्या विचणारे वाचक २७%(५२४) इतके आहेत. राजकीय बातम्या न वाचणारे वाचक ४%(६२) इतके आहेत. मनोरंजनासाठी वृत्तपत्र वाचणारे


वाचक १३%(२४६) इतके आहेत. मनोरंजन या कारणाने वृत्तपत्र न वाचणारे वाचक जास्त आहेत, म्हणजेच २१% (३४०) इतके आहेत. क्रीडा वृत्त वाचणारे वाचक १३% (२८०) इतके आहेत तर क्रीडा वृत्त न वाचणारे वाचक १९% (३०६) इतके आहेत. सर्वसाधारण वाचन करणारे वाचक १५% (२८४) इतके आहेत तर १९% (३०२) इतके वाचक सर्व साधारण वाचन करत नाहीत. शिक्षण व करियर संबंधीची माहिती मिळविणारे वृत्तपत्र वाचक १३% (२४४) इतके आहेत तर या माहितीसाठी वृत्तपत्र न वाचणारे वाचक २१%(३४२) इतके आहेत.

### ४.३.९ वाचनाला/पाहायला प्राधान्य कशाला?

**सारणी क्र. ४.९ माहिती मिळवण्यासाठी साधन प्राधान्य**

| साधने | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| वृत्तपत्र | ४५८ | ७८ |
| दूरदर्शन (टेलिव्हिजन) | ७६ | १३ |
| इंटरनेट | ५२ | ९ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

### आलेख क्र. ४.९ माहिती मिळवण्यासाठी साधन प्राधान्य




**निरीक्षण:**

वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि माहिती मिळविण्यासाठी वृत्तपत्र हे साधन वापरणा–यांची संख्या ४५८ (७८%) इतकी आहे, तर दूरदर्शन (टेलिव्हिजन) हे साधन वापरणा–या व्यक्तींची संख्या ७६ (१३%) इतकी आहे. इंटरनेटचा वापर माहिती मिळवणा–यांपैकी ५२ (९%) करतात.


- राजकीय प्रश्न

### ४.३.१० 'सामना' कशासाठी वाचता?

सारणी क्र. ४.१० 'सामना' वाचनाचे उद्देश

| 'सामना' वाचनाचे कारण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शिवसेनेचे मुखपत्र | ४१८ | ७१ |
| वृत्तपत्र | १६१ | २८ |
| इतर | ७ | १ |
| एकूण | ५८६ | १०० |

आलेख क्र. ४.१० 'सामना' वाचनाचे उद्देश




**निरीक्षण:**


'सामना' हे वृत्तपत्र शिवसेनेचे मुखपत्र म्हणून वाचणारे ४१८ (७१%) तर केवळ एक वृत्तपत्र म्हणून वाचणारे १६१ (२८%) आहेत. इतर उद्देशाने 'सामना' वृत्तपत्र वाचणारे ७ (१%) आहेत.

## ४.३.११ 'सामना' हे वृत्तपत्र अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान देते का?

**सारणी क्र. ४.११ वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांचे स्थान**

| वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४३२ | ७४ |
| नाही | ८६ | १५ |
| सांगता येत नाही | ६८ | ११ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.११ वृत्तपत्रात अन्य पक्षाच्या बातम्यांचे स्थान**




**निरीक्षण:**


वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि 'सामना' या वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान आहे असे म्हणणारे वाचक ४३२ (७४%) आहेत तर ८६ (१५%) वाचकांना 'सामना' या वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान नाही असे वाटते. 'सामना' या वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान आहे किंवा नाही हे सांगता न येणारे वाचक ६८ (११%) इतके आहेत.

### ४.३.१२ शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे लोकांपर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र (मुखपत्र) यशस्वी झाले आहे.

**सारणी क्र. ४.१२ शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे पोहोचविण्यात 'सामना'यशस्वी**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५२२ | ८९ |
| नाही | ४२ | ७ |
| सांगता येत नाही | २२ | ४ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.१२ शिवसेनेची धोरणे व उदिष्ट्ये पोचविण्यात यशस्वी**



**निरीक्षण:**


वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि शिवसेनेची धोरणे व उदिष्ट्ये लोकांपर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र (मुखपत्र) यशस्वी झाले आहे असे मत ५२२ (८९%) तर शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे लोकांपर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र (मुखपत्र) यशस्वी झाले नाही असे मत ४२ (७%) लोकांनी मांडले आहे. दोन्हीपैकी काहीही सांगता येत नाही असे २२ (४%) व्यक्ती आहेत.

**४.३.१३ शिवसेनेला आपला जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग झाला आहे.**

**सारणी क्र. ४.१३ जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५२६ | ९० |
| नाही | ३८ | ६ |
| सांगता येत नाही | २२ | ४ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.१३ 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग**



**निरीक्षण:**


नमुना निवडीतील ५२६ (९०%) वाचक शिवसेनेला जनाधार वाढविण्यासाठी सामनाचा उपयोग झाला आहे असे मत व्यक्त करतात तर ३८ (६%) हे म्हणतात कि सामनाचा अशा रीतीने काही उपयोग झाला नाही. शिवसेनेला आपला जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग झाला आहे असे सांगता येत नाही, असे मत असणा-या व्यक्तींशी संख्या २२ (४%) आहे.

### ४.३.१४ 'सामना' दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा-यांपर्यंत पोहोचली आहे?

**सारणी क्र. ४.१४ बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा-यांपर्यंत पोहोचली**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५२६ | ९० |
| नाही | ३८ | ६ |
| सांगता येत नाही | २२ | ४ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

## आलेख क्र. ४.१४ बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा–यांपर्यंत पोहोचली




**निरीक्षण:**


वरील आलेखावरून असे निदर्शनात येते कि 'सामना' दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा–यांपर्यंत पोहोचली आहे असा ५२६ (९०%) व्यक्तींचा प्रतिसाद आहे तर 'सामना' दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा–यांपर्यंत पोहोचली नाही असा ३८ (६%) व्यक्तींचा प्रतिसाद आहे. आणि दोन्हींपैकी काहीच सांगता येत नाही असा २२ (४%) प्रतिसाद आहे.

### ४.३.१५ ‘सामना’ दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, विशेष लेख, अग्रलेख यांद्वारे शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत.

**सारणी क्र. ४.१५ ‘सामना’तील बातम्या शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५५२ | ९४ |
| नाही | १८ | ३ |
| सांगता येत नाही | १६ | ३ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.१५ शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत**




**निरीक्षण:**

वरील आलेखावरून असे निदर्शनास येते कि सामना दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, विशेष लेख, अग्रलेख, व्यंगचित्र याद्वारे शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत असतात असे मत असणा–यांची संख्या ५५२ (९४%) इतकी आहे तर सामना दैनिकात प्रसिद्ध झालेल्या सदर बातम्या याद्वारे शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत


नसतात असे मत असणारे १६ (३%) इतके आहेत. दोन्हींपैकी काहीच सांगता येत नसणारे वाचक १६ (३%) इतके आहेत.

### ४.३.१६ 'सामना' मध्ये प्रसिद्ध होणा–या मजकुरात शिवसेना संदर्भातील बातम्यांचे प्रमाण पक्षाच्या दृष्टीने योग्य आहे.

**सारणी क्र. ४.१६ 'सामना' मध्ये प्रसिद्ध होणार मजकूरपक्षाच्या दृष्टीने योग्य**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पुरेशा | ३८२ | ६५ |
| अपु–या | ७४ | १३ |
| मध्यम | ८२ | १४ |
| सांगता येत नाही | ४८ | ८ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.१६ 'सामना' मध्ये प्रसिद्ध होणार मजकूर**




**निरीक्षण:**


वरील आलेखा वरून असे लक्षात येते कि ’सामना’ मध्ये प्रसिद्ध होणा–या मजकुरात शिवसेना संदर्भातील बातम्यांचे प्रमाण पक्षाच्या दृष्टीने पुरेशा आहेत असे मत ३८२ (६५%), तर ७४ (१३%) अपु–या आहेत असे मत मांडले. बातम्यांचे प्रमाण माध्यम आहे असे मत ८२ (१४%) लोकांनी मांडले आहे. काहीच ठाम सांगता येणार नाही असे ४८ (८%) लोकांनी मत नोंदविले आहे.

**४.३.१७ पक्षाची ध्येयधोरणे, भूमिका, घडामोडी, पक्षाचे आदेश समजावून घेण्यासाठी शिवसैनिकांना सामना या वृत्तपत्राचा उपयोग होतो.**

**सारणी क्र. ४.१७ शिवसैनिकांना ‘सामना’ या वृत्तपत्राचा उपयोग**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५५० | ९४ |
| नाही | १८ | ३ |
| सांगता येत नाही | १८ | ३ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.१७ सामना या वृत्तपत्राचा उपयोग**



**निरीक्षण:**


पक्षाची ध्येयधोरणे, भूमिका, घडामोडी, पक्षाचे आदेश समजावून घेण्यासाठी शिवसैनिकांना सामना या वृत्तपत्राचा उपयोग होतो असे मत असणारे वाचकांची संख्या जास्त म्हणजेच ५५० (९४%) इतकी आहे. याचा अर्थ शिवसैनिकांना 'सामना' हे वृत्तपत्र शिवसेनेच्या उद्दिष्टांचे माहितीपत्र आहे. पक्षाची ध्येयधोरणे, भूमिका, घडामोडी, पक्षाचे आश वेळी देश समजावून घेण्यासाठी शिवसैनिकांना 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग होत नाही  असे म्हणणारे वाचक १८ (३%) इतके आहेत. दोन्हींपैकी काहीच सांगता न येणारे वाचक १८ (३%) इतके आहेत.

## ४.३.१८ सामना वृत्तपत्रामुळे शिवसेना पक्षाकडून शिवसैनिकांना दिशादर्शन होते.

**सारणी क्र. ४.१८ शिवसैनिकांना दिशादर्शक**

| **प्रतिसाद** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ५४६ | ९३ |
| नाही | २४ | ४ |
| सांगता येत नाही | १६ | ३ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

### आलेख क्र. ४.१८ शिवसैनिकांना दिशादर्शक




**निरीक्षण:**


'सामना' हे वृत्तपत्र शिवसेना पक्षाकडून शिवसैनिकांना दिशादर्शक ठरते असे मत असणारे ५४६ (९३%) आहेत तर दिशादर्शक ठरत नाही असे मत असणारे २४ (४%) आहेत. 'सामना' दिशादर्शक आहे किंवा नाही असे मत असणारे १६ (३%) आहेत.

### ४.३.१९ शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे.

**सारणी क्र. ४.१९ शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्यासाठी 'सामना' यशस्वी**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५१२ | ८८ |
| नाही | ५४ | ९ |
| सांगता येत नाही | २० | ३ |
| एकूण | ५८६ | १०० |

### आलेख क्र. ४.१९ शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्यासाठी सामना यशस्वी




**निरीक्षण:**

५१२ (८८%) लोकांच्या मते शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे तर नाही म्हणणारे ५४ (९%) इतके आहेत. शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे किंवा नाही असे कोणतेच मत सांगता येत नाही असे २० (३%) लोकांनी मत मांडले आहे.


**सामाजिक आणि  सांस्कृतिक प्रश्न**

### ४.३.२० मराठी माणसाची अस्मिता ही सामनाची ओळख आहे का?

**सारणी क्र. ४.२० सामनाची ओळख**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५३६ | ९२ |
| नाही | ३० | ५ |
| सांगता येत नाही | २० | ३ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.२० सामनाची ओळख**




**निरीक्षण:**


वरील आलेखा वरून असे निदर्शनास येते की मराठी माणसाची अस्मिता अशी सामनाची ओळख आहे असे वाटणा-या ५३६ (९२%) आहेत, तर मराठी माणसाची अस्मिता अशी सामनाची वेगळी ओळख नाही असे वाटणारे ३० (५%) इतके आहेत. २० (३%) व्यक्तींना नक्की ठामपणे असे सांगता येत नाही की, मराठी माणसाची अस्मिता अशी सामनाची ओळख आहे किंवा नाही.

### ४.३.२१ 'हिंदुत्वाचा पुरस्कार' हि 'सामनाची' ओळख आहे का?

**सारणी क्र. ४.२१ सामनाची ओळख हिंदुत्वाचा पुरस्कार**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५५२ | ९४ |
| नाही | १८ | ३ |
| सांगता येत नाही | १६ | ३ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४.२१ सामनाची ओळख हिंदुत्वाचा पुरस्कार**




**निरीक्षण:**


'हिंदुत्वाचा पुरस्कार' हि 'सामनाची' ओळख आहे असे म्हणणारे वाचक ५५२ (९४%) इतके आहेत तर १८ (३%) वाचकांना 'हिंदुत्वाचा पुरस्कार' हि 'सामनाची' ओळख आहे असे वाटत नाही. 'हिंदुत्वाचा पुरस्कार' हि 'सामनाची' ओळख आहे किंवा नाही हे सांगता न येणारे वाचक १६ (३%) इतके आहेत.

### **४.३.२२ मराठी प्रादेशिक अस्मिता (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवण्यासाठी सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले.**

**सारणी क्र. ४.२२ मराठी प्रादेशिक अस्मिता (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवणे**

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५२४ | ९० |
| नाही | ४२ | ७ |
| सांगता येत नाही | २० | ३ |
| **एकूण** | **५८६** | **१००** |

**आलेख क्र. ४. २२ (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवणे**




**निरीक्षण:**

मराठी प्रादेशिक अस्मिता (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवण्यासाठी सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे असे मत ९०% (५२४)

लोकांनी मांडले आहे तर मराठी प्रादेशिक अस्मिता (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवण्यासाठी सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले नाही असे मत ७% (४२) यांचे आहे. या दोन्हीपैकी काहीच सांगता येत नाही असे मत ३% (२०) लोकांनी मांडले आहे.

## ४.४ सामनातील निवडक अग्रलेखांचे विश्लेषण –

सामनामधील काही निवडक अग्रलेखांचे विश्लेषण संशोधकाने राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांतर्गत विभाजन करून खाली मांडले आहे:

- **राजकीय अग्रलेख:**
- **दि. २० जानेवारी २०१७– अग्रलेख**



४ संपादकीय

गुंडांना सत्ताधाऱ्यांची कवचकुंडले हवीच असतात व अशा गुंडांच्या मदतीने निवडणूक जिंकणे व पक्षाची व्याप्ती वाढविणे हे काळे धन जमा करण्यापेक्षा वाईट आहे. असे सर्व दाखलेबाज लोक कालपर्यंत राष्ट्रवादीच्या छत्रछायेखाली होते. ते सगळे एका रात्रीत 'कमल निवासा'त विराजमान झाले. सत्तेचा तीळगूळ सगळ्यांनाच हवा असतो, पण भाजपने आपली कवळी सांभाळून असे राजकारण करावे. मित्र म्हणून आम्ही त्यांना हे सांगत आहोत. शेवटी काय उंचे लोग उंची पसंद!

उंची लोग, उंची पसंत

**निरीक्षण:**

महाराष्ट्रात शिवसेना भाजपबरोबर सत्तेत भागीदार असताना सामनाने लिहिलेला अग्रलेख.

- **दि. ३० जानेवारी २०१७– अग्रलेख**



४ संपादकीय

अयोध्येतील राममंदिराची घोषणा हे लोक २८ वर्षे करीत आहेत. समान नागरी कायद्याच्या बाबतीत गंडवागंडवी सुरूच आहे. मुंबईसह महाराष्ट्र यांना धनदांडग्यांच्या घशात घालायचाच आहे व त्यासाठी मुख्यमंत्री खंडोजी खोपडे व सूर्याजी पिसाळांच्या मदतीने शिवसेनेवर घाणेरडी टीका करणार असतील तर आज फक्त घसाच बसलाय, उद्या कायमचेच घरी बसाल. शिवसेना म्हणजे महाराष्ट्र अस्मितेचा पेटलेला अंगार आहे. आगीशी खेळू नका!

आगीशी का खेळाता?

**निरीक्षण:**

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारमध्ये शिवसेना सहभागी असताना सामनातून मुख्यमंत्र्यांवर केलेली टीका आहे. सत्तेत राहून सामना विरोधी पक्षाच्या मुखपत्राचे भूमिका बजावत असे.

- **दि. २ ऑगस्ट २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

मराठी माणसांच्या न्याय्य, आशा-आकांक्षांचा आवाज म्हणजे शिवसेना! शिवसेनेच्या विध्वंसाची जी भाषा आजचे पावटी पावन भाजपवाले ( बाटगे ) बडबडत आहेत ते त्यांचे पोटाचे जुने दुखणे आहे. असे बाटगे हेच महाराष्ट्र व मराठी माणसांसाठी काळ ठरत आले, पण पुढे काळाच्या ओघात हे बाटगे वरळीच्या गटारातून वाहून कायमचे नामशेष झाले. त्यांचे नामोनिशाणही उरले नाही. शिवसेना भवनाशी पंगा घेण्याचे सोडाच... असा माणूस अद्याप जन्माला यायचा आहे. बाटगे आणि शिखंडींच्या टोळ्या हाताशी धरून मराठी अस्मितेवर दारूच्या गुळण्या कोण टाकत असेल तर मराठी माणूस त्या राजकीय बेवड्यांचा चोख बंदोबस्त केल्याशिवाय राहाणार नाही! तरीही अंगावर यायचे असेल तर या; अर्थात तेवढी मर्दानगी अंगात असेल तर!

बोला, येताय अंगावर

**निरीक्षण:**

भाजपने शिवसेना भवनावर मोर्चा काढला होता अशी हिम्मत मुंबईत कोणाचीही पूर्वी झाली नव्हती म्हणून सामनातून शिवसेनेने भाजपावर आगपाखड केली.

- **दि. २३ ऑगस्ट २०२१– अग्रलेख**


४ संपादकीय

'२०२४ चे लक्ष्य' वगैरे ठीक आहे, पण मोदी-शहांप्रमाणे हातचलाखीचे काही प्रयोग विरोधकांनाही करावेच लागतील. 'मोदी नामा'ची जादू उतरली आहे. त्यामुळे २०२४ चा जय-पराजय हा हातचलाखीच्या खेळावरच ठरेल. त्याची तयारी, रंगीत तालीम करावी लागेल, नाहीतर जन आशीर्वादाच्या 'जत्रा' लोकांना गुंगीचा मंत्र देऊन पुढे निघतील!

सत्ताधा–यांची जत्रा आणि विरोधकांची मोट

**निरीक्षण:**

२०२४ ला पुन्हा मोदींच्या नेतृत्वाखाली देशात भाजप सत्तेवर येऊ नये ही शिवसेनेची भूमिका सामना मांडतो आहे.

- **दि. १ ऑक्टोबर २०२१– अग्रलेख**


दि. 1/10/2021

४ संपादकीय

काँग्रेस पक्षाने उसळी मारून उठावे, मैदानात उतरावे, नवचैतन्याची बहार राजकारणात आणावी अशी लोकभावना आहे. त्यासाठी काँग्रेसला आधी पूर्णवेळ अध्यक्ष हवाच. डोकेच नसेल तर शरीराचा काय फायदा? सिद्धू, अमरिंदर यांची मनधरणी करण्यात अर्थ नाही. पंजाबात काँग्रेस फोडून भाजपास विधानसभा गिळायची आहे, हा विनोदच म्हणावा लागेल. काँग्रेसशिवाय भाजपासही जिंकता येत नाही आणि भाजपासही काँग्रेसचे टॉनिक लागते. पण हे काँग्रेस नेतृत्वास कधी उमगणार?

**निरीक्षण:**

काँग्रेसबरोबर महाआघाडी असतानाही काँग्रेस पक्षाला योग्य व पूर्णवेळ अध्यक्षाची गरज आहे असे सामनाच्या अग्रलेखात टिपण्यात आले.

- **दि. ६ ऑक्टोबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

सर्व सरकारी संपत्ती खासगी लोकांना विकून टाकल्यावर आता शेतजमिनींचा लिलाव सुरू झाला आहे. त्या मनमानीविरोधात शेतकरी उभा ठाकला आहे. पंतप्रधान मोदी यांनी शेतकऱ्यांचे ऐकायला हवे. प्रियंका गांधी यांची लढाई शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठीच सुरू आहे. त्यांना अटक करून त्यांचा आवाज आणि शेतकऱ्यांचा आक्रोश दडपून टाकता येईल, असे सरकारला वाटत असेल तर तो भ्रम आहे. नव्या ईस्ट इंडिया कंपनीकडे देश सोपवला जाऊ नये यासाठी लढा देणाऱ्या शेतकऱ्यांना चिरडून मारणाऱ्या सरकारचा धिक्कार असो! स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात शेतकऱ्यांच्या रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. हा स्वातंत्र्याचा 'रक्त महोत्सव' म्हणायचा का? हे काय सुरू आहे आपल्या देशात?

स्वातंत्र्याचा रक्त महोत्सव

**निरीक्षण:**

प्रियंकाच्या आंदोलनाला सामनातून पाठिंबा, हे प्रथमच घडले. गांधी घराण्याशी सामना कसा जोडला गेला आहे, त्याची प्रचिती हा अग्रलेख वाचताना येते.

- **दि. ९ ऑक्टोबर २०२१–अग्रलेख**



४ संपादकीय

सध्या भाजप सर्वत्रच दिसतोय. फक्त कश्मीर खोऱ्यात निरपराध्यांच्या हत्या सुरू असताना केंद्र सरकार, भाजपचे अस्तित्व दिसत नाही. भाजप कार्यकर्त्यांचे अस्तित्व क्रूझवरील 'रेव्ह' पार्ट्यांत, जसे ईडी, आयटीत दिसते तसे ते कश्मीर खोऱ्यातही दिसावे. एवढेच नव्हे, तर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना 'शांत' करण्यासाठी 'खासगी आर्मी' उभारावी असे जाहीर सल्लेही त्या पक्षाचे नेते आपल्या कार्यकर्त्यांना देतात. कश्मीर खोऱ्यात सध्या दहशतवाद्यांकडून निरपराध पंडित आणि शिखांच्या हत्या केल्या जात आहेत. तेव्हा या धडपड्या कार्यकर्त्यांनी छातीचा कोट करून कश्मीरातही जावे. त्यांची वाहव्वाच होईल!

पंडित व शिखांच्या हत्या

**निरीक्षण:**

काश्मिरात भाजप काय करतो?

काश्मीरमध्ये काही झाले तर त्याचे खापर शिवसेना भाजपावर फोडले, त्याचे हे उदाहरण.

- **दि. ११ ऑक्टोबर २०२१ / अग्रलेख**



४ संपादकीय

लखीमपूरमधील शेतकरी हत्याकांडाबाबत जे असंख्य लोक वरुण गांधी यांच्याप्रमाणे आपल्या भावना बिनधास्तपणे व्यक्त करू शकले नाहीत, अशा सगळ्यांसाठी हा आजचा 'महाराष्ट्र बंद' आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी महाराष्ट्र राज्य ठामपणे उभे आहे. बांधावर जाऊन शेतकऱ्यांविषयी कळवळा दाखवायचा, पण चार शेतकऱ्यांना भाजपच्याच मंत्रिपुत्राने चिरडून मारले त्या कृत्याचा साधा निषेधही करायचा नाही, अशी राज्याच्या विरोधी पक्षाच्या वागण्याची तऱ्हा आहे. सरकारविरोधी आवाज उठवणाऱ्या, न्यायासाठी झगडणाऱ्या, देशासाठी बलिदान देणाऱ्या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी आजचा 'महाराष्ट्र बंद' आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकाने अन्नदात्याचे ऋण फेडण्यासाठी या बंदमध्ये सहभागी व्हावे!

वरुण गांधींचे अभिनंदन

**निरीक्षण:**

अन्नदात्यांसाठी, महाराष्ट्र बंद

जे भाजप सरकारच्या विरोधात बोलतात, त्या भाजप नेत्यांचे शिवसेना सामनातून अभिनंदन करते. दुस–या राज्यातील घटनेबद्दल महाराष्ट्र बंद सत्ताधारी पक्ष– म्हणजे महाराष्ट्र सरकारच पुकारते, हे महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच घडले. केवळ भाजप विरोध म्हणून.

- **दि. २३ ऑक्टोबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

शिवसेनेने सत्तेसाठी हिंदुत्व सोडले, असे म्हणणाऱ्यांनी जम्मू-कश्मीरात मेहबुबा मुफ्तीच्या पक्षाशी सत्तेसाठी लावलेला निकाह विसरता येईल काय? महाराष्ट्रात शिवसेनेने काय केले व करायला हवे त्यावर सल्ले देण्यापेक्षा देशाच्या सीमेवरील हिंदूंचा आक्रोश समजून घ्या. हिंदुत्व हे तुमच्या राजकीय स्वार्थासाठी चावून फेकण्याचा चोथा नाही. एका राज्यात गोमांसावरून लोकांना ठार करायचे व दुसऱ्या राज्यात गोमांस विकायला परवानगी द्यायची हे तुमचे बेगडी हिंदुत्व. हे तुमचे नव हिंदुत्व म्हणजे षंढपणाचा कळसच झाला. हिंदुत्वावरील ही फुकाची प्रवचने आता बंद करा! कश्मीरातील हिंदूंच्या किंकाळ्यांनी ज्यांचे मन द्रवत नाही त्यांनी महाराष्ट्रावर प्रवचने झोडू नयेत.

हिंदुत्वावरील फुकाची प्रवचने आता बंद करा !

**निरीक्षण:**

आम्ही हिंदुत्व सोडलेले नाही, असे शिवसेनेला सांगायचे व राज्यात धर्मनिरपेक्षतेचे नाव घेऊन अल्पसंख्यांकांचा अनुयय करणा–यांना बरोबर घेऊन सरकार चालवायचे, हा शिवसेनेचा दुटप्पीपणा आहे.

- **दि. २० नोव्हेंबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

शेतकरी लढत राहिले, शहीद झाले व शेवटी जिंकले. १३ राज्यांतील पोटनिवडणुकांत भाजपला पराभव स्वीकारावा लागला. त्यातून आलेले हे शहाणपण आहे. शेतकरी खलिस्तानवादी अतिरेकी होते तर मग पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्यापुढे पांढरे निशाण का फडकविले? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. लखीमपूर खिरी येथे आंदोलक शेतकऱ्यांना भाजपच्या मंत्रिपुत्राने चिरडून मारले. त्या 'जालियनवाला बाग'सारख्या हत्याकांडाविरुद्ध सार्वत्रिक बंद पुकारणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. न्याय, सत्य आणि राष्ट्रवादाच्या लढाईत महाराष्ट्राने नेहमीच निर्भय भूमिका घेतली. यापुढेही अशी भूमिका घ्यावीच लागेल. तिन्ही कृषी कायदे मागे घेणे अखेर केंद्र सरकारला भाग पडले आहे. शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय झालाच आहे. मागे हटणार नाही असे सांगणाऱ्यांचा अहंकार पराभूत झाला, पण आताही अंध भक्त बोलतील, "काय हा साहेबांचा मास्टर स्ट्रोक!"

व्वा ! काय हा मास्टर स्ट्रोक अहंकाराचा पराभव

**निरीक्षण:**

पंतप्रधान मोदी व भाजपच्या द्वेषाने शिवसेना व सामनाला पछाडले आहे. त्याचेच प्रतिबिंब या अग्रलेखात पडले आहे.

- **दि. २९ नोव्हेंबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

लोकशाहीचा मुखवटा लावून देशात एकाधिकारशाहीचा सध्या सुरू असलेला खेळ संविधानाच्या विरोधात आहे. संविधानात सत्याचा जय व राष्ट्रहिताला महत्त्व आहे. ते आज होत आहे काय? पंतप्रधान मोदी यांनी संविधान दिनी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये भाषण दिले. याच हॉलमध्ये स्वातंत्र्याशी नियतीचा करार झाला. मोदी आता नवी संसद निर्माण करीत आहेत. या संसदेत 'सेंट्रल हॉल'च नाही. त्यामुळे पुढच्या 'संविधान दिनी' पंतप्रधान भाषण करणार कुठे?

संविधान दिनाचे महत्व

फॅमिली पार्टी कोणाची?

**निरीक्षण:**

मोदींच्या सेंट्रल व्हिस्टा प्रकाराला काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांप्रमाणे शिवसेनेलाही विरोध आहे. काँग्रेसच्या विचारधारेशी मतभेद असू शकतात पण काँग्रेसने आजच्या प्रमाणे लोकशाहीचे स्तंभ मोडून बाजारात विकायला काढले नव्हते, असे सामना लिहितो.

- **दि. ४ डिसेंबर २०२१–अग्रलेख**



४ संपादकीय

काँग्रेसला विरोधी पक्षांचे नेतृत्व करण्याचा दैवी अधिकार प्राप्त झालेला नाही, असे ऐतिहासिक विधान तृणमूल काँग्रेसचे प्रवक्ते प्रशांत किशोर करतात. दैवी अधिकार कोणालाच प्राप्त होत नाहीत. २०२४ साली कुणाचे दैव, कोणाचे भाग्य फळफळेल ते सांगता येत नाही. भाजपचा जन्म कायम विरोधी बाकांवरच बसण्यासाठी झाला आहे, अशी टवाळकी पचवून हा पक्ष अवकाशात झेपावला आहे. आज राहुल गांधी, प्रियंका गांधींची राजकीय कुचाळकी सुरूच आहे. राहुल गांधी व प्रियंका अशा कुचाळक्यांना तोंड देत संघर्ष करीत आहेत. 'यूपीए' नेतृत्वाचा दैवी अधिकार कोणाचा ते येणारा काळ ठरवेल. आधी पर्याय तर उभा करा!

दैवी अधिकाराचा घोळ

**निरीक्षण:**

राहुल आणि प्रियंकाबाबत शिवसेनेचा आशावाद आणि प्रेम यातून दिसून येते.

- **दि. १४ डिसेंबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

कधी काळी देशात मुसलमान, दलित व्होट बँकेचे राजकारण होते व हिंदूंच्या मनात नाकारले जात असल्याची भावना तीव्र होती. आज हिंदू व्होट बँकेचे राजकारण यशस्वी झाले आहे. भाजप त्याचेच 'खात' आहे. अशा परिस्थितीत विचारांची वीज कोसळावी तसे राहुल गांधींनी हिंदू राज्य आणण्याचा बार उडवला आहे. गांधी हिंदू तर गोडसे हिंदुत्ववादी अशी फोड करून त्यांनी चर्चा सुरू केली. हिंदू म्हणजे सत्य व हिंदुत्व म्हणजे सत्ता असे ते म्हणाले; पण देश हिंदूंचा आहे हा विचार त्यांनी पुन्हा घासून पुसून वर आणला आहे. घासलेला हा दिवा त्यांना पेटविता आला तर स्वागतच आहे!

काँग्रेसकृत हिंदूंचे राज्य

**निरीक्षण:**

प्रियंका व राहुल यांची भाषणे, भूमिका यांना सामनात ठळक प्रसिद्धी दिली जाते व अग्रलेखातून त्यांचे समर्थन केले जाते, त्याचे हे उदाहरण. शिवसेनेला भाजप नको तर काँग्रेस व गांधी घराणे प्रिय आहे, त्याचा संदेश अग्रलेखातून मिळतो.

- **दि. २० डिसेंबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

कर्नाटकात छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या विचारांचा अपमान करण्याच्या घटना वारंवार घडतात व दुसऱ्या बाजूला पंतप्रधान मोदी हे काशीत जाऊन छत्रपती शिवरायांच्या शौर्याचा गौरव करतात. श्री. बोम्मई यांनी हे तरी समजून घेतले पाहिजे. कर्नाटकात वेगळे व महाराष्ट्रात जगावेगळे अशी भाजपवाल्यांची एकंदरीत तऱ्हा दिसते. पंतप्रधानांनी काशीस मांडलेला विचार चार दिवसांनीही बंगळुरूत पोहोचला नाही. काशीत शिवरायांचा सन्मान आणि बंगळुरूत अपमान हे चालणार नाही, हे ढोंग आहे. भाजपवाल्यांनो, बंगळुरूचे राजभवन गाठा, बोम्मईंचे सरकार आता घालवाच!

हे ढोंग आहे. काशीत एक, बंगळुरूत दुसरेच !

**निरीक्षण:**

उत्तर प्रदेश व कर्नाटकात भाजपची सत्ता. पण मोदींनी काशीत शिवाजी महाराजांचा गौरव करताच बंगळुरूतील घटनांशी तुलना करून शिवसेना भातावर आगपाखड करीत आहे, त्याचा हा नमुना.

- **दि.५ जानेवारी २०२२– अग्रलेख**



४ संपादकीय

सत्यपाल मलिक हे गोव्याचे राज्यपाल होते. तेथील सरकारच्या भ्रष्टाचाराची त्यांनी पोलखोल केली. गोवा सरकार जागोजाग भ्रष्टाचार करीत असल्याचे फटाके त्यांनी फोडले, तेव्हा त्यांची पाठवणी मेघालयात करण्यात आली. जम्मू-कश्मिरात राज्यपाल असताना एक महत्त्वाची फाईल मंजूर करण्यासाठी संघ परिवारातील प्रमुख नेत्याने ३०० कोटींची लाच देण्याचा कसा प्रयत्न चालविला होता याचाही स्फोट मलिक यांनी केला. त्याच फटाक्यांची माळ घेऊन मलिक वावरत असतात. त्यांच्या नावात 'सत्य' आहे. मोदींच्या अहंकारावर त्यांनी आता हल्ला केला आहे. तसे ते बेडर दिसतात, परिणामांची पर्वा करताना दिसत नाहीत. सत्यपाल मलिक हे 'जाट' आहेत व 'जाट' बंडखोर असतो ते या निमित्ताने दिसले.

बंडखोर जाट

**निरीक्षण:**

मलिक हे भाजपचे ज्येष्ठ नेते. गोव्यात भाजपचे सरकार. मलिक आपल्या वागणुकीतून केन्द्र सरकारला अडचणीत आणतात म्हणून सामना त्याची प्रशंसा करतो.

- **दि. १४ जानेवारी २०२२– अग्रलेख**



४ संपादकीय


आज तरी उत्तर प्रदेशात भारतीय जनता पक्ष आणि अखिलेश यादव यांच्यात 'कांटे की टक्कर' स्पष्ट दिसते. भारतीय जनता पक्षाचा रस्ता मोकळा नाही. गोव्यात, मणिपुरात, उत्तराखंडात निवडणुका रंगतदार होतील. ''आम्हीच जिंकू, आपल्याला कोणाचे आव्हान नाही'' असे फुगे कितीही फुगवले तरी प्रत्येक राज्यात भाजपला संघर्ष करावा लागत आहे. पंजाबात भले काँग्रेससमोर अडचणींचा डोंगर आणि अंतर्गत वाद आहेत, पण पंजाबात भाजपला तिसऱ्या क्रमांकावर राहण्यासाठीही संघर्ष करावा लागतोय. चित्र हे असे आहे. याउपरही कुणाला वाटत असेल की आमच्यासारखे आम्हीच, तर त्यास सोप्या भाषेत म्हणावे लागेल, ''गिरे तो भी टांग उपर!''

तराही टांग उपर!

**निरीक्षण:**

शिवसेना कोणत्याच राज्यात दखलपात्र नाही पण भाजप सत्तेवर येत काम नये किंवा येऊ नये, हीच भूमिका सामनातून अग्रलेखातून मांडली जाते.

- **दि. २० जानेवारी २०२२– अग्रलेख**



दि. २० जानेवारी 2022

४ संपादकीय

दि. 20/1/2022

देशाला पराक्रमाची गरज आहे, पण दुसऱ्याचा पराक्रम स्वतःच्या नावावर खपविण्यात पराक्रम नाही. पाकिस्तानची फाळणी घडवून इंदिरा गांधींनी 'फाळणी'चा सूड घेतला व पराक्रम केला. पाकिस्तान तोडले हा दिवससुद्धा पराक्रमाचाच दिवस आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पराक्रमावरील पश्चिम बंगालचा चित्ररथ डावलणे यास कोणी पराक्रम मानत असेल तर शौर्य, पराक्रमाची व्याख्या तपासावी लागेल. नेताजींना राजकीय वादात ओढून कोणाचा काय फायदा होणार? पश्चिम बंगालच्या निवडणुकीत त्याचे प्रदर्शन घडले आहे!

**निरीक्षण:**

पश्चिम बंगालमध्ये होत असणा-या निवडणूक प्रचाराबद्दल सामनामध्ये अग्रलेख लिहिण्यात आला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांना निवडणुकीच्या मुद्द्यात न आणणे योग्यच राहील असे मांडण्यात आले.

- **दि. ५ फेब्रुवारी २०२२ –अग्रलेख**


४ संपादकीय

२०१४ सालीच देश निर्माण झाला असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठी राहुल गांधींनी डोक्याला शॉट दिला आहे. माझे पणजोबा पंडित नेहरू हे देशासाठी पंधरा वर्षे तुरुंगात होते. माझ्या आजीने, इंदिरा गांधींनी देशासाठी शरीरावर ३५ गोळ्या झेलल्या. माझे वडील राजीव गांधी हेसुद्धा देशासाठीच हुतात्मा झाले. तुम्ही मला काय देश शिकवता? मला माझा देश चांगला माहीत आहे, असा तीर राहुल गांधींनी सोडला व त्यामुळे सत्ताधारी घायाळ झाले. चिनी सैन्य लडाखमध्ये का घुसले असे विचारणाऱ्यांना चीनचे एजंट ठरवणे म्हणजे राज्य करणे नव्हे. राहुल गांधी यांनी याच प्रवृत्तीवर जोरदार प्रहार केला आहे. त्यांचे टोकदार भाषण सत्ताधाऱ्यांना झोंबणारच!

राहुलचे भाषण का झोंबले?

**निरीक्षण:**

महाआघाडी सरकारचे मुख्यमंत्रीपद शिवसेनेला मिळाले तेव्हापासून राहुल गांधी, प्रियंका, सोनिया गांधी, शरद पवार हे सेना आणि सामनाला जवळचे व श्रेष्ठ नेते वाटू लागले आहेत. एकीकडे मोदींवर टीका व दुसरीकडे राहुल यांचे कौतुक हे सामनात वारंवार दिसते, तेही २ वर्षांपासून त्याचे हे उदाहरण आहे.

❖ **सामाजिक आणि सांस्कृतिक अग्रलेख:**

- **दि. १६ जून २०१६– अग्रलेख**



दि. १६ जून 2016

४ संपादकीय

दि. 16/6/2016

मुख्यमंत्री कमालीचे संवेदनशील आहेत. दालनाबाहेर झालेल्या आत्महत्येच्या प्रयत्नांमुळे ते नक्कीच व्यथित झाले असतील. आत्महत्येमागची कारणे शोधण्याचा ते निश्चितपणे प्रयत्न करतील. सहाव्या मजल्यावर जनतेने केलेल्या आक्रोशाची ते दखल घेतील. खेड्यापाड्यांतील, झोपड्यांत राहणाऱ्या व शेतावर राबणाऱ्या माणसांना डोळ्यांसमोर ठेवून राज्य चालावे अशीच राज्यात मोठ्या अपेक्षेने सत्ताबदल घडवून आणलेल्या जनतेची माफक अपेक्षा आहे.

**निरीक्षण:**

सामान्य माणसांनी व्यवस्थेला कंटाळून ब–याच वेळा मंत्रालयाबाहेर व मंत्रालयात आत्महत्येचे प्रयत्न केले. सामनामधून हे चित्र स्पष्ट मांडण्यात आले व मुख्यमंत्री या सर्व गोष्टींना गांभीर्याने नक्कीच पाहतील असेही म्हणण्यात आले.

- **दि. १६ फेब्रूवारी २०१७– अग्रलेख**



दि. १६ फेब्रुवारी 2017

४ संपादकीय

दि. 16/2/2017

गुंडगिरी व महिलांवरील अत्याचाराविरोधात गेल्या सहा महिन्यांत किमान दीडशे वेळा नागपूरची जनता रस्त्यावर उतरली आहे. तिने आक्रोश केला आहे. पोलिसांशी संघर्ष केला आहे, पण न्याय आणि सुरक्षा मागणाऱ्या जनतेवर पोलिसांनी लाठ्या चालवल्या. गेल्या कित्येक वर्षांत पाटण्यात असे प्रकार घडल्याची नोंद नाही. तेव्हा मुख्यमंत्री, आधी नागपूरकडे पहा. मुख्यमंत्र्यांसह भाजप मंत्र्यांची भाषणे ही फक्त धूळफेक आहे. शिवसेनेने मुंबई वाचवली आहे. नागपूरसारखी शहरे भाजपच्या मगरी जबड्यातून वाचवायला हवीत. नागपूरचे 'शिकागो' होत आहे काय?

निरीक्षण:

सदर अग्रलेखामध्ये नागपूर येथील महिलांवर होणा–या अत्याचाराबाबत मुख्यमंत्री यांनी लक्ष्य द्यावे असे म्हणण्यात आले आहे. ज्याप्रमाणे शिवसेनेने मुंबई वाचविली आहे त्याच प्रमाणे मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्र्यांनी नुसती भाषणे न देता न्याय व सुरक्षे बाबत लक्ष केंद्रित करावे असे म्हंटले आहे.

- **दि. १६ फेब्रुवारी २०१७– अग्रलेख**



टरकली रे टरकली... हातभर फाटली

# 'सामना'वर बंदीची भाजपची मागणी

खिंचो न कमान को
न तलवार निकालो
जब तोप मुकाबिल है
तो अखबार निकालो

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) – दैनिक 'सामना'च्या धसक्याने भाजपची पार टरकली असून हातभर फाटल्याचे आज उभ्या महाराष्ट्राला दिसले. पराभवाच्या भीतीने ग्रासलेल्या भाजपने शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'वर १६, २०, २१ फेब्रुवारी असे तीन दिवस बंदी घाला, अशी डरपोक आणि हुकूमशाही प्रवृत्तीची मागणी आज निवडणूक आयोगाकडे केली. भाजपच्या या मागणीतून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्याचे त्या पक्षाचे इरादेच उघड झाले. त्यानंतर भाजपच्या पायाखालची वाळू सरकल्याची आणि त्या पक्षाला सत्तेची नशा चढू लागल्याची प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात उमटली आहे. तसेच भाजपच्या त्या मागणीनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे.

राज्यातील १५ जिल्हा परिषदांसाठी उद्या गुरुवारी १६ फेब्रुवारी रोजी तर मुंबई-ठाणे-पुण्यासहीत १० महानगरपालिकांसाठी २१ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा प्रचार आज संपला असून महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार १९ फेब्रुवारी रोजी संपणार आहे.

मतदानाआधी दोन दिवस प्रचार थांबवण्याच्या प्रथेचा आधार घेत भाजपच्या प्रवक्त्या श्वेता शालिनी यांनी दैनिक 'सामना'वर तीन दिवसांच्या बंदीची मागणी केली. प्रचार संपल्यानंतर कोणत्याही राजकीय पक्षाने वृत्तपत्र, टीव्ही, इतर माध्यमांतून प्रचार करू नये किंवा प्रचार-प्रसाराचे साहित्य वितरित करू नये, असे निवडणूक आचारसंहिता सांगते असे नमूद करत भाजपच्या प्रवक्त्यांनी निवडणूक आयोगाला पत्र सादर केले आहे.

*अग्रलेखांची भीती*

*'सामना'च्या अग्रलेखांचा भाजपने धसका घेतल्याचे त्या पक्षाने 'सामना'वर तीन दिवसांच्या बंदीच्या केलेल्या मागणीतून आणि निवडणूक आयोगाला सादर केलेल्या पत्रातून स्पष्ट झाले आहे. 'सामना'च्या अग्रलेखांतून शिवसेनेचा प्रचार होऊ शकतो असे भाजपच्या प्रवक्त्या श्वेता शालिनी यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.*

**निरीक्षण:**

सदर लेखात सामनाच्या अग्रलेखांचा धसका भाजपने घेतला असून तीन दिवस वृत्तपत्र बंद करण्याची मागणी केल्याचा उल्लेख आहे.

- **दि. २१ सप्टेंबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

'ईडी'शी लढताना तोंडास फेस येईल, असे चंद्रकांत पाटलांनी सांगणे हा अहंकार आहे. 'ईडी'मुळे कोणाच्या तोंडास फेस येतोय की काय ते नंतर पाहू, पण महाराष्ट्राचे ठाकरे सरकार 'केंद्रीय' जोर लावूनही पडत नाही म्हणून येथील विरोधी पक्षाच्या तोंडास आलेला फेस स्पष्ट दिसत आहे. भाजपचे माजी खासदार सोमय्या यांचे आरोप व बाता या नागपूरच्या गोटमारीसारख्याच आहेत. मुंबई लोकलमध्ये विषारी वायू सोडण्याचा अतिरेक्यांचा कट होता. पोलीस त्या तपासात गुंतले असतानाच विरोधी पक्ष राज्यात भलतेच प्रश्न निर्माण करून पोलिसांवरील ताण वाढवीत आहे. विरोधकांनी निर्माण केलेल्या दुर्गंधीमुळेही जनजीवन विस्कळीत होऊ शकेल. विरोधकांना राज्यातील जनतेच्या जिवाशी खेळायचे आहे काय? एकदा तसे जाहीर करा म्हणजे झाले.

तोंडाला फेस आला पण कोणाच्या?

**निरीक्षण:**

चंद्रकांत पाटील हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष आहेत. ईडीच्या रडारवर राज्यातील महाआघाडीचे अनेक नेते आहेत, त्याचा राग शिवसेना सामनामधून प्रकट करीत आहे.

- **दि. १३ नोव्हेंबर २०२१– अग्रलेख**



४ संपादकीय

शिवसेनेने राष्ट्रवाद, हिंदुत्व गहाण ठेवल्याचे वक्तव्य भाजपवाले करीत असतात. महाराष्ट्रातील सत्ता गमावल्याचा तो जळफळाट असतो; पण त्यांच्या कंगनाबेनने तर भगतसिंगांपासून वीर सावरकरांपर्यंत सगळ्यांवरच अफू-गांजाच्या नशेच्या गुळण्या टाकून त्यांना भिकारी ठरवले आहे. कंगनाबेन यांच्या मते देशाला खरे स्वातंत्र्य २०१४ साली मिळाले. मोदींचे राज्य हेच स्वातंत्र्य. बाकी सगळे झूठ! कंगनाबेनचे डोके हे बधीर झाले आहे, असे वरुण गांधी म्हणतात. कोणत्या कारणामुळे ते बधीर झाले ते एनसीबीचे वानखेडेच शोधू शकतील! पण मोदी सरकारचे डोकेही त्याच कारणाने बधीर झाले नसेल तर या देशद्रोहाबद्दल कंगनाबेनचे सर्व राष्ट्रीय पुरस्कार ते परत घेतील. वीरांचा, स्वातंत्र्याचा अपमान देश कधीच सहन करणार नाही!

कंगनाबेनचा द्रोह

**निरीक्षण:**

कंगनाबेन यांना भाजपची फूस आहे, असे या अग्रलेखात सुचविण्यात आले आहे.

- **दि. २३ डिसेंबर २०२१–अग्रलेख**



४ संपादकीय

अयोध्येतील भूखंडाचा जो घोटाळा बाहेर आला आहे तो पाहता भाजपच्या हिंदुत्वात श्रीराम नसून फक्त व्यवहार आहे. त्यांना मंदिर हवे ते बाजूच्या जमिनी लाटण्यासाठी. त्यांचे ढोंग हे असे उघडे पडले ही श्रीरामाचीच कृपा म्हणायला हवी. ईडी, सीबीआयने एखादे कार्यालय आता कायमस्वरूपी अयोध्येतच उघडायला हवे. नंतर मथुरा आहेच. 'राम नाम सत्य है' हे इतरांसाठी. भाजपसाठी फक्त पैसा व जमिनी हेच सत्य आहे! लोकांना वाटले देवाच्या आळंदीत जायचे आहे, पण भाजपवाले चोराच्या आळंदीत घेऊन चालले आहेत. अयोध्येस चोरांची आळंदी करणाऱ्यांना श्रीराम माफ करणार नाहीत! देश विकलात, पण अयोध्या विकता येणार नाही. कारण शिवसेना हिंदुत्वाचा भगवा झेंडा घेऊन उभी आहे!

हिंदुत्वाचा चोरबाजार

**निरीक्षण:**

आमचे हिंदुत्व सच्चे असली, भाजपचे नकली हे सांगण्याचा शिवसेनेचा प्रयत्न. अयोध्येत न गेलेले आज अयोध्येचे नाव घेऊन भाजपवर हल्ले करीत आहेत.

- **दि. ३० जानेवारी २०२२–रविवार, संजय राऊत. रोखठोक**



संजय राऊत

उद्धव ठाकरे यांच्या आजारपणावर अभद्र टीका करणाऱ्यांची तोंडे २३ जानेवारीस पूर्ण वाकडी झाली. उद्धव ठाकरे समोर आले व भाजपच्या मुखवट्यावरच हल्ला केला! उद्धव ठाकरे यांच्या भाषणाने संभ्रम दूर झाला. शिवसेना आणि भाजपचे 'आतून काही सुरू आहे' या अफवांना पूर्णविराम मिळाला!



**निरीक्षण:**

टाइम्स ऑफ इंडियाचे दिवंगत व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचे व्यंगचित्र. शिवसेनाप्रमुख खुर्चीवर बसलेत. समोरच्या खुर्चीवर आपले दोन्ही पाय पसरून बसलेत. सामोर भाजपचे प्रमोद महाजन उभे आहेत. बाजूच्या लहान स्टुलावर बसा असे ते त्यांना सांगत आहेत.

* ठाकरे यांनी त्यांच्या हयातीत भाजपला किंमत दिली नाही हेच त्यातून संजय राऊत यांना दाखवायचे आहे.

* आजारपणामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे वर्षा या शासकीय निवासस्थानी होते. जवळपास तीन महिन्यांहून अधिक काळ बाहेर पडले नाहीत. कोणाला दिसले नाहीत. २३ जानेवारी २०२२ ला बाळासाहेबांच्या जयंतीला ते शिवसेना पदाधिका–यांच्या व्हर्च्युअल मीटिंगमध्ये प्रकटले. संपूर्ण भाषणात त्यांनी भाजपवर टीका केली. उद्धव ठाकरे कोठे आहेत, असा प्रश्न भाजप सतत विचारत अस.

**रोखठोक मधील भाषणाचा गोषवारा:**

शिवसेना या पक्षाचा जन्म १९६६ साली झाला आणि भारतीय जनता पक्षाचा १९८० साली त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा दावा कि भाजपच्या मदतीने शिवसेना उभी राहिली हा दावा चुकीचा असल्याचे म्हंटले आहे.

शिवसेनेकडून युती तुटावी असे कोणतेच अघोरी प्रयत्न झाले नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

## ४.५ सारांश

सदर प्रकरणात संशोधकाने शिवसेनेच्या वाढीत सामनाचे योगदान जाणून घेण्या करीता ३३ मुलाखती घेतल्या आहेत व २२ प्रश्नांनाद्वारे माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या स्तरातील वाचकांकडून एकूण ५८६ प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविण्यात आली आहे. काही निवडक अग्रलेखांचे पण विश्लेषण करण्यात आले आहे.

# प्रकरण ५: निष्कर्ष आणि शिफारसी

| क्र. | शीर्षक |
|---|---|
| ५.१ | प्रस्तावना |
| ५.२ | मुलाखतीचे विश्लेषण |
| ५.३ | प्रश्नावलीतील निष्कर्ष |
| ५.४ | निष्कर्ष व शिफारसी |
| ५.५ | गृहीतक आणि उद्धिष्ट यांची पूर्तता |
| ५.६ | पुढील संशोधनाची दिशा |
| ५.७ | सारांश |

## ५.१ प्रस्तावना:

सदर प्रकरणात माहिती विश्लेषणावर आधारित निष्कर्ष आणि शिफारसी मांडण्यात आल्या आहेत. या प्रकरणात उद्धिष्ठ व गृहीतक यांची पूर्तता दर्शविण्यात आली असून पुढील संशोधनाच्या दिशाही देण्यात आल्या आहेत.

## ५. २: मुलाखतीतून निघालेले निष्कर्ष:

### सामना वृत्तपत्राचा सुरवातीचा काळ:

१) बाळासाहेब एक व्यंगचित्रकार होते आणि त्यांनी या कौशल्याचा वापर करून ऑगस्ट १९६० मध्ये मार्मिक नावाचे साप्ताहिक सुरु केले. या साप्ताहिकापासून शिवसेनेची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि त्यामधूनच पुढे जाऊन जुने १९६६ ला शिवसेनेची स्थापना झाली.

२) मराठीमधील पहिले व्यंगचित्र साप्ताहिक बाळासाहेब ठाकरे यांनी सुरु केले. ८०–९० च्या काळात शिवसेनेची बाजू मांडण्यासाठी एका दैनिकाची गरज होतो आणि त्यातूनच शिवसेनेचा जन्म झाला.

३) मार्मिक हे साप्ताहिक असल्यामुळे बाळासाहेबांच्या भूमिका समजण्यासाठी आठवडाभर वाट बघावी लागत होती.

४) सेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या दौ–यासंबंधी बातम्याना इतर वर्तमान पत्रामधून त्रोटक प्रसिद्धी मिळत असे, पण त्याच दौ–यासंबंधी शिवसेना विरोधी बातम्या अधिक झळकत होत्या व ह्या सर्वांची खूप मोठी किंमत शिवसेने ला निवडणुकीमध्ये भोगावी लागली.

५) हे सर्व बाळासाहेबांच्या निदर्शनास आल्यावर त्यांच्या मनात स्वतःचे एक मुखपत्र असावे हा विचार आला. त्यांनी १९८९–९० च्या दस–या मेळाव्यामध्ये सामना विषयी घोषणा केली.

६) १९७४ साली जब्बार पटेल निर्देशित 'सामना' नावाचा मराठी चित्रपट प्रसिद्ध झाला होता. सदर चित्रपटाचे नाव 'सामना' याने बाळासाहेबांच्या मनात घर केले होते. त्याचवेळी त्यांनी ठरवले कि आपल्या मुखपत्राचे नाव 'सामना' असले पाहिजे.

७) परंतु सोलापूर येथील श्री. वसंत कानडे यांनी पूर्वीच ३० ऑक्टोबर १९७५ रोजी या वर्तमान पात्राची सुरवात केली होतो.

८) बाळासाहेबांच्या नीकटवर्तीयांनी त्यांना हे शीर्षक बाळासाहेबांना देण्याची ब–्याच वेळा विनंती केली पण त्यांना ते मंजूर नव्हते. शेवटी त्यांच्या बायकोने त्यांना समजावले व १२ ऑगस्ट १९८८ रोजी सोलापूर येथील न्यायालयात श्री. वसंत कानडे यांनी सामना हे शीर्षक कायदेशीररित्या बाळासाहेबांना सुपूर्द केले.

९) १९८८ साली पुण्यामध्ये शिवसेनेचे महाराष्ट्रव्यापी अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. सदर अधिवेशनात सामनाविषयी मोठी जाहिरात करण्यात आली आणि त्यामध्ये 'सामना सामान्य माणसाच्या मनाचा नादनिनाद' असे घोषवाक्य देण्यात आले होते.

१०) २३ जानेवारी १९८९ रोजी दैनिक सामनाचा पहिला अंक दादरमधील सावरकर स्मारक येथे बाळासाहेबांच्या शुभ हस्ते प्रकाशित झाला. राज्यभर शिवसेनिकांच्या 'दैनिक नव्हे सैनिक' ह्या घोषणेने सामनाचे स्वागत करण्यात आले. सामनातील पहिल्या अग्रलेखाने 'या असे सामन्याला' वृत्तपत्र सुरु करण्यामागची बाळासाहेबांची भूमिका स्पष्ट केली.

**सामना बद्दल थोडक्यात आढावा:**

११) सामना हे मुंबई शहरातून शिवसेना या राजकीय पक्षाचे मुखपत्र म्हणून प्रसिद्ध होते.

१२) सामनाला बाळासाहेबांचे ऊर्जेचे प्रतीक असेही संबोधण्यात आले आहे. सामनाचे घोषवाक्य ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणार एकमेव दैनिक असे आहे.

१३) प्रारंभी काळात सामना वृत्तपत्रामध्ये बाळासाहेबांनी काढलेली व्यंगचित्र प्रकाशित होत असत.

१४) परंतु कालांतराने ते शिवसेनेचे मुखपत्र बनले. सामन्यांमधील भूमिका आणि शिवसेनेच्या नेतृत्वाची भूमिका यामध्ये कधीच अंतर दिसून आले नाही.

१५) सामनाला सहावा महिना पूर्ण झाल्यानंतर बाळासाहेबांच्या सहीनिशी अग्रलेख प्रसिद्ध करण्यात आला.

१६) अशोक पडबिद्री यांनी सुरु केलेले पूजिला गौरीहार हे सत्र फार लोकप्रिय ठरले. यामध्ये मोठया नेत्यांच्या पत्नीचा लिखाणात सहभाग असे.

१७) दैनिक सामनात प्रकाशित होणा–या बातम्या आणि अग्रलेखांमुळे शिवसेना आपोआप चर्चेच्या केंद्रस्थानी असायची.

१८) सामनातील संपादक सत्रांमधून शिवसेनेला जे म्हणायचे असेल ते छापून येत असे व त्याचे पडसाद राजकारणात कायम दिसून येत.

१९) सामनाचे वाचक वर्ग हा शिवसैनिकांपुरता मर्यादित नसून बाळासाहेबांचे विचार आवडणारे मध्यम वर्गातील लोक पण होते. शिवसेनेची भूमिका जाणून घेण्यासाठी

सामनाचे वाचन केले जाते. मुंबईपासून खूप लांब असलेल्या खेडे गावांमध्ये सामनामुळे लाखो बेरोजगार तरुणांनी शिवसेनेचा भगवा खांद्यावर घेतला.

२०) केवळ शिवसैनिकच नव्हे तर त्यांचे विरोधक पण सामना वाचत असतात.

२१) सामनामुळे बाळासाहेबांची भाषणे व त्यांचे विचार शिवसैनिकांपर्यंत पोहोचू लागले व अशा रीतीने नवीन शिवसेनिक घडत गेले.

२२) शिवसेना करत असलेले विविध उपक्रम, आंदोलने, कार्यक्रम व शिवसेनेतील लोकप्रतिनिधींनी जनतेसाठी विभागात केलेली कामे यांचा प्रचार व प्रसार करण्यात सामनाचे मोठे योगदान आहे.

२३) काही चुका झाल्यावर सामनामधून विरोधकांवर तर प्रहार होत असेच पण शिवसैनिक पण याला अपवाद नव्हते.

२४) सामनामधून आलेला प्रत्येक शब्द शिवसैनिक बाळासाहेबांचा आदेश मानत असे. बाळासाहेबांचे अग्रलेख म्हणजे त्यांच्या विचारांचे निखारे व ते शिवसेनिकांसाठी ऊर्जेचे साधन मानले जात असे.

२५) केलेल्या कामगिरीबद्दल शिवसेनीकाना स्वतःची नावे सामन्यात छापून आल्याने अभिमान वाटत असे व त्यामुळे त्यांची कार्य करण्याची क्षमता द्विगुणित होत असे.

२६) शिवसैनिकांना स्वतःच्या हक्काचे असलेले दैनिक म्हणून सामनाचा आधार वेळोवेळी मिळत असे.

२७) जसे टाइम्स ऑफ इंडिया उचलला कि सर्व प्रथम आर. के. लक्ष्मण यांची व्यंगचित्र लोकांना आकर्षित करत असे तशीच सामना उचलला कि बाळासाहेबांचे अग्रलेख हे समीकरण झाले होते.

२८) सुरवातीच्या काळात शिवसेनेच्या शाखांमध्ये सामना वृत्तपत्र घेण्याचे बंधनकारक करण्यात आले होते; परंतु कालांतराने शिवसेनेच्या घोषणा व पदाधिकारी, शाखाप्रमुख, विभागप्रमुख, गटप्रमुख आणि महापालिका निवडणूक संदर्भात उमेदवारांची नावे सामनामध्ये छापून येऊ लागली आणि प्रत्येक शाखेला सामना घेणे अपरिहार्य झाले.

२९) हिंदू–मुसलमान दंगली असो किंवा मराठवाडा विद्यापीठाचा नामकरणाचा विषय असो शिवसेनेच्या वाढत्या व्याप्तीमध्ये नेहमीच सामनाचा मौलाच वाटा आहे.

३०) सामना वृत्तपत्राची औरंगाबाद आवृत्ती सुरु होण्यामागे मराठवाडा विद्यापीठाचे नामांतरासाठी शिवसेनीकानी केलेल्या विरोधाने महत्वाची भूमिका बजावली.

३१) शिवसेना आणि सामना एक मेकांना पूरक ठरू लागले कारण शिवसेनेच्या वाढी बरोबर सामनाचीही वाढ होऊ लागली.

३२) प्रारंभीच्या काळात सामनामध्ये बाळासाहेब व्यंगचित्र काढत असत परंतु नंतर मा. राज ठाकरे यांनी सामनामध्ये व्यंगचित्रे काढण्यास सुरवात केली.

३३) सामनामध्ये छापून आलेले आदेश किंवा आंदोलनाचा नारा हे शिवसेनिक आज्ञा मानून त्यांचे पालन करत असे. सामनाद्वारे शिवसेनीकाना पक्षाची व पक्षप्रमुखांची भूमिका समजते.

३४) सामनामध्ये छापून आलेला मजकूर दुस–या दिवशी इतर वर्तमानपत्रांसाठी बातमी असायचा.

३५) महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या मतांपुढे जाऊन इथे स्थायिक झालेल्या उत्तर प्रदेशातील नागरिकांकरिता २३ फेब्रुवारी १९९३ रोजी दोपहर का सामना हे वृत्तपत्र सुरु करण्यात आले.

३६) सामना वृत्तपत्र सुरु करण्याआधी शिवसेनेच्या संघटनात्मक बातम्या या शिवसेना भवनातून प्रसिद्ध होऊन जनतेच्या माहितीकरिता फलकांवर लावल्या जात असत. परंतु आज या सर्व महत्वाच्या बातम्या सामनामध्ये प्रकाशित केल्या जातात आणि अश्या रीतीने सामना हा शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेचा अविभाज्य भाग बनला आहे.

३७) संजय राऊत यांनी सुरु केलेले सच्चाई या सदराद्वारे पक्षाची भूमिका मंडळी जात असे ज्यामधून शिवसेनेकना संघटनेची नवी दिशा मिळत असे.

३८) जसा पक्ष वाढत गेला तसे कालांतराने काही ज्येष्ठ नेत्यांमध्ये कुरघोडीचे राजकारण सुरु झाले व या पाश्वभूमीवर एके दिवस सामनामध्ये 'शिवसेनाप्रमुखांचा शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र' या घोषवाक्याने सगळीकडे पळापळ घडवून आणली.

३९) काही जणांच्या मते मा. बाळासाहेबांच्या निधनानंतर गेल्या १० वर्षांपासून सामना मराठी माणसांच्या मनापासून दुरावत चालला आहे.

४०) शिवसेनेकडे सामनासारखे मुखपत्र नसते तर शिवसेनेने लोकांपर्यंत पोहचून पक्षाला मिळालेले प्रचंड यश संपादन करणे अवघड झाले असते.

४१) मुंबईसह कोकणात आणि राज्यात शिवसेना पसरवण्यात सामनाचे मोठे योगदान आहे आणि याच मुखपत्र मुळे सुरवातीला शिवसेनेला मुंबई, ठाणे या महापालिकांवर विजय मिळवून नंतर नवी मुंबई, नाशिक, औरंगाबाद आणि आता महाराष्ट्रात सत्ता प्राप्त झाली.

४२) सामना वृत्तपत्राला राष्ट्रीय स्तरावर मिळालेली स्वीकृती हि त्याचा प्रमुख मानदंड मानला जातो.

४३) राष्ट्रीय स्तरावरील विविध प्रसारमाध्यमे यांनी सर्वाधिक खपणा–या दैनिकांमध्ये सामना या मुख पत्राची नोंद केली आहे.

४४) शिवसेनेला घरोघरी पोहोचविण्यात सामनाचे मोठे योगदान आहे कारण सामना मुळेच शिवसेना घरोघरी पोहोचण्यात यशस्वी झाली.

४५) शिवसेनेचा राजकीय प्रवास, मा. बाळासाहेब ठाकरेंची नेतृत्व शैली व आता मा. उद्धव ठाकरे आणि मा. आदित्य ठाकरे यांचे राजकीय क्षितिज विस्तारण्याची कल्पना या सर्वांचा लिखित स्वरूपात प्रचार करण्यात सामनाचे मोठे योगदान आहे.

४६) मराठी माणसाला स्वाभिमानाने जगण्यासाठी प्रेरित करण्यात शिवसेना व सामनाचे फार मोठे योगदान आहे.

४७) आदरणीय बाळासाहेबांच्या विचारांनी प्रेरित असलेल्या व त्यांना मानणा–या प्रत्येकाच्या घरात सामनाचा सहवास आहे. मा. बाळासाहेब असताना व त्यांच्या पश्च्यात पण सामना हे वृत्तपत्र निष्ठावंत शिवसेनिकांकरिता फक्त एक वृत्तपत्र नसून स्व. बाळासाहेबांची आठवण राहील.

## ५.३ प्रश्नावलीतील निष्कर्ष

- **सामान्य प्रश्न**

५.३.१ प्राप्त झालेल्या प्रश्नावलीमधून असे निदर्शनास येते कि संशोधकाने निवडलेल्या गट समुहातील पदाधिकार्यांनामधून सामना वाचन करणा–या मध्ये पुरुष वाचक यांचे प्रमाण ७९% आहे तर महिलांचे प्रमाण २१% आहे. यामधून असे म्हणता येईल कि सामना वाचन करणा–यामध्ये पुरुषांची संख्या महिलांपेक्षा अधिक आहे.

**५.३.२** वृत्तपत्र वाचकांमध्ये दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या वाचकांची संख्या ४९% आहे तर पदवीपर्यंत शिक्षण झालेल्या वाचकांची संख्या ४२% आहे. पण पदव्युत्तर झालेल्यांची संख्या केवळ ९% हे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि संशोधकाने निवडलेल्या लक्ष गट समूहातील जास्तीत जास्त वाचन यांचे दहावीपर्यंत शिक्षण झाले आहे.

**५.३.३** शालेय शिक्षण शहरात प्राप्त केलेल्यांची संख्या ८५% आहे, तर ग्रामीण भागात शिक्षण झालेल्या व्यक्तींची संख्या १५% आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि शालेय  शिक्षण शहरी भागात झालेल्यांची संख्या अधिक आहे.

**५.३.४** महाविद्यालयीन शिक्षण प्राप्त केलेल्यामधून ८२% हे शहरी भागातील आहेत तर १८% हे ग्रामीण भागातील आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि शहरी  भागातून शिक्षण प्राप्त केलेल्यांची संख्या अधिक आहे.

**५.३.५** एक वृत्तपत्र वाचणा-या वाचकांची संख्या ४९% आहे, तर दोन वृत्तपात्र वाचणा-या वाचकांची संख्या ३४%. तीन वृत्तपत्र वाचणा-याची संख्या १७% आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि वेळ, आवड आणि उपलब्धता अशा काही कारणांमुळे एक वृत्तपत्र वाचणारे वाचक जास्त आहेत तर तीन वृत्तपत्र वाचणा-या वाचकांची संख्या कमी आहे.

**५.३.६** घरी वृत्तपत्र वाचणारे ७७% आहेत आणि प्रवासात वाचणारे ७% आहेत. कार्यालयात वृत्तपत्र वाचणारे १६% आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि घरी वृत्तपत्र वाचणे सोईचे असल्याने घरी वृत्तपत्र वाचणा-या वाचकांचे प्रमाण जास्त आहे.

**५.३.७** ४६% नमुना निवडीतील घटक हे सामना वृत्तपत्राचे वाचन ३० मिनिटे करतात तर ३७% हे रोज १५ मिनिटे सामना वाचतात. १७% वाचक ६० मिनिटांपर्यंत वृत्तपत्राचे वाचन करतात. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि अर्ध्या तासापर्यंत वृत्तपत्र वाचणा–या वाचकांची संख्या जास्त आहे.

**५.३.८** संशोधकाने निवडलेल्या नमुना निवडीतील वाचक सामना वृत्तपत्रात २७% राजकीय बातम्या करीत सामना वाचतात तर १७% हे सामनाचे संपादकीय वाचत असतात. १५% सर्वसाधारण बातम्यांसाठी सामनाचे वाचन करतात तर १३% मनोरंजन, क्रीडा व शिक्षण या विषयांवरील बातम्या वाचत असतात. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि जास्तीत जास्त लोक सामना हे वृत्तपत्र राजकीय बातम्या व संपादकीयसाठी वाचत असतात.

**५.३.९** माहिती मिळविण्यासाठी वृत्तपत्राला जास्त प्राधान्य ७८% आहे तर दूरदर्शन हे साधन वाचणा–या १३% व्यक्तीं आहेत. इंटरनेटचा वापर माहिती मिळवण्यासाठी करणारे ९% आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि आवश्यक माहिती मिळविण्यासाठी वृत्तपत्राचा वापर अधिक केला जातो.

- **राजकीय प्रश्न**

**५.३.१०** शिवसेनेचे मुखपत्र म्हणून वाचन करणारे ७१% आहेत तर केवळ वृत्तपत्र म्हणून वाचन करणारे २८% आहेत. इतर उद्देशाने 'सामना' वृत्तपत्र वाचणारे १% आहेत. या वरून असा निष्कर्ष काढता येईल कि जास्तीती जास्त शिवसेनेचे मुखपत्र म्हणून सामना वाचला जातो.

**५.३.११** संशोधनासाठी निवडलेल्या गट समूहातून असा निष्कर्ष काढता येतो कि सामना ७४% वाचक असे म्हणतात कि सामनामध्ये अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे

स्थान आहे तर १५% यांच्या मते अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान दिले जात नाही. 'सामना' या वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान आहे किंवा नाही हे सांगता न येणारे वाचक ११% इतके आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि ब-याच वाचकांना 'सामना' या वृत्तपत्रात अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान असते असे वाटते.

**५.३.१२** ८९% लोकांना असे वाटते कि शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे लोकांपर्यंत पोचविण्यात सामना यशस्वी झाले आहे तर केवळ ७% लोकांना असे वाटत नाही. दोन्हीपैकी काहीही सांगता येत नाही असे ४% व्यक्ती आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे लोकांपर्यंत पोचविण्यात सामना यशस्वी झाले आहे.

**५.३.१३** ९०% लोकांचे असे मत आहे कि शिवसेनेला जनाधार वाढविण्यासाठी सामनाचा उपयोग झाला आहे व केवळ ६% उपयोग झाला नाही असे म्हणतात. शिवसेनेला आपला जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग झाला आहे असे सांगता येत नाही, असे मत असणा-या व्यक्तींशी संख्या ४% आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि शिवसेनेला आपला जनाधार वाढविण्या करीता सामनाचा उपयोग नक्कीच झाला आहे.

**५.३.१४** ९०% लोक असे म्हणतात कि 'सामना' मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा-यांपर्यंत पाहोचविण्यात यशस्वी झाला आहे तर ६% असे म्हणतात कि शिवसेनेची भूमिका पोहोचविण्यात सामना यशस्वी झालेला नाही आणि दोन्हींपैकी काहीच सांगता येत नाही असा ४% प्रतिसाद आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि जास्तीती जास्त लोक सामनाच्या या योगदानाचे समर्थन करतात.

**५.३.१५** असे निदर्शनास येते संशोधकाने निवडलेल्या गट समूहातून शिवसेना या पक्षाची ध्येयधोरणे, भूमिका, घडामोडी, पक्षाचे आदेश समजावून घेण्यासाठी शिवसैनिकांना सामना या वृत्तपत्राचा उपयोग होतो अशी मते ९४% इतक्या लोकांची आहेत तर ३% लोकांनी नकारात्मक उत्तर दिले आहे व काहीच सांगता न येणारे वाचक ३% इतके आहेत.

**५.३.१६** 'सामना' मध्ये प्रसिद्ध होणा-या मजकुरात शिवसेना संदर्भातील बातम्यांचे प्रमाण पक्षाच्या दृष्टीने प्रमाण बद्दल विचारले तेव्हा ६५% लोकांनी सदर प्रमाण पुरेसे आहे असे म्हंटले तर १३% अपु-या आहेत असे मत मांडले. बातम्यांचे प्रमाण माध्यम आहे असे मत १४% लोकांनी मांडले आहे. काहीच ठाम सांगता येणार नाही असे ८% लोकांनी मत नोंदविले आहे.

**५.३.१७** पक्षाची ध्येयधोरणे, भूमिका, घडामोडी, पक्षाचे आदेश समजावून घेण्यासाठी शिवसैनिकांना सामना या वृत्तपत्राचा उपयोग होतो असे मत असणारे ९४% वाचक आहेत. 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग होत नाही असे म्हणणारे वाचक १८ (३%) इतके आहेत. दोन्हींपैकी काहीच सांगता न येणारे वाचक १८ (३%) इतके आहेत.

**५.३.१८** 'सामना' हे वृत्तपत्र शिवसेना पक्षाकडून शिवसैनिकांना दिशादर्शक ठरते या बद्दल संशोधकाने प्रश्न विचारल्या असता ९३% लोकांनी होकारात्मक उत्तर दिले तर केवळ ४% यांनी नकारात्मक दिले. 'सामना' दिशादर्शक आहे किंवा नाही असे मत असणारे ३% आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि जास्तीत जास्त लोकांना सामना हे वृत्तपत्र शिवसेनिकांसाठी दिशा दर्शक ठरते या बद्दल खात्री आहे.

**५.३.१९** ८८% लोकांच्या मते शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे तर नाही म्हणणारे केवळ ९% यांनी नकारत्मक उत्तर दिले आहे. शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत

पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे किंवा नाही असे कोणतेच मत सांगता येत नाही असे ३% लोकांनी मत मांडले आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि शिवसेनेचे कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामना नक्कीच यशस्वी झालेला आहे.

### ❖ सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न

**५.३.२०** मराठी प्रादेशिक अस्मिता (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवण्यासाठी सामना हे वृत्तपत्र कितपत यशस्वी झाले असा प्रश्न विचारला असता ९०% होकारात्मक मत मांडले तर हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवण्यासाठी सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले नाही असे मत ७% यांचे आहे. या दोन्हीपैकी काहीच सांगता येत नाही असे मत ३% लोकांनी मांडले आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि जास्तीती जास्त लोकांच्या मते शिवसेना या पक्षाच्या हिंदुत्वाच्या भावना जनमानसात रुजविण्यास सामना यशस्वी झाला आहे.

**५.३.२१** ९४% सामना वृत्तपत्राला 'हिंदुत्वाचा पुरस्कार' असे म्हणतात तर केवळ ३% सामना हा 'हिंदुत्वाचा पुरस्कार' अशी ओळख सामनाला नाही असे म्हणतात. 'हिंदुत्वाचा पुरस्कार' हि 'सामनाची' ओळख आहे किंवा नाही हे सांगता न येणारे वाचक ३% इतके आहेत. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि जास्तीत जास्त लोक सामानाची ओळख हिंदुत्वाचा पुरस्कार म्हणून करतात.

**५.३.२०** लक्ष गटातील ९०% व्यक्तींना असे वाटते कि सामना हि मराठी माणसाची अस्मिता आहे तर केवळ ७% लोकांना असे वाटत नाही. ३% व्यक्तींना नक्की ठाम पणे असे सांगता येत नाही की मराठी माणसाची अस्मिता अशी सामनाची ओळख आहे किंवा नाही. यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि सामना हि नक्कीच मराठी माणसाची अस्मिता आहे.

## ५.४ निष्कर्ष व शिफारसी

* शिवसेनेची मुंबई महापालिका – ठाणे, कल्याण, डोंबिवली अशा संस्थांवर वर्षानुवर्षे सत्ता आहे, महापालिका स्थानिक स्वराज्यसंस्था राज्य सरकार – महामंडळे – सार्वजनिक उपक्रम याच्या मुबलक जाहिराती सामनामध्ये सतत प्रसिद्ध होत असतात. ह्या सर्वांमुळे सामनाला मोठी आर्थिक शक्ती मिळत असते. पूर्वी केवळ शिवसेनाप्रमुखांच्या मॅरेथॉन मुलाखती सामनामध्ये प्रसिद्ध होत आणि अन्य कोणाला स्थान नव्हते. राज्यात २०१९ ला महाआघाडीचे सरकार आल्यापासून शरद पवारांची मॅरेथॉन मुलाखत येऊ लागल्या.  .

सामनाला सुरुवात होऊन ३३ वर्षे झाली.

– सामनाचे मुख्य कार्यालय प्रभादेवी, मुंबई येथे आहे आणि सामानाची छपाई नवी मुंबईत होते.

– पूर्वी २०१४ च्या अगोदर सामना काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेसवर सतत आक्रमक टीका करीत असे. २०१४ ला सेना–भाजपबरोबर युती तुटल्यापासून सामना भाजपवर संधी मिळेल तेव्हा टीका करू लागला.

– काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवसेनेचे पूर्वी राजकीय शत्रू होते. पण २०१९ नंतरर शरद पवार, अजित पवार, नवाब मलिक, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी–वाड्रा याना सामनामधून ठळक प्रसिद्धी मिळू लागली.

– सामना हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून शिवसैनिकांना महत्वाचे आहे पण सर्व शिवसैनिक विकत घेऊन सामना वाचत नाहीत. बहुसंख्य शिवसैनिक शिवसेना शाखेवर सामना वाचतात. मुंबईत शाखांची संख्या २२७.

– सामना हे इतक्या वर्षात मुंबईतील व महाराष्ट्रातील मराठी भाषिकांचे दैनिक झाले नाही.

– सामना मुंबईमध्ये चांगला खपतो. नंतर महामुंबई – कोकणात त्याचा खप आहे पण मुंबई वगळता सामना सर्वत्र पोहोचत नाही व लोक घेत नाहीत. सामना मुंबईत चौथ्या–पाचव्या क्रमांकाच्या खपाचे मराठी दैनिक आहे. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत यांचे खप मुंबईत सामनापेक्षा जास्त आहेत.

– सामना हे मुखपत्र म्हणून प्रभावी असू शकते पण ते परिपूर्ण दैनिक नाही. तसे करण्याचा तीन दशकात प्रयन्त झाला नाही असे संशोधना दरम्यान आढळून येते.

– सामनाच्या अग्रलेखात जे प्रसिद्ध होते ती शिवसेनेची भूमिका असते. त्यामुळे सामनामधील अग्रलेखाला राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रे व टी. व्ही. चॅनेलवरून इतर वृत्तपत्रांपेक्षा सर्वाधिक प्रसिद्धी मिळते.

– सामना हा रोज १० ते १२ पानी असतो. इतर प्रमुख मराठी वृत्तपत्र १२ ते १८ पानी आहेत. राज्य सरकार व मुबई महापालिका व अन्यत्र शिवसेना सत्तेत असूनही सामना हे मोठे दैनिक होऊ शकले नाही.

– राजकारणी, पत्रकार, नोकरशहा हे सामना वाचतात. शिवसेनेची भूमिका काय आहे हे कळावे हा त्यामागचा हेतू असतो. महाराष्ट्रात अन्य राजकीय पक्षांना प्रभावी प्रचाराची वृत्तपत्रे नाहीत म्हणून त्यांची फारशी दखल घेतली जात नाही.

– सकाळ हे शरद पवार कुटुंबीयांची मालकी असणारे वृत्तपत्र असले तरी पवार काय म्हणतात हे समजावे म्हणून लोक सकाळ वाचत नाहीत.

– प्रहार हे नारायण राणे कुटुंबीयांची मालकी असणारे वृत्तपत्र आहे. राणे हे आक्रमक राजकारणी व शिवसेना विरोधी असल्याने राणेंची भूमिका काय, यासाठी प्रहार वाचला जातो. मुंबईतील कोकणी माणूस हा प्रहाराचा वाचक आहे.

– सामनामध्ये शिवसेना शाखा व संघटना काय काम करते व पक्षीय घडामोडींच्या बातम्या फारच कमी दिसतात. रक्तदान शिबीर, शिवजयंती, मतदार नोंदणी, सदस्य नोंदणी, मोफत धन्य वाटप, वैद्यकीय तपासणी, स्वस्त दारात रवा, मैदा, साखर वाटप असे सामाजिक उपक्रम सतत शिवसेना शाखांवर चालू असतात. पण त्याची ठळक किंवा पुरेशी दखल सामनामध्ये घेतलेली दिसून येत नाही.

– सामना हे शिवसेनेचे नव्हे तर ठाकरे परिवाराचे मुखपत्र आहे अशी टीका हल्ली ऐकायला मिळते. हिंदुत्वाचा ज्वलंत पुरस्कार करणारे दैनिक असा सामना बिरुद मिरवतो पण हिंदुत्वासाठी आक्रमक व ठळक बातम्या महाआघाडीचे सरकार आल्यापासून (२०१४) दिसत नाहीत. मुस्लीम नेते, मुस्लीम मंत्री, काँग्रेस व राष्ट्रादीचे नेते त्यांची भाषणे, मुलाखती, प्रतिक्रिया यांना सामनातून चांगली प्रसिद्धी दिली जात आहे. त्यामुळेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे त्यांच्या हयातीत असणारा सामना आता दिसत नाही, अशा प्रतिक्रिया संशोधकाला संशोधन दरम्यान मिळाल्या.

– सामना १९८९ मध्ये सुरु झाला पण शिवसेनेचे कधीही १०० आमदार निवडून आलेले नाहीत. शिवसेनेचे सर्वाधिक ७३ आमदार महाराष्ट्र विधानसभेत निवडून आले होते. २०१४ मध्ये भाजपबरोबर युती तुटल्याने शिवसेनेने स्वबळावर निवडणूक लढवली तेव्हा ६३ आमदार निवडून आले. २०१९ मध्ये भाजप बरोबर युती करूनही शिवसेनेचे ५६ आमदार निवडून आले.

– पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पहिल्या कारकीर्दीत शिवसेना व सामना मोदींचे गुणगान गात असे. अयोध्येत राम मंदिर उभे राहायचे तर देशाला मोदीच हवेत, ही सेने

सामनाची भूमिका होती. २०१९ मध्ये महाआघाडी स्थापनेपासून भाजप व मोदी हे सेनेचे आणि सामनाचे कट्टर राजकीय शत्रू बनलेअसे आढळून येते.

– महाआधाडी सरकारमध्ये मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आहेत. तर सामनामधून काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेसला प्रसिद्धी मिळत आहे.

– सुरवातीपासून सामना सत्ताधारी पक्षांची एखादी भूमिका पटली नाही तर आक्रमक भूमिका मांडत असे. मंध्यंतरीच्या काळात भाजपबरोबर युतीत असतानाही सामना मधील बरेच अग्रलेख भाजप विरोधात दिसून येतात. पण महाविकास आघाडी सरकार आल्यापासून सामनामध्ये केवळ भाजप विरुद्ध मत मांडण्यात येतात. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या विरोधात कधीच सामनामध्ये कुठलाच उल्लेख होत नाही. ह्याला सामनाचे बदलते रूप असेही म्हणता येईल.

– राज्यात व केन्द्रात भाजपला सतत आक्रमक विरोध करायचा तसेच मोदी –शहा आणि राज्यातील भाजप नेत्यांवर सतत टीका करायची, हे सामनाचे धोरण आहे. शिवसेनेने भाजपकडे जाण्याचे दोर कापून टाकले आहेत हे सामनामधील वृत्तांत, लेख व अग्रलेखांतून स्पष्ट होते.

## ५.५ गृहीतक आणि उद्दिष्ट यांची पूर्तता:

### ५.५.१ संशोधनात मांडलेली उद्दिष्ट यांची पूर्तता पुढीलप्रमाणे

शिवसेना या राजकीय पक्षाची भूमिका दैनिक सामनामध्ये स्पष्टपणे प्रतिबिंबित होते हे प्रकरण १, ४ व ५ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

शिवसेनेची भूमिका सामनामधून सर्व सामान्यांना पर्यंत पाहोचते हे प्रकरण ४ व ५ मध्ये दिसून येते.

सामना हे वृत्तपत्र शिवसेनेच्या पदाधिका–यांना वेळोवेळी योगदान करत असते हे प्रकरण १, ४ व ५ यामध्ये दिसून येते.

सामनामध्ये छापून येणार अग्रलेख यामधून पक्षाशी भूमिका स्पष्ट होत असते व सामना हे पक्षाच्या भूमिकेला पूरक आहे असे प्रकरण १, ४ व ५ मध्ये दिसून येते.

### ५.५.२ संशोधकाने मांडलेली गृहीतक यांचा तपशील खालीलप्रमाणे:

संशोधकाने केलेल्या संशोधनामधून असे दिसून येते कि महाराष्ट्र राज्य मध्ये राजकीय पक्षाचे सामना हे एकमेव दैनिक आहे. सदर खुलासा प्रकरण १, २, ४ आणि ५ मध्ये दिसून येतो.

शिवसेनेच्या वाटचालीत सामनाचे योगदान महत्व पूर्ण आहे हे प्रकरण १, ४ आणि ५ मध्ये दिसून येते.

ह्सामनातील बातम्या, व्यंगचित्रे आणि अग्रलेख यामध्ये शिवसेनेची भूमिका स्पष्टपणे दिसून येते हे प्रकरण १, ४ आणि ५ मध्ये झालेल्या संशोधन अभ्यासात दिसून येते.

वरील दिलेल्या स्पष्टीकरणावरून असे म्हणता येईल कि संशोधनासाठी मांडलेली गृहीतके व उद्दीष्टे यांची संशोधनात पूर्तता करण्यात आली आहे.

## ५.६ पुढील संशोधनाची दिशा

इतर संशोधकांसाठी संशोधकाने मांडलेल्या पुढील संशोधनाची दिशा खालीलप्रमाणे:

- महाराष्ट्रातील विविध मराठी वृत्तपत्रांतील संपादकीय अग्रलेखांचा अभ्यास.
- विविध मराठी वृत्तपत्रांतील सदारांचे वैशिष्ट व अभ्यास.

## ५.७ सारांश:

सदर प्रकरणात संशोधकाने वितरण करून प्राप्त झालेल्या ५८६ प्रश्नावलींचे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. तसेच निवडक शिवसेनेचे पदाधिकारी, काही ज्येष्ठ संपादक आणि पत्रकार यांच्या मुलाखतीतून संशोधकाने काढलेले निष्कर्ष सादर करण्यात आले आहेत. तसेच संशोधकाने सामनाचे बदलते स्वरूप दर्शविणारे काही निवडक अग्रलेख यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. संशोधनासाठी मांडलेली गृहीतके व उद्दीष्टे यांची पूर्तता करण्यात आली असून त्याच तपशील सादर प्रकरणात देण्यात आला आहे. इतर संशोधकांसाठी पुढील संशोधनाच्या दिशाही सदर प्रकरणात नमूद करण्यात आल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**


१. आगलावे, प्रदीप (२००३): संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकशन,.

२. कऱ्हाडे, बी. एम., (२००४): सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर : पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स,.

३. खेडेकर, संतोष आणि गोखले, अरविंद (२०१३): मराठी भाषक वर्तमानपत्रांच्या जिल्हा आवृत्यांची उपयुक्तता: अभ्यासासाठी निवडलेली वृत्तपत्रे– केसरी, लोकसत्ता, सकाळ, लोकमत व पुण्यनगरी (विशेष संदर्भ: अहमदनगर जिल्हा २००८–२०१३). अप्रकाशित संशोधन प्रबंध. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. २६४ पृष्ठ

४. घोलप, उर्मिला आणि शेळके रघुनाथ (२०१९) २० व्या शतकातील नवाकाळ वृत्तपत्राचे सामाजिक आर्थिक आणि राजकीय योगदान. Available at https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/315446/6/06_ chapter% 201. pdf. Viewed on 10/02/2019.

५. टिळक, दीपक आणि टिळक गीताली (२०१९): आधुनिक वृत्तपत्र व्यवस्थापन. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. पृष्ठ ९६.

६. ठाकरे, बाळ (सामना १९८९, २३ जानेवारी): ज्वलंत हिंदुत्वाचा, पुरस्कार करणारे एकमेव दैनिक. पहिला अग्रलेख वर्षे १, अंक १

७. ठाकरे, बाळ के. (२०१२) : फटकारे. प्रबोधन प्रकाशन, मुंबई २५७ पृष्ठ

८. ठाकूर, योगेंद्र(): सत्तासंग्राम, महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची वाटचाल १९६०–२०१९. अमोद प्रकाशन, मुंबई

९. पाटील, जगन्नाथ आणि टिळक दीपक (२०११): आधुनीक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम (१९८५ ते २००५) –

विशेष अभ्यासः स्व. राजीव गांधी यांचा कालखंड. अप्रकाशित शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ३६० पृष्ठ.

१०. पुरंदरे, वैभव (२०१२): बाळ ठाकरे आणि शिवसेनेचा उदय (संजय तांबट (अनुवाद). मंजुळ पब्लिशिंग हाऊस. भोपाळ २९९ पृष्ठ

११. माडखोलकर, ग. म्या. (२, जानेवारी १९६९): 'तरुण भारताचे सिंहावलोकन'. तरुण भारत – नागपूर, , पृष्ठ, २

१२. मास्तुद प्रवीण आणि पाटील जगन्नाथ (२०२१): मराठी भाषिक वृत्तपत्रातून प्रकाशित होणा–या व्यंग चित्र सदरच्या संशोधनातून प्रसारित होणा–या मूल्यांचा वाचकांवर होणा–या परिणामाचा अभ्यास. अप्रकाशित संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४४० पृष्ठ

१३. मोरे हेमंत आणि कुलकर्णी संतोष (२०१३) वृत्तपत्रांच्या विकासकामांवरील प्रभाव, विशेष संदर्भ– सांगली जिल्ह्यातील गेल्या दहा वर्षातील विकास कामे ( कालावधी– १९९६ ते २००६). अप्रकाशित संशोधन प्रबंध. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ३०५ पृष्ठ

१४. राऊत, संजय (१९९२): ठाकरी

१५. रत्नपारखी श्यामसुंदर आणि टिळक दीपक (२०१३): वृत्तपत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्व (मराठवाड्यातील निवडक वृत्तसंस्थांचा अभ्यास, २०००–२०१०). अप्रकाशित संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ५५१ पृष्ठ

१६. लेले, रा के (२००४): मराठी वृत्तपत्रांचा इतिहास. कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे. ११११ पृष्ठ.

१७. सामंत, विजय य. आणि प्रधान हर्षल (२०१६): सुवर्ण महोत्सवी शिवसेना– ५० वर्षांची घोडदौड. श्री समर्थ प्रकाशन. मुंबई. ४०८ पृष्ठ

१८. Bulla, David W. "Party press era". Encyclopedia Britannica, 29 Dec. 2015, https://www.britannica.com/topic/party-press-era. Accessed 1 October 2021.

१९. Chandrika (nd): Available at https://en.wikipedia.org/wiki/ Chandrika_newspaper. Viewed on 10/06/2019.

२०. Dar, S. K. (1948): Report of the Linguistic Provinces Commission, 1948. Available at: https://indianculture.gov.in/rep ort-linguistic-provinces-commission-1948.Viewed on 10/12/2020.

२१. Eliasson, Par (2016): Shivsena, Saamana and minorities. A study of Political rhetoric in an Indian Hindu nationalist and Marathi regionalist newspaper. Uppasala University, Department of Linguistics and Philology. Available at: http://www.diva-portal.org/smash/get/diva2:1330219/FULLTEXT01.pdf. Viewed on 14/07/2019.

२२. Gatkal, Akshay (2021): Which newspapers support which political parties in India? Available at: https://www.quora.com/Which-newspapers-support-which-political-party-in-India. Viewed on 13/12/2021.

२३. Gerber, Alan S., Dean Karlan, and Daniel Bergan (2009): "Does the Media Matter? A Field Experiment Measuring the Effect of Newspapers on Voting Behaviour and Political Opinions." American Economic Journal: Applied Economics 1(2): 35-52. Available at: https://www.povertyactionlab.org/ evaluation/effect-media-voting-behavior-and-political-opinions-united-states.
Viewed on 22/12/2021.

२४. Government of Maharashtra (1955): Report of States Reorganisation Commission: Available at: https://www.mha. gov.in/sites/default/files/State%20Reorganisation%20 Commisison %20R> eport%20of%201955_270614.pdf. Viewed on 10/12/2020.

२५. Guha, Biwajeet (2012): Multimedia communication and journalism research. Kanishka Publishers, distributors, New Delhi. 276p.

२६. Hebar, Nistula (2015): Is Organiser anything more than a mouthpiece of RSS? https://economictimes.indiatimes.com/news/politics-and-nation/is-organiser-anything-more-than-a-mouthpiece-of-rss/articleshow/47322697.cms. Viewed on 14/13/2021.

२७. Hjarvard, Stig (2010): The views of the news: The role of political newspapers in a changing media landscape. Northern Lights 8(1):25-48. Available at: https://www.researchgate.net /publication/233571359_The_views_of_the_ news_the_role_of_political_newspapers_in_a_changing_media_landscape. View ed on 14/07/2019.

२८. Hutasuhut, Masline W. and Ngenget, Indiana (2017): The Role of Newspaper as Political Marketing Tool during Indonesian Presidential Election of 2014. Available from: https://www.researchgate.net/ publication/323396792_The_ Role_ of_Newspaper_as_Political_Marketing_Tool_during_ Indnesian_ Presidential_ Election _of_2014. Viewed on 14/07/2019.

२९. InMarathi.com (2021): Available at: https:// www.inmarathi.com/127073/story-about-saamana-news-paper/. Viewed on 12/01/2022.

३०. Kashikar, Vasundhara, Sathaye, Keshav and Tilak Geetal ( 2020): Communication theory and Practice. Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. Pages: 152.

३१. Keisham, Sangita Devi and Lahiri, Ramansu (2004): Role of local dailies of Manipur in dissemination of information. Available at https:// shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/39618. Viewed on 14/07/2019.

३२. Khalid, Malik Zahra and Ahmed, Aaliya (2014): A Snapshot of Role of Newspapers in the Contemporary Newspeak. IOSR Journal of Humanities and Social Science. 19 (5). Pp 6-11.

३३. Krejcie and Morgan (1970): Educational and psychological measurement. Available at: https://www.kenpro.org/sample-size-determination-using-krejcie-and-morgan-table/. Viewed on 10/12/ 2019.

३४. Kothari, C. R. (2004): Research Methodology. New Age (P) ltd. New Delhi. Pp: 401.

३५. Matthew Gentzkow, Matthew, Petek, Nathan and Shapiro, Jesse M. (2014): Do Newspapers Serve the State? Incumbent Party Influence on the US Press, 1869-1928. Available at https://www.brown.edu/Research/Shapiro/pdfs/PoliticalInfluence. pdf. Viewed on 10/06/2021.

३६. Menon, Krishna (2010): Research Methods for media and cultural studies. Manglam Publications. New Delhi. 309p.

३७. Mone, Geetali and Dixit, M. C. (2011): Role of free circulation of optimum newspaper management (with special reference to Marathi newspapers in Pune 2002 to 2009). Unpublished Ph D thesis, Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. 181p.

३८. Munshi, Suhas (2017): 70 years of uber Hindutva on cheap paper: the story of RSS Organiser. Available at: http://www. catchnews.com/politics-news/70-years-of-uber-hindutva-on-cheap-paper-the-story-of-rss-organiser-147153730 9. html

३९. News 18 (2021): JD(U) Launches Monthly Mouthpiece 'Sandhaan', First Major Political Party in Bihar to Do So. Available at: https://www.news18.com/news/ politics/jdu-launches-monthly-

mouthpiece-sandhaan-first-major-political-party-in-bihar-to-do-so-3340082.html. Viewed on 10/11/2019.

४०. Patil, Mahesh and Tilak, Deepak (2016): Study the role of newspapers in improving financial literacy in Navi Mumbai. Unpublished Ph D thesis. Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. 214p.

४१. Phadke, Manasi (2020): Journey of Bal Thackarey's Saamana-from Shivsena's daily newspaper to newsmaker. Available at: https://theprint.in/statedraft/ journey-of-bal-thackerays-saamana-from-shiv-senas-daily-newspaper-to-new smaker/476437/. Viewed on 14/07/2019.

४२. Puglisi, Riccardo (2011): Being The New York Times: the Political Behaviour of a Newspaper. The B.E. Journal of Economic Analysis & Policy, 11(1). Available on: https://www.researchgate.net/publication/227377834_Being_ The_ New_York_Times_ the_Political_Behaviour_of_a_New spaper. Viewed on 14/07/2019.

४३. Rawal, Chandrakant N. and Rao, A. B. (1995): An analytical study of the newspaper industry in Pune City during the period 1982 to 1992.Available at https://shodhganga.inflibnet.ac./bitstream/ 10603/157858/6/05_chapt er%201. pdf. Viewed on 10/02/2019.

४४. Santo, Paula Espírito and Costa, Bruno (2016): Party Newspapers Perspectives and Choices: A Comparative Content Analysis View. Available at: https://journals.sagepub.com/doi/full/10.1177/21 58244016640 859. Viewed on 14/07/2019.

४५. Sarkar, Arindam and Pandey, Gyan Prakash (2017): Press and Social Change A Study of Language Newspapers in Silchar Town of Assam. Available at htt ps://shodhganga .inflibnet.ac.in /handle/10603/293252. Viewed on 14/07/2019.

४६. Sarkar, Rita (2011): Media ownership: research and regulation. Arise Publishers and distributors. New Delhi. 269p.

४७. Shah, Rajula (2016): Trajectories in the Construction of ‘Maharashtrian’ Identity. Journal of emerging technologies and innovative research. 5(8). Pp 238-245. Available at https://www.jetir.org/papers/JETIR1808931.pdf. Viewed on 10/12/2021.

४८. Singh, Anveshan (2021): The "Mouthpiece' as a communication tools of Indian political parties. Research Review International Journal of Multidisciplinary. 6(8). Pp 25-30. Available at:https://rrjournals.com/wp-content/u{loads/2021/08/25-30_RRIJM2021060800 7.pdf. Viewed on 11/08/2019.

४९. Singh, Shivam (nd): Indian newspapers and being political biasing. Available at https://themagzone.com/india-newspapers-political-biasing/. Viewed on 28/ 12/2021.

५०. Thakur, Aditya (2013): Top 7 newspapers known to favour specific political parties in India. Available at: http://hillpost.in/2013 /08/top-7-newspapers-known-to-favor-specific-political-parties-in-india/94800/. Viewed on 14/07/201 9.

५१. Veekshanam (nd): Available at: https://veekshanam.com/about/. Viewed on 10/06/2019.

५२. Vijapurkar, Mahesh (2012): The importance of Bal Thackeray's Dainik Saamana. Available at: https://www.irstpost.com /politics/the-importance-of-bal-thackerays-dainik-saamana-531496. html. Viewed on 12/08/2021.

## परिशिष्ये –१

## प्रश्नावली

**सामान्य प्रश्न**

**प्रश्नावली भरणा–याचे नाव :–** ------------------------------

**पत्ता :–** ----------------------------------------

**व्यवसाय :–** --------------------------------------

**मोबाइल क्रमांक :–** ------------------------------------

**लिंग :** पुरुष ☐ महिला ☐

**शिक्षण :** दहावीपर्यंत ☐ पदवीपर्यंत ☐ पदव्युत्तर ☐

**शालेय शिक्षण कुठे झाले?**

शहरात ☐ ग्रामीण भागात ☐

**महाविद्यालयीन शिक्षण कुठे झाले?**

शहरात ☐ ग्रामीण भागात ☐

**रोज किती वृत्तपत्र वाचता?**

एक ☐ दोन ☐ तीन ☐

**वृत्तपत्र कोठे वाचता?**

घरी ☐ प्रवासात ☐ कार्यालयात ☐

**वृत्तपत्र किती वेळ वाचता?**

१५ मिनिटे ☐ ३० मिनिटे ☐ ६० मिनिटांपर्यंत ☐

**वृत्तपत्र कशासाठी वाचता?**

अग्रलेख/ संपादकीय ☐

राजकीय बातम्या ☐

मनोरंजन ☐

क्रीडा ☐

सर्वसाधारण वाचन ☐

शिक्षण / करिअर ☐

**वाचनाला/पाहायला प्राधान्य कशाला?**

वृत्तपत्र ☐ दूरदर्शन (टेलिव्हिजन) ☐ इंटरनेट ☐

**राजकीय प्रश्न**

**'सामना' कशासाठी वाचता?**

शिवसेनेचे मुखपत्र ☐ वृत्तपत्र ☐

**'सामना' हे वृत्तपत्र अन्य पक्षांच्या बातम्यांना पुरेसे स्थान देते का?**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**शिवसेनेची धोरणे व उद्दिष्टे लोकांपर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र (मुखपत्र) यशस्वी झाले आहे.**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**शिवसेनेला आपला जनाधार वाढविण्यासाठी 'सामना' या वृत्तपत्राचा उपयोग झाला आहे.**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**’सामना’ दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, शिवसेनेची भूमिका सत्ताधा–यांपर्यंत पोहोचली आहे?**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**‘सामना’ दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, विशेष लेख, अग्रलेख हे शिवसेनेच्या धोरणांशी सुसंगत असतात का?**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**पक्षाची ध्येय, धोरणे, भूमिका, घडामोडी, पक्षाचे आदेश समजावून घेण्यासाठी शिवसैनिकांना सामना या वृत्तपत्राचा उपयोग होतो.**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**सामनामध्ये प्रसिद्ध होणा–या मजकुरात शिवसेना संदर्भातील बातम्यांचे प्रमाण पक्षाच्या दृष्टीने योग्य आहे.**

पुरेशा ☐ अपु–या ☐ मध्यम ☐ सांगता येत नाही ☐

**शिवसेना पक्षाचे सार्वजनिक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यात सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले आहे.**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न**

**मराठी माणसाची अस्मिता ही सामनाची ओळख आहे का?**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**'हिंदुत्वाचा पुरस्कार' ही 'सामनाची' ओळख आहे का?**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

**मराठी प्रादेशिक अस्मिता (शिवसेनेची भूमिका) आणि हिंदुत्वाची भावना जनमानसात रुजवण्यासाठी सामना हे वृत्तपत्र यशस्वी झाले.**

होय ☐ नाही ☐ सांगता येत नाही ☐

## परिशिष्ये –२

### मुलाखतदारांची नावे:–

| अ.क्र. | मुलाखतदारांची नावे |
|---|---|
| १ | श्री. सुभाष देसाई |
| २ | श्री. संजय राऊत |
| ३ | श्री. महेश पांचाळ |
| ४ | श्री. सतीश पाटणकर |
| ५ | श्री.विनायक सुतार |
| ६ | श्री. देवदास मटाले |
| ७ | डॉ. मिलिंद शेजवळ |
| ८ | श्री. मनोहर विश्वासराव |
| ९ | श्री. अजय वैद्य |
| १० | श्री. अरुण बेतकेकर |
| ११ | श्री. अरुण सावंत |
| १२ | श्री. राजू वेर्णेकर |
| १३ | श्री. किरण हेगडे |
| १४ | श्री. प्रकाश मोकाशी |
| १५ | श्री. रविंद्र बिवलकर |
| १६ | सौ. पौर्णिमा नार्वेकर |
| १७ | श्री. अरविंद कुलकर्णी |
| १८ | श्री. नरेंद्र वाबळे |
| १९ | श्री. प्रकाश जोशी |
| २० | श्री. प्रकाश कुलकर्णी |
| २१ | वैजयंती आपटे |
| २२ | श्री. प्रमोद तेंडुलकर |
| २३ | श्री. दीपक परब |
| २४ | श्री. योगेश त्रिवेदी |
| २५ | श्री. राकेश जाधव |
| २६ | श्री. मनोज जोशी |
| २७ | श्री. दीपक मोहिते |

| | |
|---|---|
| २८ | श्री. अजित राऊत |
| २९ | श्री. सुनील सपकाळ |
| ३० | श्री. रवींद्र पांचाळ |
| ३१ | श्री. शिशिर शिंदे |
| ३२ | श्री. जयंत होवाळ |
| ३३ | श्री. दिनेश गुणे |